शंसन्ति सुहृदः कर्मचोदनाम् ४५ दानं यज्ञाः सतां पूजा वेदधारणमार्जवम् । एष धर्मः परो राजन्फलवान्प्रेत्य चेह च ४६ एष नार्थविहीनेन शक्यो राजन्निषेवितुम् । अखिलाः पुरुषव्याघ्र गुणाः स्युर्यद्यपीतरे ४७ धर्ममूलं जगद्राजन्नान्यद्धर्माद्विशिष्यते । धर्मश्चार्थेन महता शक्यो राजन्निषेवितुम् ४८ न चार्थो भैक्ष्यचर्येण नापि क्लैब्येन कर्हिचित् । वेत्तुं शक्यः सदा राजन्केवलं धर्मबुद्धिना ४९ प्रतिषिद्धा हि ते याञ्चा यया सिध्यति वै द्विजः । तेजसैवार्थलिप्सायां यतस्व पुरुषर्षभ ५० भैक्ष्यचर्या न विहिता न च विट्शूद्रजीविका । क्षत्रियस्य विशेषेण धर्मस्तु बलमौरसम् ५१ स्वधर्मं प्रतिपद्यस्व जहि शत्रून्समागतान् । धार्तराष्ट्रवनं पार्थ मया पार्थेन नाशय ५२ उदारमेव विद्वांसो धर्मं प्राहुर्मनीषिणः । उदारं प्रतिपद्यस्व नावरे स्थातुमर्हसि ५३ अनुबुध्यस्व राजेन्द्र वेत्थ धर्मान्सनातनान् । क्रूरकर्माभिजातोऽसि यस्मादुद्विजते जनः ५४ प्रजापालनसं-

---

जाणीत असून तसें तुला सांगतही आहेत ४५. हे राजा, दान, यज्ञ, संतांचें पूजन, वेदपठन आणि सरळ वर्तन हाच सर्वोत्कृष्ट धर्म असून इहलोकीं व परलोकीं फलद्रूप होणारा आहे ४६. परंतु, हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, इतर सर्व गोष्टी जरी असल्या तरी अर्थहीन पुरुषाच्या हातून ह्या धर्माचें आचरण होणें शक्य नाहीं ४७. हे राजा, जगत् हें धर्माच्याच आधारावर असल्यामुळें धर्मापेक्षां कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नाहीं. परंतु, हे राजा, धर्माचें आचरण विपुल अर्थाच्याच योगानें होणें शक्य आहे ४८. हे राजा, (धर्माचरणाला मुख्य साधन असलेला) अर्थ भिक्षावृत्तीनें, क्लीबवृत्तीनें अथवा केवल धर्मबुद्धि धरून प्राप्त होणें शक्य नाहीं ४९. (याचना आणि स्वसामर्थ्य हीं दोन अर्थप्राप्तीचीं साधनें आहेत. पैकीं) जिच्या योगानें ब्राह्मणाला आपला (अर्थप्राप्तीचा) उद्देश सिद्धीस नेतां येतो ती याचना तुला निषिद्ध आहे. करितां, सामर्थ्याच्याच योगानें, हे पुरुषश्रेष्ठा, तूं अर्थप्राप्तीविषयीं यत्न कर ५०. क्षत्रियाला भिक्षावृत्ति विहित नसून वैश्य आणि शूद्र ह्यांची वृत्तिही(ह्मणजे अर्थात् व्यापार अथवा सेवाही) विहित नाहीं. फक्त स्वतःचें सामर्थ्यच विशेषतः उपजीविकेचें साधन ह्मणून विहित आहे ५१. करितां, हे कुंतीपुत्रा, स्वधर्माचें अवलंबन करून प्राप्त झालेल्या शत्रूचा वध कर. सारांश, मी आणि अर्जुन ह्यांच्या योगानें धृतराष्ट्रपुत्रांचें संपूर्ण वनच तूं नाहींसें कर ५२. (होतां होईल तों स्वजातीला विहित असलेल्या) मुख्य धर्माचेंच अवलंबन करावें असें ज्ञानी पुरुषांनीं ह्मटलें आहे. करितां, तूं मुख्य कल्पाचेंच अवलंबन कर. अनुकल्पाचा आश्रय करणें तुला योग्य नाहीं ५३. हे राजाधि-

भूतं फलं तव न गर्हितम् । एष वै विहितो राजन्धात्रा धर्मः सनातनः ५५ तस्मादपचितः पार्थ लोके हास्यं गमिष्यसि । स्वधर्माद्धि मनुष्याणां चलनं न प्रशस्यते ५६ स क्षात्रं हृदयं कृत्वा त्यक्त्वेदं शिथिलं मनः । वीर्यमास्थाय कौरव्य धुरमुद्वह धुर्यवत् ५७ न हि केवलधर्मात्मा पृथिवीं जातु कश्चन । पार्थिवो व्यजयद्राजन्न भूतिं न पुनः श्रियम् ५८ जिह्वां दत्त्वा बहूनां हि क्षुद्राणां पापचेतसाम् । निकृत्या लभते राज्यमाहारमिव शल्यकः ५९ भ्रातरः पूर्वजाताश्च सुसमृद्धाश्च सर्वशः । निकृत्या निर्जिता देवैरसुराः पार्थिवर्षभ ६० एवं बलवतः सर्वमिति बुद्ध्वा महीपते । जहि शत्रून्महाबाहो परां निकृतिमास्थितः ६१ न ह्यर्जुनसमः कश्चिद्युधि योद्धा धनुर्धरः । भविता वा पुमान्कश्चिन्मत्समो वा गदाधरः ६२ सत्त्वेन कुरुते युद्धं राजन्नबलवानपि । न प्रमाणेन नोत्साहात्सत्त्वस्थो भव

राज, तूं अजून तरी उमज. सनातन धर्म तूं जाणीत आहेस. अरे, ज्याच्या पासून लोकांना भीति वाटते असा क्रूरकर्मीच तूं जन्मास आलेला आहेस. (तात्पर्य, हिंसारूप क्षात्र कर्म हा तुझा जातिधर्मच असल्यामुळें हिंसा करून राज्य परत मिळविण्यांत तुला दोष लागणार नाहीं) ५४. (हिंसा करून राज्य मिळविल्यानंतर) प्रजापालनापासून तुला प्राप्त होणारें फल निंद्य मानिलेलें नाहीं. कारण, हे राजा, हा तुझा विधात्यानें ठरविलेला सनातन धर्मच आहे ५५. तेव्हां त्या धर्मापासून तूं भ्रष्ट झालास तर, हे कुंतीपुत्रा, लोकामध्यें तुझा उपहास होईल. कारण, मनुष्यांचें स्वधर्मापासून भ्रष्ट होणें प्रशस्त नाहीं ५६. ह्याकरितां, हा भित्रेपणाचा विचार सोडून देऊन क्षत्रियाला अनुरूप असें आपलें हृदय दृढ कर आणि वीर्याचें अवलंबन करून, हे कुरुवंशजश्रेष्ठा, धुरीणाप्रमाणें राज्यभार वहा ५७. हे राजा, केवल धर्मात्मा बनून कोणत्याही राजाला पृथ्वी, संपत्ति अथवा राज्यलक्ष्मी कधींही प्राप्त झालेली नाहीं ५८. ज्याप्रमाणें आपली जीभ बाहेर काढून साळई आहार प्राप्त करून घेते (ह्मणजे जिभेवर बसलेले क्षुद्र जंतु गट्ट करून टाकिते) त्याचप्रमाणें जीभ बाहेर काढून (ह्मणजे वचन देऊन) नीच आणि दुष्टबुद्धि अशा शत्रूंपासून राज्य हरण करावें ५९. हे नृपश्रेष्ठा, उत्तम समृद्धींनीं युक्त असें आपले ज्येष्ठ भ्राते दैत्य देवांनीं सर्वस्वी कपटानेंच जिंकिलेले आहेत ६०. तेव्हां, सर्व ह्याप्रमाणेंच आहे असें समजून, हे महापराक्रमी भूपते, चांगल्या कपटाचा आश्रय करून तूं शत्रूंचा वध कर ६१. अरे, युद्धामध्यें अर्जुनासारिखा धनुर्धारी योद्धा आणि माझ्यासारिखा गदाधारी पुरुष आजमितीलाही कोणी नाहीं व पुढेंही कोणी होणार नाहीं ६२. हे राजा, महाबलाढ्य जरी पुरुष असला तरी धैर्याच्या योगानें

पाण्डव ६३ सत्त्वं हि मूलमर्थस्य वितथं यदतोन्यथा। न तु प्रसक्तं भवति वृक्षच्छायेव हैमनी ६४ अर्थत्यागोपि कार्यः स्यादर्थं श्रेयांसमिच्छता। बीजौपम्येन कौन्तेय मा ते भूदत्र संशयः ६५ अर्थेन तु समोनर्थो यत्र लभ्येत नोदयः। न तत्र विपणः कार्यः खरकण्डूयनं हि तत् ६६ एवमेव मनुष्येन्द्र धर्मं त्यक्त्वाल्पकं नरः। बृहन्तं धर्ममाप्नोति स बुद्ध इति निश्चितम् ६७ अमित्रं मित्रसंपन्नं मित्रैर्भिन्दति पण्डिताः। भिन्नैर्मित्रैः परित्यक्तं युवानं कुरुते वशम् ६८ सत्त्वेन कुरुते युद्धं राजन्नबलवानपि। नोद्यमेन न होत्राभिः सर्वाः स्वीकुरुते प्रजाः ६९ सर्वथा संहतैरेव दुर्बलैर्बलवानपि। अमित्रः शक्यते हन्तुं मधुहा भ्रमरैरिव ७० यथा राजन्प्रजाः

तो युद्ध करीत असतो. उत्साहावर अथवा सैन्याच्या संख्येवर अवलंबून तो युद्ध करीत नाहीं. तस्मात्, हे पांडुपुत्रा, तूं धैर्याचें अवलंबन कर ६३. धैर्य हेंच अर्थप्राप्तीचें मुख्य कारण असून इतर सर्व अर्थप्राप्तीला व्यर्थ होणार आहे. कारण, धैर्यरहित असें कोणतेंही इतर साधन हेमंत ऋतूंतील वृक्षाच्या छायेप्रमाणें उपयोगीं पडत नाहीं ६४. हे कुंतीपुत्रा, विपुल अर्थ संपादन करण्याची इच्छा करणाऱ्यानें अर्थत्यागही करणें योग्य आहे. पण तो अर्थत्याग बीजसादृश्यानेंच केला पाहिजे; याबद्दल तूं मुळींच मनामध्यें संशय आणूं नकोस (तात्पर्य, अनेक पट फलप्राप्ति होणें असल्यास ज्याप्रमाणें जमीनींत बीं टाकिलें जातें त्याचप्रमाणें अनेक पट अर्थप्राप्ति होण्याचा संभव असल्यास त्याकरितां थोडासा अर्थत्यागही करणें योग्य आहे) ६५. परंतु, ज्या ठिकाणीं वृद्धि होण्याचा संभव नसून अर्थाबरोबर अनर्थ मात्र लब्ध होणार आहे त्या ठिकाणीं द्रव्य खर्ची घालूं नये. कारण, तें खर्ची घालण्यापासून कांहीं एक फायदा न होतां गर्दभाला खाजविल्याप्रमाणें उलट तोटा मात्र होणार आहे. (सारांश, ज्याप्रमाणें गर्दभाला खाजविलें असतां स्पर्शदोषामुळें स्नान करण्याचें दुःख प्राप्त होणार असून परलोकींही कांहीं फल प्राप्त होण्याचा संभव नसतां त्याचप्रमाणें अनर्थ मात्र लब्ध होणार आहे अशा ठिकाणी द्रव्य खर्ची घातल्यापासून फक्त दुःख मात्र होत असतें ६६. हे राजा, ह्याचप्रमाणें थोडकासा धर्मत्याग करून जो विपुल धर्म प्राप्त करून घेतो तोच बुद्धिमान् हें निश्चित आहे ६७. शत्रु मित्रांनीं युक्त असल्यास शाहणे लोक मित्रांपासून प्रथम त्याला वेगळा काढितात आणि मित्र भिन्न होऊन त्यांनीं त्याचा त्याग केला ह्मणजे त्या दुर्बल शत्रूला ते आपल्या स्वाधीन करून घेतात ६८. हे राजा, बलहीन पुरुषही उत्साह आणि यज्ञयाग ह्यांवरच अवलंबून न राहतां धैर्यानें युद्ध करून सर्व प्रजा आपल्या ताब्यांत घेतो ६९. (अरे, आतां शत्रूंना जिंकण्याला विलंब लावण्यांत कांहा अर्थ नाहीं

सर्वाः सूर्यः पाति गभस्तिभिः । अत्ति चैव तथैव त्वं सदृशः सवितु-
र्भव ७१ एतच्चापि तपो राजन्पुराणमिति नः श्रुतम् । विधिना पालनं भूमेर्य-
त्कृतं नः पितामहैः ७२ न तथा तपसा राजँल्लोकान्प्राप्नोति क्षत्रियः । यथा
सृष्टेन युद्धेन विजयेनेतरेण वा ७३ अपयात्किल भा सूर्याल्लक्ष्मीश्चन्द्रमस-
स्तथा । इति लोको व्यवसितो दृष्ट्वेमां भवतो व्यथाम् ७४ भवतश्च प्रशंसा-
भिर्निन्दाभिरितरस्य च । कथा युक्ताः परिषदः पृथग्राजन्समागताः ७५
इदमभ्यधिकं राजन्ब्राह्मणाः कुरवश्च ते । समेताः कथयन्तीह मुदिताः
सत्यसंधताम् ७६ यन्न मोहान्न कार्पण्यान्न लोभान्न भयादपि । अनृतं

पांडवांचें राज्य हरण केलें हें नीट झालें नाहीं असें कित्येकांच्या मनांत येत असल्यामुळें जोंपर्यंत त्यांच्या त्यांच्यांत मतभेद आहे तोंपर्यंतच त्यांचा पराजय होण्याचा संभव आहे. त्यांच्यांतील मतभेद कालावधीनें नाहींसा झाल्यावर मग आपण आपलें राज्य युद्ध करून परत घेण्याचें जरी मनामध्यें आणिलें तरी कदाचित् ते आपलाच पराभव करितील. कारण) ज्याप्रमाणें मध काढण्यास आलेल्या पुरुषाचा वध एकत्र जमून दुर्बल मधमाशा करितात त्याचप्रमाणें शत्रु बलाढ्य जरी असला तरी एकत्र जुळलेल्या दुर्बलांच्या हातून त्याचा वध होणें सर्वस्वीं शक्य आहे ७०. हे राजा, ज्याप्रमाणें सूर्य किरणांच्या योगानें रस शोषण करितो आणि त्याच किरणांच्या योगानें वृष्टीच्या द्वारें सर्व प्रजांचें रक्षण करितो त्याचप्रमाणें तूं सूर्यासारिखा हो (ह्मणजे दुर्योधनादि शत्रूंचें आपल्या तेजाच्या योगानें शोषण करून इतर सर्व प्रजांचें परिपालन कर) ७१. हे राजा, शास्त्रांना अनुसरून पृथ्वीचें परिपालन करणें हेंच अनादि (वेद-विहित) तप असें आमच्या ऐकण्यांत आहे व तेंच आमच्या पूर्वजांनीं केलेलें आहे ७२. हे राजा, धर्म ह्मणून विहित असलेल्या युद्धाचें अवलंबन करून त्यांत जय आल्यानें अथवा मरण आल्यानें जसें क्षत्रियाला उत्तम लोक प्राप्त होतात तसें इतर तपाच्या योगानें प्राप्त होत नाहीत ७३. हे तुझें दुःख अवलोकन करून खरोखर सूर्याला सोडून प्रभा आणि त्याचप्रमाणें चंद्राला सोडून शोभा जाईल कीं काय असें लोकांना वाटूं लागलें आहे (सारांश, तुझें दुःख अवलोकन करून सूर्यही दुःखित होऊन निस्तेज होईल व चंद्रही दुःखाच्या योगानें शोभारहित होईल अशी लोकांची अटकळ आहे. कारण, तुझ्यावर लोकांचें प्रेमच फार आहे) ७४. हे राजा, ठिकठिकाणीं वेगवेगळ्या सभा होत असून त्या सभांतून गोष्टी चाललेल्या असतात. परंतु, त्या गोष्टी तुझ्या प्रशंसेनें आणि दुर्योधनाच्या निंदेनें भरलेल्या असतात ७५. शिवाय, हे राजा, ब्राह्मण आणि ते कुरुवंशज हे एकत्र जमून आनंदानें ह्या पृथ्वीवर तुझ्या सत्यप्रतिज्ञ-

किंचिदुक्तं ते न कामान्नार्थकारणात् ७७ यदेनः कुरुते किंचिद्राजा भूमिमवाप्नुवन् । सर्वं तन्नुदते पश्चाद्यज्ञैर्विपुलदक्षिणैः ७८ ब्राह्मणेभ्यो ददद्ग्रामान्गाश्च राजन्सहस्रशः । मुच्यते सर्वपापेभ्यस्तमोभ्य इव चन्द्रमाः ७९ पौरजानपदाः सर्वे प्रायशः कुरुनन्दन । सवृद्धबालसहिताः शंसन्ति त्वां युधिष्ठिर ८० श्वदृतौ क्षीरमासक्तं ब्रह्म वा वृषले यथा । सत्यं स्तेने बलं नार्यां राज्यं दुर्योधने तथा ८१ इति लोके निर्वचनं पुरश्चरति भारत । अपि चैताः स्त्रियो बालाः स्वाध्यायमधिकुर्वते ८२ इमामवस्थां च गते सहास्माभिररिन्दम । हन्त नष्टाः स्म सर्वे वै भवतोपद्रवे सति ८३ स भवान्रथमास्थाय सर्वोपकरणान्वितम् । त्वरमाणोभिनिर्यातु विप्रेभ्योर्थविभावकः ८४ वाचयित्वा द्विजश्रेष्ठानद्यैव गजसाह्वयम् ८५ अस्त्रविद्भिः परिवृतो भ्रातृभिर्दृढधन्विभिः । आशीविषसमैर्वीरैर्मरुद्भिरिव वृत्रहा ८६ अमित्रांस्तेजसा मृद्नन्नसुरानिव वृत्रहा । श्रिय-

---

तेची प्रशंसा करीत असतात ही गोष्ट एक अधिक आहे ७६. कारण, मोह, कार्पण्य, लोभ, भय व काम ह्यांकरितां अथवा अर्थप्राप्तीकरितां तूं कधींही अनृत भाषण केलेलें नाहींस ७७. अरे, पृथ्वी प्राप्त करून घेण्यामध्यें राजाच्या हातून जें पातक घडतें तें सर्व पृथ्वी प्राप्त झाल्यानंतर विपुल दक्षिणांनीं युक्त अशा यज्ञयागांच्या योगानें त्याला नाहींसें करितां येतें ७८. हे राजा, ज्याप्रमाणें चंद्र अंधकारापासून मुक्त होतो त्याचप्रमाणें ब्राह्मणांना हजारों गाई आणि गांव देणारा राजा सर्व पापांपासून मुक्त होतो ७९. हे कुरुनंदना युधिष्ठिरा, (राज्य परत मिळविण्याचा यत्न करण्यास हीच वेळ फार उत्तम आहे. कारण,) हास्तिनपुरांतील आणि देशांतील प्रायः सर्व लोक वृद्धांपासून तो बालांपर्यंत तुझी स्तुति करात आहेत ८०. श्वानचर्मपात्रांत घातलेलें जसें दूध, शूद्राचे ठिकाणीं जसा वेद, चोराचे ठिकाणीं जसें सत्य अथवा स्त्रीचे ठिकाणीं जसें बल तसेंच दुर्योधनाचे ठिकाणीं राज्य होय ८१. अशी तर आजकाल लोकांमध्यें ह्मणच होऊन बसलेली आहे इतकेंच नव्हे परंतु, हे शत्रुदमना, आह्मांसहवर्तमान तुला ही (दुःखद) अवस्था प्राप्त झाल्यापासून स्त्रिया आणि बालक ह्यांमध्यें तर वरील ह्मणीचा उघड उघड पाठच चाललेला असतो. कारण, तुझ्यामुळें राज्यभ्रंश झाल्याकारणानें आमचें जिणें व्यर्थ झालें आहे ८२,८३. करितां, द्विजश्रेष्ठांकडून स्वस्तिवाचन करवून ब्राह्मणांना द्रव्य देण्याकरितां तूं आजच सर्वसाधनसंपन्न अशा रथावर आरूढ होऊन सत्वर हास्तिनपुराकडे जा ८४,८५. सारांश, मरुद्गणांनीं परिवेष्टित असलेल्या इंद्राप्रमाणें महाधनुर्धारी, अस्त्रवेत्ते आणि शत्रूंचा वध करण्यांत सर्पा-

मादत्स्व कौन्तेय धार्तराष्ट्रान्महाबल ८७ न हि गाण्डीवमुक्तानां शराणां गार्ध्रवाससाम् । स्पर्शमाशीविषाभानां मर्त्यः कश्चन संसहेत् ८८ न स वीरो न मातङ्गो न च सोऽश्वोऽस्ति भारत । यः सहेत गदावेगं मम क्रुद्धस्य संयुगे ८९ सृञ्जयैः सह कैकेयैर्वृष्णीनां वृषभेण च । कथंस्विद्युधि कौन्तेय न राज्यं प्राप्नुयामहे ९० शत्रुहस्तगतां राजन्कथंस्विन्नाहरे महीम् । इह यत्नमुपाहृत्य बलेन महतान्वितः ९१ [१३६४] इति श्रीमहाभारते० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि भीमवाक्ये त्रयस्त्रिंशोऽध्यायः॥ ३३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स एवमुक्तस्तु महानुभावः सत्यव्रतो भीमसेनेन राजा । अजातशत्रुस्तदनन्तरं वै धैर्यान्वितो वाक्यमिदं बभाषे १ युधिष्ठिर उवाच ॥ असंशयं भारत सत्यमेतद्यन्मां तुदन्वाक्यशल्यैः क्षिणोषि । न त्वां विगर्हे प्रतिकूलमेव ममानयाद्धि व्यसनं व आगात् २ अहं ह्यक्षानन्वपद्यं जिहीर्षन्राज्यं सराष्ट्रं धृतराष्ट्रस्य पुत्रात् । तन्मां शठः कितवः

प्रमाणें उग्र अशा आपल्या वीर भ्रात्यांनीं परिवेष्टित हो ८६ आणि इंद्र ज्याप्रमाणें दैत्यांचा नाश करितो त्याप्रमाणें तेजाच्या योगानें शत्रचा नाश करीत करीत, हे महाबलाढ्य कुंतीपुत्रा, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनापासून आपलें राज्यवैभव हरण कर ८७. (अरे, राज्यवैभव परत मिळण्याची तुला मुळींच शंका नको. कारण) गृध्र पक्ष्यांच्या पिसाऱ्यांनीं युक्त आणि सर्पाप्रमाणें तीक्ष्ण असे जे गांडीव धनुष्यापासून सुटलेले बाण त्यांचा स्पर्श कोणत्याही मर्त्य जनाला सहन होणें अशक्य आहे ८८. त्याचप्रमाणें, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, युद्धामध्यें मी क्रुद्ध झालों असतां माझ्या गदेचा वेग सहन करणारा योद्धा, अश्व अथवा गज कोणीही नाहीं ८९. हे कुंतीपुत्रा, सृंजय, कैकेय आणि वृष्णिकुलश्रेष्ठ कृष्ण ह्यांचें साहाय्य असतांना युद्धामध्यें आपणांला राज्य प्राप्त होणार नाहीं हें संभवेल तरी कसें ? ९०. सारांश, हे राजा, मोठ्या बलानें युक्त असतांना व चांगल्या यत्नाचें अवलंबन केलें असतांना श ूंच्या हस्तगत झालेली पृथ्वी कशी बरें मला घेतां येणार नाहीं ?९१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं तेहेतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या महानुभाव, अजातशत्रु व सत्यव्रत धर्मराजाला भीमसेन ह्मणाला असतां त्या धैर्यवान् धर्मराजानें त्याला असें उत्तर दिलें १. युधिष्ठिर ह्मणतोः—हे भारता भीमसेना, मला दुःख देण्याच्या इच्छेनें तूं ह्या शब्दरूप बाणप्रहारांच्या द्वारें जें ह्मणत आहेस तें खरें आहे. मी तुला त्याबद्दल दोष देत नाहीं. कारण, माझ्याच अपराधामुळें तुह्मांला हें दुःसह संकट प्राप्त झालें आहे २.

प्रत्यदेवीत्सुयोधनार्थं सुबलस्य पुत्रः ३ महामायः शकुनिः पार्वतीयः सभामध्ये प्रवपन्नक्षपूगान् । अमायिनं मायया प्रत्यजैषीत्ततोपश्यं वृजिनं भीमसेन ४ अक्षांश्च दृष्ट्वा शकुनेर्यथावत्कामानुकूलानयुजो युजश्च । शक्यं नियन्तुमभविष्यदात्मा मन्युस्तु हन्यात्पुरुषस्य धैर्यम् ५ यन्तुं नात्मा शक्यते पौरुषेण मानेन वीर्येण च तात नद्धः । न ते वाचो भीमसेनाभ्यसूये मन्ये तथा तद्भवितव्यमासीत् ६ स नो राजा धृतराष्ट्रस्य पुत्रो न्यपातयद्व्यसने राज्यमिच्छन् । दास्यं च नोगमयद्भीमसेन यत्राभवच्छरणं द्रौपदी नः ७ त्वं चापि तद्वेत्थ धनञ्जयश्च पुनर्द्यूतायागतांस्तां सभां नः । यन्माब्रवीद्धृतराष्ट्रस्य पुत्र एकग्लहार्थं भरतानां समक्षम् ८ वने समा द्वादश राजपुत्र यथाकामं विदितमजातशत्रो । अथापरं चाविदितं चरेथाः सर्वैः सह भ्रातृभिश्छद्मगूढः ९ त्वां चेच्छ्रुत्वा तात तथाचरन्तमवभोत्स्यन्ते

धृतराष्ट्राच्या पुत्रांपासून राष्ट्रांसहवर्तमान राज्याचा अपहार करण्याच्या इच्छेनें मी फांसे हातांत घेतले तेव्हां सुयोधनाकरितां कपटानें द्यूत खेळणाऱ्या सुबलपुत्रानेंच माझ्याशीं द्यूत केलें ३. पर्वतप्रदेशाधिपति महामायावी शकुनीनें अनेक प्रकारचे फांसे टाकून मी निष्कपट असतांना कपटाचें अवलंबन करून मला जिंकिलें आणि त्यामुळें, हे भीमसेना, मला हें दुःख पहावें लागलें ४. बरे अथवा वाईट असे अगदीं हुबेहुब इच्छेप्रमाणें शकुनीला फांसे पडलेले अवलोकन करून पुरुषाचें धैर्य नाहींसे करणारा क्रोध जर मला आला नसतां तर (द्यूत बंद करण्याविषयीं) मला मनोनिग्रह करितां आला असतां. (परंतु, क्रोध आल्यामुळें मनोनिग्रह न होऊन पुढें माझ्या हातून द्यूत झालें) ५. बा भीमसेना, पौरुष, अभिमान आणि वीर्य ह्यांनीं पछाडिलें ह्मणजे आत्मसंयमन करितां येत नाहीं. करितां मी तुझ्या भाषणाचा राग मानीत नाहीं. कारण, त्याप्रमाणें तें भवितव्यच होतें ६. ह्यामुळें त्या राजा धृतराष्ट्रपुत्रानें आपल्या राज्याचा अपहार करण्याची इच्छा धरून आह्मांला संकटांत पाडिलें आणि आमच्याकडून दास्य पत्करविलें. तेव्हां, हे भीमसेना, द्रौपदी आमची रक्षक झाली ७. पुनरपि द्यूताकरितां आपण त्या सभेमध्यें गेल्यावर भरतवंशजांच्या समक्ष सर्वस्वाचा एकच पण करण्याविषयीं धृतराष्ट्रपुत्र जें मला ह्मणाला तें तुला व अर्जुनाला विदितच आहे (तथापि मी तो आणखी, एकदां सांगतों तो धृतराष्ट्रपुत्र मला ह्मणाला) ८ " हे अजातशत्रु राजपुत्रा, (ह्या पणांत पराजित झाल्यास) तूं उघडपणें वनामध्यें बारा वर्षेपर्यंत वास्तव्य करून नंतर एक संवत्सर कोणाच्याही समजण्यांत न येतां सर्व भ्रात्यांसहवर्तमान गुप्त राहून संचार करावा ९ आणि तेराव्या वर्षीं त्याप्रमाणें (गुप्तपणें)

भारतानां चराश्च । अन्यांश्चैरथास्तावतोब्दांस्तथा त्वं निश्चित्य तत्प्रति-
जानीहि पार्थ १० चरैश्चेन्नो विदितः कालमेतं युक्तो राजन्मोहयित्वा
मदीयान् । ब्रवीमि सत्यं कुरुसंसदीह तवैव ता भारत पञ्च नद्यः ११ वयं
चैतद्भारत सर्व एव त्वया जिताः कालमपास्य भोगान् । वसेम इत्याह
पुरा स राजा मध्ये कुरूणां स मयोक्तस्तथेति १२ तत्र द्यूतमभवन्नो
जघन्यं तस्मिञ्जिताः प्रव्रजिताश्च सर्वे । इत्थं तु देशाननुसंचरामो वनानि
कृच्छ्राणि च कृच्छ्ररूपाः १३ सुयोधनश्चापि न शान्तिमिच्छन्भूयः स
मन्योर्वशमन्वगच्छत् । उद्योजयामास कुरूंश्च सर्वान्ये चास्य केचिद्वश-
मन्वगच्छन् १४ तं साधिमास्थाय मतां सकाशे को नाम जह्यादिह राज्य-
हेतोः । आर्यस्य मन्ये मरणाद्गरीयो यद्धर्ममुत्क्रम्य महीं प्रशासेत् १५ तदैव
चेद्वीरकर्माकरिष्यो यदा द्यूते परिघं पर्यमृक्षः । बाहू दिधक्षन्वारितः

संचार करीत असतांना भरत वंशजांनी अथवा त्यांच्या हेरांनीं जर तुह्मांला ओळखिलें तर, बा कुंतीपुत्रा, तितकीं दुसरीं वर्षें तुह्मीं त्याप्रमाणें घालवावीत. ह्याविषयीं काय तो निश्चय करून बा कुंतीपुत्रा, प्रतिज्ञा कर १०. हे राजा, माझ्या पक्षाच्या लोकांना मोह पाडून सावध राहिल्यामुळे एक वर्ष पर्यंत जर हेरांच्याही तूं दृष्टोत्पत्तीस आला नाहींस तर, हे भारता, त्या पांची नद्या (अर्थात् पांच नद्यांनीं व्यापिलेली भूमि) तुझ्याच हें मी तुला कुरुसमाजामध्यें सत्य सांगतो ११. त्याचप्रमाणें, हे राजा, तूं जर आह्मांला जिंकिलेस तर आह्मी सर्वही भ्राते इतका काल पर्यंत भोग्य वस्तूंचा त्याग करून ह्याप्रमाणें वास्तव्य करूं " ह्मणून पूर्वी तो राजा कौरवांमध्यें मला ह्मणाला असतां मींही " ठीक आहे " ह्मणून त्याला ह्मटलें १२. नंतर त्या ठिकाणीं ते नीच द्यूत झालें असतां त्यांत पराजित होऊन आपण सर्व राष्ट्र सोडून निघालों आणि ह्याप्रमाणें आतां अनेक प्रदेशांतून आणि कठिण वनांतून मोठ्या क्लेशानें संचार करीत आहोंत १३. आह्मांला वनांत पाठविल्यावर दुर्योधन स्वस्थ न राहतां क्रोधवश झाला आहे आणि आपल्या हातांत असलेल्या सर्व कौरवांना त्यानें आमचे विरुद्ध उद्युक्त केलें आहे १४. तेव्हां सज्जनांच्या समीप केलेल्या त्या प्रतिज्ञेचा राज्याकरितां कोणी बरें त्याग करावा? खरोखर (प्रतिज्ञापालनरूप) धर्माचें उल्लंघन करून पृथ्वीचें राज्य करणें संभावित मनुष्याला मरणापेक्षांही अधिक वाईट आहे असें मला वाटतें १५. हे वीरा भीमसेना, माझे बाहु दग्ध करण्याकरितां तूं उद्युक्त झालास तेव्हां अर्जुनाला तुझें निवारण करावें लागलें; (इतका तूं त्याचवेळीं क्रुद्ध झाला होतास) इतकेंच नव्हे परंतु, द्यूत चाललें असतांना (शत्रूंचा वध करण्याकरितां) तूं हातांमध्यें परिघायुधही घेतलें होतेंस.

फाल्गुनेन किं दुष्कृतं भीम तदाभविष्यत् १६ प्रागेव चैवं समयक्रियायाः
किं नाब्रवीः पौरुषमाविदानः। प्राप्तं तु कालं त्वभिपद्य पश्चात्किं मामि-
दानीमतिवेलमात्थ १७ भूयोपि दुःखं मम भीमसेन दूये विषस्येव रसं
हि पीत्वा। यद्याज्ञसेनीं परिक्लिश्यमानां संदृश्य तत्क्षान्तमिति स्म भीम १८
न त्वद्य शक्यं भरतप्रवीर कृत्वा यदुक्तं कुरुवीरमध्ये । कालं प्रतीक्षस्व
सुखोदयस्य पक्तिं फलानामिव बीजवापः १९ यदा हि पूर्वं निकृतो निकृ-
न्तेद्वैरं सपुष्पं सफलं विदित्वा । महागुणं हरति हि पौरुषेण तदा वीरो
जीवति जीवलोके २० श्रियं च लोके लभते समग्रां मन्ये चास्मै शत्रवः
संनमन्ते । मित्राणि चैनमचिराद्भजन्ते देवा इवेन्द्रमुपजीवन्ति चैनम् २१
मम प्रतिज्ञां च निबोध सत्यां वृणे धर्मममृताज्जीविताच्च। राज्यं च पुत्राश्च

करितां, त्याचवेळीं तूं जर कांहीं केलें असतेस तर तुला काय दुर्घट होतें ? १६. अरे, पराक्रम दाखविण्याची इच्छा धरून तूं जें हें आतां भाषण करीत आहेस तें माझी प्रतिज्ञा होण्यापूर्वीं कां केलें नाहींस ? सारांश, जो समय प्राप्त झाला त्याचा निमूटपणें स्वीकार करून आतां वेळ निघून गेल्यावर तूं कां मला बोलत आहेस? १७. हे भीमसेना, असलें वनवासाचें दुःख मला हवें तितकें होवो त्याची मला परवा नाहीं. परंतु, द्रौपदीला दुःशासन भरसभेमध्यें ओढून आणीत असल्याचें अवलोकन करूनही त्याची आपण क्षमा केली ह्याचें, हे भीमा, मला विषरसाचें प्राशन केल्याप्रमाणें दुःख होत आहे १८. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा, आपण कौरव वीरांमध्यें जी प्रतिज्ञा केली ती शेवटास नेल्यावांचून तूं ह्मणतोस ह्यातलें कांहींएक होणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें शेतकरी फलें पक्क होण्याची वाट पहात असतो त्याप्रमाणें तूं सुखोदयाच्या कालाची मार्ग प्रतीक्षा कर १९. अरे, पूर्वी फसला गेलेला वीर आपला वैरिसमूह (साधनरूप) पुष्पफलांनीं आणि (शौर्यादि) मोठमोठ्या गुणांनीं संपन्न झाल्याचें समजून आल्यावर पराक्रमाच्या योगानें जेव्हां त्याच्या पासून आपलें राज्य हरण करितो तेव्हांच जीवलोकामध्यें त्याच्या जीविताचें साफल्य होतें २०. (ह्याप्रमाणें सर्वप्रकारें संपन्न असलेल्या शत्रूपासून राज्य हरण केल्यावरच खरोखर) ह्या लोकामध्यें संपूर्ण राज्यलक्ष्मी त्याला प्राप्त होते; शत्रु त्याच्याशीं नमून वागूं लागतात; मित्र थोडक्याच वेळांत त्याचा आश्रय करितात आणि इंद्रावर उपजीविका करणाऱ्या देवांप्रमाणें त्याच्या आधारावर ते उपजीविका करूं लागतात असें मी समजतों २१. अरे, जीवितापेक्षां अथवा अमर होण्यापेक्षांही (सत्यरूप) धर्माला मी अधिक मान देतों. कारण, राज्य, पुत्र, यश आणि धन हीं सर्व सत्याच्या पासंगालाही

यशो धनं च सर्वं न सत्यस्य कलामुपैति २२ [१३८६] इति० मार-
ण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि युधिष्ठिरवाक्ये चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

भीम उवाच ॥ सन्धिं कृत्वैव कालेन ह्यन्तकेन पतत्रिणा । अनन्ते-
नाप्रमेयेण स्रोतसा सर्वहारिणा १ प्रत्यक्षं मन्यसे कालं मर्त्यः सन्कालबन्धनः । फेनधर्मा महाराज फलधर्मा तथैव च २ निमेषादपि कौन्तेय यस्यायुरपचीयते । सूच्येवाञ्जनचूर्णस्य किमिति प्रतिपालयेत् ३ यो नूनममितायुः स्यादथ वापि प्रमाणवित् । स कालं वै प्रतीक्षेत सर्वप्रत्यक्षदर्शिवान् ४ प्रतीक्ष्यमाणः कालो नः समा राजंस्त्रयोदश । आयुषोपचयं कृत्वा मरणायोपनेष्यति ५ शरीरिणां हि मरणं शरीरे नित्यमाश्रितम् । प्रागेव मरणात्तस्माद्राज्यायैव घटामहे ६ यो न याति प्रसङ्ख्यानमस्पृष्टो भूमिवर्धनः । अयातयित्वा वैराणि सोऽवसीदति गौरिव ७ यो न यातयते वैरमल्पमप्यन्वोद्यमः पुमान् । अफलं जन्म तस्याहं मन्ये दुर्जा-

---

पुरणार नाहींत २२. ह्याप्रमाणें०लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं युधिष्ठिराच्या भाषणाविषयीं चवतिसावा अध्याय समाप्त झाला ॥३४॥

भीमसेन ह्मणतोः— अपार सामर्थ्यानें युक्त, शीघ्रगामी आणि सर्वांचा नाश करण्यास समर्थ अशा कालाशीं स्नेह करून स्वस्थ राहणें ह्मणजे सर्व हरण करून नेणाऱ्या प्रचंड प्रवाहाशींच सख्य करून राहण्यासारिखें आहे १. हे महाराजा, तूं मर्त्य आणि ह्मणूनच कालाधीन असल्यामुळें शाश्वतीसंबंधानें पाण्यावरील फेंस आणि वृक्षावरील पक्व फल ह्यांच्याशीं तुझें साम्य असतांना कालाला स्वाधीन समजत आहेस हें काय ? २. हे कुंतीपुत्रा, सुईच्या योगानें कमी कमी होत जाणाऱ्या कज्जलाप्रमाणें प्रत्येक निमिषांतही ज्याचें आयुष्य थोडें थोडें कमी कमी होत आहे त्यानें (कोणतेंही कृत्य करण्याला) कालाची प्रतीक्षा कशा करितां करावी ? ३. अरे, ज्याचें आयुष्य खरोखर अपरिमित असेल अथवा जो आपल्या आयुष्याचें मान जाणीत असेल किंवा भूत, वर्तमान आणि भविष्य हें सर्व जो प्रत्यक्ष अवलोकन करीत असेल त्यानें कालाची प्रतीक्षा करावी (इतरानें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं) ४. हे राजा, आपण जर तेरावर्षे होईपर्यंत कालाची वाट पहात बसलों तर तो काल आयुष्याचा ऱ्हास करून आपणांला मृत्यूचे समीप नेईल ५. अरे, प्राण्यांच्या शरीराचा आश्रय करून मरण हें नित्य राहिलेलेंच आहे. ह्यास्तव, मरण येण्याच्या पूर्वींच आपण राज्य प्राप्तीकरितां यत्न करावा ६. अरे, वैराचा प्रतीकार न केल्यामुळें जो प्रसिद्धीस येत नाहीं ह्मणजे अर्थात् जो उजेडांत येत नाहीं तो भूमीला भारभूत होत असून चिखलांत रुतणाऱ्या

तजायिनः ८ हैरण्यौ भवतो बाहू श्रुतिर्भवति पार्थिवी । हत्वा द्विषन्तं सङ्ग्रामे भुङ्क्ष्व बाहुर्जितं वसु ९ हत्वा वै पुरुषो राजन्विकर्तारमरिन्दम । अह्नाय नरकं गच्छेत्स्वर्गेणास्य स संमितः १० अमर्षजो हि संतापः पावकाद्दीप्तिमत्तरः । येनाहमतिसंतप्तो न नक्तं न दिवा शये ११ अयं च पार्थो बीभत्सुर्वरिष्ठो ज्याविकर्षणे । आस्ते परमसंतप्तो नूनं सिंह इवाशये १२ योयमेको न मनुते सर्वाँल्लोके धनुर्भृतः । सोयमात्मजमूष्माणं महाहस्तीव यच्छति १३ नकुलः सहदेवश्च वृद्धा माता च वीरसूः । तथैव प्रियमिच्छन्त आसते जडमूकवत् १४ सर्वे ते प्रियमिच्छन्ति बान्धवाः सह सृञ्जयैः । अहमेकश्च संतप्तो माता च प्रतिविन्ध्यतः १५ प्रियमेव तु सर्वेषां यद्ब्रवीम्युत किंचन । सर्वे हि व्यसनं प्राप्ताः सर्वे युद्धाभिनन्दिनः १६ नातः पापीयसी काचिदापद्राजन्भविष्यति । यन्नो नीचैरल्पबलैराज्यमाच्छिद्य भुज्यते १७

बैलाप्रमाणें जागच्या जागीं नाश पावतो ७. सारांश, धैर्य व उद्योग हीं अल्प असल्यामुळें जो वैराचा प्रतीकार करीत नाहीं त्याचा जन्म निंद्य आणि ह्मणनच निष्फल असें मी समजतों ८. " तुझे बाहु सारमय आहेत " अशी क्षत्रियासबंधानें श्रुति आहे. करितां, तूं संग्रामामध्यें शत्रूंचा वध कर आणि बाहुबलानें प्राप्त करून घेतलेल्या लक्ष्मीचा उपभोग घे ९. हे शत्रुदमना धर्मराजा, आपल्याशीं कपट करणाऱ्याचा वध केल्यानें जर पुरुषाला एकदम नरकप्राप्ति होत असेल तर तो नरक त्याला स्वर्गतुल्य आहे १०. असहिंष्णुतेमुळें होणारा संताप अग्नीपेक्षांही अधिक प्रखर असतो आणि त्याच्या योगानें मी संतप्त झालों असल्यामुळें रात्रंदिवस मला झोंप येत नाहीं ११. हा कुंतीपुत्र अर्जुन धनुष्याची प्रत्यंचा आकर्षण करण्यामध्यें सर्वोत्कृष्ट आहे आणि ह्मणूनच स्वस्थानीं संतप्त होऊन पडणाऱ्या सिंहाप्रमाणें तो आपल्या ठिकाणीच अत्यंत संतप्त होऊन राहिला आहे १२. जगतांतील सर्व धनुर्धारी ज्याच्या खात्रींत नाहींत तो हा अर्जुन आपल्या चित्तसंतापाचें महागजाप्रमाणें संयमन करीत आहे १३. नकुल, सहदेव आणि वीर पुत्र प्रसवणारी आमची वृद्ध माता हे केवळ तुझ्या मर्जीबाहेर वागावयाचें नाहीं ह्मणून मूढांप्रमाणें आणि मुक्यांप्रमाणें स्वस्थ बसले आहेत १४. ह्यांच्याप्रमाणें सृंजयासहवर्तमान हे सर्व बांधवही तुझ्या मर्जीबाहेर वागूं इच्छित नाहींत. तेव्हां संताप काय तो मला आणि प्रतिविंध्याच्या मातेला (ह्मणजे द्रौपदीला) च झाला आहे १५. परंतु, मी जें कांहीं बोलत आहे हें सर्वांना प्रिय आहे (केवल तुझ्या तोंडावर मात्र कोणी सांगत नाहींत). सारांश, सर्वच संकटांत सांपडले आहेत आणि त्यामुळें (त्यांतून सुटका होण्याकरितां) युद्धाचें अभिनंदन करणारे आहेत १६. हे

शीलदोषाद्घृणाविष्ट आनृशंस्यात्परन्तप । क्लेशांस्तितिक्षसे राजन्नान्यः कश्चित्प्रशंसति १८ श्रोत्रियस्येव ते राजन्मन्दकस्याविपश्चितः । अनुवाकहता बुद्धिर्नैषा तत्त्वार्थदर्शिनी १९ घृणी ब्राह्मणरूपोसि कथं क्षत्रेषु जायथाः । अस्यां हि योनौ जायन्ते प्रायशः क्रूरबुद्धयः २० अश्रौषीस्त्वं राजधर्मान्यथा वै मनुरब्रवीत् २१ क्रूरान्निकृतिसंपन्नान्विहितानशमात्मकान् । धार्तराष्ट्रान्महाराज क्षमसे किं दुरात्मनः २२ कर्तव्ये पुरुषव्याघ्र किमास्से पीठसर्पवत् । बुद्ध्या वीर्येण संयुक्तः श्रुतेनाभिजनेन च २३ तृणानां मुष्टिनैकेन हिमवन्तं च पर्वतम् । छन्नमिच्छसि कौन्तेय योस्मान्संवर्तुमिच्छसि २४ अज्ञातचर्या गूढेन पृथिव्यां विश्रुतेन च । दिवीव पार्थ सूर्येण न शक्या चरितुं त्वया २५ बृहच्छाल इवानूपे शाखापुष्पपलाशवान् । हस्ती श्वेत इवाज्ञातः कथं जिष्णुश्चरिष्यति २६ इमौ च

राजा, नीच दुर्बलांनीं आपलें राज्य हिसकावून घेऊन त्याचा उपभोग घ्यावा ह्यापेक्षां अधिक शोचनीय विपत्ति कोणतीही येण्याचा संभव नाहीं १७. हे शत्रुतापना धर्मराजा, स्वभावदोषामुळें तूं लज्जेनें व्याप्त होऊन दयाळुपणामुळें क्लेश सहन करीत आहेस; परंतु, हें दुसरा कोणीही बरें ह्मणत नाहीं १८. हे राजा, जड आणि अविचारी अशा वैदिक ब्राह्मणाची बुद्धि ज्याप्रमाणें घोकंपट्टी करून कुंठित झालेली असते त्याप्रमाणें तुझ्या बुद्धीची अवस्था झाली आहे. वास्तविक गोष्ट काय आहे ह्याचें तुझ्या बुद्धीला आकलन होत नाहीं १९. क्षत्रियांमध्यें तूं ब्राह्मणासारिखा दयाळु कसा रे उत्पन्न झालास ? अरे, ह्या जातीमध्यें प्रायः क्रूरबुद्धि लोक उत्पन्न होत असतात २० हे महाराजा, मनूनें सांगितल्याप्रमाणें राजधर्म तूं श्रवण केले आहेस. तस्मात्, क्रूर, कपटी आणि शांतिरहित अंतःकरणानें युक्त ह्मणून ठरलेल्या दुरात्म्या धृतराष्ट्रपुत्रांची तूं कशाकरितां क्षमा करीत आहेस ? २१,२२. हे पुरुषश्रेष्ठा, तूं वीर्यवान्, बहुश्रुत आणि शूर कुलामध्यें उत्पन्न झाला असतांना स्वकर्तव्याविषयीं अजगरासारिखा स्वस्थ का रे बसला आहेस ? २३. हे कुंतीपुत्रा, आह्मांला गुप्त राखण्याची तुझी इच्छा असणें ह्मणजे एक मूठभर गवतानें हिमालय पर्वत आच्छादून टाकण्याची इच्छा करण्यासारिखेंच आहे २४. हे कुंतीपुत्रा, आकाशामध्यें कोणाच्या समजण्यांत न येतां सूर्याला संचार करितां येणें ज्याप्रमाणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें पृथ्वीमध्यें प्रसिद्ध असलेल्या तुला गुप्त राहून (एक वर्षपर्यंत) कोणाच्याही समजण्यांत न येतां राहतां येणें शक्य नाहीं २५. अरे, शाखा, पुष्पें आणि पानें यांनीं युक्त असलेल्या पाणथळ जमीनींतील प्रचंड शालवृक्षाप्रमाणें असलेला अथवा शुभ्रवर्ण गजाप्रमाणें असलेला हा अर्जुन कोणाच्या समजण्यांत न

सिंहसङ्काशौ भ्रातरौ सहितौ शिशू। नकुलः सहदेवश्च कथं पार्थ चरिष्यतः २७ पुण्यकीर्ती राजपुत्री द्रौपदी वीरसूरियम्। विश्रुता कथमज्ञाता कृष्णा पार्थ चरिष्यति २८ मां चापि राजञ्जानन्ति ह्याकुमारमिमाः प्रजाः। नाज्ञातचर्यां पश्यामि मेरोरिव निगूहनम् २९ तथैव बहवोस्माभी राष्ट्रेभ्यो विप्रवासिताः। राजानो राजपुत्राश्च धृतराष्ट्रमनुव्रताः ३० न हि तेप्युपशाम्यन्ति निकृता वा निराकृताः। अवश्यं तैर्निकर्तव्यमस्माकं तत्प्रियैषिभिः ३१ तेप्यस्मासु प्रयुञ्जीरन्प्रच्छन्नान्सुबहूंश्चरान्। आचक्षीरंश्च नो ज्ञात्वा ततः स्यात्सुमहद्भयम् ३२ अस्माभिरुषिताः सम्यग्वने मासास्त्रयोदश। परिमाणेन तान्पश्य तावतः परिवत्सरान् ३३ अस्ति मासः प्रतिनिधिर्यथा प्राहुर्मनीषिणः। पूतीकानिव सोमस्य तथेदं क्रियतामिति ३४ अथवानडुहे राजन्साधवे साधुवाहिने। सौहित्यदानादेतस्मादेनसः प्रतिमुच्यते ३५ तस्माच्छत्रुवधे राजन्क्रियतां निश्चय-

---

येतां कसा रे संचार करील? २६. हे कुंतीपुत्रा, वयानें एकसारिखे असलेले हे सिंहतुल्य बालक भ्राते नकुल आणि सहदेव कसे रे (गुप्तपणें एक वर्षपर्यंत) संचार करितील ? २७. हे कुंतीपुत्रा, पवित्र कीर्तीनें युक्त, वीर माता आणि राजकन्या अशी ही प्रख्यात द्रुपदात्मजा कृष्णा कोणाच्या समजण्यांत न येतां कशी रे संचार करील ? २८. हे राजा, मलासुद्धां अगदीं पोरांबाळांपर्यंत हे प्रजाजन ओळखीत आहेत. ह्याकरितां, मेरुपर्वत गुप्त ठेवण्याप्रमाणें स्वत: कोणाच्याही समजण्यांत न येतां राहतां येणें मला शक्य दिसत नाहीं २९. शिवाय, धृतराष्ट्राशीं मिळून असलेले अनेक राजे आणि राजपुत्र आपण राष्ट्रापासून हाकून दिले आहेत ३० आणि गांजलेले अथवा जिंकिलेले ते लोक स्वस्थ बसणें शक्य नाहीं; धृतराष्ट्राचें प्रिय करण्याची इच्छा धरून त्यांनीं आह्मांला उलट छळणें अवश्य व योग्य आहे ३१. तेव्हां, ते सुद्धां आमच्या पाळतीवर गुप्त असे पुष्कळच हेर योजितील आणि आमचा तपास काढून धृतराष्ट्रपुत्रांना बातमी सांगतील व त्यापासून आपणांला फारच मोठें भय प्राप्त होईल ३२. अरे, आपण पूर्ण तेरा महिनेपर्यंत वनामध्यें वास्तव्य केलें आहे; तेव्हां अल्प प्रमाणानें तितके संवत्सरच आपला वनवास झाला असें तूं समज ३३. कारण, ज्याप्रमाणें सोमवल्लीच्या अभावीं पूतीक हा प्रतिनिधि सांगितला आहे त्याप्रमाणें ज्ञानवान् लोकांनीं मास हा संवत्सराचा प्रतिनिधि सांगितला आहे. करितां, त्याप्रमाणें हें तूं कर ३४. अथवा, असें केल्यानें कांहीं पातक होतें अशी तुला कांहीं शंका असल्यास फार तर सरळ जूं ओढणाऱ्या गरीब बैलाला तूं पोटभर वैरण घाल ह्मणजे त्या

स्त्वया। क्षत्रियस्य हि सर्वस्य नान्यो धर्मोस्ति संयुगात् ३६ [१४२२] इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि भीमवाक्ये पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भीमसेनवचः श्रुत्वा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । निःश्वस्य पुरुषव्याघ्रः संप्रदध्यौ परन्तपः १ श्रुता मे राजधर्माश्च वर्णानां च विनिश्चयाः । आयत्यां च तदात्वे च यः पश्यति स पश्यति २ धर्मस्य जानमानोहं गतिमग्र्यां सुदुर्विदाम् । कथं बलात्करिष्यामि मेरोरिव विमर्दनम् ३ स मुहूर्तमिव ध्यात्वा विनिश्चित्येतिकृत्यताम् । भीमसेनमिदं वाक्यमपदान्तरमब्रवीत् ४ युधिष्ठिर उवाच ॥ एवमेतन्महाबाहो यथा वदसि भारत । इदमन्यत्समाधत्स्व वाक्यं मे वाक्यकोविद ५ महापापानि कर्माणि यानि केवलसाहसात् । आरभ्यन्ते भीमसेन व्यथन्ते तानि भारत ६ सुमन्त्रिते सुविक्रान्ते सुकृते सुविचारिते । सिध्यन्त्यर्था महाबाहो दैवं चात्र प्रदक्षिणम् ७ यत्तु केवलचापल्याद्बलदर्पोत्थितः स्वयम् । आरब्धव्यमिदं कार्यं मन्यसे शृणु तत्र मे ८ भूरिश्रवाः शलश्चैव जलसन्धश्च

पातकापासून तूं मुक्त होशील ३५. हे राजा, कोणत्याही क्षत्रियाला युद्धावांचून अन्य धर्म नाहीं. तस्मात्, शत्रुवधाविषयीं तूं निश्चय कर ३६. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं भीमसेनाच्या भाषणाविषयीं पस्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३५ ॥

वैशंपायन सांगतातः—भीमसेनाचें भाषण श्रवण केल्यावर शत्रूंना ताप देणारा पुरुषश्रेष्ठ कुंतीपुत्र युधिष्ठिर दुःखानें सुस्कारा टाकून मनामध्यें चिंतन करूं लागला कीं, १ "मीं राजधर्म आणि वर्णधर्म श्रवण केले आहेत. परंतु, विद्यमान कालाकडे आणि भविष्यत्कालाकडे जो दृष्टि देऊन चालतो तोच खरा खरा डोळस होय २. समजण्यास अतिशय कठीण अशी धर्माची उत्तम गति मी जाणीत असतांना मेरुपर्वताचें मर्दन करण्यास उद्युक्त होण्याप्रमाणें साहसानें मला तसें कसें करितां येईल !" ३. ह्याप्रमाणें क्षणभर चिंतन करून आणि काय करावयाचें त्याचा निश्चय करून तो युधिष्ठिर लगेंच भीमसेनाला ह्मणाला ४ "हे भरतकुलोत्पन्ना महापराक्रमी भीमसेना, तूं संभाषणाचें तत्त्व जाणणारा आहेस; करितां, हें माझें बोलणें ऐकून घे ५. हे भरतकुलोत्पन्ना भीमसेना, महापातकांना कारणीभूत होणारीं जीं कर्में केवळ साहसाचें अवलंबन करून लोक करूं लागतात तीं त्यांना पुढें जाचतात ६. हे महापराक्रमी भीमसेना, दैव जर अनुकूल असेल तर उत्कृष्टविचारपूर्वक मसलत करून योग्य रीतीनं चांगला प्रयत्न केला असतां मनोरथ सिद्धीस जातात ७. आतां शरीरसामर्थ्याचा अभिमान अंगीं वसत असल्यामुळें केवल साहसाचें अवलंबन करून तूं जो स्वतः उद्युक्त

वीर्यवान्। भीष्मो द्रोणश्च कर्णश्च द्रोणपुत्रश्च वीर्यवान् ९ धार्तराष्ट्रा दुराधर्षा दुर्योधनपुरोगमाः। सर्व एव कृतास्त्राश्च सततं चाततायिनः १० राजानः पार्थिवाश्चैव येऽस्माभिरुपतापिताः। संश्रिताः कौरवं पक्षं जातस्नेहाश्च तं प्रति ११ दुर्योधनहिते युक्ता न तथास्मासु भारत। पूर्णकोशबलोपेताः प्रयतिष्यन्ति सङ्गरे १२ सर्वे कौरवसैन्यस्य सपुत्रामात्यसैनिकाः। संविभक्ता हि मात्राभिर्भोगैरपि च सर्वशः १३ दुर्योधनेन ते वीरा मानिताश्च विशेषतः। प्राणांस्त्यक्ष्यन्ति सङ्ग्राम इति मे निश्चिता मतिः १४ समा यद्यपि भीष्मस्य वृत्तिरस्मासु तेषु च। द्रोणस्य च महाबाहो कृपस्य च महात्मनः १५ अवश्यं राजपिण्डस्तैर्निर्वेश्य इति मे मतिः। तस्मात्त्यक्ष्यन्ति सङ्ग्रामे प्राणानपि सुदुस्त्यजान् १६ सर्वे दिव्यास्त्रविद्वांसः सर्वे धर्मपरायणाः। अजेयाश्चेति मे बुद्धिरपि देवैः सवासवैः १७

झाला आहेस आणि ह्या कार्याला आरंभ करावा ह्मणून सांगत आहेस त्यासंबधानें मी काय सांगतों तें ऐकून ठेव ८. वीर्यवान् जलसंध, भूरिश्रवा, शल, भीष्म, द्रोण, कर्ण, वीर्यवान् द्रोणपुत्र ९ आणि दुर्योधनप्रभृति धृतराष्ट्रपुत्र हे सर्व अस्त्रविद्येमध्यें निपुण आणि नेहमीं जिवावर उदार असल्यामुळें जिंकण्यास कठीण आहेत १०. शिवाय आह्मी ज्यांना ताप दिलेला आहे असे राजे कौरवपक्षाचा आश्रय करून राहिलेले आहेत आणि सांप्रत तर त्या कौरवपक्षासंबंधानें त्यांचे मनांत प्रेमभाव उत्पन्न झालेला आहे ११. हे भरतकुलोत्पन्ना, ह्यामुळें ते दुर्योधनाच्या हिताविषयीं जसे उद्युक्त आहेत तसे आमच्या हिताविषयीं नाहींत. तेव्हां (अर्थातच) विपुल द्रव्य आणि सैन्य ह्यांनीं युक्त असलेले ते राजे युद्धामध्यें (कौरवांचें रक्षण करण्याविषयीं) प्रयत्न करितील १२. कौरव सैन्यासंबंधीं सर्व लोकांनाच केवळ नव्हे परंतु, त्यांचे पुत्र, अमात्य आणि योद्धे ह्यांनाही (कौरवांच्या) भोग्य वस्तु आणि द्रव्यांश ह्यांचा सर्वप्रकारें वांटा मिळूं लागला आहे १३. सारांश, दुर्योधनानें त्या वीरांची मानमान्यता विशेषेंकरून ठेविलेली आहे. ह्यास्तव, संग्रामामध्यें ते (त्याच्याकरितां) प्राण देतील अशी माझी पक्की समजूत आहे १४. हे महापराक्रमी भीमसेना, भीष्म, द्रोण आणि महात्मा कृप ह्यांचें वर्तन जरी आमच्याशीं आणि त्यांच्याशीं सारिखेंच आहे तरी १५ राजाचें अन्न खाल्ल्याबद्दल त्यांना त्याचें उतराई होणें अवश्य आहे असें मला वाटतें. तस्मात्, त्याग करण्यास अत्यंत कठीण अशाही प्राणांचा संग्रामामध्यें ते (दुर्योधनाकरितां) त्याग करितील १६. ते सर्व दिव्यास्त्रें जाणणारे असून सर्वही धर्मनिष्ठ आहेत आणि ह्मणूनच इंद्रासहवर्तमान देवांनाही अजिंक्य आहेत अशी

अमर्षी नित्यसंरब्धस्तत्र कर्णो महारथः । सर्वास्त्रविदनाधृष्यो ह्यभेद्यकवचावृतः १८ अनिर्जित्य रणे सर्वानेतान्पुरुषसत्तमान् । अशक्यो ह्यसहायेन हन्तुं दुर्योधनस्त्वया १९ न निद्रामधिगच्छामि चिन्तयानो वृकोदर । अतिसर्वान्धनुर्ग्राहान्सूतपुत्रस्य लाघवम् २० वैशम्पायन उवाच ॥ एतद्वचनमाज्ञाय भीमसेनोत्यमर्षणः । बभूव विमनास्त्रस्तो न चैवोवाच किंचन २१ तयोः संवदतोरेवं तदा पाण्डवयोर्द्वयोः । आजगाम महायोगी व्यासः सत्यवतीसुतः २२ सोभिगम्य यथान्यायं पाण्डवैः प्रतिपूजितः । युधिष्ठिरमिदं वाक्यमुवाच वदतांवरः २३ व्यास उवाच ॥ युधिष्ठिर महाबाहो वेद्मि ते हृदयस्थितम् । मनीषया ततः क्षिप्रमागतोस्मि नरर्षभ २४ भीष्माद्द्रोणात्कृपात्कर्णाद्द्रोणपुत्राच्च भारत । दुर्योधनान्नृपसुतात्तथा दुःशासनादपि २५ यत्ते भयममित्रघ्न हृदि संपरिवर्तते । तत्तेहं नाशयिष्यामि विधिदृष्टेन कर्मणा २६ तच्छ्रुत्वा धृतिमास्थाय कर्मणा प्रतिपादय । प्रतिपाद्य तु राजेन्द्र ततः क्षिप्रं ज्वरं जहि २७ तत एकान्त-

---

माझी समजूत आहे १७. ह्या (कौरवपक्षीय योध्यां) मध्यें महारथी, सर्व अस्त्रें जाणणारा, अभेद्य कवचानें आच्छादित आणि ह्मणूनच अजिंक्य असा कर्ण स्वभावतःच खुनशी असून नेहमीं क्रुद्ध झालेला असतो १८. तस्मात्, ह्या सर्व पुरुषश्रेष्ठांना संग्रामामध्यें जिंकिल्यावांचून तुझ्या एकट्याच्या हातून दुर्योधनाचा वध होणें अशक्य आहे १९. हे भीमसेना, सर्व धनुर्धाऱ्यांपेक्षांही अधिक असलेलें सूतपुत्र कर्णाचें हस्तलाघव एकसारिखें मनामध्यें येत असल्यामुळें मला निद्रा येत नाहीं" २०. वैशंपायन सांगतातः—हे धर्मराजाचें भाषण श्रवण करून अत्यंत क्रुद्ध झालेला भीमसेन खिन्न होऊन त्रासून गेला व कांहींच उत्तर देईनासा झाला २१. ह्याप्रमाणें त्या उभयतां पांडुपुत्रांचा संवाद चालला असतांना सत्यवतीपुत्र महायोगी व्यास तेथें आले २२. ते आल्यावर पांडवांनीं त्यांचें यथाविधि पूजन केलें आणि नंतर वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेले ते व्यासमुनि युधिष्ठिराशीं असें भाषण करूं लागले २३. व्यास ह्मणतातः— हे महापराक्रमी युधिष्ठिरा, तुझ्या मनामध्यें काय आहे हें मी जाणत आहें आणि ह्मणूनच, हे पुरुषश्रेष्ठा, मी आपल्या इच्छेनें सत्वर तुझ्याकडे आलों आहें २४. हे भरतकुलोत्पन्ना, शत्रुघ्ना, भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, द्रोणपुत्र अश्वत्थामा, राजपुत्र दुर्योधन आणि त्याचप्रमाणें दुःशासन ह्यांचें जें भय तुझ्या मनामध्यें घोळत आहे तें मी शास्त्रसिद्ध उपायानें नाहींसें करून टाकीन २५,२६. करितां, मी सांगतों तें श्रवण केल्यावर तूं धैर्य धरून त्याप्रमाणें कृतीनें अमलांत आण आणि तें अमलांत आणिल्यावर, हे राजाधिराज, तूं आपल्या चिंतेचा

मुचीय पाराशर्यो युधिष्ठिरम् । अब्रवीदुपपन्नार्थमिदं वाक्यविशारदः २८ श्रेयसस्ते परः कालः प्राप्तो भरतसत्तम । येनाभिभविता शत्रून्रणे पार्थो धनञ्जयः २९ गृहाणेमां मया प्रोक्तां सिद्धिं मूर्तिमतीमिव । विद्यां प्रतिस्मृतिं नाम प्रपन्नाय ब्रवीमि ते ३० यामवाप्य महाबाहुरर्जुनः साधयिष्यति । अस्त्रहेतोर्महेन्द्रं च रुद्रं चैवाभिगच्छतु ३१ वरुणं च कुबेरं च धर्मराजं च पाण्डव । शक्तो ह्येषः सुरान्द्रष्टुं तपसा विक्रमेण च ३२ ऋषिरेष महातेजा नारायणसहायवान् । पुराणः शाश्वतो देवस्त्वजेयो जिष्णुरच्युतः ३३ अस्त्राणीन्द्राच्च रुद्राच्च लोकपालेभ्य एव च । समादाय महाबाहुर्महत्कर्म करिष्यति ३४ वनादस्माच्च कौन्तेय वनमन्यद्विचिन्त्यताम् । निवासार्थाय यद्युक्तं भवेद्वः पृथिवीपते ३५ एकत्र चिरवासो हि न प्रीतिजननो भवेत् । तापसानां च सर्वेषां भवेदुद्वेगकारकः ३६ मृगाणामुपयोगश्च वीरुदोषधिसंक्षयः । बिभर्षि च बहून्विप्रान्वेदवेदाङ्गपारगान् ३७ वैशम्पायन उवाच ॥ एव-

---

सत्वर त्याग कर २७. ह्यानंतर संभाषण करण्यामध्यें प्रवीण असलेल्या पराशरपुत्र व्यासमुनींनीं युधिष्ठिराला एकांत स्थलीं नेलें आणि अर्थानें परिपूर्ण असें भाषण ते त्याच्याशीं करूं लागले कीं २८ " हे भरतवंशजश्रेष्ठा, तुझें कल्याण होण्याचा उत्तम काल प्राप्त झाला आहे. ह्या कालाच्या योगानें धनुर्धारी अर्जुन रणामध्यें शत्रूंचा पराभव करील २९. करितां, तुज शरणागताला मी प्रतिस्मृतिनामक विद्या कथन करीत आहें. तरी प्रत्यक्ष सिद्धीप्रमाणें असलेल्या त्या मीं सांगितलेल्या विद्येचा तूं स्वीकार कर ३०. ती विद्या प्राप्त झाल्यानें महापराक्रमी अर्जुनाला राज्य परत मिळवितां येईल. ह्यास्तव, ह्या अस्त्रप्राप्तीकरितां, हे पांडुपुत्रा धर्मराजा, महेंद्र, रुद्र, वरुण, कुबेर आणि धर्मराज यम ह्यांचेकडे अर्जुनाला जाऊं द्या. हा तपश्चर्येच्या योगानें व प्रभावाच्या योगानें देवांना अवलोकन करण्यास समर्थ आहे ३१,३२. हा अर्जुन पुरातन, अक्षय, अजिंक्य आणि ऐश्वर्यापासून च्युत न होणारा असा महातेजस्वी देवर्षि असून ह्याला नारायणाचें साहाय्य आहे ३३. ह्यास्तव, इंद्र, रुद्र आणि लोकपाल ह्यांपासून अस्त्रें प्राप्त करून घेऊन हा महापराक्रमी महत्कर्म करील ३४. करितां, हे भूपते कुंतीपुत्रा, निवासाला जें योग्य असेल असें एकादें ह्या वनाहून दुसरें वन तुम्ही मनामध्यें आणा ३५. एके ठिकाणीं फार दिवस वास्तव्य करणें आपल्या मनालाही आल्हादकारक होत नसून वनांतील सर्व तापसजनांना त्यापासून त्रास होतो ३६. कारण, तूं वेदवेदांगपारंगत अशा पुष्कळ विप्रांचें पोषण करीत असल्यामुळें वल्ली आणि ओषधि ह्यांचा क्षय होतो आणि (तुम्हां स्वतःकरितां) वनांतील पशूंही

मुक्त्वा प्रपन्नाय शुचये भगवान्प्रभुः । प्रोवाच लोकतत्त्वज्ञो योगी विद्या-
मनुत्तमाम् ३८ धर्मराजाय धीमान्स व्यासः सत्यवतीसुतः । अनुज्ञाय
च कौन्तेयं तत्रैवान्तरधीयत ३९ युधिष्ठिरस्तु धर्मात्मा तद्ब्रह्म मनसा यतः ।
धारयामास मेधावी काले काले सदाभ्यसन् ४० स व्यासवाक्यमुदितो
वनाद्द्वैतवनात्ततः । ययौ सरस्वतीकूले काम्यकं नाम काननम् ४१ तम-
न्वयुर्महाराज शिक्षाक्षरविशारदाः । ब्राह्मणास्तापसा युक्ता देवेन्द्रमृषयो
यथा ४२ ततः काम्यकमासाद्य पुनस्ते भरतर्षभाः । न्यविशन्त महात्मानः
सामात्याः सपरिच्छदाः ४३ तत्र ते न्यवसन्राजन्कंचित्कालं मनस्विनः ।
धनुर्वेदपरा वीराः शृण्वन्तो वेदमुत्तमम् ४४ चरन्तो मृगयां नित्यं
शुद्धैर्बाणैर्मृगार्थिनः । पितृदैवतविप्रेभ्यो निर्वपन्तो यथाविधि ४५
[१४६६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामार-

---

खर्ची पडतात " ३७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें सांगून शरणागत आणि आचरणानें शुद्ध अशा धर्मराजाला लोकव्यवहारांतील तत्त्व जाणणाऱ्या भगवान् योग-संपन्न समर्थ व्यासमुनींनीं (प्रतिस्मृतिनामक) अनुपम विद्येचा उपदेश केला ३८. आणि ह्याप्रमाणें बुद्धिमान् सत्यवतीपुत्र व्यासमुनींनीं धर्मराजाला उपदेश केल्यानंतर त्या कुंतीपुत्राला विचारून ते तेथेंच गुप्त झाले ३९ व इकडे तो ग्रहणशक्तीनें युक्त असलेला धर्मात्मा युधिष्ठिरही वेळोवेळीं त्या विद्येचा अभ्यास करून ती आपल्या मनामध्यें धारण करूं लागला ४०. असो. व्यासमुनींच्या उपदेशानें आनंदित झालेला तो धर्मराज युधिष्ठिर त्या द्वैतवनापासून निघून सरस्वती नदीचे तीरीं असलेल्या काम्यकनामक वनामध्यें गेला असतां ४१, हे महाराज जनमेजया, शिक्षेंत सांगितल्याप्रमाणें वेदाक्षरांचा उच्चार करण्यांत निपुण असलेले ब्राह्मण देवराज इंद्राच्या मागोमाग जाणाऱ्या ऋषींप्रमाणें त्याच्या मागोमाग गेले ४२. हे भरतवंशज-श्रेष्ठा जनमेजया, द्वैत वन सोडून काम्यक वनाप्रत आल्यानंतर त्या महात्म्या पांडवांनीं अमात्य आणि बाडबिछाईत ह्यांसहवर्तमान तेथें तळ दिला ४३. हे जनमेजय राजा, धनुर्वेदाविषयीं तत्पर असलेले ते वीर व विचारी पांडव (ब्राह्मणांच्या मुखांतून) उत्कृष्ट वेद श्रवण करीत करीत कांहीं काल पर्यंत ४४, पितर, देव आणि विप्र ह्यांना यथाविधि अन्नदान करीत करीत आणि (स्वतः करितां) मृगांची इच्छा धरून (निर्विष अशा) शुद्ध बाणांच्या योगानें नित्य मृगया करीत करीत तेथें राहिले ४५. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं पांडवांच्या काम्यक वनाप्रत गमनाविषयीं छत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३६ ॥

ण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि काम्यकवनप्रवेशे षट्त्रिंशोध्यायः ॥ ३६ ॥
वैशम्पायन उवाच ॥ कस्यचित्त्वथ कालस्य धर्मराजो युधिष्ठिरः । संस्मृत्य मुनिसंदेशमिदं वचनमब्रवीत् १ विविक्ते विदितप्रज्ञमर्जुनं पुरुषर्षभ । सान्त्वपूर्वं स्मितं कृत्वा पाणिना परिसंस्पृशन् २ स मुहूर्तमिव ध्यात्वा वनवासमरिन्दमः । धनञ्जयं धर्मराजो रहसीदमुवाच ह ३ युधिष्ठिर उवाच ॥ भीष्मे द्रोणे कृपे कर्णे द्रोणपुत्रे च भारत । धनुर्वेदश्चतुष्पाद एतेष्वद्य प्रतिष्ठितः ४ दैवं ब्राह्मं मानुषं च सयत्नं सचिकित्सितम् । सर्वास्त्राणां प्रयोगं च तेभिजानन्ति कृत्स्नशः ५ ते सर्वे धृतराष्ट्रस्य पुत्रेण परिसान्त्विताः । संविभक्ताश्च तुष्टाश्च गुरुवत्तेषु वर्तते ६ सर्वयोधेषु चैवास्य सदा प्रीतिरनुत्तमा । आचार्या मानितास्तुष्टाः शान्तिं व्यवहरन्त्युत ॥ शक्तिं न हापयिष्यन्ति ते काले प्रतिपूजिताः ७ अद्य चेयं मही कृत्स्ना दुर्योधनवशानुगा । सग्रामनगरा पार्थ ससागरवनाकरा ८

वैशंपायन सांगतातः—काम्यक वनांत जाऊन कांहीं काल लोटल्यावर धर्मराजयुधिष्ठिराला व्यासमुनींनीं अर्जुनासंबंधानें सांगितल्याचें स्मरण झालें आणि त्यानें अर्जुनाला तें कथन केलें १. हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, प्रथमतः एकांत स्थलामध्यें त्या प्रख्यात बुद्धिमान् अर्जुनाला नेऊन सांत्वनपूर्वक व हास्यपूर्वक धर्मराजानें त्याच्या अंगावर हात फिरविला २ आणि वनवासासंबंधानें क्षणभर विचार केल्यासारिखें करून तो शत्रुदमन करणारा धर्मराज एकांतामध्यें अर्जुनाला ह्मणाला ३ "हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, भीष्म, द्रोण, कृप, कर्ण आणि द्रोणपुत्र अश्वत्थामा ह्यांचे ठिकाणीं आज संपूर्ण धनुर्वेद वसत आहे ४. ह्यामुळें, दैव, ब्राह्म, मानुष इत्यादि अस्त्रें—प्रयोग आणि प्रतीकार ह्यांसहवर्तमान—ते जाणीत असून इतरही सर्व अस्त्रांचा प्रयोग ते पूर्णपणें जाणीत आहेत ५ आणि त्या सर्वांचें धृतराष्ट्राच्या पुत्रानें सर्वप्रकारें सांत्वन केलें असून (स्वतःचें धन आणि भोग्य वस्तु ह्यांविषयीं) त्यांना भागीदार केलेले आहेत. व ह्यामुळें ते संतुष्ट असून तोही त्यांच्याशीं गुरूंप्रमाणें वागत आहे ६. तसेंच सर्व योद्ध्यांचे ठिकाणीं हा धृतराष्ट्रपुत्र अनुपम प्रेम करीत आहे आणि (द्रोणप्रभृति) आचार्यांची तर तो मानमान्यता ठेवीत असल्यामुळें ते संतुष्ट होऊन त्याच्या बाजूचा उणेपणा नाहींसा करण्याविषयीं यत्न करीत आहेत. तात्पर्य, ह्याप्रमाणें संमान झाल्यामुळें योग्य समयीं दुर्योधनाचें सामर्थ्य ते कमी होऊं देणार नाहींत ७. शिवाय, हे अर्जुना, ग्राम, नगरें, समुद्र, वनें आणि खाणी ह्यांसहवर्तमान ही संपूर्ण पृथ्वी आज दुर्योधनाच्या अधीन असून त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागणारी आहे ८.

भवानेव प्रियोस्माकं त्वयि भारः समाहितः । अत्र कृत्यं प्रपश्यामि प्राप्त-
कालमरिन्दम ९ कृष्णद्वैपायनात्तात गृहीतोपनिषन्मया । तया प्रयुक्तया
सम्यग्जगत्सर्वं प्रकाशते १० तेन त्वं ब्रह्मणा तात संयुक्तः सुसमाहितः ।
दैवतानां यथाकालं प्रसादं प्रतिपालय ११ तपसा योजयात्मानमुग्रेण भरत-
र्षभ । धनुष्मान्कवची खड्गी मुनिः साधुव्रते स्थितः १२ न कस्यचिद्
दन्मार्गं गच्छ तातोत्तरां दिशम् । इन्द्रे ह्यस्त्राणि दिव्यानि समस्तानि
धनञ्जय १३ वृत्राद्भीतैर्बलं देवैस्तदा शक्रे समर्पितम् । तान्येकस्थानि
सर्वाणि ततस्त्वं प्रतिपत्स्यसे १४ शक्रमेव प्रपद्यस्व स तेस्त्राणि प्रदास्यति ।
दीक्षितोद्यैव गच्छ त्वं द्रष्टुं देवं पुरन्दरम् १५ वैशम्पायन उवाच ॥ एव-
मुक्त्वा धर्मराजस्तमध्यापयत प्रभुः । दीक्षितं विधिनानेन धृतवाक्कायमान-
सम् १६ अनुजज्ञे तदा वीरं भ्राता भ्रातरमग्रजः । निदेशाद्धर्मराजस्य
द्रष्टुकामः पुरन्दरम् १७ धनुर्गाण्डीवमादाय तथाक्षय्ये महेषुधी ।

आह्मांला प्रिय काय तो तूंच असून आमचा सर्व प्रकारें भार तुझ्यावर ठेविलेला आहे. करितां, हे शत्रुदमना, आज कांहीं कृत्य करण्याचा समय प्राप्त झाला आहे असें मला दिसतें ९. बा अर्जुना, कृष्णद्वैपायन मुनींपासून मला मंत्रोपदेश प्राप्त झालेला आहे; त्याचा उत्तम प्रकारें प्रयोग झाला असतां सर्व जगत् प्रकाशित होतें (अर्थात् जगतांतील सर्व गोष्टींचें ज्ञान होतें) १०. ह्यास्तव, बा अर्जुना, स्वस्थांतःकरणपूर्वक तूं त्या मंत्राचा जप करीत रहा आणि योग्य वेळीं तूं देवतांचा प्रसाद होण्याची (निःसंशय) प्रतीक्षा कर ११. हे भरतवंशजश्रेष्ठा, धनुष्य, कवच आणि खड्ग धारण करून व सदाचरणाविषयीं तत्पर राहून तूं चिंतनपूर्वक स्वतः उग्र तपश्चर्या कर १२. बा धनंजया, कोणालाही वाट न सोडितां तूं उत्तर दिशेला जा. कारण, इंद्राचे ठिकाणीं सर्व दिव्यास्त्रें आहेत १३. वृत्रासुराच्या भीतीनें देवांनीं आपलें अस्त्ररूप बल त्यावेळीं इंद्रापाशीं ठेविलेलें आहे. ह्याकरितां एकत्र असलेलीं तीं सर्व दिव्यास्त्रें तुला इंद्रापासून प्राप्त होतील १४. करितां, तूं इंद्राकडेच जा; तो तुला अस्त्रें देईल; अरे, इंद्रदेवतेचें दर्शन घेण्याकरितां तूं आजच व्रताचा स्वीकार करून जा " १५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें सांगितल्यावर काया, वाचा आणि मन ह्यांचें संयमन केलेल्या त्या अर्जुनाला ह्या विधीनें दीक्षा देऊन प्रभु धर्मराजानें त्या मंत्राचा उपदेश केला १६ आणि त्या ज्येष्ठ भ्रात्यानें त्या आपल्या कनिष्ठ भ्रात्याला जाण्याची अनुज्ञा दिली. तेव्हां, धर्मराजाच्या आज्ञेवरून इंद्रदर्शनाकरितां उद्युक्त झालेल्या अर्जुनानें १७ गांडीवधनुष्य व मोठे अक्षय्य भाते घेतले आणि कवच व तलत्राण चढवून

कवची सतनुत्राणो बद्धगोधाङ्गुलित्रवान् १८ हुताग्निर्ब्राह्मणान्निष्कैः स्वस्ति वाच्य महाभुजः । प्रातिष्ठत महाबाहुः प्रगृहीतशरासनः १९ वधाय धार्तराष्ट्राणां निःश्वस्योर्ध्वमुदीक्ष्य च । तं दृष्ट्वा तत्र कौन्तेयं प्रगृहीतशरासनम् २० अब्रुवन्ब्राह्मणाः सिद्धा भूतान्यन्तर्हितानि च । क्षिप्रमाप्नुहि कौन्तेय मनसा यद्यदिच्छसि २१ अब्रुवन्ब्राह्मणाः पार्थमिति कृत्वा जयाशिषः । संसाधयस्व कौन्तेय ध्रुवोऽस्तु विजयस्तव २२ तं तथा प्रस्थितं वीरं शालस्कन्धोरुमर्जुनम् । मनांस्यादाय सर्वेषां कृष्णा वचनमब्रवीत् २३ कृष्णोवाच ॥ यत्ते कुन्ती महाबाहो जातस्यैच्छद्धनंजय । तत्तेऽस्तु सर्वं कौन्तेय यथा च स्वयमिच्छसि २४ मास्माकं क्षत्रियकुले जन्म कश्चिदवाप्नुयात् । ब्राह्मणेभ्यो नमो नित्यं येषां भैक्ष्येण जीविका २५ इदं मे परमं दुःखं यः स पापः सुयोधनः । दृष्ट्वा मां गौरिति प्राह प्रहसन्राजसंसदि २६ तस्माद्दुःखादिदं दुःखं गरीय इति मे

गोधासंज्ञक अंगुलित्राणही त्यानें बांधिलें १८. नंतर, (अग्नीमध्यें हवन करून) आणि निष्कांच्या योगानें (ह्मणजे निष्क दक्षिणा देऊन) ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून त्या आजानुबाहु महापराक्रमी अर्जुनानें हातामध्यें धनुष्य घेतलें आणि धृतराष्ट्रपुत्रांचा वध करण्याकरितां दीर्घ सुस्कारा टाकून आणि वर पाहून तो निघाला. तेव्हां हातामध्यें धनुष्य घेतलेल्या त्या कुंतीपुत्राला अवलोकन करून त्या ठिकाणीं १९,२० सिद्ध ब्राह्मण व गुप्त असलेलीं इतर भूतें ह्यांनीं त्याला उद्देशून " जें जें तूं मनामध्यें इच्छीत असशील तें तें, हे कुंतीपुत्रा, तुला सत्वर प्राप्त होईल" असें भाषण केलें २१. ह्याप्रमाणें जयसूचक आशीर्वाद दिल्यावर " हे कुंतीपुत्रा, तुला अक्षय्य विजय होवो तूं जा " ह्मणून ब्राह्मणांनीं त्या अर्जुनाला आणखीही सांगितलें. २२. ह्याप्रमाणें (ब्राह्मणांचे आशीर्वाद घेऊन) शालवृक्षाच्या स्कंधाप्रमाणें ज्याच्या मांड्या आहेत असा तो वीर अर्जुन निघाला असतां सर्वांचीं मनें आपल्याकडे ओढून घेऊन (द्रुपदकन्या) कृष्णा त्याला ह्मणाली २३ " हे महापराक्रमी धनंजया, तूं उत्पन्न झाल्यावर तुझ्यासंबंधानें कुंतीनें जें जें इच्छिलें असेल तें सर्व सिद्धीस जावो आणि त्याचप्रमाणें कुंतीपुत्रा, तूं स्वतः जें इच्छीत असशील तेंही शेवटास जावो २४. आमच्या ह्या क्षत्रिय कुलामध्यें कोणालाही जन्म प्राप्त न व्हावा. (कारण, ह्या कुलांत जन्मास येऊन कांहींच उपयोग नाहीं. खरोखर) भिक्षेवर उपजीविका करणारे ब्राह्मणच श्रेष्ठ आहेत. करितां, त्यांना माझा नित्य नमस्कार असो २५. राजसभेमध्यें तो पापी दुर्योधन मला पाहून गाय गाय (ह्मणजे अनेक पुरुषांनीं उपभोग

मतिः । यत्तत्परिषदो मध्ये बह्वयुक्तमभाषत २७ नूनं ते भ्रातरः सर्वे त्वत्कथाभिः प्रजागरे । रंस्यन्ते वीर कर्माणि कथयन्तः पुनः पुनः २८ नैव नः पार्थ भोगेषु न धने नोत जीविते । तुष्टिर्बुद्धिर्भवित्री वा त्वयि दीर्घप्रवासिनि २९ त्वयि नः पार्थ सर्वेषां सुखदुःखे समाहिते । जीवितं मरणं चैव राज्यमैश्वर्यमेव च ३० आपृष्टो मेऽसि कौन्तेय स्वस्ति प्राप्नुहि भारत । बलवद्भिर्विरुद्धं न कार्यमेतत्त्वयानघ ३१ प्रयाह्यविघ्नेनैवाशु विजयाय महाबल । नमो धात्रे विधात्रे च स्वस्ति गच्छ ह्यनामयम् ३२ ह्रीः श्रीः कीर्तिर्द्युतिः पुष्टिरुमा लक्ष्मीः सरस्वती। इमा वै तव पान्थस्य पालयन्तु धनञ्जय ३३ ज्येष्ठापचायी ज्येष्ठस्य भ्रातुर्वचनकारकः । प्रपद्येऽहं वसून्रुद्रानादित्यान्समरुद्गणान् ३४ विश्वेदेवांस्तथा साध्याञ्छान्त्यर्थं भरतर्षभ । स्वस्ति तेऽस्त्वान्तरिक्षेभ्यः पार्थिवेभ्यश्च भारत ३५ दिव्येभ्य-

---

घेण्यास योग्य) असें ह्मणाला त्याचें मला पराकाष्ठेचें दुःख होत आहे २६. परंतु, हे अर्जुना, त्या सभेमध्यें त्या दुर्योधनानें (ह्याप्रकारें) फारच अयोग्य भाषण केल्यामुळें जें मला दुःख होत आहे त्यापेक्षां हें (तुझ्या वियोगाचें) दुःख अधिक आहे असें मला वाटतें २७. हे वीरा, तुझे सर्व भ्राते वारंवार तुझ्या पराक्रमांची प्रशंसा करीत राहतील आणि तुझ्या वियोगामुळें त्यांना झोंप येईनाशी झाली ह्मणजे तुझ्या संबंधानें गोष्टी सांगून ते कर्मणूक करितील २८. हे पार्था, तूं दीर्घकालपर्यंत प्रवास करूं लागलास ह्मणजे भोग्य वस्तु, धन अथवा किंबहुना जीवितही आह्मांला संतोषदायक होणार नाहीं व तिकडे आमचें मनही लागणार नाहीं २९. हे पार्था, आह्मां सर्वांचें सुखदुःख तुझ्यावरच अवलंबून असून जीवित, मरण, राज्य आणि ऐश्वर्य हींही तुझ्यावरच अवलंबून आहेत ३०. हे भरतत्कुलोत्पन्ना अर्जुना, मीं तुला विचारिलें आहे (माझी आठवण ठेव) आणि कल्याण प्राप्त करून घे. हे निष्पापा, बलवानांच्या मताचे विरुद्ध असलेलं हें आमचें (राज्यवैभवप्राप्तिरूप) कार्य तुला पार पाडिलें पाहिजे ३१. असो. हे महाबलाढ्य अर्जुना, विजयप्राप्तीकरितां तूं सत्वर अगदीं निर्विघ्नपणानें जा. धाता आणि विधाता ह्यांना नमस्कार असो. तूं आतां सुखरूपपणें खुशाल जा ३२. हे धनंजया, ह्री, श्री, कीर्ति, द्युति, पुष्टि, उमा, लक्ष्मी आणि सरस्वती ह्या देवता तुज प्रवाशाचें रक्षण करोत ३३. श्रेष्ठांना मान देण्याविषयीं तूं तत्पर असून ज्येष्ठ भ्रात्यांच्या आज्ञेप्रमाणें वागत आहेस. करितां, हे भरतवंशजश्रेष्ठा, वसु, रुद्र आदित्य, मरुद्गण, विश्वेदेव आणि साध्य ह्यांना तुझें कल्याण होण्याकरितां मी शरण जातें. हे भरतकुलोत्पन्ना, पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग ह्यांमध्यें वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांपासून आणि

श्चैव भूतेभ्यो ये चान्ये परिपन्थिनः । वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा-
शिषः कृष्णा विरराम यशस्विनी ३६ ततः प्रदक्षिणं कृत्वा भ्रातॄन्धौम्यं
च पाण्डवः । प्रातिष्ठत महाबाहुः प्रगृह्य रुचिरं धनुः ३७ तस्य मार्गा-
दपाक्रामन्सर्वभूतानि गच्छतः । युक्तस्यैन्द्रेण योगेन पराक्रान्तस्य
शुष्मिणः ३८ सोगच्छत्पर्वतांस्तात तपोधननिषेवितान् । दिव्यं हैमवतं
पुण्यं देवजुष्टं परन्तपः ३९ अगच्छत्पर्वतं पुण्यमेकाह्नैव महामनाः । मनो-
जवगतिर्भूत्वा योगयुक्तो यथानिलः ४० हिमवन्तमतिक्रम्य गन्धमादनमेव
च । अत्यक्रामत्स दुर्गाणि दिवारात्रमतन्द्रितः ४१ इन्द्रकीलं समासाद्य ततो-
तिष्ठद्धनञ्जयः। अन्तरीक्षेतिशुश्राव तिष्ठेति स वचस्तदा ४२ तच्छ्रुत्वा सर्व-
तोदृष्टिं चारयामास पाण्डवः। अथापश्यत्सव्यसाची वृक्षमूले तपस्विनम् ४३
ब्राह्म्या श्रिया दीप्यमानं पिङ्गलं जटिलं कृशम् । सोब्रवीदर्जुनं तत्र स्थितं
दृष्ट्वा महातपाः ४४ कस्त्वं तातेह संप्राप्तो धनुष्मान्कवची शरी । निबद्धा-

---

इतरही जे कोणी विरुद्ध असतील त्यांपासून तुझें कल्याण होवो ". वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें आशीर्वाद देऊन ती यशस्विनी (द्रुपदकन्या) कृष्णा स्तब्ध राहिली ३४,३५,३६. तदनतर आपले भ्राते आणि धौम्य ह्यांना प्रदक्षिणा करून आणि आपलें भव्य धनुष्य हातांत घेऊन तो महापराक्रमी पांडुपुत्र अर्जुन तेथून निघाला ३७ व इंद्राची भेट घेण्याकरितां उद्युक्त झालेला तो पराक्रमी व बलाढ्य अर्जुन जाऊं लागला असतां सर्व प्राणी त्याच्या मार्गापासून दूर झाले ३८. बा जन-मेजया, तपोधनांनीं सेवित अशा पर्वतांवर प्रथम तो गेला आणि नंतर देवांनीं वास्तव्य केलेल्या पुण्य व दिव्य अशा हिमालय पर्वताकडे तो चालला ३९. तो महाशय अर्जुन योगबलानें संपन्न असल्यामुळें मनोवेगाप्रमाणें शीघ्र गतीनें युक्त झाला आणि वायूसारिखा एका दिवसांतच त्या पवित्र पर्वतावर गेला ४०. नंतर हिमा-लय आणि गंधमादन हे पर्वत ओलांडून गेल्यावर तो सावध राहणारा अर्जुन रात्रंदिवस दुर्गम प्रदेशांचेंही उल्लंघन करीत चालला ४१. जातां जातां इंद्रकील पर्वतावर आल्यानंतर अंतरिक्षामध्यें " उभा रहा " असे शब्द त्यानें ऐकिल्यामुळें तो तेथें उभा राहिला ४२ आणि ते शब्द ऐकिल्यावर तो पांडुपुत्र सर्व बाजूंस दृष्टि देऊं लागला. तेव्हां ब्राह्म तेजानें देदीप्यमान, पिंगट वर्णानें युक्त व जटा धारण केलेला असा एक कृश तपस्वी एका वृक्षाच्या मुळाशीं बसलेला त्यानें अवलोकन केला ४३,४४. पुढें त्या ठिकाणीं स्थित असलेल्या अर्जुनाला तो महात-पस्वी ह्मणाला " बाबा, धनुष्य, कवच, बाण, खड्ग आणि तलत्राण धारण करून क्षात्र

मितलत्राणः क्षत्रधर्ममनुव्रतः ४५ नेह शस्त्रेण कर्तव्यं शान्तानामेष आलयः। विनीतक्रोधहर्षाणां ब्राह्मणानां तपस्विनाम् ४६ नेहास्ति धनुषा कार्यं न सङ्ग्रामोत्र कर्हिचित् । निक्षिपैतद्धनुस्तात प्राप्तोसि परमां गतिम् ४७ ओजसा तेजसा वीर यथा नान्यः पुमान्क्वचित् ४८ तथा हसन्निवाभीक्ष्णं ब्राह्मणोर्जुनमब्रवीत् । न चैनं चालयामास धैर्यात्सुधृतनिश्चयम् ४९ तमुवाच ततः प्रीतः स द्विजः प्रहसन्निव । वरं वृणीष्व भद्रं ते शक्रोहमरिसूदन ५० एवमुक्तः सहस्राक्षं प्रत्युवाच धनञ्जयः । प्राञ्जलिः प्रणतो भूत्वा शूरः कुरुकुलोद्वहः ५१ ईप्सितो ह्येष वै कामो वरं चैनं प्रयच्छ मे । त्वत्तोद्य भगवन्नस्त्रं कृत्स्नमिच्छामि वेदितुम् ५२ प्रत्युवाच महेन्द्रस्तं प्रीतात्मा प्रहसन्निव । इह प्राप्तस्य किं कार्यमस्त्रैस्तव धनञ्जय ५३ कामान्वृणीष्व लोकांस्त्वं प्राप्तोसि परमां गतिम् । एवमुक्तः प्रत्युवाच सहस्राक्षं धनञ्जयः ५४ न लोभान्न पुनः कामान्न देवत्वं पुनः सुखम् ।

धर्माचें अवलंबन करीत असलेला असा कोण तूं येथें प्राप्त झाला आहेस ? अरे, ह्या ठिकाणीं शस्त्रांचें कांहींएक काम नाहीं. क्रोध आणि हर्ष हे ज्यांनीं जिंकिले आहेत अशा तपस्वी शांत ब्राह्मणांचें हें वसतिस्थान आहे; ह्या ठिकाणीं धनुष्याचें काम नाहीं. कारण, येथें कधींही संग्राम होण्याचा संभव नाहीं ४५,४६,४७. बा वीरा, सामर्थ्य आणि तेज ह्यांच्या योगानें तूं पराकाष्ठेचा दूर आला आहेस. तुझ्याप्रमाणें इतकें दूरपर्यंत दुसऱ्या कोणालाही येतां येणें शक्य नाहीं " ४८. ह्याप्रमाणें हंसल्यासारिखें करीत करीत तो ब्राह्मण वारंवार अर्जुनाला ह्मणाला. परंतु, त्या अत्यंत दृढनिश्चयी अर्जुनाला धैर्यापासून चळविण्यास तो समर्थ झाला नाहीं ४९. तेव्हां " हे शत्रुनाशका, तुझें कल्याण असो. तूं वर माग; मी इंद्र आहें. " असें हंसत हंसत तो ब्राह्मण सुप्रसन्न होऊन अर्जुनाला ह्मणाला ५०. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें अर्जुनाला सांगितलें असतां तो कुरुकुलश्रेष्ठ शूर अर्जुन हात जोडून नम्र झाला आणि त्या इंद्राला ह्मणाला ५१ " हे भगवन्, आपणांपासून आज संपूर्ण अस्त्रविद्या जाणण्याची माझी इच्छा आहे. सारांश. हाच माझा मनोरथ असून आपणही मला हाच वर द्या " ५२. (ह्याप्रमाणें अर्जुनानें प्रार्थना केली असतां) अंतःकरणामध्यें प्रसन्न झालेला महेंद्र हंसल्यासारिखें करून " हे धनंजया, अशा शांत ठिकाणीं तूं प्राप्त झाला असतांना अस्त्रांचें तुला काय कर्तव्य आहे ? तूं पराकाष्ठेचा दूर आला आहेस; ह्याकरितां, इच्छेप्रमाणें तूं भोग मागून घे. " असें त्या अर्जुनाला फिरून ह्मणाला. परंतु, ह्याप्रमाणें इंद्रानें त्याला सांगितलें असतांही अर्जुनानें त्या सहस्रनयन इंद्राला प्रत्युत्तर दिलें

न च सर्वामरैश्वर्यं कामये त्रिदशाधिप ५५ भ्रातॄंस्तान्विपिने त्यक्त्वा वैरमप्रतियात्य च । अकीर्तिं सर्वलोकेषु गच्छेयं शाश्वतीः समाः ५६ एवमुक्तः प्रत्युवाच वृत्रहा पाण्डुनन्दनम् । सान्त्वयञ्श्लक्ष्णया वाचा सर्वलोकनमस्कृतः ५७ यदा द्रक्ष्यसि भूतेशं त्र्यक्षं शूलधरं शिवम् । दातास्मि ते तदा तात दिव्यान्यस्त्राणि सर्वशः५८क्रियतां दर्शने यत्नो देवस्य परमेष्ठिनः । दर्शनात्तस्य कौन्तेय संसिद्धः स्वर्गमेष्यसि ५९ इत्युक्त्वा फाल्गुनं शक्रो जगामादर्शनं पुनः । अर्जुनोऽप्यथ तत्रैव तस्थौ योगसमन्वितः ६० [१५२६] इति श्रीमहाभारते०मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणीन्द्रदर्शने सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥ समाप्तं चार्जुनाभिगमनपर्व ॥

अथ कैरातपर्व ॥ जनमेजय उवाच ॥ भगवञ्छ्रोतुमिच्छामि पार्थस्याक्लिष्टकर्मणः । विस्तरेण कथामेतां यथास्त्राण्युपलब्धवान् १ यथा च पुरुषव्याघ्रो दीर्घबाहुर्धनंजयः । वनं प्रविष्टस्तेजस्वी निर्मनुष्यमभीतवत् २

कीं ५३, ५४, " हे स्वर्गाधिपते, लोभानें अथवा विषयलालसेनें मला देवत्वाची, स्वर्गसुखाची आणि त्याचप्रमाणें सर्व देवांच्या आधिपत्याचीही इच्छा नाहीं ५५. त्या भ्रात्यांना अरण्यामध्यें सोडून आणि वैरावा सूड न उगवून मी जर स्वर्गसुखाच्या वगैरे मागें लागलों तर सर्व लोकांमध्यें माझी अनंत कालपर्यंत अपकीर्ति होऊन राहील" ५६. ह्याप्रमाणें अर्जुनानें इंद्राला सांगितलें असतां सर्व लोकांना वंद्य असलेला तो वृत्रघातक इंद्र पांडुपुत्र अर्जुनाचें सांत्वन करीत करीत मनोहर वाणीनें त्याला ह्मणाला ५७ " बा अर्जुना, भूताधिपति त्रिलोचन शूलपाणि शिवाचें जेव्हां तुला दर्शन होईल तेव्हां मी तुला सर्व दिव्यास्त्रें देईन ५८. ह्यास्तव, त्या श्रेष्ठ देवाचें दर्शन होण्याविषयीं तूं यत्न कर. हे कुंतीपुत्रा, त्याच्या दर्शनानें तुला सिद्धि प्राप्त होऊन तूं स्वर्गाप्रत येशील" ५९. ह्याप्रमाणें अर्जुनाला सांगून इंद्र तेथेंच अंतर्धान पावला आणि योगाचें अवलंबन केलेला अर्जुनही तेथेंच राहिला ६०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं अर्जुनाला (ब्राह्मणरूपानें) इंद्राचें दर्शन झाल्याविषयीं सदतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३७ ॥ ह्या ठिकाणीं अर्जुनाभिगमनपर्वही संपूर्ण झालें ॥

येथून पुढें कैरातपर्वाला आरंभ झाला. जनमेजय ह्मणतोः—हे भगवन् , पराक्रम करण्यांत मुळींच क्लेश न पावणाऱ्या कुंतीपुत्र अर्जुनाला अस्त्रें कशीं प्राप्त झालीं ह्याविषयीं ही सविस्तर कथा श्रवण करण्याची माझी इच्छा आहे १. त्याचप्रमाणें तो पुरुषश्रेष्ठ आजानुबाहु तेजस्वी धनंजय निर्भयपणें निर्जनवनामध्यें कसा प्रविष्ट झाला ?२;

किं च तेन कृतं तत्र वसता ब्रह्मवित्तम । कथं च भगवान्स्थाणुर्देवराजश्च तोषितः ३ एतदिच्छाम्यहं श्रोतुं त्वत्प्रसादाद्द्विजोत्तम । त्वं हि सर्वज्ञ दिव्यं च मानुषं चैव वेत्थ ह४ अत्यद्भुततमं ब्रह्मँल्लोमहर्षणमर्जुनः । भवेन सह सङ्ग्रामं चकाराप्रतिमं किल ५ पुरा प्रहरतां श्रेष्ठः सङ्ग्रामेष्वपराजितः । यच्छ्रुत्वा नरसिंहानां दैन्यहर्षातिविस्मयात् ६ शूराणामपि पार्थानां हृदयाणि चकंपिरे । यद्यच्च कृतवानन्यत्पार्थस्तदखिलं वद ७ न ह्यस्य निन्दितं जिष्णोः सुसूक्ष्ममपि लक्षये । चरितं तस्य शूरस्य तन्मे सर्वं प्रकीर्तय ८ वैशम्पायन उवाच ॥ कथयिष्यामि ते तात कथामेतां महात्मनः । दिव्यां पौरवशार्दूल महतीमद्भुतोपमाम् ९ गात्रसंस्पर्शसंबद्धां त्र्यम्बकेण महानघ । पार्थस्य देवदेवेन शृणु सम्यक्समागमम् १० युधिष्ठिरनियोगात्स जगामामितविक्रमः । शक्रं सुरेश्वरं द्रष्टुं देवदेवं च शंकरम् ११ दिव्यं तद्धनुरादाय खड्गं च कनकत्सरुम् । महाबलो महाबाहुरर्जुनः कार्यसिद्धये १२ दिशं ह्युदीचीं कौरव्यो हिमवच्छिखरं प्रति ।

हे ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठा तेथें वास्तव्य करीत असतांना त्यानें काय केलें आणि भगवान्, शिव व देवराज इंद्र ह्यांना त्यानें कसं संतुष्ट केलें ? ३ हें, हे द्विजोत्तमा, आपल्या प्रसादानें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. कारण, हे सर्वज्ञा, स्वर्ग व मनुष्यलोक ह्यासंबंधानें आपण सर्व कांहीं जाणत आहां ४. हे ब्रह्मन् , प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आणि संग्रामामध्यें अजिंक्य अशा अर्जुनानें पूर्वी अंगावर कांटा येण्यासारिखा अत्यंत अद्भुत व अप्रतिम संग्राम शिवांशीं केला आहे आणि तें वृत्त नुसतें श्रवण करूनच दैन्य, हर्ष आणि अत्यंत विस्मय झाल्यामुळें पुरुषश्रेष्ठ आणि शूर अशा पांडवांचींही हृदयें कंपित झालीं असें सांगतात. करितां, आणखी त्या कुंतीपुत्र अर्जुनानें जें जें कांहीं केलें असेल तें सर्व आपण मला कथन करा ५,६,७. ह्या अर्जुनासंबंधीं निंद्य असें अत्यंत सूक्ष्म सुद्धां मला कांहीं आढळत नाहीं. करितां, त्या शूराचें तें सर्व चरित्र आपण मला कथन करा ८. वैशंपायन सांगतातः— बा पुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, त्र्यंबकाशीं अंगस्पर्श झाल्याचा संबंध असल्यामुळें आश्चर्याप्रमाणें असलेली ही त्या महात्म्याची मोठी दिव्य कथा मी तुला कथन करितों. हे निष्पापा, देवाधिदेव त्र्यंबकाशीं कुंतीपुत्र अर्जुनाचा झालेला समागम तूं चांगला श्रवण कर ९,१०. तो अपरिमितपराक्रमी, महाबलाढ्य आणि आजानुबाहु अर्जुन कार्यसिद्धीकरितां युधिष्ठिराची आज्ञा झाल्यामुळें तें दिव्य धनुष्य आणि सुवर्णाच्या मुष्टीनें युक्त असलेला खड्ग घेऊन देवराज इंद्राचें व देवाधिदेव शंकराचें दर्शन घेण्याकरितां

ऐन्द्रिः स्थिरमना राजन्सर्वलोकमहारथः १३ त्वरया परया युक्तस्तपसे
धृतनिश्चयः । वनं कण्टकितं घोरमेक एवान्वपद्यत १४ नानापुष्पफलो-
पेतं नानापक्षिनिषेवितम् । नानामृगगणाकीर्णं सिद्धचारणसेवितम १५
ततः प्रयाते कौन्तेये वनं मानुषवर्जितम् । शङ्खानां पटहानां च शब्दः सम-
भवद्दिवि १६ पुष्पवर्षं च सुमहन्निपपात महीतले । मेघजालं च विततं
छादयामास सर्वतः १७ सोतीत्य वनदुर्गाणि सन्निकर्षे महागिरेः । शुशुभे
हिमवत्पृष्ठे वसमानोर्जुनस्तदा १८ तत्रापश्यद्द्रुमान्फुल्लान्विहगैर्वल्गुनादि-
तान् । नदीश्च विपुलावर्ता वैडूर्यविमलप्रभाः १९ हंसकारण्डवोद्गीताः
सारसाभिरुतास्तथा । पुंस्कोकिलरुताश्चैव क्रौञ्चबर्हिणनादिताः २०
मनोहरवनोपेतास्तस्मिन्नतिरथोर्जुनः । पुण्यशीतामलजलाः पश्यन्प्रीतमना-
भवत् २१ रमणीये वनोद्देशे रममाणोर्जुनस्तदा । तपस्युग्रे वर्तमान उग्र-
तेजा महामनाः २२ दर्भचीरं निवस्याथ दण्डाजिनविभूषितः । शीर्ण

निघाला ११,१२. हे राजा, त्रैलोक्यांतील महारथी आणि निश्चयाचा दृढ असा तो कुरुकुलोत्पन्न इंद्रपुत्र अर्जुन हिमालयाच्या शिखरावर गेल्यानंतर १३ पराकाष्ठेच्या त्वरेनें युक्त झाला आणि तपश्चर्येविषयीं निश्चय धरून एकटाच कंटकांनीं व्याप्त आणि भयंकर अशा वनामध्यें गेला १४. तें वन नानाप्रकारचीं पुष्पें आणि फलें ह्यांनीं युक्त होतें, नानाप्रकारचे पक्षी तेथें वास्तव्य करीत होते; अनेक प्रकारच्या मृगसमुदायांनीं तें व्याप्त झालेलें होतें आणि सिद्ध व चारण त्याच्या आश्रयाला राहिलेले होते १५. नंतर तो कुंतीपुत्र तेथून पुढें गेला असतां स्वर्गामध्यें शंख व दुंदुभि ह्यांचा ध्वनि होऊं लागला १६; त्याच्या मागोमाग भूतलावर मोठी पुष्पवृष्टि होऊं लागली आणि विस्तृत मेघजाल चोहोंकडे पसरूं लागलें १७. ह्याप्रमाणें महापर्वताच्या समीप असलेल्या वनांतलि बिकट प्रदेशांचें उल्लंघन करून हिमालयाच्या पृष्ठभागीं अर्जुन वास्तव्य करूं लागला असतां(फारच) शोभूं लागला १८. त्या ठिकाणीं पक्ष्यांच्या मधुर शब्दांनीं नादित झालेले प्रफुल्लित वृक्ष अर्जुनानें अवलोकन केले व असंख्य भोंवऱ्यांनीं युक्त आणि वैडूर्य रत्नाप्रमाणें उज्ज्वल अशा नद्याही अवलोकन केल्या १९. त्या नद्यांवर हंस आणि कारंडव पक्षी गायन करीत होते; सारस आणि कोकिल पक्षी तेथें शब्द करीत होते आणि त्याचप्रमाणें मनोहर वनें व पवित्र, शीतल आणि निर्मल जल ह्यांनीं युक्त असलेल्या त्या नद्या क्रौंच आणि मयूर पक्ष्यांच्या ध्वनींनीं नादित झालेल्या होत्या. त्या अवलोकन करून अतिरथी अर्जुनाच्या मनाला आनंद झाला २०,२१. त्या रमणीय वनप्रदेशामध्यें अर्जुनाचें मन रमूं लागलें व तो

च पतितं भूमौ पर्णं समुपयुक्तवान् २३ पूर्णे पूर्णे त्रिरात्रे तु मासमेकं फलाशनः । द्विगुणेन हि कालेन द्वितीयं मासमत्ययात् २४ तृतीयमपि मासं स पक्षेणाहारमाचरत् । चतुर्थे त्वथ संप्राप्ते मासे भरतसत्तमः २५ वायुभक्षो महाबाहुरभवत्पाण्डुनन्दनः । ऊर्ध्वबाहुर्निरालम्बः पादाङ्गुष्ठाग्रधिष्ठितः २६ सदोपस्पर्शनाच्चास्य बभूवुरमितौजसः । विद्युदम्भोरुहनिभा जटास्तस्य महात्मनः २७ ततो महर्षयः सर्वे जग्मुर्देवं पिनाकिनम् । निवेदयिषवः पार्थं तपस्युग्रे समास्थितम् २८ तं प्रणम्य महादेवं शशंसुः पार्थकर्म तत् । एष पार्थो महातेजा हिमवत्पृष्ठमास्थितः २९ उग्रे तपसि दुष्पारे स्थितो धूमाययन्दिशः । तस्य देवेश न वयं विद्मः सर्वे चिकीर्षितम् ३० संतापयति नः सर्वानसौ साधु निवार्यताम् । तेषां तद्वचनं श्रुत्वा मुनीनां भावितात्मनाम् ३१ उमापतिर्भूतपतिर्वाक्यमेतदुवाच

उग्रतेजस्वी महाशय दुष्कर तपश्चर्या करूं लागला २२. दर्भमय वस्त्र परिधान करून दंड व अजिन ह्यांनीं तो भूषित झाला आणि सुकून खालीं पडलेलें पान खाऊं(न निर्वाह करूं) लागला २३. नंतर तीन तीन दिवस पूर्ण झाल्यावर एक वेळ फलाहार असा त्यानें एक महिना काढिला आणि पहिल्याच्या दुप्पट काळ लोटल्यावर (ह्मणजे सहा दिवस पूर्ण झाल्यावर एक वेळ फलाहार) असा त्यानें दुसरा महिना काढिला २४. तिसऱ्या महिन्याला त्यानें पंधरवड्यांतून एक वेळ असा आहार केला आणि चवथा महिना लागल्यावर तो भरतवंशजश्रेष्ठ २५ महापराक्रमी पांडुपुत्र अर्जुन वायु भक्षण करूं लागला आणि हात वर करून व केवल पादांगुष्ठावरच उभा राहून (आधारा करितां) दुसऱ्या कशाचेंही अवलंबन न करितां तपश्चर्या करूं लागला २६. सवदां स्नान करीत असल्यामुळें त्या महात्म्या अतुलतेजस्वी अर्जुनाच्या जटा विद्युल्लता आणि कमलें ह्यांप्रमाणें दिसूं लागल्या २७. तेव्हां अर्जुन उग्र तपश्चर्या करीत बसला आहे हें निवेदन करण्याकरितां सर्व महर्षि पिनाकपाणि महादेवाकडे गेले २८ आणि त्या महादेवाला प्रणाम करून त्याला तें अर्जुनाचें कर्म सांगूं लागले कीं " हे देवाधिपते, हिमालयाच्या पृष्ठ भागाचें अवलंबन करून असलेला हा महातेजस्वी अर्जुन २९ दुर्घट अशी उग्र तपश्चर्या करीत आहे आणि आपल्या तपाच्या योगानें सर्व दिशा धूम्रमय करून टाकीत आहे. तेव्हां त्याच्या मनामध्यें काय आहे हें आह्मांपैकीं कोणालाही ठाऊक नाहीं ३०. ह्याच्या योगानें आह्मांला संताप होत आहे. करितां, ह्याचें चांगलेंच निवारण करा ". ह्याप्रमाणें त्या जितेंद्रिय मुनींचें तें भाषण श्रवण करून ३१ उमापति भूतराज महादेव ह्मणाले " अर्जुनाच्या संबंधानें

ह। महादेव उवाच ॥ न वो विषादः कर्तव्यः फाल्गुनं प्रति सर्वशः३२ शीघ्रं गच्छत संहृष्टा यथागतमतन्द्रिताः। अहमस्य विजानामि संकल्पं मनसि स्थितम् ३३ नास्य स्वर्गस्पृहा काचिन्नैश्वर्यस्य तथायुषः। यत्त्वस्य काङ्क्षितं सर्वं तत्करिष्येहमद्य वै ३४ वैशम्पायन उवाच॥ तच्छ्रुत्वा शर्ववचनमृषयः सत्यवादिनः। प्रहृष्टमनसो जग्मुर्यथा स्वान्पुनरालयान् ३५ [१५६१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वणि कैरातपर्वणि मुनिशंकरसंवादेऽष्टत्रिंशोध्यायः ॥ ३८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ गतेषु तेषु सर्वेषु तपस्विषु महात्मसु। पिनाकपाणिर्भगवान्सर्वपापहरो हरः १ कैरातं वेषमास्थाय काञ्चनद्रुमसंनिभम्। विभ्राजमानो विपुलो गिरिर्मेरुरिवापरः २ श्रीमद्धनुरुपादाय शरांश्चाशीविषोपमान्। निष्पपात महावेगो दहनो देहवानिव ३ देव्या सहोमया श्रीमान्समानव्रतवेषया। नानावेषधरैर्हृष्टैर्भूतैरनुगतस्तदा ४ किरातवेषसंछन्नः स्त्रीभिश्चापि सहस्रशः। अशोभत तदा राजन्स देशोतीव

तुह्मांला भय बाळगण्याचे मुळींच कारण नाहीं ३२. तुह्मी हुशारी धरून आनंदानें आला तसे सत्वर परत जा. ह्याच्या मनांत असलेला उद्देश मी जाणीत आहें ३३. ह्याला स्वर्गाची इच्छा किमपि नाहीं आणि त्याचप्रमाणें ऐश्वर्याची अथवा आयुष्याचीही ह्याला वांछा नाहीं. त्यानें जें मनामध्यें आणिलें आहे तें सर्व आज मी शेवटास नेईन ३४. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें महादेवाचें भाषण श्रवण करून ते सत्यवादी ऋषि आनंदित झाले आणि आपआपल्या स्थानाप्रत परत गेले ३५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कैरातपर्वापैकीं ऋषि आणि शंकर ह्यांच्या संवादाविषयीं अडतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३८॥

वैशंपायन सांगतातः— ते सर्व महात्मे तपस्वी मुनि गेल्यावर सर्वपापहारक भगवान् पिनाकपाणि हर १ कांचनवृक्षासमान उज्ज्वल असा किरातवेष धारण करून दुसरा मेरुपर्वतच कीं काय असा भव्य दिसूं लागला २ आणि भव्य धनुष्य व सर्पासारिखे (तीक्ष्ण) बाण घेऊन तसेंच व्रत व वेष धारण केलेल्या उमादेवीसहवर्तमान तो वैभवशाली व मूर्तिमान् अग्निच की काय असा तेजस्वी शंकर मोठ्या वेगानें वनामध्यें चालला ३. तेव्हां आनंदित झालेले भूतगणही नानाप्रकारचे वेष धारण करून त्याच्यामागोमाग गेले ४. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजयराजा, (ह्याप्रमाणें भूतगणासहवर्तमान किरातवेष धारण करून शंकर त्या वनामध्यें गेले असतां) किरातवेषधारी पुरुषांनीं व तशाच प्रकारच्या हजारों स्त्रियांनीं भरून गेलेला तो प्रदेश

भारत ५ क्षणेन तद्वनं सर्वं निःशब्दमभवत्तदा । नादः प्रस्रवणानां च पक्षिणां चाप्युपारमत् ६ स संनिकर्षमागम्य पार्थस्याक्लिष्टकर्मणः । मूकं नाम दनोः पुत्रं ददर्शाद्भुतदर्शनम् ७ वाराहं रूपमास्थाय तर्कयन्तमिवार्जुनम । हन्तुं परमदुष्टात्मा तमुवाचाथ फाल्गुनः ८ गाण्डीवं धनुरादाय शरांश्चाशीविषोपमान् । सज्यं धनुर्वरं कृत्वा ज्याघोषेण निनादयन् ९ यन्मां प्रार्थयसे हन्तुमनागसमिहागतम् । तस्मात्त्वां पूर्वमेवाहं नेताद्य यमसादनम् १० दृष्ट्वा तं प्रहरिष्यन्तं फाल्गुनं दृढधन्विनम् । किरातरूपी सहसा वारयामास शंकरः ११ मयैष प्रार्थितः पूर्वमिन्द्रनीलसमप्रभः । अनादृत्य च तद्वाक्यं प्रजहाराथ फाल्गुनः १२ किरातश्च समं तस्मिन्नेकलक्ष्ये महाद्युतिः । प्रमुमोचाशनिप्रख्यं शरमग्निशिखोपमम् १३ तौ मुक्तौ सायकौ ताभ्यां मर्म तत्र निपततुः । मूकस्य गात्रे विस्तीर्णे शैलसंहनने तदा १४ यथाशनेर्विनिर्घोषो वज्रस्येव च पर्वते । तथा तयोः संनिपातः शरयोर-

---

अतिशयच शोभूं लागला ५. (शंकर अशाप्रकारें त्या वनामध्यें प्रविष्ट झाले असतां), एका क्षणांत तें सर्व वन अगदीं शब्दरहित झालें. कारण, तेथील जलप्रवाहांचा ध्वनि बंद होऊन पक्ष्यांचाही शब्द बंद झाला ६. थकवा आल्यावांचून एकसारिखा पराक्रम करणाऱ्या अर्जुनाचे समीप आल्यावर आश्चर्यकारक रूप धारण केलेला मूकनामक दानव त्या शंकरांचे दृष्टीं पडला ७. तो दानव क्रोधानें पराकाष्ठेचा जळत होता आणि वाराह रूप धारण करून अर्जुनाचा वध करण्याचा अजमास पाहत होता. तेव्हां गांडीव धनुष्य आणि सर्पासमान (भयंकर) बाण हातांत घेऊन व तें श्रेष्ठ धनुष्य सज्य करून प्रत्यंचेच्या टणत्कारानें (दशदिशा) नादित करीत करीत अर्जुन त्याला ह्मणाला ८, ९ " अरे, येथें आलेल्या मज निरुपद्रव्याचा ज्याअर्थी वध करण्याची तूं इच्छा करीत आहेस त्याअर्थी मी आधींच आज तुला यमसदनीं पोंचवितों " १०. (असें ह्मणत ह्मणत) तो महाधनुर्धारी अर्जुन त्या वराहावर प्रहार करण्याच्या बेतात आहे असें अवलोकन करून किरातरूपी शंकरांनीं. " इंद्रकीलपर्वताप्रमाणें असलेल्या वराहाला मींच आधीं बाण मारण्याचें ठरविलें आहे " ह्मणून, एकदम त्याचें निवारण केलें; परंतु, त्यांच्या सांगण्याची परवा न करितां अर्जुनानें त्या वराहावर प्रहार केला ११, १२. तेव्हां त्याच वराहावर महातेजस्वी किरातानेंही अग्नीच्या ज्वालेप्रमाणें देदीप्यमान आणि वज्रासारिखा दृढ बाण त्याच वेळीं टाकिला १३. त्या किरातार्जुनांनीं सोडिलेले ते बाण विस्तीर्ण आणि पर्वताप्रमाणें दृढ अशा मूकराक्षसाच्या शरीरावर एकदम पडले १४. तेव्हां त्या दोन्ही बाणांच्या एकमेकांना धडका बसल्या असतां पर्वतावर टाकिलेल्या

भवत्तदा १५ स विद्धो बहुभिर्बाणैर्दीप्तास्यैः पन्नगैरिव । ममार राक्षसं रूपं भूयः कृत्वा विभीषणम् १६ स ददर्श ततो जिष्णुः पुरुषं काञ्चनप्रभम् । किरातवेषसंछन्नं स्त्रीसहायममित्रहा १७ तमब्रवीत्प्रीतमनाः कौन्तेयः प्रहसन्निव । को भवानटते शून्ये वने स्त्रीगणसंवृतः १८ न त्वमस्मिन्वने घोरे बिभेषि कनकप्रभ । किमर्थं च त्वया विद्धो वराहो मत्परिग्रहः १९ मयाभिपन्नः पूर्वं हि राक्षसोयमिहागतः । कामात्परिभवाद्वापि न मे जीवन्विमोक्ष्यसे २० न ह्येष मृगयाधर्मो यस्त्वयाद्य कृतो मयि । तेन त्वां नाशयिष्यामि जीवितात्पर्वताश्रय २१ इत्युक्तः पाण्डवेयेन किरातः प्रहसन्निव । उवाच श्लक्ष्णया वाचा पाण्डवं सव्यसाचिनम् २२ न मत्कृते त्वया वीर भीः कार्या वनमन्तिकात् । इयं भूमिः सदास्माकमुचिता वसतां वने २३ त्वया तु दुष्करः कस्मादिह वासः प्ररोचितः । वयं तु बहुसत्त्वेस्मिन्निवसामस्तपोधन २४ भवांस्तु कृष्णवर्त्माभः सुकुमारः सुखोचितः । कथं शून्य-

---

वज्राप्रमाणें आणि विजेच्या कडकडाटाप्रमाणें त्यांचा ध्वनि झाला १५. असो. ह्याप्रमाणें प्रदीप्त मुखांनीं युक्त असलेले सर्पच कीं काय अशा अनेक बाणांच्या योगानें वेध झाला असतां तो वराह पुनरपि आपलें भयंकर राक्षसरूप धारण करून मृत्यु पावला १६. तदनंतर शत्रुनाशक अर्जुन त्या किराताकडे पाहूं लागला असतां सुवर्णासारिख्या कांतीनें युक्त असा किरातवेषधारी पुरुष बरोबर स्त्रिया घेऊन आलेला त्याचे दृष्टीस पडला १७. तेव्हां कुंतीपुत्र अर्जुन मनामध्यें प्रसन्न होऊन हंसत हंसत त्याला ह्मणाला " ह्या निर्जन वनामध्य स्त्रीगणानें परिवेष्टित असा तूं कोण संचार करीत आहेस ? १८. हे सुवर्णासमान तेजस्वी पुरुषा, तूं ह्या घोर वनामध्यें (संचार करण्यास) भीतही नाहींस. (बरें तेंही असो. परंतु) मी शिकार ह्मणून योजिलेल्या वराहाला तूं कां ह्मणून वेध केलास ? १९. ह्या येथें आलेल्या राक्षसाचा शिकार ह्मणून पूर्वीं मीं स्वीकार केलेला होता. तस्मात्, तुला कामामुळें मृत्यु येवो अथवा पराभवामुळें मृत्यु येवो आज माझ्या हातून तुझी जिवंत सुटका होत नाहीं २०. अरे, आज तूं ज्या रीतीनें माझ्याशीं वागलास तो हा मृगयाधर्म नव्हे. तस्मात्, पर्वतावर वास्तव्य करून राहणाऱ्या तुला मी आज जीवितापासून सोडवितों " २१. ह्याप्रमाणें पांडुपुत्र अर्जुनानें सांगितलें असतां तो किरात हंसत हंसत सौम्य वाणीनें सव्यसाची पांडुपुत्र अर्जुनाला ह्मणाला २२ " हे वीरा, वनाचे समीप मी वास्तव्य करितों ह्मणून माझ्याकरितां तुला मुळींच काळजी करण्याचें कारण नाहीं. अरे, वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या आह्मांला ही भूमिच सर्वदां योग्य आहे २३. परंतु, हे तपोधना, तूं ह्या ठिकाणीं दुर्घट वास्तव्य करण्याचें कशाकरितां मनामध्यें आणिलें आहेस ? अरे,

मिमं देशमेकाकी विचरिष्यति २५ अर्जुन उवाच ॥ गाण्डीवमाश्रयं कृत्वा नाराचांश्चाग्निसंनिभान् । निवसामि महारण्ये द्वितीय इव पावकिः २६ एष चापि मया जन्तुर्मृगरूपं समाश्रितः । राक्षसो निहतो घोरो हन्तुं मामिह चागतः २७ किरात उवाच ॥ मयैष धनुर्भिर्मुक्तैस्ताडितः पूर्वमेव हि । बाणैरभिहतः शेते नीतश्च यमसादनम् २८ ममैष लक्ष्यभूतो हि मम पूर्वपरिग्रहः । ममैव च प्रहारेण जीविताद्व्यपरोपितः २९ दोषान्स्वान्नार्हसेन्यस्मै वक्तुं स्वबलदर्पितः । अवलिप्तोसि मन्दात्मन्न मे जीवन्विमोक्ष्यसे ३० स्थिरो भवस्व मोक्ष्यामि सायकानशनीरिव । घटस्व परया शक्त्या मुञ्च त्वमपि सायकान् ३१ तस्य तद्वचनं श्रुत्वा किरातस्यार्जुनस्तदा । रोषमाहारयामास ताडयामास चेषुभिः ३२ ततो हृष्टेन मनसा प्रतिजग्राह सायकान् । भूयो भूय इति प्राह मन्द मन्देत्युवाच ह ३३ प्रह-

---

अनेक प्रकारच्या प्राण्यांनीं युक्त असलेल्या ह्या वनामध्यें तर आह्मींच रहात असतों २४. तूं अग्नीप्रमाणें उज्ज्वल कांतीनें युक्त असून सुकुमार व सुखात राहण्यासच योग्य दिसत आहेस. तस्मात् , तूं एकटा ह्या निर्जन प्रदेशामध्यें कां संचार करीत आहेस? "२५.अर्जुन ह्मणतो:—"अग्नीसारिखें तेजस्वी नाराचसंज्ञक बाण आणि गांडीव धनुष्य ह्यांचा आश्रय करून दुसरा षडाननच कीं काय असा मी ह्या महावनामध्यें वास्तव्य करीत आहें २६ आणि वनपशूंचें रूप धारण करून माझा वध करण्याच्या उद्देशानें ह्या ठिकाणीं असलेल्या ह्या घोर राक्षसाचा वधही मींच केला आहे" २७. किरात ह्मणतो:—"मींच धनुष्यापासून सुटलेल्या बाणांच्या योगानें ह्याला प्रथमतः ताडन केलें आहे, माझ्याच बाणांच्या योगानें ताडित होऊन हा पडलेला आहे आणि माझ्याच बाणांनीं ह्याला यमसदनाप्रत नेलें आहे २८. सारांश, मींच ह्याच्यावर निशाण धरिलें होतें, मींच ह्याचा वध करण्याचें प्रथम योजिलें होतें आणि आतांही माझ्याच प्रहाराच्या योगानें ह्याला मरण आलेलें आहे २९. अरे, (स्वतःच तूं मृगया धर्माचें अतिक्रमण केलेलें आहेस) करितां, आपल्या हातून झालेले दोष स्वतःच्या पराक्रमानें चढून जाऊन दुसऱ्यावर लादणें तुला योग्य नाहीं. हे मूढा, तुला गर्व झाला आहे. करितां, आज माझ्या हातून तुझी जिवंत सुटका होत नाहीं ३०. अरे, धीर धर. प्रतिवज्रेंच कीं काय असे बाण मी तुझ्यावर सोडितों. तुझ्या अंगांत काय जी पराकाष्ठेची शक्ति असेल ती सर्व एकत्र कर आणि तूंही माझ्यावर बाण टाक" ३१. ह्याप्रमाणें किराताचें तें भाषण श्रवण करून अर्जुन क्रुद्ध झाला आणि बाणांनीं त्याला प्रहार करूं लागला ३२. तेव्हां आनंदयुक्त मनानें त्या बाणांचा स्वीकार करून "अरे मूढा, अरे मूढा, ह्या मर्मभेदी

रस्व शरानेतान्नाराचान्मर्मभेदिनः । इत्युक्तो बाणवर्षं स मुमोच सहसा-र्जुनः ३४ ततस्तौ तत्र संरब्धौ गर्जमानौ मुहुर्मुहुः । शरैराशीविषाका-रैस्ततक्षाते परस्परम् ३५ ततोऽर्जुनः शरवर्षं किराते समवासृजत् । तत्प्र-सन्नेन मनसा प्रतिजग्राह शंकरः ३६ मुहूर्तं शरवर्षं तत्प्रतिगृह्य पिनाक-धृक् । अक्षतेन शरीरेण तस्थौ गिरिरिवाचलः ३७ स दृष्ट्वा बाणवर्षं तु मोघीभूतं धनञ्जयः । परमं विस्मयं चक्रे साधु साध्विति चाब्रवीत् ३८ अहोयं सुकुमाराङ्गो हिमवच्छिखराश्रयः । गाण्डीवमुक्तान्नाराचान्प्रति-गृह्णात्यविह्वलः ३९ कोयं देवो भवेत्साक्षाद्रुद्रो यक्षः सुरोसुरः । विद्यते हि गिरिश्रेष्ठे त्रिदशानां समागमः ४० न हि मद्बाणजालानामुत्सृष्टानां सहस्रशः । शक्तोन्यः सहितुं वेगमृते देवं पिनाकिनम् ४१ देवो वा यदि वा यक्षो रुद्रादन्यो व्यवस्थितः । अहमेनं शरैस्तीक्ष्णैर्नयामि यमसा-दनम् ४२ ततो हृष्टमना जिष्णुर्नाराचान्मर्मभेदिनः । व्यसृजच्छतधा

नाराच बाणांचा प्रहार कर " असे फिरून फिरून तो किरात अर्जुनाला ह्मणू लागला असतां अर्जुनाने एकदम त्याच्यावर बाणांची वृष्टि केली ३३,३४. तेव्हां त्या वनामध्ये शोभा पावून एकमेकांवर खवळून गेलेले ते उभयता किरातार्जुन सर्पासारिख्या तीक्ष्ण बाणानीं एकमेकांना प्रहार करूं लागले ३५. प्रथमतः अर्जुनानें किरातावर बाणवृष्टि केली; तेव्हां प्रसन्न मनानें शंकरानें तिचा स्वीकार केला ३६. इतकेंच नव्हे परतु, एकसारिखा बाणांचा वर्षाव एक महूर्तपर्यंत महन करूनही शरीराला कोठेंही क्षत न पडतां तो पिनाकपाणि पर्वतासारिखा निश्चलच उभा राहिला ३७. तेव्हां आपला तो बाणवर्षाव व्यर्थ झालेला अवलोकन करून अर्जुनाला पराकाष्ठेचा विस्मय झाला आणि " शाबास शाबास " असे शब्द उच्चारून तो (आपल्यामनामध्यें) ह्मणाला ३८ " अहो, हिमालयाच्या शिखराचा आश्रय करून असलेला हा किरात शरीराने सुकुमार असून गांडीव धनुष्यापासून सुटलेल्या नाराचसज्ञक बाणांचा, यत्किंचितही न डगमगतां, स्वीकार करित आहे ३९. अहो ! ह्या श्रेष्ठ पर्वतावर देवांचें आगमन होत असते. तेव्हां हा कोण्ही देव, साक्षात् रुद्र अथवा दुसरा कोणी यक्ष, सुर अथवा असुर आहे कीं काय ४०. अरे, मीं सोडिलेल्या हजारों बाणसमुदायांचा वेग पिनाकपाणि देवाधिदेव शंक-रावांचून दुसरा कोणीही सहन करण्यास समर्थ नाहीं ४१. रुद्राहून अन्य असा जर हा कोणी देव अथवा यक्ष असेल तर तीक्ष्ण बाणांच्या योगानें मी ह्याला (आतां) यमसदनीं पोंचवितों " ४२. ह्याप्रमाणें विचार करून मनामध्यें आनंदित झालेला तो अर्जुन किरणें सोडणाऱ्या सूर्याप्रमाणें शेंकडों मर्मभेदक नाराचसंज्ञक बाण सोडूं

राजन्मयूखानिव भास्करः ४३ तान्प्रसन्नेन मनसा भगवाँल्लोकभावनः ।
शूलपाणिः प्रत्यगृह्णाच्छिलावर्षमिवाचलः ४४ क्षणेन क्षीणबाणोथ संवृत्तः
फाल्गुनस्तदा । भीश्चैनमाविशत्तीव्रा तं दृष्ट्वा शरसंक्षयम् ४५ चिन्त-
यामास जिष्णुस्तु भगवन्तं हुताशनम् । पुरस्तादक्षयौ दत्तौ तूणौ येनास्य
खाण्डवे ४६ किं नु मोक्ष्यामि धनुषा यन्मे बाणाः क्षयं गताः । अयं
च पुरुषः कोपि बाणान्ग्रसति सर्वशः ४७ हत्वा चैनं धनुष्कोट्या शूला-
ग्रेणेव कुञ्जरम् । नयामि दण्डधारस्य यमस्य सदनं प्रति ४८ प्रगृह्याथ
धनुष्कोट्या ज्यापाशेनावकृष्य च । मुष्टिभिश्चापि हतवान्वज्रकल्पैर्महा-
द्युतिः ४९ संप्रयुद्धो धनुष्कोट्या कौन्तेयः परवीरहा । तदप्यस्य धनुर्दिव्यं
जग्राह गिरिगोचरः ५० ततोर्जुनो ग्रस्तधनुः खड्गपाणिरतिष्ठत । युद्धस्या-
न्तमभीप्सन्वै वेगेनाभिजगाम तम् ५१ तस्य मूर्ध्नि शितं खड्गमसक्तं पर्वते-
ष्वपि । मुमोच भुजवीर्येण विक्रम्य कुरुनन्दनः ५२ तस्य मूर्धानमासाद्य

लागला ४३. परंतु, पाषाणवृष्टीचा स्वीकार करणारा पर्वतच की काय असा तो जगत्पालक भगवान् शूलपाणि सुप्रसन्न मनानें त्यांचा स्वीकार करूं लागला ४४ असतां एका क्षणामध्यें अर्जुनाचे बाण संपून गेले आणि तो बाणांचा क्षय झालेला अवलोकन करून त्या अर्जुनाला मोठेंच भय प्राप्त झालें ४५. तेव्हां पूर्वी खांडव वनामध्यें ज्यानें अक्षय भाते दिले होते त्या भगवान् अग्नीचें ध्यान करून तो म्हणाला ४६ "माझे बाण नाहींसे झाले; करितां, धनुष्याला लावून मी आतां काय सोडूं ? हा कांहीं अद्भुतच पुरुष असून माझे सर्व बाण गट्ट करीत आहे ४७. तस्मात्, शूलाच्या अग्रानें ज्याप्रमाणें गजाला मारीत असतात त्याप्रमाणें धनुष्याच्या अग्रानें मी ह्याला प्रहार करून दंडपाणि यमाच्या घरीं पोंचवितों" ४८. (ह्याप्रमाणें विचार केल्या) नंतर तो महातेजस्वी अर्जुन धनुष्याच्या कोटीनें प्रहार करून आणि प्रत्यंचेच्या पाशानें त्या किराताला ओढून वज्रप्राय मुष्टीनेंही त्याच्यावर प्रहार करूं लागला ४९. परंतु, ह्याप्रमाणें तो शत्रुपक्षीयवीरनाशक कुंतीपुत्र अर्जुन धनुष्याच्या अग्रानें युद्ध करण्यास प्रवृत्त झाला असता त्याचें तें दिव्य धनुष्य त्या पर्वतनिवासी किरातानें गट्ट केलें ५०. तेव्हां धनुष्य ग्रस्त झाल्यावर अर्जुनानें हातामध्यें खड्ग घेतला आणि युद्धाचा शेवट करण्याच्या इच्छेनें तो त्या किरातावर वेगावेगानें चालून गेला ५१. नंतर आपल्या बाहुबलानें होता तितका पराक्रम करून कुरुवंशज अर्जुनानें पर्वतांचे ठिकाणींही कुंठित न होणाऱ्या त्या तीक्ष्ण खड्गाचा त्या किराताचे मस्तकीं प्रहार केला ५२; परंतु त्याचे मस्तकावर पडताक्षणीं त्या उत्कृष्ट

ष्फालासिवरो हि सः । ततो वृक्षैः शिलाभिश्च योधयामास फाल्गुनः ५३ तदा वृक्षान्महाकायः प्रत्यगृह्णादथो शिलाः । किरातरूपी भगवांस्ततः पार्थो महाबलः ५४ मुष्टिभिर्वज्रसंकाशैर्धूममुत्पादयन्मुखे । प्रजहार दुराधर्षे किरातसमरूपिणि ५५ ततः शक्राशनिसमैर्मुष्टिभिर्भृशदारुणैः । किरातरूपी भगवानर्दयामास पाण्डवम् ५६ ततश्चटचटाशब्दः सुघोरः समपद्यत । पाण्डवस्य च मुष्टीनां किरातस्य च युध्यतः ५७ सुमुहूर्तं तु तद्युद्धमभवल्लोमहर्षणम् । भुजप्रहारसंयुक्तं वृत्रवासवयोरिव ५८ जघानाथ ततो जिष्णुः किरातमुरसा बली । पाण्डवं च विचेष्टन्तं किरातोऽप्यहनद्बली ५९ तयोर्भुजविनिष्पेषात्संघर्षेणोरसोस्तथा । समजायत गात्रेषु पावकोऽङ्गारधूमवान् ६० तत एनं महादेवः पीड्य गात्रैः सुपीडितम् । तेजसा व्यक्रमद्रोषाच्चेतस्तस्य विमोहयन् ६१ ततोऽभिपीडितैर्गात्रैः पिण्डीकृत इवाबभौ । फाल्गुनो गात्रसंरुद्धो देवदेवेन भारत ६२ निरुच्छ्वासो-

---

खड्गाचे तुकडे तुकडे झाले. तेव्हां अर्जुन वृक्ष आणि पाषाण ह्यांच्या योगानें युद्ध करूं लागला ५३. परंतु, शरीरानें धिप्पाड असलेल्या त्या किरातरूपी भगवानानें वृक्ष व पाषाण गट्ट करून टाकिले असतां तो महाबलाढ्य कुंतीपुत्र अर्जुन ५४ (संतप्त झाल्यामुळें) मुखांतून धूम उत्पन्न करीत करीत वज्रप्राय मुष्टींच्या योगानें किरातासारिखें रूप धारण केलेल्या अजिंक्य शंकरावर प्रहार करूं लागला ५५. तेव्हां इंद्रवज्रतुल्य आणि ह्मणूनच अत्यंत भयंकर अशा मुष्टींच्या योगानें किरातरूपी भगवान् शंकरही अर्जुनाला प्रहार करूं लागला ५६. ह्याप्रमाणें त्या उभयतां किरातार्जुनांचें मुष्टियुद्ध सुरू झालें असतां अत्यंत भयंकर असा " फाड फाड " शब्द होऊं लागला ५७ आणि भुजप्रहारांनीं युक्त असलेलें तें मुष्टियुद्ध इंद्रवृत्रासुरांच्या युद्धाप्रमाणें चांगलें मुहूर्तपर्यंत अंगावर कांटा येण्यासारिखें भयंकर झालें ५८. प्रथमतः बलाढ्य अर्जुनानें किराताला उराची धडक दिली. तेव्हां तडफड करीत असलेल्या पांडुपुत्र अर्जुनालाही बलाढ्य किरातानें प्रहार केला ५९. ह्याप्रमाणें एकमेकांचे बाहु एकमेकांवर घासूं लागले असतां आणि परस्परांच्या वक्षःस्थलांचेंही संघर्षण होऊं लागलें असतां अंगार आणि धूम ह्यांनीं युक्त असा अग्नि त्या उभयतांच्या अवयवांपासून उत्पन्न होऊं लागला ६०. तदनंतर गात्रांच्या योगानें अर्जुनाला महादेवांनीं अतिशयच अवळून टाकिला आणि तेजानें त्याच्या अंतःकरणाला मोह पाडून रागारागानें त्याच्या वक्षःस्थलावर पाय दिला ६१. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, देवाधिदेव शंकरांनीं अर्जुनाचीं गात्रें अवळून धरिलीं असतां सर्व बाजूंनीं अवळून गेलेल्या

भवच्चैव संनिरुद्धो महात्मना । पपात भूम्यां निश्चेष्टो गतमस्त्व इवाम-
वत् ६३ स मुहूर्तं तथा भूत्वा सचेताः पुनरुत्थितः । रुधिरेणाप्लुताङ्गस्तु
पाण्डवो भृशदुःखितः ६४ शरण्यं शरणं गत्वा भगवन्तं पिनाकिनम् ।
मृन्मयं स्थण्डिलं कृत्वा माल्येनापूजयद्भवम् ६५ तच्च माल्यं तदा पार्थः
किरातशिरसि स्थितम् । अपश्यत्पाण्डवश्रेष्ठो हर्षेण प्रकृतिं गतः ६६ पपात
पादयोस्तस्य ततः प्रीतोऽभवद्भवः । उवाच चैनं वचसा मेघगम्भी-
रगीर्हरः ६७ जातविस्मयमालोक्य ततः क्षीणाङ्गसंहतिम् ६८ भव
उवाच ॥ भो भो फाल्गुन तुष्टोऽस्मि कर्मणाप्रतिमेन ते । शौर्येणा-
नेन धृत्या च क्षत्रियो नास्ति ते समः ६९ समं तेजश्च वीर्यं च ममाद्य
तव चानघ । प्रीतस्तेऽहं महाबाहो पश्य मां भरतर्षभ ७० ददामि ते विशा-
लाक्ष चक्षुः पूर्वऋषिर्भवान् । विजेष्यसि रणे शत्रूनपि सर्वान्दिवौकसः ७१
प्रीत्या च तेऽहं दास्यामि यदस्त्रमनिवारितम् । त्वं हि शक्तो मदीयं तदस्त्रं

गात्रांच्या योगानें तो अर्जुन गोळा बनल्यासारिखा झाला ६२ आणि महात्म्या शंक-
रांनीं त्याचा श्वासही कोंडून धरिल्यामुळें निश्चेष्ट होऊन तो गतप्राण झाल्यासारिखा
पृथ्वीवर पडला ६३. तदनतर अत्यंत दुःखित झालेला व सर्वांग रक्तानें भरून गेलेला
तो पांडुपुत्र अर्जुन मुहूर्तपर्यंत तसाच निश्चेष्ट पडून सावध झाल्यावर पुनरपि उठला ६४.
नंतर शरण जाण्यास योग्य अशा भगवान् पिनाकपाणि शंकराला शरण गेला आणि
मृत्तिकेचे पार्थिव करून त्या पार्थिवाचे ठिकाणीं त्यानें शिवाची पुष्पपूजा केली ६५.
पुढें तें पुष्प किराताच्या मस्तकावर आहे असें कुंतीपुत्र अर्जुनानें पाहिलें असतां त्या
पांडवश्रेष्ठाला हर्ष होऊन धीर आला ६६ आणि त्यानें त्याचे चरणावर साष्टांग नम-
स्कार घातला. तेव्हां शंकर त्याच्यावर प्रसन्न झाले आणि मेघासारिख्या गंभीर
वाणीनें युक्त असलेले ते शंकर अर्जुन विस्मित झालेला आहे व त्याचीं गात्रें अगदीं
क्षीण झालेलीं आहेत असें अवलोकन करून त्याला म्हणाले ६७,६८ "हे अर्जुना,
ह्या तुझ्या अप्रतिम पराक्रमानें, शौर्यानें आणि धैर्यानें मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें.
तुझी बरोबरी करणारा क्षत्रिय कोणीही नाहीं ६९. हे निष्पापा, तुझें तेज आणि
वीर्य हीं आज माझ्या बरोबरीचीं झालीं आहेत. तस्मात्, हे महापराक्रमी भरतवंशज-
श्रेष्ठा, पहा आज मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें ७०. हे विशालनयना, तूं पुरातन
ऋषि (नर) आहेस. ह्यास्तव, मी आज तुला दिव्य ज्ञान देतों. त्याच्या योगानें
सर्व देव जरी शत्रु झाले तरी त्या सर्वांचा तूं संग्रामामध्यें पराजय करिशील ७१.
(हे अर्जुना) अकुंठित असें अस्त्र मी तुला प्रेमपूर्वक देतों. कारण, तें माझें अस्त्र

धारयितुं क्षणात् ७२ वैशम्पायन उवाच ॥ ततो देवं महादेवं गिरिशं शूलपाणिनम्। ददर्श फाल्गुनस्तत्र सह देव्या महाद्युतिम् ७३ स जानुभ्यां महीं गत्वा शिरसा प्रणिपत्य च। प्रसादयामास हरं पार्थः परपुरञ्जयः ७४ अर्जुन उवाच॥ कपर्दिन्सर्वदेवेश भगनेत्रनिपातन। देवदेव महादेव नीलग्रीव जटाधर ७५ कारणानां च परमं जाने त्वां त्र्यम्बकं विभुम् ७६ देवानां च गतिं देव त्वत्प्रसूतमिदं जगत्॥ अजय्यस्त्वं त्रिभिर्लोकैः सदेवासुरमानुषैः ७५ शिवाय विष्णुरूपाय विष्णवे शिवरूपिणे। दक्षयज्ञविनाशाय हरिरुद्राय वै नमः ७७ ललाटाक्षाय शर्वाय मीढुषे शूलपाणये। पिनाकगोप्त्रे सूर्याय मार्जालीयाय वेधसे ७८ प्रसादये त्वां भगवन्सर्वभूतमहेश्वर। गणेशं जगतः शम्भुं लोककारणकारणम् ७९ प्रधानपुरुषातीतं परं सूक्ष्मतरं हरम्। व्यतिक्रमं मे भगवन्क्षन्तुमर्हसि शंकर ८० भगवद्दर्शनाकाङ्क्षी प्राप्तोस्मीमं महागिरिम्। दयितं तव देवेश तापसालयमुत्तमम् ८१ प्रसादये त्वां भगवन्सर्वलोकनमस्कृतम्।

उत्साहपूर्वक धारण करण्याला तूंच समर्थ आहेस" ७२. वैशंपायन सांगतातः— तदनंतर देवी पार्वतीसहवर्तमान महातेजस्वी शूलपाणि देवाधिदेव महादेव शंकराचें अर्जुनाला दर्शन झालें ७३. तेव्हां भूमीवर गुडघे टेंकून आणि मस्तकानें प्रणाम करून शत्रुसैन्याचा पराजय करणाऱ्या कुंतीपुत्र अर्जुनानें शंकराला प्रसन्न करून घेतलें ७४. अर्जुन स्तुति करतोः— हे सर्वदेवेश्वरा, हे कपर्दिन्, हे भगनेत्रनाशका, हे देवदेवा, हे महादेवा, हे नीलकंठा, हे जटाधरा ७५, सर्व कारणांमध्यें मुख्य असा मी तुलाच समजत आहें. तूं त्रिलोचन असून सर्वव्यापी आहेस आणि मुख्य देव तूंच असून देवांचा आधारही तूंच आहेस हें मी जाणीत आहें. हें जगत् तुझ्यापासूनच उत्पन्न झालें आहे आणि त्रैलोक्यांतील देव असुर व मानुष ह्यांना तूं अजिंक्य आहेस ७६. कल्याणस्वरूप रूपानें युक्त असल्यामुळें शिव, सर्वव्यापक असल्यामुळें विष्णुस्वरूप, दक्षयज्ञनाशक, हरिहर, भाललोचन, शर्व, शूलपाणि, पर्जन्यवर्षक, पिनाकरक्षक, सूर्यस्वरूप, शुद्ध देहानें युक्त आणि ब्रह्मस्वरूप अशा तुला नमस्कार असो ७७,७८. हे सर्वभूताधिपते, हे भगवन्, गणाधिपति, जगत्कल्याणकर्ता, जगत्स्रष्ट्यांचाही स्रष्टा, पुरुषोत्तमालाही अगोचर. अत्यंत सूक्ष्म, सर्वदुःखहारक आणि परमात्मस्वरूप अशा तुला मी शरण आलों आहें. करितां, हे शंकरा, हे भगवन्, आपण माझ्या अपराधाची क्षमा करा ७९,८०. हे भगवन्, हे देवाधिपते, तुह्मांला प्रिय व तपस्वी जनांचें सर्वोत्कृष्ट निवासस्थान अशा ह्या महापर्वतावर तुमचें दर्शन व्हावें एतदर्थ मी प्राप्त झालों आहें ८१. हे

न मे स्यादपराधोयं महादेवातिसाहसात् ८२ कृतो मयायमज्ञानाद्वि-
मर्दो यस्त्वया सह । शरणं प्रतिपन्नाय तत्क्षमस्वाद्य शंकर ८३ वैशम्पा-
यन उवाच ॥ तमुवाच महातेजाः प्रहस्य वृषभध्वजः । प्रगृह्य रुचिरं
बाहुं क्षान्तमित्येव फाल्गुनम् ८४ परिष्वज्य च बाहुभ्यां प्रीतात्मा भग-
वान्हरः । पुनः पार्थं सान्त्वपूर्वमुवाच वृषभध्वजः ८५ [१६४६] इति॰
मारण्यपर्वणि कैरातपर्वणि महादेवस्तव एकोनचत्वारिंशोध्यायः ॥ ३९ ॥

देवदेव उवाच ॥ नरस्त्वं पूर्वदेहे वै नारायणसहायवान् । बदर्यां तप्त-
वानुग्रं तपो वर्षायुतान्बहून् १ त्वयि वा परमं तेजो विष्णौ वा पुरुषो-
त्तमे । युवाभ्यां पुरुषाग्र्याभ्यां तेजसा धार्यते जगत् २ शक्राभिषेके सुम-
हद्धनुर्जलदनिःस्वनम् । प्रगृह्य दानवाः शस्तास्त्वया कृष्णेन च प्रभो ३
तदेतदेव गाण्डीवं तव पार्थ करोचितम् । मायामास्थाय यद्ग्रस्तं मया
पुरुषसत्तम ४ तूणौ चाप्यक्षयौ भूयस्तव पार्थ यथोचितौ । भविष्यति
शरीरं च नीरुजं कुरुनन्दन ५ प्रीतिमानस्मि ते पार्थ भवान्सत्य-

भगवन्, सर्वलोकांना वंद्य असलेल्या तुला मी शरण आलों आहें. करितां, हे महादेवा, अत्यंत साहसामुळें घडलेल्या ह्या माझ्या अपराधाचें निरसन व्हावें ८२. हे शंकरा, अज्ञानामुळें तुमच्याशी माझ्या हातून हा धांगडधिंगा झाला आहे. तस्मात्, आज आपण त्याची क्षमा करावी ८३. वैशंपायन सांगतातः—ह्यानंतर अर्जुनाचा मनोहर हात धरून महातेजस्वी वृषभध्वजानें "क्षमा केली" एवढेंच अर्जुनाला सांगितलें ८४. तदनंतर भगवान् शंकरानें अंतःकरणामध्यें प्रसन्न होऊन अर्जुनाला बाहूंनीं आलिंगन दिलें आणि पुनरपि त्या वृषभध्वजानें त्या कुंतीपुत्राला सांत्वनपूर्वक तसेंच सांगितलें ८५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कैरातपर्वापैकीं महादेवस्तवनाविषयीं एकुणचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥३९॥

देवाधिदेव सांगतातः— पूर्व जन्मीं तूं नर असून नारायण तुझा साहाय्यकर्ता होता. तूं लाखों वर्षें बदरिकाश्रमामध्यें उग्र तपश्चर्या केली आहेस १. उत्कृष्ट प्रकारचें तेज एक तुझ्या ठिकाणीं आहे किंवा पुरुषोत्तम विष्णूंच्या ठिकाणीं आहे आणि तुझीच पुरुषश्रेष्ठ तेजाच्या योगानें हें जगत् धारण करीत आहांत २. हे प्रभो, इंद्राभिषेकसमयीं मेघाप्रमाणें गंभीर ध्वनीनें युक्त असें प्रचंड धनुष्य घेऊन तूं आणि कृष्ण ह्यांनीं दानवांचा वध केला ३. हे पुरुषश्रेष्ठा कुंतीपुत्रा, मायेचें अवलंबन करून मीं जें ग्रस्त केलें होतें तें हें गांडीव तुझ्याच हातांमध्यें असणें योग्य आहे ४ आणि त्याचप्रमाणें अक्षय भाते, हे कुंतीपुत्रा, तुझाच असावे योग्य आहेत. हे कुरुवंशजा, तुझें शरीर नीरो-

पराक्रमः । गृहाण वरमस्मत्तः काङ्क्षितं पुरुषोत्तम ६ न त्वया पुरुषः कश्चित्पुमान्मर्त्येषु मानद । दिवि वा वर्तते क्षत्रं त्वत्प्रधानमरिन्दम ७ अर्जुन उवाच ॥ भगवन्ददासि चेन्मह्यं कामं प्रीत्या वृषध्वज । कामये दिव्यमस्त्रं तद्घोरं पाशुपतं प्रभो ८ यत्तु ब्रह्मशिरो नाम रौद्रं भीमपराक्रमम् । युगान्ते दारुणे प्राप्ते कृत्स्नं संहरते जगत् ९ कर्णभीष्मकृपद्रोणैर्भविता तु महाहवः । त्वत्प्रसादान्महादेव जयेयं तान्यथाविधि १० दहेयं येन सङ्ग्रामे दानवान्राक्षसांस्तथा । भूतानि च पिशाचांश्च गन्धर्वानथ पन्नगान् ११ यस्मिञ्छूलसहस्राणि गदाश्चोग्रप्रदर्शनाः । शराश्चाशीविषाकाराः संभवन्त्यनुमन्त्रिते १२ युध्येयं येन भीष्मेण द्रोणेन च कृपेण च । सूतपुत्रेण च रणे नित्यं कटुकभाषिणा १३ एष मे प्रथमः कामो भगवन्भगनेत्रहन् । त्वत्प्रसादाद्विनिर्वृत्तः समर्थः स्यामहं यथा १४ भव उवाच ॥ ददामि तेऽस्त्रं दयितमहं पाशुपतं विभो । समर्थो धारणे मोक्षे

रहित होईल ५. हे कुंतीपुत्रा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. कारण, तुझा पराक्रम कधींही निष्फल होणारा नाहीं. ह्यास्तव, हे पुरुषश्रेष्ठा, इच्छिलेला वर तूं माझ्यापासून प्राप्त करून घे ६. हे शत्रुदमना मान्या अर्जुना, मर्त्यजनांमध्यें तुझी बरोबरी करणारा परुष कोणींही नाहीं इतकेंच नव्हे परंतु, तूं ज्यांतील मुख्य आहेस असें क्षत्रियकुल स्वर्गामध्येंही नाहीं ७. अर्जुन ह्मणतो, हे प्रभो वृषभध्वजा, आपण जर मला आनंदानें वर देत असाल तर मला त्या दिव्य व घोर अशा पाशुपत अस्त्राची इच्छा आहे ८. भयंकर पराक्रम करणाऱ्या अशा त्या रुद्राच्या अस्त्रालाच ब्रह्मशिर हें नांव असून दारुण असा युगांतकाल प्राप्त झाला असतां संपूर्ण जगताचा तें संहार करीत असतें ९. हे महादेवा, आपल्या प्रसादानें (तें अस्त्र प्राप्त झालें असतां) कर्ण, भीष्म, कृप व द्रोण ह्यांच्याशीं जो मोठा संग्राम होणार त्या संग्रामामध्यें मी त्यांचा पराजय करीन १०. इतकेंच नव्हे परंतु, दानव, राक्षस, भूतें, पिशाच, गंधर्व आणि पन्नग ह्यांनाही मी संग्रामामध्यें त्याच्या योगानें दग्ध करून टाकीन ११. कारण, त्याचें अभिमंत्रण केलें असतां हजारों शूल, भयंकर गदा आणि सर्पासारिखे बाण उत्पन्न होत असतात १२. ह्यास्तव, त्या अस्त्राच्या योगानें संग्रामामध्यें भीष्म, द्रोण, कृप आणि नित्य कटुभाषण करणारा सूतपुत्र कर्ण ह्यांच्याशीं मी युद्ध करीन १३. हे भगवन्, ही माझी अगदीं पराकाष्ठेची इच्छा आहे. करितां, हे भगनेत्रनाशका, आपल्या प्रसादामुळें ती परिपूर्ण झाली असतां मी (शत्रूंना जिंकण्यास) समर्थ होईन १४. शिव ह्मणतात:— हे प्रभो, मी तुला प्रिय पाशुपत अस्त्र देतों. तें धारण करण्यास, त्याचा प्रयोग करण्यास

संहारे चासि पाण्डव १५ नैतद्वेद महेन्द्रोपि न यमो न च यक्षराट् । वरुणोप्यथ वा वायुः कुतो वेत्स्यन्ति मानवाः १६ न त्वेतत्सहसा पार्थ मोक्तव्यं पुरुषे क्वचित् । जगद्विनाशयेत्सर्वमल्पतेजसि पातितम् १७ अवध्यो नाम नास्त्यस्य त्रैलोक्ये सचराचरे । मनसा चक्षुषा वाचा धनुषा च निपात्यते १८ वैशम्पायन उवाच ॥ तच्छ्रुत्वा त्वरितः पार्थः शुचिर्भूत्वा समाहितः । उपसंगम्य विश्वेशमधीष्वेत्यथ सोब्रवीत् १९ ततस्त्वध्यापयामास सरहस्यनिवर्तनम् । तदस्त्रं पाण्डवश्रेष्ठं मूर्तिमन्तमिवान्तकम् २० उपतस्थे च तत्पार्थं यथा त्र्यक्षमुमापतिम् । प्रतिजग्राह तच्चापि प्रीतिमानर्जुनस्तदा २१ ततश्चचाल पृथिवी सपर्वतवनद्रुमा । ससागरवनोद्देशा सग्रामनगराकरा २२ शङ्खदुन्दुभिघोषाश्च भेरीणां च सहस्रशः । तस्मिन्मुहूर्ते संप्राप्ते निर्घाताश्चापतन्मुहुः २३ अथास्त्रं जाज्वलद्घोरं पाण्डवस्यामितौजसः । मूर्तिमद्विष्ठितं पार्श्वे ददृशुर्देवदानवाः २४ स्पृष्टस्य त्र्यम्बके-

---

आणि उपसंहार करण्यास तूं समर्थ आहेस १५. अरे, महेंद्र, यम, यक्षराज कुबेर, वरुण आणि वायु ह्यांनाही हें विदित नाहीं; मग मानवांना तर हें कोठून विदित होणार ! १६. हे कुंतीपुत्रा, तूं ह्या अस्त्राचा प्रयोग सामान्य पुरुषांवर कधींही करूं नकोस. कारण, अल्पतेजानें युक्त असलेल्या पुरुषांचे ठिकाणीं ह्याचा प्रयोग केला असतां हें सर्व जगताचा नाश करील १७. ह्या अस्त्राला स्थावरजंगमात्मक प्राण्यांनीं भरलेल्या त्रैलोक्यामध्यें अवध्य ह्मणून कोणीही नसून मनानें, वाचेनें, नेत्रानें अथवा धनुष्यानें ह्याचा प्रयोग करितां येतो १८. वैशंपायन सांगतातः—हें महादेवांचें भाषण श्रवण केल्यावर कुंतीपुत्र अर्जुन सत्वर शुचि होऊन स्वस्थांतःकरणानें युक्त झाला आणि त्या विश्वाधिपतीसमीप जाऊन "अस्त्राचा उपदेश करा" असें ह्मणाला १९. तेव्हां मूर्तिमान् मृत्युच कीं काय अशा त्या अस्त्राचा रहस्य आणि उपसंहार ह्यांसहवर्तमान त्या विश्वाधिपतीनें पांडवश्रेष्ठ अर्जुनाला उपदेश केला असतां २० उमापति त्र्यंबकाप्रमाणें कुंतीपुत्र अर्जुनासमीप तें अस्त्र येऊन उभें राहिलें आणि अर्जुनानेंही आनंदित होऊन त्याचा स्वीकार केला २१. तेव्हां पर्वत, वनांतील वृक्ष, सागर, वनप्रदेश, ग्राम, नगरें आणि खाणी ह्यांसहवर्तमान सर्व पृथ्वी कंपित झाली २२; शंख, दुंदुभि आणि नौबदी ह्यांचे हजारों ध्वनि होऊं लागले व तो अस्त्रोपदेशाचा मुहूर्त प्राप्त झाला असतां वारंवार उत्पातध्वनि होऊं लागले २३. तदनंतर अपरिमित सामर्थ्यानें युक्त अशा पांडुपुत्र अर्जुनाचे समीप अत्यंत उज्ज्वल असें तें घोर पाशुपत अस्त्र स्थित असल्याचें देवदा-

नाथ फाल्गुनस्यामितौजसः । यत्किंचिदशुभं देहे तत्सर्वं नाशमीयिवत् २५ स्वर्गं गच्छेत्यनुज्ञातस्त्र्यम्बकेण तदार्जुनः । प्रणम्य शिरसा राजन्प्राञ्जलि-र्देवमैक्षत २६ ततः प्रभुस्त्रिदिवनिवासिनां वशी महाद्युतिर्गिरिश उमापतिः शिवः । धनुर्महद्दितिजपिशाचसूदनं ददौ भवः पुरुषवराय गाण्डिवम् २७ ततः शुभं गिरिवरमीश्वरस्तदा सहोमया सिततटसानुकन्दरम् । विहाय तं पतगमहर्षिसेवितं जगाम खं पुरुषवरस्य पश्यतः २८ [१६७४]इति० आरण्यपर्वणि कैरातपर्वणि शिवप्रस्थाने चत्वारिंशोध्यायः ॥ ४० ॥

वैशम्पायन उवाच ॥ तस्य संपश्यतस्त्वेव पिनाकी वृषभध्वजः । जगा-मादर्शनं भानुर्लोकस्येवास्तमीयिवान् १ ततोर्जुनः परं चक्रे विस्मयं परवीरहा । मया साक्षान्महादेवो दृष्ट इत्येव भारत २ धन्योस्म्यनुगृहीतोस्मि यन्मया त्र्यम्बको हरः । पिनाकी वरदो रूपी दृष्टः स्पृष्टश्च पाणिना ३ कृतार्थं चावगच्छामि परमात्मानमाहवे । शत्रूंश्च विजितान्सर्वा-

नवांनीं अवलोकन केलें २४. असो. त्र्यंबकाचा स्पर्श झाल्यामुळें त्या अपार साम-र्थ्यानें युक्त असलेल्या अर्जुनाच्या देहामध्यें जें कांहीं अशुभ होतें तें सर्व नाश पावलें २५. हे राजा, (अस्त्राचा उपदेश केल्यानतर) " स्वर्गाप्रत गमन कर " अशी त्र्यंबकानें अर्जुनाला अनुज्ञा दिली असतां मस्तकानें प्रणाम करून व हात जोडून अर्जुन त्या देवांकडे बघूं लागला २६. तेव्हां जितेंद्रिय, महामति आणि कैलासनाथ अशा त्या देवाधिदेव कल्याणस्वरूप शंकरानें दैत्य आणि पिशाच ह्यांचा नाश करणारें गांडीव धनुष्य पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला दिलें २७ आणि नंतर शुभ्रवर्ण तट, शिखरें आणि गुहा ह्यांनीं युक्त, पक्षी आणि महर्षि ह्यांनीं सेवित आणि शुभ अशा त्या श्रेष्ठ पर्वताला सोडून त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनासमक्ष उमेसहवर्तमान ईश्वर आकाशा-मध्यें निघून गेले २८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कैरातपर्वापैकीं शिवप्रस्थानाविषयीं चाळिसावा अध्याय समाप्त झाला॥४०॥

वैशंपायन सांगतात:—अस्ताचलास जाणारा सूर्य ज्याप्रमाणें लोकांना दिसेनासा होतो त्याप्रमाणें तो वृषभध्वज पिनाकपाणि पहातां पहातां अर्जुनाला दिसेनासा झाला १. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, " मला प्रत्यक्ष महादेवाचें दर्शन झालें " म्हणून शत्रुपक्षीयवीरनाशक अर्जुन पराकाष्ठेचा विस्मित झाला (आणि मनामध्यें चिंतन करूं लागला कीं) २ " ज्याअर्थी पिनाकपाणि व त्रिलोचन अशा वरप्रद शंकराचें मला प्रत्यक्ष दर्शन होऊन हस्तस्पर्श झाला त्याअर्थी मी धन्य आहें आणि माझ्यावर ईश्वराचा अनुग्रह झाला आहे ३. मी आपल्याला अत्यंत

न्निर्वृत्तं च प्रयोजनम् ४ इत्येवं चिन्तयानस्य पार्थस्यामिततेजसः । ततो वैदूर्यवर्णाभो भासयन्सर्वतो दिशः ५ यादोगणवृतः श्रीमानाजगाम जलेश्वरः ६ नागैर्नदैर्नदीभिश्च दैत्यैः साध्यैश्च दैवतैः । वरुणो यादसां भर्ता वशी तं देशमागमत् ७ अथ जाम्बूनदवपुर्विमानेन महार्चिषा । कुबेरः समनुप्राप्तो यक्षैरनुगतः प्रभुः ८ विद्योतयन्निवाकाशमद्भुतोपमदर्शनः । धनानामीश्वरः श्रीमानर्जुनं द्रष्टुमागतः ९ तथा लोकान्तकृच्छ्रीमान्यमः साक्षात्प्रतापवान् । मर्त्यमूर्तिधरैः सार्धं पितृभिर्लोकभावनैः १० दण्डपाणिरचिन्त्यात्मा सर्वभूतविनाशकृत् । वैवस्वतो धर्मराजो विमानेनावभासयन् ११ त्रीँल्लोकान्गुह्यकांश्चैव गन्धर्वांश्च सपन्नगान् । द्वितीय इव मार्तण्डो युगान्ते समुपस्थिते १२ ते भानुमन्ति चित्राणि शिखराणि महागिरेः । समास्थायार्जुनं तत्र ददृशुस्तपसान्वितम् १३ ततो मुहूर्ताद्भगवानैरावतशिरोगतः । आजगाम सहेन्द्राण्या शक्रः सुरगणैर्वृतः १४ पाण्डु-

---

कृतकृत्य समजत आहे आणि संग्रामामध्यें सर्व शत्रूंचा पराजय होऊन माझा मनोरथही सिद्धीस गेला असें मी जाणीत आहे " ४. ह्याप्रमाणें तो अत्यंततेजस्वी कुंतीपुत्र अर्जुन चिंतन करीत आहे तोंच वैदूर्यमण्यासारिख्या कांतीनें युक्त आणि जलचरगणांनीं परिवेष्टित असा वैभवशाली जलाधिपति वरुण (आपल्या कांतीनें) सर्व दिशा प्रकाशित करीत करीत तेथे आला ५,६. तो (नुसत्या जलचर गणासहवर्तमानच आला असें नसून) नाग, नद, नद्या, दैत्य, आणि साध्य, देव ह्यांसहवर्तमान तो जलचराधिपति जितेंद्रिय वरुण त्या प्रदेशाप्रत आला ७. नंतर महातेजस्वी विमानामध्यें बसून सुवर्णासारिख्या कांतीनें युक्त असा प्रभु कुबेरही यक्षांसहवर्तमान तेथें आला ८. त्या धनाधिपति कुबेराचें रूप मोठें अद्भुत होतें आणि (आपल्या कांतीनें) आकाश प्रकाशित करीतच कीं काय तो वैभवशाली कुबेर अर्जुनाला भेटण्याकरितां आला होता ९. त्याचप्रमाणें वैभवशाली व महाप्रतापी लोकनाशक यम मनुष्यरूप धारण केलेल्या लोकपालक पितरांसहवर्तमान तेथे आला होता १०. अचिंत्य स्वरूपानें युक्त असलेला आणि सर्व भूतांचा नाश करणारा तो दंडपाणि सूर्यपुत्र धर्मराज प्रलयकाल प्राप्त झाला असतां प्रकाशित होणारा दुसरा सूर्यच कीं काय अशारीतीनें आपल्या विमानाच्या योगानें गुह्यक, गंधर्व आणि पन्नग ह्यांसहवर्तमान त्रैलोक्य प्रकाशित करीत होता ११, १२. ते वरुणप्रभृति लोकपाल त्या महापर्वताच्या उज्ज्वल व चित्रविचित्र शिखरांप्रत आले असतां त्या ठिकाणीं तपश्चर्या करीत बसलेल्या अर्जुनाला त्यांनीं अवलोकन केलें १३. (ते वरुणप्रभृति आल्यानंतर) सुमारें एका मुहूर्तानें ऐरावताच्या

रेणातपत्रेण ध्रियमाणेन मूर्धनि । शुशुभे तारकाराजः सितमभ्रमिवा-
श्रितः १५ संस्तूयमानो गन्धर्वैर्ऋषिभिश्च तपोधनैः । शृङ्गं गिरेः समा-
साद्य तस्थौ सूर्य इवोदितः १६ अथ मेघस्वनो धीमान्व्याजहार शुभां
गिरम् । यमः परमधर्मज्ञो दक्षिणां दिशमास्थितः १७ अर्जुनार्जुन पश्या-
स्माँल्लोकपालान्समागतान् । दृष्टिं ते वितरामोद्य भवानर्हति दर्शनम् १८
पूर्वर्षिरमितात्मा त्वं नरो नाम महाबलः । नियोगाद्ब्रह्मणस्तात मर्त्यतां
समुपागतः १९ त्वया च वसुसंभूतो महावीर्यः पितामहः । भीष्मः पर-
मधर्मात्मा संसाध्यश्च रणेनघ २० क्षत्रं चाग्निसमस्पर्शं भारद्वाजेन रक्षि-
तम् । दानवाश्च महावीर्या ये मनुष्यत्वमागताः ॥ निवातकवचाश्चैव दानवाः
कुरुनन्दन २१ पितुर्ममांशो देवस्य सर्वलोकप्रतापिनः । कर्णश्च सुमहावी-
र्यस्त्वया वध्यो धनञ्जय २२ अंशाश्च क्षितिसंप्राप्ता देवदानवरक्षसाम् ।

मस्तकावर आरूढ झालेला आणि देवगणांनीं परिवेष्टित असलेला भगवान् इंद्र इंद्राणीसह-वर्तमान तेथें आला १४. त्याचे मस्तकीं शुभ्रवर्ण छत्र धरिलें असल्यामुळें तो शुक्लवर्ण अभ्रांचें अवलंबन करून राहिलेल्या नक्षत्राधिपति चंद्रासारिखा शोभूं लागला १५. गंधर्व आणि तपोधन ऋषि त्याची स्तुति करीत होते आणि अशा थाटानें उदयाचलास आलेल्या सूर्याप्रमाणें तो त्या पर्वतशिखरांवर येऊन उभा राहिला १६. तेव्हां दक्षिण दिशेचें अवलंबन करून असलेला उत्कृष्ट धर्मवेत्ता, वैभवशाली व बुद्धिमान् यम मेघासारिख्या गंभीर ध्वनीनें शुभ भाषण करूं लागला कीं १७ " अरे, अर्जुना, येथें जमून आलेल्या आह्मां लोकपालांना तूं अवलोकन कर. अरे, आमचें दर्शन होण्यास तूं योग्य आहेस; करितां, आज आह्मीं तुला दर्शन देतों १८. बा अर्जुना, अतर्क्यस्वरूपानें युक्त असा तूं नरनामक महाबलाढ्य पुरातन ऋषि आहेस आणि ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून तूं मनुष्ययोनीप्रत प्राप्त झाला आहेस १९. हे निष्पापा, अष्टवसूंपासून उत्पन्न झालेला असा महावीर्यवान् आणि अत्यंत धर्मनिष्ठ पितामह भीष्म संग्रामामध्यें तुला जिंकावयाचा आहे २०. इतकेंच नव्हे परंतु, ज्यांचा स्पर्शही अग्नीसारिखा तीक्ष्ण आहे असे द्रोणरक्षित क्षत्रिय तुला जिंकावयाचे आहेत; (ते सामान्य क्षत्रिय नसून) महावीर्यवान् असे जे दैत्य ते (क्षत्रियांच्या रूपानें) मनुष्य जन्माला आले आहेत. हे कुरुनंदना, त्याचप्रमाणें निवातकवचनामक दानवांचा तुला वध कर्तव्य आहे २१ आणि सर्व लोकांना प्रकाशित करणारा जो माझा पिता देव सूर्य त्याचा अंश असलेल्या अत्यंत महावीर्यवान् कर्णाचाही, हे धनंजया, तुला वध कर्तव्य आहे २२. सारांश, देव, दानव आणि राक्षस ह्यांचे जे अंश (क्षत्रियांच्या रूपानें)

त्वया निपातिता युद्धे स्वकर्मफलनिर्जिताम् २३ गतिं प्राप्स्यन्ति कौन्तेय यथा स्वामरिकर्शन । अक्षया तव कीर्तिश्च लोके स्थास्यति फाल्गुन २४ त्वया साक्षान्महादेवस्तोषितो हि महामृधे । लघ्वी वसुमती चापि कर्तव्या विष्णुना सह २५ गृहाणास्त्रं महाबाहो दण्डमप्रतिवारणम् । अनेनास्त्रेण सुमहत्त्वं हि कर्म करिष्यसि २६ वैशम्पायन उवाच ॥ प्रतिजग्राह तत्पार्थो विधिवत्कुरुनन्दन । समन्त्रं सोपचारं च समोक्षविनिवर्तनम् २७ ततो जलधरश्यामो वरुणो यादसां पतिः । पश्चिमां दिशमास्थाय गिर-मुच्चारयन्प्रभुः २८ पार्थ क्षत्रियमुख्यस्त्वं क्षत्रधर्मे व्यवस्थितः । पश्य मां पृथुताम्राक्ष वरुणोस्मि जलेश्वरः २९ मया समुद्यतान्पाशान्वारुणाननि-वारितान् । प्रतिगृह्णीष्व कौन्तेय सरहस्यनिवर्तनान् ३० एभिस्तदा मया वीर सङ्ग्रामे तारकामये । दैतेयानां सहस्राणि संयतानि महात्मनाम् ३१ तस्मादिमान्महासत्त्व मत्प्रसादसमुत्थितान् । गृहाण न हि ते मुच्येदन्त-

---

पृथ्वीवर प्राप्त झाले आहेत त्यांचा तुझ्या हातून युद्धामध्यें वध झाला ह्मणजे स्वकर्माचें फल ह्मणून मिळवून ठेविलेली २३ आपआपली गति, हे शत्रुनाशका कुंतीपुत्रा, त्यांना प्राप्त होईल व, हे फाल्गुना, तुझीही कीर्ति जगतामध्यें अक्षय राहील २४. अरे, महासग्रामामध्यें साक्षात् महादेवाला तूं संतुष्ट केलें आहेस. तेव्हां (कृष्णरूपानें अवतीर्ण झालेल्या) विष्णूसहवर्तमान पृथ्वीचा भारही तुलाच कमी केला पाहिजे २५. करितां, हे महापराक्रमी अर्जुना, ज्याचें निवारण कशानेंही होत नाहीं असें हें दंडास्त्र तूं घे ; ह्या अस्त्राच्या योगानें तू फारच मोठें कर्म करिशील " २६. वैशंपायन सांगतात:– (ह्याप्रमाणें यमधर्मानें भाषण केलें असतां) कुरुनंदन अर्जुनानें विधान, प्रयोग आणि उपसहार ह्यांसहवर्तमान त्या अस्त्राचा यथाविधि समंत्रक स्वीकार केला २७. तदनंतर मेघासारिख्या श्याम वर्णानें युक्त असा जलचराधिपति समर्थ वरुण पश्चिम दिशेचें अवलंबन करून भाषण करूं लागला कीं २८ " हे अर्जुना, तूं क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ आहेस आणि क्षात्र धर्माचें अवलंबन करून राहिला आहेस. करितां, हे आरक्तनेत्रा, हे विशालनयना, माझ्याकडे पहा ; मी जलाधिपति वरुण आहें २९. हे कुंतीपुत्रा, मी प्रयोग आणि उपसंहार ह्यांसहवर्तमान पुढें केलेल्या ह्या अकुंठित वरुणपाशांचा तूं स्वीकार कर ३०. हे वीरा, तारकासुराशीं संग्राम चालला असतांना मोठमोठे हजारों दैत्य ह्या पाशांनी मीं बांधून टाकिले होते ३१. तस्मात्, हे महावीर्यवान् अर्जुना, माझ्या प्रसादानें चालून आलेल्या ह्या पाशांचा तूं स्वीकार कर ह्मणजे तूं युद्ध करीत असतांना तुझ्या हातून

कोप्याततायिनः ३२ अनेन त्वं यदास्त्रेण सङ्ग्रामे विचरिष्यसि । तदा निःक्षत्रिया भूमिर्भविष्यति न संशयः ३३ वैशम्पायन उवाच ॥ ततः कैलासनिलयो धनाध्यक्षोभ्यभाषत । दत्तेष्वस्त्रेषु दिव्येषु वरुणेन यमेन च ३४ प्रीतोहमपि ते प्राज्ञ पाण्डवेय महाबल । त्वया सह समागम्य अजितेन तथैव च ३५ सव्यसाचिन्महाबाहो पूर्वदेव सनातन । सहास्माभिर्भवाञ्छ्रान्तः पुराकल्पेषु नित्यशः ३६ दर्शनात्ते त्विदं दिव्यं प्रदिशामि नरर्षभ । अमनुष्यान्महाबाहो दुर्जयानपि जेष्यसि ३७ मत्तश्चैव भवानाशु गृह्णात्वस्त्रमनुत्तमम् । अनेन त्वमनीकानि धार्तराष्ट्रस्य धक्ष्यसि ३८ तदिदं प्रतिगृह्णीष्व अन्तर्धानं प्रियं मम । ओजस्तेजो द्युतिकरं प्रस्वापनमरातिनुत् ३९ महात्मना शंकरेण त्रिपुरं निहतं यदा । तदैतदस्त्रं निर्मुक्तं येन दग्धा महासुराः ४० त्वदर्थमुद्यतं चेदं मया सत्यपराक्रम । त्वमर्हो धारणे चास्य मेरुप्रतिमगौरव ४१ ततोर्जुनो महाबाहुर्विधिवत्कुरुनन्दनः । कौबेरमभिजग्राह दिव्यमस्त्रं महाबलः ४२ ततोब्रवीद्देवराजः

साक्षात् मृत्यूलाही सुटून जातां येणार नाहीं ३२. ह्या अस्त्रासहवर्तमान जेव्हां तूं संग्रामामध्यें संचार करूं लागशील तेव्हां पृथ्वी निःसंशय निःक्षत्रिय होईल " ३३. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें वरुण व यम ह्यांनी आपआपलीं दिव्य अस्त्रें दिलीं असतां कैलासनिवासी धनाधिपति कुबेर ह्मणाला ३४ " हे प्राज्ञ महाबलाढ्य पांडुपुत्रा, तुझा समागम झाल्यामुळें कृष्णाचा समागम झाल्याप्रमाणेंच मी प्रसन्न झालों आहें ३५. हे सनातन (नर स्वरूप) पूर्वदेवा, हे सव्यसाचिन् . हे महापराक्रमी, पूर्वकल्पामध्यें आह्मांबरोबर तूं नित्य श्रांत होत होतास ३६. ह्यास्तव, हे पुरुषश्रेष्ठा, पुनरपि तुझें दर्शन झाल्यामुळें हें दिव्य अस्त्र मी तुला देत आहें. हे महापराक्रमी अर्जुना, ह्याच्या योगानें तूं जिंकण्यास दुर्घट अशा मनुष्येतराचाही पराजय करिशील ३७. ह्यास्तव, ह्या अनुपम अस्त्राचा तूं माझ्यापासून सत्वर स्वीकार कर; ह्याच्या योगानें तूं धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाच्या सेना दग्ध करिशील ३८. तस्मात् , ओज, तेज आणि कांति उत्पन्न करणारें, मोह पाडणारें आणि शत्रूंचा नाश करणारें असें हें मला प्रिय असलेलें अंतर्धाननामक अस्त्र ग्रहण कर ३९. महात्म्या शंकरानें जेव्हां त्रिपुरवध केला तेव्हां हें अस्त्र सोडिलें होतें आणि ह्याच्या योगानें ते महादैत्य दग्ध झाले ४०. हे अमितपराक्रमी अर्जुना, संग्रामामध्यें मेरुपर्वताप्रमाणें तूं निश्चल राहणारा आहेस आणि ह्मणूनच हें अस्त्र धारण करण्यास समर्थ आहेस; ह्यास्तव, तुझ्याकरितां मीं हें पुढें केलें आहें " ४१. ह्याप्रमाणें कुबेरानें सांगितल्यानंतर महापराक्रमी व महाबलाढ्य

पार्थमक्लिष्टकारिणम् । सान्त्वयञ्श्लक्ष्णया वाचा मेघदुन्दुभिनिस्वनः ४३
कुन्तीमातर्महाबाहो त्वमीशानः पुरातनः । परां सिद्धिमनुप्राप्तः साक्षा-
द्देवगतिं गतः ४४ देवकार्यं तु सुमहत्त्वया कार्यमरिन्दम । आरोढव्यस्त्वया
स्वर्गः सज्जीभव महाद्युते ४५ रथो मातलिसंयुक्त आगन्ता त्वत्कृते महीम्।
तत्र तेऽहं प्रदास्यामि दिव्यान्यस्त्राणि कौरव ४६ तान्दृष्ट्वा लोकपालांस्तु समे-
तान्गिरिमूर्धनि । जगाम विस्मयं धीमान्कुन्तीपुत्रो धनञ्जयः ४७ ततो-
र्जुनो महातेजा लोकपालान्समागतान् । पूजयामास विधिवद्वाग्भिरद्भिः
फलैरपि ४८ ततः प्रतिययुर्देवाः प्रतिमान्य धनञ्जयम् । यथागतेन विबुधाः
सर्वे काममनोजवाः ४९ ततोर्जुनो मुदं लेभे लब्धास्त्रः पुरुषर्षभः । कृता-
र्थमथ चात्मानं स मेने पूर्णमानसम् ५० [१७२४] इति० मारण्यपर्वणि कैरा-
तपर्वणि देवप्रस्थाने एकचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४१ ॥ समाप्तं च कैरातपर्व ॥
अथैन्द्रलोकाभिगमनपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ गतेषु लोकपालेषु

कुरुवंशज अर्जुनानें त्या कुबेराच्या दिव्य अस्त्राचा यथाविधि स्वीकार केला ४२. तदनंतर, मेघ आणि दुंदुभि ह्यांसारिख्या गंभीर ध्वनीनें युक्त असलेला देवराज इंद्र क्लेश न पावतां एकसारिखा पराक्रम करणाऱ्या कुंतीपुत्र अर्जुनाला सौम्यवाणीनें सांत्वन करीत करीत ह्मणाला ४३ " हे महापराक्रमी कुंतीपुत्रा, तूं पुरातन जगन्नियंता (नर) आहेस आणि ह्या जन्मींही पराकाष्ठेची सिद्धि तुला प्राप्त झाल्यामुळें साक्षात् देवांच्या योग्यतेला तूं चढला आहेस ४४. हे शत्रुदमना, तुला मोठेंच देवकार्य कर्तव्य असल्यामुळें स्वर्गारोहण करणें अवश्य आहे. करितां, हे महातेजस्वी अर्जुना, तूं तयार हो ४५. मातलि सारथ्यासहवर्तमान माझा रथ तुला स्वर्गास नेण्याकरितां पृथ्वीवर येईल आणि, हे कुरुवंशजा, (स्वर्गाला आल्यानंतर) त्या ठिकाणीं मी तुला दिव्य अस्त्रें देईन "४६. ह्याप्रमाणें पर्वतशिखरावर जुळलेल्या त्या लोकपालांना अवलोकन करून तो बुद्धिमान् कुंतीपुत्र अर्जुन विस्मय पावला ४७. नंतर त्या महातेजस्वी अर्जुनानें तेथें जुळत आलेल्या लोकपालांचे उदक, फलें आणि वाणी ह्यांच्या योगानें यथाविधि पूजन केलें ४८. तेव्हां देवांनींही धनंजयाचा उलट सत्कार केला आणि इच्छा व मन ह्याप्रमाणें वेगवान् असलेले ते सर्व देव आल्या मार्गानें परत गेले ४९. ह्याप्रमाणें अस्त्रें प्राप्त झालीं असतां पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला आनंद झाला आणि " आपण कृतकृत्य झालों " असें तो अगदीं मनापासून समजूं लागला ५०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कैरातपर्वापैकीं देवांच्या गमनाविषयीं एकेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४१ ॥ ह्या ठिकाणीं कैरात पर्वही संपूर्ण झालें ॥

पार्थः शत्रुनिबर्हणः। चिन्तयामास राजेन्द्र देवराजरथं प्रति १ ततश्चिन्तयमानस्य गुडाकेशस्य धीमतः। रथो मातलिसंयुक्त आजगाम महाप्रभः २ नभो वितिमिरं कुर्वञ्जलदान्पाटयन्निव। दिशः संपूरयन्नादैर्महामेघरवोपमैः ३ अयसः शक्तयो भीमा गदाश्चोग्रप्रदर्शनाः। दिव्यप्रभावाः प्रासाश्च विद्युतश्च महाप्रभाः ४ तथैवाशनयश्चैव चक्रयुक्तास्तुलागुडाः। वायुस्फोटाः सनिर्घाता महामेघस्वनास्तथा ५ तत्र नागा महाकाया ज्वलितास्याः सुदारुणाः। सिताभ्रकूटप्रतिमाः संहताश्च तथोपलाः ६ दशवाजिसहस्राणि हरीणां वातरंहसाम्। वहन्ति यं नेत्रमुषं दिव्यं मायामयं रथम् ७ तत्रापश्यन्महानीलं वैजयन्तं महाप्रभम्। ध्वजमिन्दीवरश्यामं वंशं कनकभूषणम् ८ तस्मिन्रथे स्थितं सूतं तप्तहेमविभूषितम्। दृष्ट्वा पार्थो महाबाहुर्देवमेवान्वतर्कयत् ९ तथा तर्कयतस्तस्य फाल्गुनस्याथ मातलिः। संनतः प्रश्रितो भूत्वा वाक्यमर्जुनमब्रवीत् १० मात-

---

येथून पुढें इंद्रलोकाभिगमनसंज्ञक पर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः— हे राजाधिराज जनमेजया, लोकपाल गेल्यानंतर शत्रुनाशक कुंतीपुत्र अर्जुन देवराज इंद्राच्या रथाविषयीं मनामध्यें चिंतन करूं लागला १ आणि निद्रा जिंकिलेला तो बुद्धिमान् अर्जुन चिंतन करीत आहे तोंच महातेजस्वी रथ मातलीबरोबर तेथें आला २. तो रथ आकाशांतील अंधकार नाहीसा करीत करीत, मेघ जसे कांहीं फाडित फाडित आणि मोठ्या मेघध्वनीप्रमाणें गंभीर नादांनीं दिशा पूरित करीत करीत येत होता ३. खड्ग, भयंकर शक्ति, दिसण्यांतही उग्र अशा गदा, दिव्य प्रभावानें युक्त असलेले पट्टे, प्रचंड प्रभेनें युक्त असलेल्या विद्युल्लता ४, त्याचप्रमाणें वज्रें, चक्रासहवर्तमान तोफांचे गोळे, विद्युल्लतेच्या ध्वनींनीं व मोठमोठ्या मेघगर्जनांनीं युक्त असे वायूचे फडफडाट ५, प्रदीप्त मुख आणि प्रचंड शरीर ह्यांनीं युक्त असलेले अत्यंत भयंकर नाग आणि शुभ्रवर्ण मेघपटलाप्रमाणें असलेले एकत्र जुळवून ठेविलेले पाषाण त्या रथावर असून ६ वायूप्रमाणें वेगवान् असे दहा हजार हरिसंज्ञक अश्व त्या नजर न ठरवूं देणाऱ्या मायामय दिव्य रथाला ओढीत होते ७. उत्कृष्ट नीलमण्यांनीं बनविलेला आणि ह्मणूनच नील कमलाप्रमाणें श्यामवर्ण असलेला अत्यंत तेजस्वी वैजयंतनामक ध्वज आणि सुवर्णभूषित ध्वजदंड अर्जुनानें अवलोकन केला ८. नंतर शुद्ध सुवर्णानें भूषित असा सारथि त्या रथावर स्थित असलेला अवलोकन करून तर महापराक्रमी कुंतीपुत्र अर्जुनाला तो देव असावा असेंच वाटलें ९. परंतु, अर्जुन त्याप्रमाणें तर्क करीत आहे तोंच मातलि पुढें आला आणि नम्र होऊन त्याला ह्मणाला १०

लिरुवाच ॥ भो भोः शक्रात्मज श्रीमाञ्छक्रस्त्वां द्रष्टुमिच्छति । आरो-
हतु भवाञ्छीघ्रं रथमिन्द्रस्य संमतम् ११ आह माममरश्रेष्ठः पिता तव
शतक्रतुः । कुन्तीसुतमिह प्राप्तं पश्यन्तु त्रिदशालयाः १२ एष शक्रः परि-
वृतो देवैर्ऋषिगणैस्तथा । गन्धर्वैरप्सरोभिश्च त्वां दिदृक्षुः प्रतीक्षते १३
अस्माल्लोकाद्देवलोकं पाकशासनशासनात् । आरोह त्वं मया सार्धं
लब्धास्त्रः पुनरेष्यसि १४ अर्जुन उवाच ॥ मातले गच्छ शीघ्रं त्वमारो-
हस्व रथोत्तमम् । राजसूयाश्वमेधानां शतैरपि सुदुर्लभम् १५ पार्थिवैः
सुमहाभागैर्यज्वभिर्भूरिदक्षिणैः । दैवतैर्वा समारोढुं दानवैर्वा रथोत्तमम् १६
नातप्ततपसा शक्य एष दिव्यो महारथः । द्रष्टुं वाप्यथवा स्प्रष्टुमारोढुं
कुत एव च १७ त्वयि प्रतिष्ठिते साधो रथस्थे स्थिरवाजिनि । पश्चादहम-
थारोक्ष्ये सुकृती सत्पथं यथा १८ वैशम्पायन उवाच ॥ तस्य तद्वचनं श्रुत्वा
मातलिः शक्रसारथिः । आरुरोह रथं शीघ्रं हयान्येमे च रश्मिभिः १९
ततोऽर्जुनो हृष्टमना गङ्गायामाप्लुतः शुचिः । जजाप जप्यं कौन्तेयो विधि-

---

" हे इंद्रपुत्रा, वैभवशाली इंद्र तुला भेटण्याची इच्छा करीत आहे. करितां, इंद्राच्या ह्या प्रिय रथावर तूं सत्वर आरोहण कर ११. " कुंतीपुत्र येथें आलेला देवांना पाहूं दे" ११ ह्मणून तुझ्या पित्या सुरश्रेष्ठ इंद्रानें मला सांगितलें आहे १२ आणि देव, ऋषिगण, गंधर्व व अप्सरा ह्यांनीं परिवेष्टित असलेला इंद्र तुला भेटण्याकरितां वाट पहात बसला आहे १३. ह्यास्तव, इंद्राच्या आज्ञेनें तूं ह्या मर्त्यलोकापासून देवलोका-प्रत माझ्याबरोबर चल आणि (इंद्रापासून) अस्त्रप्राप्ति झाल्यानंतर पुनरपि परत ये " १४. अर्जुन ह्मणतो " हे मातले, जा; तूं त्या उत्कृष्ट रथावर सत्वर आरोहण कर. शेंकडों राजसूय आणि अश्वमेध याग केले असतांही तो रथ आरोहण करण्यास मिळणें अतिशय दुर्लभ आहे १५. विपुल दक्षिणा देऊन याग करणाऱ्या अत्यंत महाभाग्यवान् राजांचें, देवतांच अथवा दानवांचें त्या उत्कृष्ट रथावर आरोहण होणें अशक्य आहे १६. तपश्चर्या न केलेल्या पुरुषाला ह्या मोठ्या दिव्य रथाचें केवल दर्शन अथवा स्पर्श होण्याचाही संभव नाही; मग आरोहणाची तर गोष्ट कशाला पाहिजे? १७. हे साधो, तूं रथावर नीट बसलास आणि रथावर जाऊन बसल्यावर अश्व स्थिर उभे राहिले ह्मणजे पुण्यवान् ज्याप्रमाणें सन्मार्गावर आरोहण करितो त्याप्रमाणें मी नंतर त्या रथावर आरोहण करीन १८. वैशंपायन सांगतातः—त्या अर्जुनाचें तें भाषण श्रवण करून इंद्राचा सारथि मातलि सत्वर रथारूढ झाला आणि रश्मींच्या योगानें त्यानें अश्व आवरून धरिले १९. तदनंतर मनांत आनंदित झालेला अर्जुन गंगेमध्यें

वरकुरुनन्दनः २० ततः पितॄन्यथान्यायं तर्पयित्वा यथाविधि । मन्दरं शैलराजन्तमाप्रष्टुमुपचक्रमे २१ साधूनां पुण्यशीलानां मुनीनां पुण्यकर्मणाम् । त्वं सदा संश्रयः शैल स्वर्गमार्गाभिकाङ्क्षिणाम् २२ त्वत्प्रसादात्सदा शैल ब्राह्मणाः क्षत्रिया विशः । स्वर्गं प्राप्ताश्चरन्ति स्म देवैः सह गतव्यथाः २३ अद्रिराज महाशैल मुनिसंश्रय तीर्थवन् । गच्छाम्यामन्त्रयित्वा त्वां सुखमस्म्युषितस्त्वयि २४ तव सानूनि कुञ्जाश्च नद्यः प्रस्रवणानि च । तीर्थानि च सुपुण्यानि मया दृष्टान्यनेकशः २५ फलानि च सुगन्धीनि भक्षितानि ततस्ततः । सुसुगन्धाश्च वार्योघास्त्वच्छरीरविनिःसृताः २६ अमृतास्वादनीया मे पीताः प्रस्रवणोदकाः । शिशुर्यथा पितुरङ्के सुसुखं वर्तते नग २७ तथा तवाङ्के ललितं शैलराज मया प्रभो । अप्सरोगणसंकीर्णे ब्रह्मघोषानुनादिते २८ सुखमस्म्युषितः शैल तव सानुषु नित्यदा । एवमुक्त्वार्जुनः शैलमामन्त्र्य परवीरहा २९ आरुरोह रथं दिव्यं द्योतयन्निव भास्करः । स तेनादित्यरूपेण दिव्येनाद्भुतकर्मणा ३० ऊर्ध्वमाचक्रमे धीमान्प्रहृष्टः कुरुनन्दनः ।

स्नान करून शुचि झाला आणि नंतर त्या कुरुवंशज कुंतीपुत्रानें यथाविधि जप केला २०. तदनंतर अनुक्रमानें पितरांचें तर्पण यथाविधि करून शैलराज मंदर पर्वताचा तो निरोप घेऊं लागला की २१ " हे पर्वता, सज्जन, पुण्यशील, मुनि, सत्कर्मी आणि स्वर्गेच्छु ह्यांचें तूं सर्वदां आश्रयस्थान असतोस २२ आणि. हे पर्वता, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यांना तुझ्या प्रसादानें स्वर्ग प्राप्त झाला असतां ते निश्चिंत होऊन देवांसहवर्तमान संचार करितात २३. हे अद्रिराजा, हे महापर्वता, हे मुनिसंश्रया, हे तीर्थसंपन्ना, तुझ्यावर मी आजपर्यंत सुखानें राहिलों. आतां तुझा निरोप घेऊन मी जातों २४. तुझीं शिखरें, कुंजवनें, नद्या, ओहोळ आणि अत्यंत पवित्र तीर्थे ह्यांचें मला अनेक वेळां दर्शन झालें २५; ठिकठिकाणीं स्वादिष्ट फलें मीं भक्षण केलीं, अमृताप्रमाणें स्वादिष्ट आणि झऱ्याच्या उदकानें युक्त अशा तुझ्या शरीरांतून निघालेल्या अत्यंत सुगंधि जलप्रवाहांचें मीं पान केलें आणि, हे पर्वता, ज्याप्रमाणें पित्याचे अंकावर बालक अतिशय सुखानें राहतो २६,२७ त्याचप्रमाणें, हे प्रभो शैलराजा, अप्सरांच्या समुदायांनीं व्याप्त आणि वेदघोषानें नादित अशा तुझ्या अंकावर मीं क्रीडा केली २८. हे पर्वता, खरोखर नेहमीं तुझ्या शिखरांवर मी सुखानें वास्तव्य केलें ". ह्याप्रमाणें बोलून शत्रुपक्षीयवीरनाशक अर्जुनानें त्या पर्वताचा निरोप घेतला २९ आणि सूर्याप्रमाणें दिशा प्रकाशित करीत करीत तो त्या दिव्य रथावर आरूढ झाला,

सोदर्शनपथं गतो मर्त्यानां धर्मचारिणाम् ३१ ददर्शाद्भुतरूपाणि विमानानि सहस्रशः । न तत्र सूर्यः सोमो वा द्योतते न च पावकः ३२ स्वयैव प्रभया तत्र द्योतन्ते पुण्यलब्धया । तारारूपाणि यानीह दृश्यन्ते द्युतिमन्ति वै ३३ दीपवद्विप्रकृष्टत्वात्तनूनि सुमहान्त्यपि । तानि तत्र प्रभास्वन्ति रूपवन्ति च पाण्डवः ३४ ददर्श स्वेषु धिष्ण्येषु दीप्तिमन्ति स्वयार्चिषा । तत्र राजर्षयः सिद्धा वीराश्च निहता युधि ३५ तपसा च जितं स्वर्गं संपेतुः शतसङ्घशः । गन्धर्वाणां सहस्राणि सूर्यज्वलिततेजसाम् ३६ गुह्यकानामृषीणां च तथैवाप्सरसां गणान् । लोकानात्मप्रभान्पश्यन्फाल्गुनो विस्मयान्वितः ३७ पप्रच्छ मातलिं प्रीत्या स चाप्येनमुवाच ह । एते सुकृतिनः पार्थ स्वेषु धिष्ण्येष्ववस्थिताः ३८ यान्दृष्टवानसि विभो तारारूपाणि भूतले । ततोपश्यत्स्थितं द्वारि शुभं वैजयिनं गजम् ३९ ऐरावतं चतुर्दन्तं कैलासमिव शृङ्गिणम् । स सिद्धमार्गमाक्रम्य कुरुपा-

---

त्या सूर्यसमान तेजस्वी आणि अद्भुत कृतीनें युक्त अशा दिव्य रथाच्या योगानें ३० तो बुद्धिमान् अर्जुन आनंदपूर्वक वर जाऊं लागला. तेव्हां मर्त्य लोकांच्या दृष्टिपथाचें उल्लंघन करून गेल्यानंतर धर्मनिष्ठ लोकांचीं ३१ दिसण्यांत आश्चर्यकारक अशीं हजारों विमानें त्यानें अवलोकन केली. त्या प्रदेशामध्यें सूर्य, चंद्र अथवा अग्नि ह्यांपैकीं कोणाचाही प्रकाश पडत नसून ३२ येथें ज्या चकचकणाऱ्या तारांच्या आकृति दिसतात त्या पुण्यानें प्राप्त झालेल्या स्वतःच्याच प्रभेच्या योगानें तेथें प्रकाशत असतात ३३. वस्तुतः अत्यंत मोठ्या असूनही फार लांब असल्यामुळें ज्या नक्षत्राकृति आपल्याला येथें अगदीं दीपाप्रमाणें सूक्ष्म दिसतात त्या तेथें प्रकाशमान आणि स्वरूपानें युक्त अशा आकृति असल्याचें पांडुपुत्र अर्जुनानें ३४ अवलोकन केलें. संग्रामामध्यें वध पावलेले वीर आणि सिद्ध बनलेले राजर्षि आपल्या प्रभेच्या योगानें आपआपल्या स्थानांचे ठिकाणीं तेथें प्रकाशत असतात ३५. सूर्याप्रमाणें उज्ज्वल तेजानें युक्त असे हजारों गंधर्व शेंकडों समुदायांनीं तपश्चर्येनें प्राप्त करून घेतलेल्या स्वर्गाप्रत जात असतात ३६. सारांश, गुह्यकगण, ऋषिसमुदाय आणि अप्सरांचे गण वगैरे स्वयंप्रकाश लोकांना पहातां पहातां अर्जुन विस्मित झाला ३७ आणि मातलीला विचारूं लागला; तेव्हां मातलिही प्रेमानें त्याला सांगूं लागला कीं "हे प्रभो कुंतीपुत्रा, भूतलावर तूं ज्या तारांच्या आकृति अवलोकन केल्यास ते हे पुण्यवान् लोक आपआपल्या स्थानावर बसलेले आहेत. तदनंतर स्वर्गाचे द्वाराशीं स्थित असलेला आणि कैलासपर्वताप्रमाणें भासत असलेला ऐरावतनामक चौदंती विजयी गज अर्जुनाचे दृष्टीं पडला. असो. ह्याप्रमाणें सिद्ध मार्गाचें उल्लं-

ण्डवसत्तमः ४० व्यरोचत यथा पूर्वं मान्धाता पार्थिवोत्तमः । अतिचक्राम लोकान्स राज्ञां राजीवलोचनः ४१ एवं स संक्रमंस्तत्र स्वर्गलोके महायशाः । ततो ददर्श शक्रस्य पुरींताममरावतीम् ४२ [१७६६] इति० मारण्यपर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणि शक्रपुरीदर्शने द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स ददर्श पुरीं रम्यां सिद्धचारणसेविताम् । सर्वर्तुकुसुमैः पुण्यैः पादपैरुपशोभिताम् १ तत्र सौगन्धिकानां च पुष्पाणां पुण्यगन्धिनाम् । उद्वीज्यमानो मिश्रेण वायुना पुण्यगन्धिना २ नन्दनं च वनं दिव्यमप्सरोगणसेवितम् । ददर्श दिव्यकुसुमैराह्वयद्भिरिव द्रुमैः ३ नातप्ततपसा शक्यो द्रष्टुं नानाहिताग्निना । स लोकः पुण्यकर्तॄणां नापि युद्धे पराङ्मुखैः ४ नायज्वभिर्नाव्रतिकैर्न वेदश्रुतिवर्जितैः । नानाप्लुताङ्गैस्तीर्थेषु यज्ञदानबहिष्कृतैः ५ नापि यज्ञहनैः क्षुद्रैर्द्रष्टुं शक्यः कथंचन । पानपैर्गुरुतल्पैश्च मांसादैर्वा दुरात्मभिः ६ स तद्दिव्यं वनं पश्यन्दिव्यगीतनिनादितम् । प्रविवेश महाबाहुः शक्रस्य दयितां पुरीम् ७ तत्र देव-

---

घन करून जाऊं लागलेला तो कुरुपांडवश्रेष्ठ अर्जुन ३८,३९,४० पूर्वी गेलेल्या नृपश्रेष्ठ मांधात्याप्रमाणें शोभूं लागला. अशा प्रकारें तो कमलनयन अर्जुन राजांना प्राप्त झालेले लोकांचें अतिक्रमण करून चालला ४१ आणि ह्याप्रमाणें जातां जातां स्वर्ग लोकामध्यें गेल्यावर त्या महायशस्वी अर्जुनानें इंद्राची ती अमरावती नगरी अवलोकन केली ४२. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं बेचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥४२॥

वैशंपायन सांगतातः—सिद्ध आणि चारण ह्यांनीं सेवित आणि सर्व ऋतूंमध्यें प्रफुल्लित होणाऱ्या पुण्य वृक्षानी सुशोभित अशी ती रम्य पुरी त्यानें अवलोकन केली १. त्या ठिकाणी पवित्र व उत्तम गधांनीं युक्त अशा पुष्पांमध्यें मिश्र झाल्यामुळें सुगंधि वायूची झुळुक लागत असतांना २ आह्वानच करीत आहेत कीं काय अशा दिव्य पुष्पांनीं संपन्न असलेल्या वृक्षांनीं युक्त आणि अप्सरांच्या समुदायांनी सेवित असें नंदन वन त्यानें अवलोकन केलें ३. (हे जनमेजया) पुण्यकर्त्यांना प्राप्त होणारा तो लोक तपश्चर्या न केलेल्याला, अग्निहोत्र न घेतलेल्याला आणि त्याचप्रमाणें युद्धामध्यें पराङ्मुख झालेल्याला दृष्टीं पडणें शक्य नाहीं ४ आणि त्याचप्रमाणें यज्ञयाग न करणारे, व्रतानें न चालणारे, वेदश्रवणरहित असलेले, तीर्थांचे ठिकाणीं स्नान न केलेले, यज्ञ आणि दान ह्यांपासून पराङ्मुख असलेले ५, यज्ञघातकी, क्षुद्र, मद्यपी, गुरुदारगामी आणि मांसभक्षक दुष्ट ह्यांनाही त्या लोकाचें दर्शन होणें शक्य नाहीं ६. असो. ह्याप्रमाणें दिव्य गायनांनीं नादित झालेलें तें दिव्य वन अवलोकन करीत करीत तो महा-

विमानानि कामगानि सहस्रशः । संस्थितान्यभियातानि ददर्शायुतश-
स्तदा ८ संस्तूयमानो गन्धर्वैरप्सरोभिश्च पाण्डवः । पुष्पगन्धवहैः पुण्यै-
र्वायुभिश्चानुवीजितः ९ ततो देवाः सगन्धर्वाः सिद्धाश्च परमर्षयः । हृष्टाः
संपूजयामासुः पार्थमक्लिष्टकारिणम् १० आशीर्वादैः स्तूयमानो दिव्य-
वादित्रनिःस्वनैः । प्रतिपेदे महाबाहुः शङ्खदुन्दुभिवादितम् ११ नक्षत्रमार्गं
विपुलं सुरवीथीति विश्रुतम् । इन्द्राज्ञया ययौ पार्थः स्तूयमानः सम-
न्ततः १२ तत्र साध्यास्तथा विश्वे मरुतोथाश्विनौ तथा । आदित्या
वसवो रुद्रास्तथा ब्रह्मर्षयोमलाः १३ राजर्षयश्च बहवो दिलीपप्रमुखा
नृपाः । तुम्बुरुर्नारदश्चैव गन्धर्वौ च हाहाहूहूः १४ तान्सर्वान्स समा-
गम्य विधिवत्कुरुनन्दनः । ततोपश्यद्देवराजं शतक्रतुमरिन्दमः १५ ततः
पार्थो महाबाहुरवतीर्य रथोत्तमात् । ददर्श साक्षाद्देवेशं पितरं पाकशास-
नम् १६ पाण्डुरेणातपत्रेण हेमदण्डेन चारुणा । दिव्यगन्धाधिवासेन
व्यजनेन विधूयता १७ विश्वावसुप्रभृतिभिर्गन्धर्वैस्तुतिवन्दिभिः । स्तूय-

---

पराक्रमी अर्जुन इंद्राच्या प्रिय नगरीप्रत प्रविष्ट झाला असतां ७ इच्छेप्रमाणें गमन करणारीं हजारों, लाखों, देवविमानें चोहोंकडून त्या ठिकाणीं जुळलेलीं त्यानें अवलोकन केलीं ८. ह्याप्रमाणें तो पांडुपुत्र अर्जुन इंद्रनगरीमध्यें प्रविष्ट झाला असतां अप्सरा आणि गंधर्व हे त्याची स्तुति करूं लागले आणि पुष्पगंध वाहून नेणारे पवित्र वायु त्याला वारा घालूं लागले ९. तदनंतर गंधर्वांसहवर्तमान देव, सिद्ध आणि महर्षि क्लेश न पावतां सतत पराक्रम करणाऱ्या कुंतीपुत्र अर्जुनाची आनंदानें प्रशंसा करूं लागले १०. ह्याप्रमाणे ऋषिप्रभृति आशीर्वाद देत असतांना आणि दिव्य वाद्यांच्या ध्वनींनीं आदरसत्कार चालला असतांना तो महापराक्रमी अर्जुन शंख व दुंदुभि ह्या वाद्यांच्या ध्वनींनीं नादित आणि सुरवीथि ह्मणून विख्यात अशा भव्य नक्षत्रमार्गामध्यें प्राप्त झाला आणि स्तुति चालली असतांना इंद्राच्या आज्ञेनें तो कुंतीपुत्र चोहोंकडे जाऊं लागला ११.१२. त्या ठिकाणीं साध्य, विश्वेदेव, मरुद्गण, अश्विनीकुमार, द्वादशादित्य, अष्टवसु, एकादशरुद्र, निष्पाप ब्रह्मर्षि १३, अनेक राजर्षि, दिलीपप्रभृति राजे, तुंबुरु, नारद आणि हाहा व हूहू हे गंधर्व होते १४. त्या सर्वांची यथान्याय भेट घेऊन त्या शत्रुदमन कुरुवंशज अर्जुनानें देवराज इंद्राला अवलोकन केलें १५. प्रथमतः इंद्रासमीप आल्यानंतर महापराक्रमी कुंतीपुत्र त्या श्रेष्ठ रथांतून खालीं उतरला आणि तदनंतर त्यानें साक्षात् देवराज पित्या इंद्राचें दर्शन घेतलें १६. त्यावेळीं शुभ्रवर्ण आणि सुवर्णदंड ह्यांनीं युक्त असलेलें मनोहर छत्र इंद्रावर धरिलेलें होतें; दिव्य गंधांनीं सुवासित

मानं द्विजाद्यैश्च ऋग्यजुःसामसंभवैः १८ ततोभिगम्य कौन्तेयः शिर-
साभ्यगमद्बली । स चैनं वृत्तपीनाभ्यां बाहुभ्यां प्रत्यगृह्णत १९ ततः
शक्रासने पुण्ये देवर्षिगणसेविते । शक्रः पाणौ गृहीत्वैनमुपावेशयदन्तिके २०
मूर्ध्नि चैनमुपाघ्राय देवेन्द्रः परवीरहा । अङ्कमारोपयामास प्रश्रयावनतं
तदा २१ सहस्राक्षनियोगात्स पार्थः शक्रासनं गतः । अध्यक्रामदमे-
यात्मा द्वितीय इव वासवः २२ ततः प्रेम्णा वृत्रशत्रुरर्जुनस्य शुभं मुखम्।
पस्पर्श पुण्यगन्धेन करेण परिसान्त्वयन् २३ प्रमार्ज्यमानः शनकैर्बाहू
चास्यायतौ शुभौ । ज्याशरक्षेपकठिनौ स्तम्भाविव हिरण्मयौ २४ वज्र-
ग्रहणचिह्नेन करेण परिसान्त्वयन् । मुहुर्मुहुर्वज्रधरो बाहू चास्फोटय-
च्छनैः २५ स्मयन्निव गुडाकेशं प्रेक्षमाणः सहस्रदृक् । हर्षेणोत्फुल्लन-
यनो न चातृप्यत वृत्रहा २६ एकासनोपविष्टौ तौ शोभयाञ्चक्रतुः सभाम्।
सूर्याचन्द्रमसौ व्योम चतुर्दश्यामिवोदितौ २७ तत्र स्म गाथा गायन्ति

केलेल्या विंझण्याचा वारा त्याच्यावर चाललेला होता १७ आणि स्तवनपूर्वक वंदन करणारे विश्वावसुप्रभृति गंधर्व आणि ऋग्वेदी, यजुर्वेदी व सामवेदी ब्राह्मण त्याची स्तुति करीत होते १८. तदनंतर इंद्रासमीप जाऊन कुंतीपुत्र बलाढ्य अर्जुनानें त्याला मस्तकानें प्रणाम केला व त्या देवराजानेंही वर्तुल आणि पुष्ट अशा बाहूंनीं त्याला आलिंगन दिलें १९. तदनंतर अर्जुनाचा हात धरून देवगण आणि ऋषिगण ज्याची सेवा करीत असतात अशा आपल्या आसनावर इंद्रानें त्याला घेतलें आणि आपल्या समीप बसविलें २०. तदनंतर शत्रुवीरनाशक देवराजानें अर्जुनाचें मस्तकीं अवघ्राण केलें आणि विनयानें नम्र झालेल्या त्या अर्जुनाला आपल्या अंकावर घेतलें २१. इंद्राच्या आज्ञेनें त्याच्या सिंहासनावर गेलेला महात्मा अर्जुन दुसरा इंद्रच कीं काय असा त्याच्यावर बसला २२. तदनंतर चुचकारीत चुचकारीत इंद्रानें आपला पवित्र गंधानें युक्त असलेला हात अर्जुनाच्या शुभ्र मुखावर फिरविला २३. नंतर प्रत्यंचेच्या आकर्षणानें व बाण सोडण्यानें कठीण आणि सुवर्णस्तंभासारिख्या दीर्घ अशा अर्जुनाच्या शुभ्र बाहूंना हळू हळू २४ सांत्वनपूर्वक वज्रपाणि इंद्र आपल्या वज्रचिन्हांकित हातानें वारंवार स्पर्श करूं लागला आणि हळूं हळूं त्याच्यावर ताडन करूं लागला २५. अगा. ह्याप्रमाणें हर्षानें ज्याचीं नेत्रकमलें प्रफुल्लित झालीं आहेत असा तो वृत्रघातक सहस्रनयन इंद्र हास्यपूर्वक मोहनिर्मुक्त अर्जुनाला अवलोकन करूं लागला असतां त्याची तृप्ति झाली नाहीं २६. (हे जनमेजय राजा) ते उभयतां इंद्र व अर्जुन एकाच आसनावर बसले असतांना कृष्णचतुर्दशीचे दिवशीं उदय पाव-

साम्ना परमवल्गुना । गन्धर्वास्तुम्बुरुश्रेष्ठाः कुशला गीतसामसु २८ घृताची मेनका रम्भा पूर्वचित्तिः स्वयंप्रभा । उर्वशी मिश्रकेशी च दण्डगौरी वरूथिनी २९ गोपाली सहजन्या च कुम्भयोनिः प्रजागरा । चित्रसेना चित्रलेखा सहा च मधुरस्वना ३० एताश्चान्याश्च ननृतुस्तत्र तत्र सहस्रशः । चित्तप्रसादने युक्ताः सिद्धानां पद्मलोचनाः ३१ महाकटितटश्रोण्यः कम्पमानैः पयोधरैः । कटाक्षहावमाधुर्यैश्चेतोबुद्धिमनोहरैः ३२ [१७९८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणीन्द्रसभादर्शने त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो देवाः सगन्धर्वाः समादायार्घ्यमुत्तमम् । शक्रस्य मतमाज्ञाय पार्थमानर्चुरञ्जसा १ पाद्यमाचमनीयं च प्रतिग्राह्य नृपात्मजम् । प्रवेशयामासुरथो पुरन्दरनिवेशनम् २ एवं संपूजितो जिष्णुरुवास भवने पितुः । उपशिक्षन्महास्त्राणि ससंहाराणि पाण्डवः ३ शक्रस्य हस्तादयितं वज्रमस्त्रं च दुःसहम् । अशनीश्च महानादा मेघबर्हिणल-

---

लेले चंद्रसूर्य ज्याप्रमाणें आकाशाला शोभा देत असतात त्याप्रमाणें त्या सभेला शोभवूं लागले २७. त्या ठिकाणीं सामान्य गीतें आणि सामें ह्या दोहोंमध्यें निपुण असलेले तुंबुरुप्रभृति गंधर्व अत्यंत रम्य असें प्रेमपूर्वक गायन करीत होते २८ आणि त्याचप्रमाणें घृताची, मेनका, रंभा, पूर्वचित्ति, स्वयंप्रभा, उर्वशी, मिश्रकेशी, दंडगौरी, वरूथिनी २९, गोपाली, सहजन्या, कुंभयोनि, प्रजागरा, चित्रसेना, चित्रलेखा, सहा व मधुरस्वरा ह्या ३० आणि अवलोकनात्मक चित्तवृत्तीला गुंग करून सोडणारे कटाक्ष, निश्चयस्वरूप बुद्धिवृत्तीला हरण करणारे हावभाव आणि मनाला मोह पाडणारें कंठमाधुर्य ह्यांच्या योगानें व स्फुरण पावणाऱ्या स्तनांच्या योगानें सिद्धांचें चित्तरंजन करण्याविषयीं तत्पर आणि मोठमोठ्या कटितटरूप श्रोणींनीं युक्त व कमलासारिख्या नेत्रांनीं युक्त असलेल्या इतरही हजारों अप्सरा ठिकठिकाणीं नृत्य करीत होत्या ३१, ३२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वांपैकीं इंद्रसभादर्शनाविषयीं त्रेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४३ ॥

वैशंपायन सांगतात:— तदनंतर, इंद्राची संमति घेऊन गंधर्वांसहवर्तमान देवांनीं उत्कृष्ट पूजाद्रव्यें आणून मनोभावानें कुंतीपुत्र अर्जुनाचें पूजन केलें १ व ह्याप्रमाणें पाद्य आणि आचमनीय अर्पण केल्यानंतर ते त्या राजकुमार अर्जुनाला इंद्राच्या वसतिस्थानामध्यें घेऊन गेले २. ह्याप्रमाणें मानमान्यता होत असतांना उपसंहारासहवर्तमान अस्त्रें शिकण्याकरितां पित्याचे घरीं पांडुपुत्र अर्जुन राहिला ३. तेथें राहिला असतांना इंद्राला प्रिय असें

क्षणाः ४ गृहीतास्त्रस्तु कौन्तेयो भ्रातॄन्सस्मार पाण्डवः। पुरन्दरनियो-
गाच्च पश्चाब्दानवसत्सुखी ५ ततः शक्रोऽब्रवीत्पार्थं कृतास्त्रं काल आगते।
नृत्यं गीतं च कौन्तेय चित्रसेनादवाप्नुहि ६ वादित्रं देवविहितं नृलोके
यन्न विद्यते। तदर्जयस्व कौन्तेय श्रेयो वै ते भविष्यति ७ सखायं प्रददौ
चास्य चित्रसेनं पुरन्दरः। स तेन सह संगम्य रेमे पार्थो निरामयः ८
गीतवादित्रनृत्यानि भूय एवादिदेश ह ९ तथापि नालभच्छर्म तरस्वी
द्यूतकारितम्। दुःशासनवधामर्षी शकुनेः सौबलस्य च १० ततस्तेना-
तुलां प्रीतिमुपागम्य क्वचित्क्वचित्। गान्धर्वमतुलं नृत्यं वादित्रं चोपल-
ब्धवान् ११ स शिक्षितो नृत्यगुणाननेकान्वादित्रगीतार्थगुणांश्च सर्वान्।
न शर्म लेभे परवीरहन्ता भ्रातॄन्स्मरन्मातरं चैव कुन्तीम् १२[१८१०] इति
श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वणीन्द्रलो-
काभिगमनपर्वण्यर्जुनास्त्रादिशिक्षायां चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥

दुःसह वज्रास्त्र आणि मेघ व मयूर ह्यांच्या दर्शनाने अनुमित होणारें व महाध्वनींनें युक्त असलेल अशनिसंज्ञक अस्त्र हीं त्याला इंद्रापासूनच प्राप्त झालीं ४. ह्याप्रमाणें इंद्रापासून अस्त्रें घेतल्यानतर कुतीपुत्र अर्जुनाला आपल्या भ्रात्यांचे स्मरण झालें तथापि इंद्राच्या आज्ञेमुळे पांच वर्षें पर्यंत त्याला तेथें सुखांत राहणें भाग पडलें ५. तदनंतर योग्य समय प्राप्त झाला असतां इंद्र अस्त्रप्राप्ति झालेल्या अर्जुनाला ह्मणाला "हे कुंतीपुत्रा, चित्रसेन गधर्वापासून तू नृत्य व गीत प्राप्त करून घे ६ आणि हे कुंतीपुत्रा, मनुष्यलोकामध्यें विद्यमान नसलेले वाद्य(वाजविणे ही विद्या)ही तू प्राप्त करून घे; ह्मणजे तुझें कल्याण होईल" ७. ह्याप्रमाणे अर्जुनाला सांगितल्यावर इंद्रानें त्या अर्जुनाला चित्रसेन हा एक मित्र दिला. तेव्हां त्याचा समागम झाल्यावर निरोगी अर्जुनाच्या मनाला (कांहींशीं) करमणूक झाली ८. (चित्तरंजन होण्याकरितां) चित्रसेनानें पुनरपि गायन, वादन व नृत्य ही त्याला सांगितलीं. तथापि द्यूतामुळें प्राप्त झालेलें दुःख स्मरून दुःशासन आणि सुबलपुत्र शकुनि ह्यांचा वध करण्याकरितां मनामध्यें तडफडत असलेल्या त्या तेजस्वी अर्जुनाला सुख झालें नाहीं ९,१०. तदनंतर चित्रसेनाशीं पराकाष्ठेचें प्रेम जडलें असत, अर्जुनानें अनुपम वादन, नृत्य आणि गायन हीं प्राप्त करून घेतलीं ११. परंतु, ह्याप्रमाणें नृत्य, वादन आणि गायन एतद्विषयक सर्व गुण जरी अर्जुन शिकला तरी माता कुंती आणि भ्राते ह्यांचें (एकसारिखें) स्मरण होत असल्यामुळें त्या शत्रुपक्षीयवीरनाशकाला सुख प्राप्त झालें नाहीं १२. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं चव्वेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ कदाचिदथ तं शक्रश्चित्रसेनं रहोऽब्रवीत् ।
पार्थस्य चक्षुरुर्वश्यां सक्तं विज्ञाय वासवः १ गन्धर्वराज गच्छाद्य प्रहि-
तोऽप्सरसां वराम् । उर्वशीं पुरुषव्याघ्रं सोपतिष्ठतु फाल्गुनम् २ यथा-
र्चितो गृहीतास्त्रो विद्यया मन्नियोगतः । तथा त्वया विधातव्यः स्त्रीषु
सङ्गविशारदः ३ एवमुक्तस्तथेत्युक्त्वा सोऽनुज्ञां प्राप्य वासवात् । गन्धर्व-
राजोऽप्सरसमभ्यगादुर्वशीं वराम् ४ तां दृष्ट्वा विदितो हृष्टः स्वागतेना-
र्चितस्तथा । सुखासीनः सुखासीनां स्मितपूर्वं वचोऽब्रवीत् ५ विदितं तेऽस्तु
सुश्रोणि प्रहितोऽहमिहागतः । त्रिदिवस्यैकराजेन त्वत्प्रसादाभिनन्दिना ६ यस्तु
देवमनुष्येषु प्रख्यातः सहजैर्गुणैः । श्रिया शीलेन रूपेण व्रतेन च दमेन च ७
प्रख्यातो बलवीर्येण संमतः प्रतिभानवान् । वर्चस्वी तेजसा युक्तः क्षमावान्वी-
तमत्सरः ८ साङ्गोपनिषदान्वेदांश्चतुराख्यानपञ्चमान् । योऽधीते गुरुशुश्रूषां
मेधां चाष्टगुणाश्रयाम् ९ ब्रह्मचर्येण दाक्ष्येण प्रसवैर्वयसापि च । एको

वैशंपायन सांगतातः—अर्जुनाची दृष्टि उर्वशीचे ठिकाणीं आसक्त झाली आहे असें समजून इंद्रानें एकांतामध्यें प्रथमतः त्या चित्रसेनाला सांगितलें कीं १ " हे पुरुषश्रेष्ठा गंधर्वराजा, मी पाठविल्यावरून आज तूं अप्सरांमध्यें श्रेष्ठ असलेल्या उर्वशीकडे जा आणि तिनें अर्जुनाकडे जावें (अशी तजवीज ठेव) २ व त्याचप्रमाणें अस्त्रप्राप्ति झालेल्या ह्या अर्जुनाची मानमान्यता होऊन स्त्रियांचा समागम करण्याविषयीं हा प्रवीण होईल अशा रीतीनें माझ्या आज्ञेवरून तूं त्याला गांधर्वविद्या शिकविण्याची तजवीज कर " ३. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां चित्रसेनानें " ठीक आहे " असें ह्मटलें आणि अशी इंद्राची अनुज्ञा झाल्यावर तो गंधर्वराज चित्रसेन त्या उर्वशीनामक श्रेष्ठ अप्सरेकडे गेला ४. तिला अवलोकन केल्याबरोबर तो प्रख्यात गंधर्वराज आनंदित झाला आणि तिनें स्वागतपूर्वक पूजन केल्यावर यथेष्ट बसून यथेष्ट बसलेल्या उर्वशीला हास्यपूर्वक तो ह्मणाला ५ " हे संदरि, तुझें मन प्रसन्न झालें असतां आनंद पावणाऱ्या स्वर्गाधिपति इंद्रानें पाठविल्यावरून मी येथें आलों आहें, हें तुला विदित असूं दे ६. देव आणि मनुष्य ह्यांमध्यें आपल्या स्वाभाविक गुणांनीं प्रख्यात, वैभव, शील, रूप, आचरण आणि इंद्रियदमन ह्यांच्या योगानें ७ विख्यात, बल आणि वीर्य ह्यांमुळें महशूर, समयस्फूर्तीनें युक्त, तेज आणि शौर्य ह्यांच्या योगानें युक्त, क्षमाशील, निर्मत्सर ८, इतिहासपुराणरूप आख्यानांसहवर्तमान चारी वेदांचें अध्ययन करणारा, गुरुशुश्रूषा आणि (श्रवण करण्याची इच्छा, श्रवण, ग्रहण, धारण, शंका, समाधान, अर्थज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्या) आठ गुणांनीं युक्त असलेली बुद्धि ह्यांनीं संपन्न अस-

वै रक्षिता चैव त्रिदिवं मघवानिव १० अकत्थनो मानयिता स्थूललक्ष्यः प्रियंवदः । सुहृदश्चान्नपानेन विविधेनाभिवर्षति ११ सत्यवाक्पूजितो वक्ता रूपवाननहंकृतः । भक्तानुकम्पी कान्तश्च प्रियश्च स्थिरसंगतः १२ प्रार्थनीयैर्गुणगणैर्महेन्द्रवरुणोपमः । विदितस्तेऽर्जुनो वीरः स स्वर्गफलमाप्नुयात् १३ तव शक्राभ्यनुज्ञातः पादावद्य प्रपद्यताम् । तदेवं कुरु कल्याणि प्रपन्नस्त्वां धनञ्जयः १४ एवमुक्त्वा स्मितं कृत्वा संमानं बहु मन्य च । प्रत्युवाचोर्वशी प्रीत्या चित्रसेनमनिन्दिता १५ यस्त्वस्य कथितः सत्यो गुणोद्देशस्त्वया मम । तं श्रुत्वाव्यथयं पुंसो वृणुयां किमतोऽर्जुनम् १६ महेन्द्रस्य नियोगेन त्वत्तः संप्रणयेन च । तस्य चाहं गुणौघेन फाल्गुने जातमन्मथा १७ गच्छ त्वं हि यथाकाममागमिष्याम्यहं सुखम् १८ [१८२८] इति श्री महाभारते शतसाहस्र्यां संहितायां० आरण्यपर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणि चित्रसेनोर्वशीसंवादे पञ्चचत्वारिंशोऽध्यायः ॥४५॥

लेला ९, ब्रह्मचर्य, दक्षता, उत्तम कुल आणि तरुण वय ह्यांनीं युक्त. स्वर्गाचें रक्षण करणाऱ्या इंद्राप्रमाणें ताब्यांतील प्रदेशांचें उत्कृष्ट प्रकारें रक्षण करणारा १०, आत्मप्रशंसा न करणारा, दुसऱ्यांची मानमान्यता ठेवणारा, क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष्य न देणारा (अर्थात् उदार), प्रियवचनी, अनेक प्रकारच्या अन्नपानानें सुहृदांना तृप्त करणारा, ११ सत्यवचनी, लोकमान्य, वक्ता, रूपवान् , अहंकाररहित, भक्तांवर दया करणारा, मनोहर आणि ह्मणूनच प्रेमाला पात्र, मैत्री कायम राखणारा १२ आणि स्पृहणीय गुणसमुदायांनीं युक्त असल्यामुळें इंद्रवरुणांच्या उपमेला योग्य असलेला असा जो वीर अर्जुन तो तुला विदितच आहे. त्याला (त्वत्समागमरूप) स्वर्गफल प्राप्त होऊं दे १३. सारांश, इंद्राच्या अनुज्ञेनें आज तुझे चरण त्याला प्राप्त होऊं दे. हे कल्याणि, तूं ह्याप्रमाणें करच. अर्जुन तुला शरण आला आहे " १४. ह्याप्रमाणें गंधर्वराज चित्रसेनानें सांगितलें असतां हास्य करून व अर्जुनानें आपणाला बहुमान दिला असें समजून जिला कोठेंही नांव ठेवण्यास जागा नाहीं अशी ती उर्वशी संतुष्ट होऊन त्याला ह्मणाली १५. (हे गंधर्वराजा) हे जे तूं अर्जुनाचे खरेखरे गुण संक्षिप्त रीतीनें मला कथन केलेस ते श्रवण करितांक्षणीं अर्जुनालाच वरावें कीं काय असें मला झालें असून मी इतर पुरुषांना तुच्छ करून बसलें आहें १६. सारांश, इंद्राच्या आज्ञेमुळें, तुझ्या प्रार्थनेमुळें आणि त्याचे ठिकाणीं असलेल्या ह्या गुणसमुदायांमुळें अर्जुनाविषयीं मला कामवासना उत्पन्न झाली आहे. ह्याकरितां, तूं खुशाल जा; मी आनंदानें अर्जुनाकडे येईन १७. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं

वैशम्पायन उवाच ॥ ततो विसृज्य गन्धर्वं कृतकृत्यं शुचिस्मिता । उर्वशी चाकरोत्स्नानं पार्थप्रार्थनलालसा १ स्नानालङ्करणैर्हृद्यैर्गन्धमाल्यैश्च सुप्रभैः । धनञ्जयस्य रूपेण शरैर्मन्मथचोदितैः २ अतिविद्धेन मनसा मन्मथेन प्रदीपिता । दिव्यास्तरणसंस्तीर्णे विस्तीर्णे शयनोत्तमे ३ चित्तसङ्कल्पभावेन स्वचित्तानन्यमानसा । मनोरथेन संप्राप्तं रमन्त्येनं हि फाल्गुनम् ४ निर्गम्य चन्द्रोदयने विगाढे रजनीमुखे । प्रस्थिता सा पृथुश्रोणी पार्थस्य भवनं प्रति ५ मृदुकुञ्चितदीर्घेण कुसुमोत्करधारिणा । केशहस्तेन ललना जगामाथ विराजती ६ भ्रूक्षेपालापमाधुर्यैः कान्त्या सौम्यतयापि च । शशिनं वक्त्रचन्द्रेण माह्वयन्तीव गच्छति ७ दिव्याङ्गरागौ सुमुखौ दिव्यचन्दनरूषितौ । गच्छन्त्या हारविरुचौ स्तनौ तस्या ववल्गतुः ८ स्तनोद्वहनसंक्षोभान्नम्यमाना पदे पदे । त्रिवलीदामचित्रेण मध्येनातीव

चित्रसेन आणि उर्वशी ह्यांच्या संवादाविषयीं पंचेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४५ ॥

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें कृतकृत्य झालेल्या त्या गंधर्वाला जाण्याची अनुज्ञा दिल्यानंतर (समागमाकरितां) अर्जुनाची प्रार्थना करण्याविषयीं अंतःकरणामध्यें उत्सुकता उत्पन्न झालेल्या सुहास्यवदना उर्वशीनें स्नान केलें १. स्नानानंतर धारण केलेलीं मनोहर भूषणें, सतेज गंधपुष्पें, अर्जुनाचें सौंदर्य व मदनानें सोडिलेले बाण २ ह्यांच्या योगानें मनामध्यें अतिशय विव्हल होऊन उर्वशी कामानें अगदीं प्रदीप्त झाली आणि मदनाचा उद्भव झाल्यामुळें दुसऱ्या कशाचेंही स्मरण न होतां केवल अर्जुनाकडेच चित्त लावून राहिलेली ती उर्वशी उत्कृष्ट पलंगपोस वगैरे ज्यावर अंथरले आहेत अशा भव्य आणि उत्तम शय्येवर प्राप्त झालेल्या अर्जुनाशीं आपण रममाण होत आहांत अशी कल्पना करूं लागली ३,४. नंतर चांगली रात्र पडून चंद्रोदय झाल्यावर विस्तृत कटितटानें युक्त असलेली ती उर्वशी आपल्या मंदिरांतून निघून अर्जुनाच्या वसतिस्थानाकडे चालली ५. ती अप्सरा चालली असतां कमलसमुदाय ज्यामध्यें गुंफिला आहे अशा मृदु, कुंचित आणि दीर्घ केशपाशाच्या योगानें झळकत होती ६ आणि भ्रूविक्षेप, आलाप, माधुर्य आणि सौम्यता ह्यांनीं संपन्न असलेल्या आपल्या मुखचंद्राच्या योगानें आकाशस्थ चंद्राला आह्वान करण्याकरितांच जात आहे कीं काय अशी ती दिसत होती ७. उत्कृष्ट उटीनें युक्त, दिव्य चंदनानें चर्चित, वर पडलेल्या हाराच्या योगानें मनोहर व उत्कृष्ट मुखांनीं युक्त असे तिचे स्तन ती गमन करीत असतांना इकडे तिकडे जसें कांहीं नृत्यच करीत होते ८. उदरावर असलेल्या त्रिवलिरूप हाराच्या योगानें मनोहर दिसत असलेल्या मध्यभा-

शोभिता ९ अधोभूधरविस्तीर्णं नितम्बोन्नतपीवरम्। मन्मथायतनं शुभ्रं रसनादामभूषितम् १० ऋषीणामपि दिव्यानां मनोव्याघातकारणम्। सूक्ष्मवस्त्रधरं रेजे जघनं निरवद्यया ११ गूढगुल्फधरौ पादौ ताम्रायततलाङ्गुली। कूर्मपृष्ठोन्नतौ चापि शोभेते किङ्किणीकिणौ १२ सीधुपानेन चाल्पेन तुष्ट्याथ मदनेन च। विलासनैश्च विविधैः प्रेक्षणीयतराभवत् १३ सिद्धचारणगन्धर्वैः सा प्रयाता विलासिनी। बह्वाश्चर्येऽपि वै स्वर्गे दर्शनीयतमाकृतिः १४ सुसूक्ष्मेणोत्तरीयेण मेघवर्णेन राजता। तनुरभ्रावृता व्योम्नि चन्द्रलेखेव गच्छती १५ ततः प्राप्ता क्षणेनैव मनःपवनगामिनी। भवनं पाण्डुपुत्रस्य फाल्गुनस्य शुचिस्मिता १६ तत्र द्वारमनुप्राप्ता द्वारस्थैश्च निवेदिता। अर्जुनस्य नरश्रेष्ठ उर्वशी शुभलोचना १७ उपातिष्ठत तद्वेश्म

माने अत्यंत शोभा पावत असलेली ती उर्वशी आपल्या भारभूत स्तनांच्या क्षोभामुळें पदोपदीं नम्र होत होती ९. पर्वताच्या अधःप्रदेशाप्रमाणें विस्तीर्ण, उन्नत आणि पुष्ट अशा नितंबांनीं युक्त, मदनाचें केवल वसतिस्थान, शुभ्रवर्णानें संपन्न, रशनारूप हारानें विभूषित १०, दिव्य मुनींच्याही मनाला विक्षेप होण्याचें कारण आणि सूक्ष्म वस्त्र धारण करणारा असा (सौंदर्यासंबधानें) कोठेंही नाव ठेवण्यास जागा नसलेल्या त्या अप्सरेचा जघनप्रदेश जसा कांहीं चमकत होता ११. तिचे पाय मांसल असल्यामुळें तेथील घोटे दिसत नव्हते; त्यांचे तळवे व बोटें हीं तांबूसवर्णाचीं असून लांबट होतीं; कांसवाच्या पाठीप्रमाणें ते उंच होते; तोरड्यांचा झुणझुण शब्द त्यांच्यांतून येत होता आणि ह्यामुळें ते फार शोभत होते १२. किंचित् मद्यपान, मनाची प्रसन्नता, मदन आणि नानाप्रकारचे हावभाव ह्यांच्या योगानें ती फारच मनोहर दिसत होती १३. सारांश, स्वर्गामध्यें आश्चर्यकारक प्रकार जरी पुष्कळ आहेत तरी अर्जुनाकडे निघालेल्या त्या विलासिनी उर्वशीचें स्वरूप सिद्ध, चारण व गंधर्व ह्यांनाही अत्यत प्रेक्षणीय दिसलें १४. कारण, फारच बारिक आणि मेघासारिख्या श्यामवर्णानें युक्त असा झळकत असलेला शेला तिनें पांघरला असल्यामुळें मेघानें आच्छादित झालेली चंद्रलेखाच आकाशामधून जात आहे कीं काय अशी ती दिसत होती १५. असो. आपल्या मंदिरांतून निघाल्यानंतर मन आणि वायु ह्यांप्रमाणें शीघ्र गमन करणारी ती सुहास्यवदना उर्वशी एका क्षणामध्यें पांडुपुत्र अर्जुनाच्या वसतिस्थानाला गेली १६. हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, दाराशीं गेल्यानंतर द्वारपालानें ती सुलोचना उर्वशी प्राप्त झाल्याचें अर्जुनाला निवेदन केलें १७ व तदनंतर

रशना = कमरपट्टा.

निर्मलं सुमनोहरम् । स शङ्कितमना राजन्प्रत्युद्गच्छत तां निशि १८
दृष्ट्वैव चोर्वशीं पार्थो लज्जासंवृतलोचनः । तदाभिवादनं कृत्वा गुरुपूजां
प्रयुक्तवान् १९ अर्जुन उवाच ॥ अभिवादये त्वां शिरसा प्रवराप्सरसां
वरे । किमाज्ञापयसे देवि प्रेष्यस्तेहमुपस्थितः २० फाल्गुनस्य
वचः श्रुत्वा गतसंज्ञा तदोर्वशी । गन्धर्ववचनं सर्वं श्रावयामास तं
तदा २१ उर्वश्युवाच ॥ यथा मे चित्रसेनेन कथितं मनुजोत्तम । तत्तेहं
संप्रवक्ष्यामि यथा चाहमिहागता २२ उपस्थाने महेन्द्रस्य वर्तमाने
मनोरमे । तवागमनतो वृत्ते स्वर्गस्य परमोत्सवे २३ रुद्राणां चैव सांनि-
ध्यमादित्यानां च सर्वशः । समागमेऽश्विनोश्चैव वसूनां च नरोत्तम २४
महर्षीणां च संघेषु राजर्षिप्रवरेषु च । सिद्धचारणयक्षेषु महोरगगणेषु
च २५ उपविष्टेषु सर्वेषु स्थानमानप्रभावतः । ऋद्ध्या प्रज्वलमानेषु
अग्निसोमार्कवर्ष्मसु २६ वीणासु वाद्यमानासु गन्धर्वैः शक्रनन्दन । दिव्ये
मनोरमे गेये प्रवृत्ते पृथुलोचन २७ सर्वाप्सरःसु मुख्यासु प्रनृत्तासु कुरू-
द्वह । त्वं किलानिमिषः पार्थ मामेकां तत्र दृष्टवान् २८ तत्र चावभृथे

फारच मनोहर आणि निर्मल अशा त्या गृहामध्यें उर्वशी प्राप्त झाली तेव्हां, हे जन-
मेजय राजा, मनामध्यें शंकित होऊन अर्जुन रात्रीं त्या उर्वशीला सामोरा गेला १८
आणि तिला अवलोकन करितांक्षणीं लज्जेनें डोळे मिटून अभिवंदनपूर्वक गुरूप्रमाणें तो
तिचा सत्कार करूं लागला १९ आणि ह्मणाला "हे उत्कृष्ट अप्सरांमध्यें श्रेष्ठ, मी
तुला मस्तकानें प्रणाम करितों; हे देवि, तुझी काय आज्ञा आहे ती सांग. ती शिरसा
मान्य करण्यास हा मी दास सिद्ध आहें २०. ह्याप्रमाणें अर्जुनाचें भाषण श्रवण केल्या-
बरोबर उर्वशीला कांहीं सुचेनासें झालें आणि तिनें लगेंच गंधर्वाचें बोलणें अर्जुनाला
सर्व कथन केलें २१. उर्वशी ह्मणते:—" हे पुरुषश्रेष्ठा, चित्रसेनगंधर्वानें मला काय
सांगितलें आणि मी येथें कां आलें हें मी तुला कथन करितें २२. तुझ्या आगमनामुळें
इंद्राच्या मनोहर गृहामध्यें स्वर्गाचा महोत्साह चालला असतांना २३, रुद्र, आदित्य,
अश्विनीकुमार आणि वसु हे, हे पुरुषश्रेष्ठा, तेथें जमले असतांना २४, कांतीनें देदी-
प्यमान आणि ह्मणूनच अग्नि, चंद्र आणि सूर्य ह्यांप्रमाणें तेजःपुंज शरीरानें युक्त असे
महर्षींचे समुदाय, श्रेष्ठ राजर्षि, सिद्ध, चारण व यक्ष आणि महोरगसमुदाय, हे सर्व
आपलें स्थान, योग्यता आणि प्रभा ह्यांना अनुसरून तेथें बसले असतांना २५,२६,
हे विशालनयना इंद्रपुत्रा, वीणाप्रभृति वाद्यें वाजूं लागून गंधर्वांनीं मनोहर असें दिव्य
गायन सुरू केलें असतांना २७ आणि त्याचप्रमाणें मुख्य मुख्य सर्व अप्सरा नृत्य

तस्मिन्नुपस्थाने दिवौकसाम् । तव पित्राभ्यनुज्ञाता गताः स्वं स्वं गृहं सुराः २९ तथैवाप्सरसः सर्वा विशिष्टाः स्वगृहं गताः । अपि चान्याश्च शत्रुघ्न तव पित्रा विसर्जिताः ३० ततः शक्रेण संदिष्टश्चित्रसेनो ममान्तिकम् । प्राप्तः कमलपत्राक्ष स च मामब्रवीदथ ३१ त्वत्कृतेहं सुरेशेन प्रेषितो वरवर्णिनि । प्रियं कुरु महेन्द्रस्य मम चैवात्मनश्च ह ३२ शक्रतुल्यं रणे शूरं सदौदार्यगुणान्वितम् । पार्थं प्रार्थय सुश्रोणि त्वमित्येवं तदाब्रवीत् ३३ ततोहं समनुज्ञाता तेन पित्रा च तेनघ । तवान्तिकमनुप्राप्ता शुश्रूषितुमरिन्दम ३४ त्वद्गुणाकृष्टचित्ताहमनङ्गवशमागता । चिराभिलषितो वीर ममाप्येष मनोरथः ३५ वैशम्पायन उवाच ॥ तां तथा ब्रुवतीं श्रुत्वा भृशं लज्जावृतोर्जुनः । उवाच कर्णौ हस्ताभ्यां पिधाय त्रिदशालये ३६ दुःश्रुतं मेस्तु सुभगे यन्मां वदसि भाविनि । गुरुदारैः समाना मे निश्चयेन वरानने ३७ यथा कुन्ती महाभागा यथे-

---

करूं लागल्या असतांना, हे कुरुवंशजश्रेष्ठा कुंतीपुत्रा, माझ्या एकटीकडेसच खरोखर तुझें एकसारिखें लक्ष्य लागून राहिलें होतें २८. पुढें त्या ठिकाणीं स्वर्गातील तो महोत्साह समाप्त झाल्यावर तुझ्या पित्याची अनुज्ञा घेऊन देव आपआपल्या घरीं गेले २९; त्याचप्रमाणें सर्व मुख्य मुख्य अप्सराही आपआपल्या घरीं गेल्या आणि, हे शत्रुनाशका, इतरही अप्सरांना तुझ्या पित्यानें जाण्याची अनुज्ञा दिली ३०. तदनंतर, हे कमलनयना, इंद्रानें पाठविल्यावरून चित्रसेन माझ्याकडे आला आणि मला ह्मणाला ३१ " हे सुंदरि, तुझ्याकरितां इंद्रानें मला पाठविलें आहे. ह्यास्तव, महेंद्राचें, माझें आणि स्वतःचें तूं प्रिय कर ३२. सारांश, हे सुंदरि, संग्रामामध्यें इंद्रासारिखा शूर आणि औदार्यगुणानें नित्य संपन्न अशा कुंतीपुत्र अर्जुनाची (समागम करण्याविषयीं) तूं प्रार्थना कर असें मला चित्रसेनगंधर्वानें सांगितलें ३३. ह्मणून, हे निष्पापा, शत्रुदमना, त्या चित्रसेन गंधर्वाच्या अनुज्ञेनें आणि तुझ्या पित्याच्याही अनुज्ञेनें मी सेवा करण्याकरितां तुझ्या संनिध आलें आहें ३४. कारण, तुझ्या गुणांनीं माझें मन तुझ्याकडे ओढून नेलें असून मी अगदीं मदनाधीन झालें आहें आणि ह्मणूनच, हे वीरा, (तुझा समागम करण्याविषयीं) हा माझा फार दिवसांपासून मनोरथ आहे ३५. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें भाषण करणाऱ्या उर्वशीचें बोलणें ऐकून घेऊन अर्जुन अत्यंत लज्जित झाला आणि कानावर हात ठेवून स्वर्गामध्यें तिला ह्मणाला ३६ " हे भाग्यवति बाई, ज्याअर्थी तूं अशा प्रकारचा आरोप मजवर करीत आहेस त्याअर्थी आजपर्यंत झालेलें माझें सगळें श्रवण व्यर्थ होवो. तूं गुरुपत्नीसमान आहेस असें मला

न्द्राणी शची मम । तथा त्वमपि कल्याणी नात्र कार्या विचारणा ३८ यच्चेक्षितासि विस्पष्टं विशेषेण मया शुभे । तच्च कारणपूर्वं हि शृणु सत्यं शुचिस्मिते ३९ इयं पौरववंशस्य जननी मुदितेति ह । त्वामहं दृष्टवांस्तत्र विज्ञायोत्फुल्ललोचनः ४० न मामर्हसि कल्याणि अन्यथा ध्यातुमप्सरः । गुरोर्गुरुतरा मे त्वं मम त्वं वंशवर्धिनी ४१ उर्वश्युवाच ॥ अनावृताश्च सर्वाः स्म देवराजाभिनन्दन । गुरुस्थाने न मां वीर नियोक्तुं त्वमिहार्हसि ४२ पूरोर्वंशे हि ये पुत्रा नप्तारो वा त्विहागताः । तपसा रमयन्त्यस्मान्न च तेषां व्यतिक्रमः ४३ तत्प्रसीद न मामार्तां विसर्जयितुमर्हसि । हृच्छयेन च संतप्तां भक्तां च भज मानद ४४ अर्जुन उवाच ॥ शृणु सत्यं वरारोहे यत्त्वां वक्ष्याम्यनिन्दिते । शृण्वन्तु मे दिशश्चैव विदिशश्च सदेवताः ४५ यथा कुन्ती च माद्री च शची चैव ममानघे । तथा च वंशजननी त्वं हि मेऽद्य गरीयसी ४६ गच्छ मूर्ध्ना प्रपन्नोस्मि पादौ ते वरवर्णिनि । त्वं हि मे मातृवत्पूज्या रक्ष्योहं पुत्रवत्त्वया ४७ वैशम्पायन

निःसंशय वाटत आहे ३७ ह्मणजे, हे कल्याणि, कुंतीप्रमाणें अथवा इंद्रपत्नी शचीप्रमाणेच तूं मला आहेस ह्याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं ३८. आतां, हे सुहास्यवदने, हे कल्याणि, विशेषेंकरून उघडपणे मी तुझ्याकडे कां पहात होतों तें तूं हेतुपूर्वक खरें खरें श्रवण कर ३९. " ही पौरववंशाची जननी आनंदित झालेली आहे " असें समजल्यावरून मी आपले डोळे उघडून तुझ्याकडे पहात होतों ४०. ह्यास्तव, हे कल्याणि अप्सरे, तूं माझ्याविषयीं भलतीच कल्पना करूं नकोस. तूं माझ्या वंशाची जननी असल्यामुळें मला मातेपेक्षांही पूज्य आहेस " ४१. उर्वशी ह्मणते:—हे इंद्रनंदना वीरा, आह्मी सर्व अप्सरा अप्रतिबद्ध आहोंत. करितां, मातृस्थानीं ह्या ठिकाणीं माझी योजना करणें तुला योग्य नाहीं ४२. अरे, पूरूच्या वंशांतील जे पुत्राचे वंशज अथवा कन्येचे वंशज तपश्चर्येच्या योगानें येथें आले आहेत ते आमच्याशीं रममाण होत असतात; परंतु, असें केल्यानें त्यांच्या हातून मर्यादेचें अतिक्रमण होत नाहीं ४३. तस्मात्, तूं कृपा कर आणि मदनानें विह्वल झालेल्या माझा त्याग करूं नकोस. हे मान्य अर्जुना, मदनानें संतप्त आणि तुझ्याविषयीं अनुरक्त अशा माझा स्वीकार कर ४४. अर्जुन ह्मणतो:—हे सौंदर्यसंपन्न निर्दोष स्त्रिये, मी जी तुला खरी गोष्ट सांगत आहें ती तूं श्रवण कर आणि देवतांसहवर्तमान दिशा व उपदिशाही ती श्रवण करोत ४५. हे निष्पापे, कुंती, माद्री आणि शची ह्या ज्याप्रमाणें मला पूज्य आहेत त्याचप्रमाणें तूं वंशमाता मला अतिशय पूज्य आहेस ४६. हे सौंदर्यसंपन्न बाई, तूं जा. मी तुझ्या

उवाच॥ एवमुक्ता तु पार्थेन उर्वशी क्रोधमूर्च्छिता। वेपन्ती भ्रुकुटीवक्रा शशाप धनञ्जयम् ४८ उर्वश्युवाच॥ तव पित्राभ्यनुज्ञातां स्वयं च गृहमागताम्। यस्मान्मां नाभिनन्देथाः कामबाणवशंगताम् ४९ तस्मात्त्वं नर्तनः पार्थ स्त्रीमध्ये मानवर्जितः। अपुमानिति विख्यातः षण्ढवद्विचरिष्यसि ५० एवं दत्वार्जुने शापं स्फुरदोष्ठी श्वसन्त्यथ। पुनः प्रत्यागता क्षिप्रमुर्वशी गृहमात्मनः ५१ ततोऽर्जुनस्त्वरमाणश्चित्रसेनमरिन्दमः। संप्राप्य रजनीवृत्तं तदुर्वश्या यथा तथा। निवेदयामास तदा चित्रसेनाय पाण्डवः ५२ तत्र चैवं यथावृत्तं शापं चैव पुनः पुनः। अवेदयच्च शक्रस्य चित्रसेनोऽपि सर्वशः ५३ तत आनाय्य तनयं विविक्ते हरिवाहनः। सान्त्वयित्वा शुभैर्वाक्यैः स्मयमानोऽभ्यभाषत ५४ सुपुत्राद्य पृथा तात त्वया पुत्रेण सत्तम। ऋषयोऽपि हि धैर्येण जिता वै ते महाभुज ५५ यत्तु दत्तवती शापमुर्वशी तव मानद। स चापि तेऽर्थकृत्तात साधकश्च भविष्यति ५६ अज्ञातवासो

चरणांवर मस्तक ठेवितो. तूं मला मातेप्रमाणें पूज्य असून तुलाही माझें पुत्राप्रमाणें रक्षण करणें योग्य आहे ४७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें अर्जुनानें सांगितलें असतां उर्वशी क्रोधानें अगदीं व्याप्त झाली आणि भिंवया चढवून कांपत कांपत तिनें अर्जुनाला शाप दिला ४८. उर्वशी ह्मणतेः—तुझ्या पित्यानें मला आज्ञा केली असतां, मी आपण होऊन तुझ्या जवळ चालून आलें असतां आणि त्यांतनही मी मदनबाणांच्या अधीन झालें असतां ज्याअर्थीं तूं माझें अभिनंदन करीत नाहींस ४९ त्याअर्थीं, हे कुंतीपुत्रा, तूं स्त्रियांमध्यें मानरहित असा नाचणारा होशील आणि पुरुषत्व नसल्याबद्दल प्रसिद्ध होऊन तूं षंढाप्रमाणे संचार करिशील ५०. जिचे ओंठ क्रोधानें स्फुरण पावत आहेत अशी ती उर्वशी ह्याप्रमाणें अर्जुनाला शाप देऊन क्रोधाचे सुस्कारे टाकीत टाकीत आपल्या घरी सत्वर परत आली ५१. तदनंतर शत्रुदमन अर्जुन त्वरा करून चित्रसेनाकडे गेला आणि रात्रीं घडलेलें तें उर्वशीचें वर्तन जसें झालें तसें त्या पांडुपुत्रानें चित्रसेनाला निवेदन केलें ५२. ह्याप्रमाणें रात्रीं त्या ठिकाणीं घडलेली सर्व हकीकत व उर्वशीचा शाप हीं पुन्हां पुन्हां अर्जुनानें चित्रसेनाला सांगितली असतां चित्रसेनानेंही तें सर्व इंद्राला निवेदन केलें ५३. तेव्हां आपल्या पुत्राला एकांतस्थलीं आणवून आणि शुभ शब्दांनीं त्याचें सांत्वन करून इंद्र हंसत हंसत त्याला ह्मणाला ५४ " बा सज्जनश्रेष्ठा, तुज पुत्राच्या योगानें आज कुंती उत्तमपुत्रवती झाली. हे महापराक्रमी अर्जुना, धैर्यानें तूं ऋषींनाही जिंकिलें आहेस ५५. बा मानीपुत्रा, उर्वशीनें तुला जो शाप दिला तोही तुझ्या उपयोगीं पडणार असून कार्यसाधक होईल ५६. हे

वस्तव्यो भवद्भिर्भूतलेनघ । वर्षे त्रयोदशे वीर तं तत्र क्षपयिष्यसि ५७
तेन नर्तनवेषेण अपुंस्त्वेन तथैव च । वर्षमेकं विहृत्यैव ततः पुंस्त्वमवा-
प्स्यसि ५८ एवमुक्तस्तु शक्रेण फाल्गुनः परवीरहा । मुदं परमिकां लेभे
न च शापं व्यचिन्तयत् ५९ चित्रसेनेन सहितो गन्धर्वेण यशस्विना ।
रेमे स स्वर्गभवने पाण्डुपुत्रो धनञ्जयः ६० इदं यः शृणुयाद्वृत्तं नित्यं
पाण्डुसुतस्य वै । न तस्य कामः कामेषु पापकेषु प्रवर्तते ६१ इदममर-
वरात्मजस्य घोरं शुचि चरितं विनिशम्य फाल्गुनस्य । व्यपगतमददम्भ-
रागदोषास्त्रिदिवगताभिरमन्ति मानवेन्द्राः ६२ [१८९०] इति श्रीमहा-
भारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणीन्द्रलोकाभि-
गमनपर्वण्युर्वशीशापो नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ कदाचिदटमानस्तु महर्षिरुत लोमशः । जगाम
शक्रभवनं पुरन्दरदिदृक्षया १ स समेत्य नमस्कृत्य देवराजं महामुनिः ।
ददर्शार्धासनगतं पाण्डवं वासवस्य हि २ ततः शक्राभ्यनुज्ञात आसने
विष्टरोत्तरे । निषसाद द्विजश्रेष्ठः पूज्यमानो महर्षिभिः ३ तस्य दृष्ट्वा-

निष्पापा, तेराव्या वर्षी तुह्मांला अज्ञातवास कर्तव्य आहे. ह्यास्तव, हे वीरा, त्यावेळीं तो शाप तूं भोगून टाकशील ५७. सारांश, उर्वशीनें सांगितल्याप्रमाणें नर्तकवेष आणि नपुंसकत्व ह्यांनीं युक्त होऊन तूं एक वर्षपर्यंत राहशील आणि नंतर तुला पुरुषत्व प्राप्त होईल" ५८. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां त्या शत्रुपक्षीयवीरनाशक अर्जुनाला पराकाष्ठेचा आनंद होऊन शापाची काळजी नाहींशी झाली ५९ आणि तदनंतर यशस्वी चित्रसेन गंधर्वासहवर्तमान तो पांडुपुत्र अर्जुन स्वर्गामध्यें आनंदांत दिवस घालवूं लागला ६०. हें पांडुपुत्र अर्जुनाचें वृत्त जो नित्य श्रवण करितो त्याचें मन पापवासनांचे ठिकाणीं जात नाहीं ६१. सारांश, इंद्रपुत्र अर्जुनाचें हें दुष्कर व पवित्र चरित्र राजांनीं श्रवण केलें असतां मद, दंभ आणि राग हे दोष नाहींसे होऊन ते स्वर्गास जाऊन आनंदांत राहतात ६२. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं उर्वशीच्या शापाविषयीं शेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४६॥

वैशंपायन सांगतातः—एकदां लोमश महर्षि पर्यटन करितां करितां इंद्राची भेट घेण्याच्या इच्छेनें स्वर्गामध्यें गेले असतां १ देवराज इंद्राची गांठ पडून त्याला नमस्कार केल्यानंतर इंद्राच्या अर्ध्या आसनावर पांडुपुत्र अर्जुन असल्याचें त्या महामुनींनीं अवलोकन केलें २. महर्षि ज्यांचा आदरसत्कार करीत आहेत असे ते द्विजश्रेष्ठ लोमश इंद्रानें अनुज्ञा दिल्यानंतर दर्भास्तरणानें युक्त असलेल्या आसनावर बसले ३.

भवद्बुद्धिः पार्थमिन्द्रासने स्थितम् । कथं नु क्षत्रियः पार्थः शक्रासनमवाप्तवान् ४ किं त्वस्य सुकृतं कर्म के लोका वै विनिर्जिताः । स एवमनुसंप्राप्तः स्थानं देवनमस्कृतम् ५ तस्य विज्ञाय संकल्पं शक्रो वृत्रनिषूदनः । लोमशं प्रहसन्वाक्यमिदमाह शचीपतिः ६ ब्रह्मर्षे श्रूयतां यत्ते मनसैतद्विवक्षितम् । नायं केवलमर्त्यो वै मानुषत्वमुपागतः ७ महर्षे मम पुत्रोयं कुन्त्यां जातो महाभुजः । अस्त्रहेतोरिह प्राप्तः कस्माच्चित्कारणान्तरात् ८ अहो नैनं भवान्वेत्ति पुराणमृषिसत्तमम् । शृणु मे वदतो ब्रह्मन्योयं यच्चास्य कारणम् ९ नरनारायणौ यौ तौ पुराणावृषिसत्तमौ । ताविमावनुजानीहि हृषीकेशधनंजयौ १० विख्यातौ त्रिषु लोकेषु नरनारायणावृषी । कार्यार्थमवतीर्णौ तौ पृथ्वीं पुण्यप्रतिश्रयाम् ११ यन्न शक्यं सुरैर्द्रष्टुमृषिभिर्वा महात्मभिः । तदाश्रमपदं पुण्यं बदरीनाम विश्रुतम् १२ स निवासोभवद्विप्र विष्णोर्जिष्णोस्तथैव च । यतः प्रववृते गङ्गा सिद्धचारणसेविता १३ तौ मन्नियोगाद्ब्रह्मर्षे क्षितौ जातौ महाद्युती ।

तेव्हां, इंद्राच्या आसनावर अर्जुन स्थित असल्याचें अवलोकन करून त्या लोमश महर्षींच्या मनामध्यें आलें कीं " अर्जुन क्षत्रिय असतांना त्याला इंद्राचें आसन कसें प्राप्त झालें ? ४. अहो ज्याअर्थी देवांनाही पूज्य असें स्थान ह्याला ह्याप्रमाणें प्राप्त झालें आहे त्याअर्थी ह्यानें काय तरी पुण्यकर्म केलें आहे आणि ह्यानें कोणते बरे उत्तम लोक संपादन केले आहेत ?" ५. (ह्याप्रमाणें ते लोमशमहर्षि चिंतन करूं लागले असतां) त्यांच्या मनांतील आशय जाणून वृत्रघातक शचीपति इंद्र हंसत हंसत लोमशमहर्षींना ह्मणाले ६ " हे महर्षे, ज्याविषयीं तुझ्या मनांत शंका आली आहे तें हें तूं श्रवण कर. अरे मनुष्ययोनीमध्यें जन्मास आलेला हा अर्जुन केवळ मनुष्य नाहीं ७. हे महर्षे, कुंतीचे ठिकाणीं उत्पन्न झालेला हा माझा पुत्र आहे व कांहीं कारणाकरितां अस्त्रप्राप्तीच्या उद्देशानें हा येथें आला आहे ८. अहो, ह्या पुरातन, श्रेष्ठ ऋषीला आपण ओळखत नाहीं. हे ब्रह्मन् हा कोण आणि हा पृथ्वीवर उत्पन्न होण्याचें कारण काय हें माझ्या मुखांतून श्रवण करा ९. नरनारायण ह्मणून जे पुरातन श्रेष्ठ ऋषि ते हे कृष्णार्जुन आहेत असें आपण समजा १०. अहो, त्रैलोक्यामध्यें विख्यात असलेले जे नरनारायण ऋषि तेच पुण्याच्या आधारानें युक्त असलेल्या पृथ्वीवर कांहीं कार्याकरितां अवतीर्ण झाले आहेत ११. हे विप्र, सिद्धचरणांनीं सेवित अशी गंगा जेथून निघाली आहे आणि देव अथवा महात्मे ऋषि ह्यांना ज्याचें नुसतं दर्शन होणेंही दुर्लभ आहे असें जें बदरी ह्मणून प्रसिद्ध

भूमेर्भारावतरणं महावीर्यौ करिष्यतः १४ उद्वृत्ता ह्यसुराः केचिन्निवात-
कवचा इति । विप्रियेषु स्थितास्माकं वरदानेन मोहिताः १५ तर्कयन्ते
सुरान्हन्तुं बलदर्पसमन्विताः । देवान्न गणयन्त्येते तथा दत्तवरा हि ते १६
पातालवासिनो रौद्रा दनोः पुत्रा महाबलाः । सर्वदेवनिकाया हि नालं
योधयितुं हि तान् १७ योसौ भूमिगतः श्रीमान्विष्णुर्मधुनिषूदनः । कपिलो
नाम देवोसौ भगवानजितो हरिः १८ येन पूर्वं महात्मानः खनमाना रसा-
तलम् । दर्शनादेव निहताः सगरस्यात्मजा विभो १९ तेन कार्यं महत्का-
र्यमस्माकं द्विजसत्तम । पार्थेन च महायुद्धे समेताभ्यां न संशयः २०
सोसुरान्दर्शनादेव शक्तो हन्तुं सहानुगान् । निवातकवचान्सर्वान्नागानिव
महाह्रदे २१ किं तु नाल्पेन कार्येण प्रबोध्यो मधुसूदनः । तेजसः सुम-
हाराशिः प्रबुद्धः प्रदहेज्जगत् २२ अयं तेषां समस्तानां शक्तः प्रतिसमा-
सने । तान्निहत्य रणे शूरः पुनर्यास्यति मानुषान् २३ भवानस्मन्नियो-

---

असलेलें आश्रमस्थान त्या ठिकाणीं कृष्णार्जुनांचें वास्तव्य होतें १२, १३. हे ब्रह्मर्षे, ते पृथ्वीवर उत्पन्न झालेले महातेजस्वी व महावीर्यवान् कृष्णार्जुन माझ्या आज्ञेनें भूभार हरण करतील १४. निवातकवच ह्मणून कोणी दैत्य वरप्रदानामुळें चढून जाऊन दुर्वृत्त झालेले आहेत आणि आह्मांला अप्रिय असेल ते करण्याविषयीं ते तत्पर आहेत १५. बल आणि गर्व ह्यांनीं युक्त असलेले ते असुर देवांचा वध करण्याच्या विचारांत आहेत. कारण, त्यांना वर प्राप्त झाला असल्यामुळें देवांना ते मुळींच जुमानीत नाहींत १६. पातालामध्यें वास्तव्य करणारे दानव महाबलाढ्य व भयंकर आहेत; त्यांच्यांशीं युद्ध करण्यास कोणीही देवगण समर्थ नाहींत १७. सांप्रत जो श्रीमान् मधुसूदन विष्णु कृष्णरूपानें पृथ्वीवर अवतीर्ण झाला आहे तो षड्गुणैश्वर्य संपन्न व अजित असा श्रीहरि कपिलनामक देवच होय १८. ह्या कपिलानें, हे प्रभो, रसातल खणीत असलेल्या महात्म्या सगरपुत्रांचा केवळ अवलोकनानें नाश केला १९. हे द्विजश्रेष्ठ, (कृष्णरूपानें अवतीर्ण झालेला) तो (भगवान् कपिल) आणि कुंतीपुत्र अर्जुन हे महायुद्धामध्यें एकत्र होऊन आमचें मोठें कार्य सिद्धीस नेणार आहेत २०. तो श्रीकृष्ण मोठ्या सरोवरांत जमलेल्या गजांप्रमाणें सर्व निवातकवचांचा अनुयायांसहवर्तमान केवल दर्शनानेंच वध करण्यास समर्थ आहे २१. परंतु, यःकश्चित् कार्याकरितां त्या मधुसूदनाला क्षोभ आणणें योग्य नाहीं. कारण, तो प्रचंड तेजोराशि मधुसूदन क्षुब्ध झाला असतां सर्व जगत् दग्ध करून टाकील २२. हा अर्जुन त्या सर्व निवात कवचांना उडवून देण्यास समर्थ आहे. तस्मात्, संग्रामामध्यें त्यांचा वध करून

गेन यातु तावन्महीतलम् । काम्यके द्रक्ष्यसे वीरं निवसन्तं युधिष्ठिरम् २४
म वाच्यो मम संदेशाद्धर्मात्मा सत्यसंगरः । नोत्कण्ठा फाल्गुने कार्या
कृतास्त्रः शीघ्रमेष्यति २५ नाशुद्धबाहुवीर्येण नाकृतास्त्रेण वा रणे । भीष्म-
द्रोणादयो युद्धे शक्याः प्रतिसमासितुम् २६ गृहीतास्त्रो गुडाकेशो महा-
बाहुर्महामनाः । नृत्यवादित्रगीतानां दिव्यानां पारमीयिवान् २७ भवानपि
विविक्तानि तीर्थानि मनुजेश्वर । भ्रातृभिः सहितः सर्वैर्द्रष्टुमर्हत्यरिन्दम २८
तीर्थेष्वाप्लुत्य पुण्येषु विपाप्मा विगतज्वरः । राज्यं भोक्ष्यसि राजेन्द्र सुखी
विगतकल्मषः २९ भवांश्चैनं द्विजश्रेष्ठ पर्यटन्तं महीतलम् । त्रातुमर्हसि
विप्राग्र्य तपोबलसमन्वितः ३० गिरिदुर्गेषु च सदा देशेषु विषमेषु च ।
वसन्ति राक्षसा रौद्रास्तेभ्यो रक्षां विधास्यति. ३१ एवमुक्ते महेन्द्रेण
बीभत्सुरपि लोमशम् । उवाच प्रयतो वाक्यं रक्षेथाः पाण्डुनन्दनम् ३२
यथा गुप्तस्त्वया राजा चरेत्तीर्थानि सत्तम । दानं दद्याद्यथा चैव तथा

हा शूर अर्जुन पुनरपि मनुष्यांकडे जाईल २३. आपण आमच्या आज्ञेनें तूर्त भूतला-
प्रत जा. ह्मणजे काम्यक वनामध्यें वास्तव्य करणारा वीर युधिष्ठिर आपणांला भेटेल २४.'
त्या धर्मात्म्या सत्यप्रतिज्ञ युधिष्ठिराला असा माझा निरोप सांगा की " अर्जु-
नासंबधानें तुला काळजी करण्याचें कारण नाहीं; तो कृतास्त्र होऊन सत्वर परत
येईल २५. कारण, ज्याचें बाहुवीर्य शुद्ध नाहीं आणि जो अस्त्रांमध्यें पारंगत नाहीं
त्याच्या हातून युद्धामध्यें भीष्मद्रोणादिकांचा पराजय होणें शक्य नाहीं २६.
महापराक्रमी व महाशय अर्जुनाला अस्त्रें प्राप्त झालीं असून स्वर्गसंबंधीं
नृत्य, वाद्य आणि गीत ह्यांमध्येंही तो पारगत झाला आहे २७.
हे शत्रुदमना राजा, तूंही सर्व भ्रात्यांसहवर्तमान पवित्र तीर्थांचें दर्शन घे २८. कारण,
हे राजाधिराजा, पवित्र तीर्थांमध्यें स्नान केलें असतां तूं पाप व कल्मष ह्यांपासून
मुक्त होशील आणि कसलीही चिंता न राहतां सुखी होऊन राज्याचा उपभोग
घेशील २९. ह्याप्रमाणें धर्मराजाला सांगून हे द्विजोत्तमा, हे विप्रश्रेष्ठा, तपःसामर्थ्यानें
युक्त असलेले आपण भूतलावर पर्यटन करणाऱ्या ह्या युधिष्ठिराचें संरक्षण करा ३०.
कारण, पर्वतसंबंधीं गहन प्रदेश आणि इतरही दुर्गम स्थानें ह्या ठिकाणीं घोर राक्षस
वास्तव्य करीत असतात. करितां, त्यांपासून आपण युधिष्ठिराचें रक्षण करा " ३१.
ह्याप्रमाणें महेंद्रानें सांगितल्यावर अर्जुनही लोमशमहर्षींना ह्मणाला " पांडुपुत्र
युधिष्ठिराचें आपण अगदीं तत्पर राहून रक्षण करा ३२. सारांश, हे सज्जनश्रेष्ठ
महामुने, आपण संरक्षण केलें असतां धर्मराजाला तीर्थाटन करून दान देतां येईल.

कुरु महामुने ३३ वैशम्पायन उवाच ॥ तथेति संप्रतिज्ञाय लोमशः सुमहातपाः । काम्यकं वनमुद्दिश्य समुपायान्महीतलम् ३४ ददर्श तत्र कौन्तेयं धर्मराजमरिन्दमम् । तापसैर्भ्रातृभिश्चैव सर्वतः परिवारितम् ३५ [१९२५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणि लोमशगमने सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥

जनमेजय उवाच ॥ अत्यद्भुतमिदं कर्म पार्थस्यामिततेजसः । धृतराष्ट्रो महाप्राज्ञः श्रुत्वा विप्र किमब्रवीत् १ वैशम्पायन उवाच ॥ शक्रलोकगतं पार्थं श्रुत्वा राजाम्बिकासुतः । द्वैपायनादृषिश्रेष्ठात्संजयं वाक्यमब्रवीत् २ धृतराष्ट्र उवाच ॥ श्रुतं मे सूत कार्त्स्न्येन कर्म पार्थस्य धीमतः । कच्चित्तवापि विदितं याथातथ्येन सारथे ३ प्रमत्तो ग्राम्यधर्मेषु मन्दात्मा पापनिश्चयः । मम पुत्रः सुदुर्बुद्धिः पृथिवीं घातयिष्यति ४ यस्य नित्यमृता वाचः स्वैरेष्वपि महात्मनः । त्रैलोक्यमपि तस्य स्याद्योद्धा यस्य धनञ्जयः ५ अस्यतः कर्णिनाराचांस्तीक्ष्णाग्रांश्च शिलाशितान् । कोऽर्जुनस्याग्रतस्तिष्ठेदपि मृत्युर्जरातिगः ६ मम पुत्रा दुरात्मानः सर्वे मृत्युवशानुगाः ।

अशी व्यवस्था करा ३३. वैशंपायन सांगतातः— " ह्यावर ठीक आहे " असें ह्मणून अत्यंत महातपस्वी लोमशमहर्षि काम्यकवनांत जाण्याचा उद्देश धरून भूतलावर आले ३४ आणि त्या ठिकाणीं तापस व भ्रातें ह्यांनीं सर्व बाजूंनी परिवेष्टित असलेल्या शत्रुनाशक कुंतीपुत्र धर्मराजाला अवलोकन केलें ३५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वांपैकीं लोमशमुनींच्या गमनाविषयीं सत्तेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४७ ॥

जनमेजय प्रश्न करितोः—हे विप्र, अत्यंततेजस्वी कुंतीपुत्र अर्जुनाचें हें अतिशय अद्भुत कर्म ऐकून घेऊन महाज्ञानी धृतराष्ट्र काय बरें ह्मणाला ? १. वैशंपायन सांगतातः—ऋषिश्रेष्ठ द्वैपायनांपासून अर्जुन इद्रलोकाप्रत गेल्याचें श्रवण केल्यावर अंबिकापुत्र धृतराष्ट्रराजा संजयाला ह्मणाला २ " बुद्धिमान् अर्जुनाचें कर्म मीं संपूर्णपणें श्रवण केलें आहे व, हे सारथे, तुलाही तें इत्थंभूत माहीत आहे ना ? ३. विषयोपभोगामध्यें चूर झालेला, मंदमति, पापनिश्चयी व अत्यंत दुर्बुद्धि असा माझा पुत्र पृथ्वीचा घात करील ४. विनोदप्रसंगामध्येंही ज्या महात्म्याचे शब्द नेहमीं सत्य असतात आणि धनंजय हा ज्याचा योद्धा आहे त्याला संपूर्ण त्रैलोक्यही प्राप्त होईल ५. अरे, शिळेवर घासलेले आणि ह्मणूनच तीक्ष्ण अग्रांनीं युक्त असे कर्णी व नाराच बाण अर्जुन सोडूं लागला असतां प्रत्यक्ष जरामरणांपासून मुक्त असलेला मृत्यु जरी

येषां युद्धं दुराधर्षैः पाण्डवैः प्रत्युपस्थितम् ७ तथैव च न पश्यामि युधि गाण्डीवधन्वनः । अनिशं चिन्तयानोपि य एनमुदियाद्रथी ८ द्रोणकर्णौ प्रतीयातां यदि भीष्मोपि वारणे । महान्स्यात्संशयो लोके तत्र पश्यामि नो जयम् ९ घृणी कर्णः प्रमादी च आचार्यः स्थविरो गुरुः । अमर्षी बलवान्पार्थः संरम्भी दृढविक्रमः १० भवेत्तुमुलं युद्धं सर्वशोप्यपराजितम् । सर्वे ह्यस्त्रविदः शूराः सर्वे प्राप्ता महद्यशः ११ अपि सर्वेश्वरत्वं हि ते वाञ्छन्त्यपराजिताः । वधे नूनं भवेच्छान्तिरेतेषां फाल्गुनस्य वा १२ न तु हन्तार्जुनस्यास्ति जेता वास्य न विद्यते । मन्युस्तस्य कथं शाम्येन्मां चैव प्रतिसंहितः १३ त्रिदशेशसमो वीरः खाण्डवेऽग्निमतर्पयत् । जिगाय

झाला तरी त्याच्या समोर कोण बरं टिकणार आहे ? ६. सारांश, अत्यंत अजिंक्य अशा पांडवांशीं ज्यांचें युद्ध उपस्थित झालें आहे ते माझे सर्वही दुरात्मे पुत्र मृत्यूच्या तावडींत सांपडलेले आहेत ७. असो. ज्याप्रमाणें अर्जुनासमोर टिकणारा कोणी नाहीं त्याचप्रमाणें युद्धामध्यें तो गांडीवधनुर्धारी अर्जुन उभा राहिला असतां एकसारिखा त्याचा पाडाव करण्याचा विचार करणाराही कोणी रथी युद्धामध्ये त्याच्या पुढें जाणारा मला दिसत नाहीं ८. फार कशाला ? द्रोण आणि कर्ण ह्या उभयतांनीं मिळून जरी अर्जुनापुढें जाण्याचें मनामध्यें आणिलें आणि प्रत्यक्ष भीष्म जरी अर्जुनाचें निवारण करण्यास सिद्ध झाले तरी लोकांमध्यें आह्मांला जय प्राप्त होण्याविषयीं मोठा संशयच उत्पन्न होईल. सारांश, अशा प्रसंगीही जय येईल असें मला वाटत नाहीं ९. कारण, कर्ण दयाळू असून बेसावधपणानें वागणारा आहे व द्रोणाचार्य वृद्ध झाले असून (अर्जुनाचे) गुरु आहेत; परंतु, अर्जुन उद्यमशील, महापराक्रमी, बलाढ्य व असहिष्णु आहे १०. पांडवांशीं तुमुल युद्ध जरी केलें तरी त्यामध्यें त्यांना पराजय कधींही येणार नाहीं. कारण, ते सर्वही शूर व अस्त्रवेत्ते असून (युद्धांत विजयी होण्याविषयीं) सर्वांचाही मोठा लौकिक झालेला आहे ११. पराजय आल्यावांचून ते सार्वभौमत्व प्राप्त होण्याचा उत्साह धरीत आहेत आणि (माझ्या पुत्रांनीं जें त्यांच्याशीं वर्तन केलें आहे त्याचा विचार केला असतां) ह्या पांडवांचें अथवा निदान अर्जुनाचें तरी समाधान कौरवांचा वध झाल्यावरच खरोखर होणारें आहे १२. अरे, अर्जुनाचा वध करणारा तर आज कोणी नाहींच नाहीं. परंतु, नुसता त्याचा पराजय करणाराही कोणी नाहीं. तेव्हां, माझ्या संबंधानें त्याचे ठिकाणीं उद्भवलेला क्रोध शांत व्हावा कसा ? (ह्याचा मला मोठा विचार पडलेला आहे) १३. अरे, ह्या इंद्रतुल्य शूर अर्जुनानें खांडववनामध्यें अग्नीची तृप्ति केली

पार्थिवान्सर्वान्राजसूये महाक्रतौ १४ शेषं कुर्याद्गिरेर्वज्रो निपतन्मूर्ध्नि संजय। न तु कुर्युः शराः शेषं क्षिप्तास्तात किरीटिना १५ यथा हि किरणा भानोस्तपन्तीह चराचरम्। तथा पार्थभुजोत्सृष्टाः शरास्तप्स्यन्ति मत्सुतान् १६ अपि तद्रथघोषेण भयार्ता सव्यसाचिनः। प्रतिभाति विदीर्णेव सर्वतो भारती चमूः १७ यदुद्वमन्प्रवपंश्चैव बाणान्स्थातातताय्यी समरे किरीटी। सृष्टोन्तकः सर्वहरो विधात्रा भवेद्यथा तद्वदपारणीयः १८ [१९४३]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणि धृतराष्ट्रविलापेऽष्टचत्वारिंशोऽध्यायः॥ ४८॥

संजय उवाच॥ यदेतत्कथितं राजंस्त्वया दुर्योधनं प्रति। सर्वमेतद्यथातत्त्वं नैतन्मिथ्या महीपते १ मन्युना हि समाविष्टाः पाण्डवास्ते महौजसः। दृष्ट्वा कृष्णां सभां नीतां धर्मपत्नीं यशस्विनीम् २ दुःशासनस्य ता वाचः श्रुत्वा ते दारुणोदयाः। कर्णस्य च महाराज न स्वप्स्यन्तीति मे मतिः ३ श्रुतं हि मे महाराज यथा पार्थेन संयुगे। एकादशतनुः

आणि राजसूयनामक महाक्रतूच्या प्रसंगीं सर्व राजे ह्याने जिंकिले १४. बा संजया, पर्वताच्या माथ्यावर पडणारें इंद्राचें वज्रही पर्वताचा कांहीं भाग शिल्लक ठेवील; परंतु, अर्जुनानें टाकिलेले बाण कांहीं शिल्लक ठेवितील असें मला वाटत नाहीं १५. ज्याप्रमाणें सूर्याचीं किरणें ह्या विश्वांतील सर्व चराचर तप्त करीत असतात त्याचप्रमाणें अर्जुनाच्या हातांतून सुटलेले बाण माझ्या पुत्रांना तप्त करितील १६. फार कशाला! त्या सव्यसाची अर्जुनाच्या नुसत्या रथाच्या घोषानेंच ही भारती सेना भयभीत होऊन सर्वप्रकारें विदीर्ण झाल्यासारखी भासत आहे १७. सारांश, ज्याअर्थी भात्यांतून बाण काढून एकसारिखे धनुष्याला लावीत लावीत हा शस्त्रपाणि अर्जुन संग्रामामध्यें उभा राहणार त्याअर्थी विधात्यानें हा एक सर्वांचा संहार करणारा अंतकच उत्पन्न केला आहे आणि ह्मणूनच त्याला पराजित करणें अशक्य आहे १८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं धृतराष्ट्रविलापसंबंधीं अठ्ठेचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥ ४८॥

संजय ह्मणतोः—हे भूपते धृतराष्ट्रराजा, दुर्योधनासंबंधानें जें हें तूं सांगितलेंस तें सर्व खरें आहे. हें कांहीं खोटें नव्हे १. आपली यशस्विनी धर्मपत्नी कृष्णा सभेंत ओढून आणिल्याचें अवलोकन केल्यापासून ते महाबलाढ्य पांडव क्रोधानें अगदीं व्याप्त झालेले आहेत २. हे महाराज, ज्यांचा परिणाम फारच भयंकर आहे असे ते दुःशासनाचे व कर्णाचे शब्द श्रवण केल्यावर ते पांडव केवळ झोंपाच घेत पडतील असें

स्थाणुर्धनुषा परितोषितः ४ कैरातं वेषमास्थाय योधयामास फाल्गुनम् । जिज्ञासुः सर्वदेवेशः कपर्दी भगवान्स्वयम् ५ तत्रैनं लोकपालास्ते दर्शयामासुरच्युतम् । अस्त्रहेतोः पराक्रान्तं तपसा कौरवर्षभम् ६ नैतदुत्सहते चान्यो लब्धुमन्यत्र फाल्गुनात् । साक्षाद्दर्शनमेतेषामीश्वराणां नरो भुवि ७ महेश्वरेण यो राजन्न जीर्णो ह्यष्टमूर्तिना । कस्तमुत्सहते वीरो युद्धे जरयितुं पुमान् ८ आसादितमिदं घोरं तुमुलं लोमहर्षणम् । द्रौपदीं परिकर्षद्भिः कोपयद्भिश्च पाण्डवान् ९ यत्र प्रस्फुरमाणोष्ठो भीमः प्राह वचोऽर्थवत् । दृष्ट्वा दुर्योधनेनोरू द्रौपद्या दर्शितावुभौ १० ऊरू भेत्स्यामि ते पाप गदया भीमवेगया । त्रयोदशानां वर्षाणामन्ते दुर्द्यूतदेविनः ११ सर्वे प्रहरतां श्रेष्ठाः सर्वे चामिततेजसः । सर्वे सर्वास्त्रविद्वांसो देवैरपि सुदुर्जयाः १२ मन्ये मन्युसमुद्धूताः पुत्राणां तव संयुगे । अन्तं पार्थाः करिष्यन्ति भार्यामर्षसमन्विताः १३ धृतराष्ट्र उवाच ॥ किं कृतं सूत

मला वाटत नाहीं ३. हे महाराज, अकरा तनु धारण करणाऱ्या रुद्रालाही अर्जुनानें समरांगणामध्यें धनुष्याच्या योगानें (अर्थात् युद्धाच्या योगानें) संतुष्ट केल्याचें मीं ऐकिलें आहे ४. अर्जुनाची योग्यता जाणण्याकरितां भगवान् शंकरांनीं स्वतः वेष धारण करून अर्जुनाशीं युद्ध केलें ५. तेव्हां, अस्त्रप्राप्तीकरितां तपश्चर्या करीत बसलेल्या त्या कुरुवंशजश्रेष्ठ अर्जुनाला लोकपालांनींही दर्शन दिलें ६. खरोखर अर्जुनाशिवाय ह्या ईश्वरांचें प्रत्यक्ष दर्शन होण्याची ह्या पृथ्वीमध्यें दुसऱ्या कोणत्याही पुरुषाला आशा नाहीं ७. हे राजा, प्रत्यक्ष अष्टमूर्ति महेश्वराच्यानेंही संग्रामामध्यें जो जर्जर झाला नाहीं त्या अर्जुनाला युद्धामध्यें जेरीस आणण्याची कोणत्या बरें वीर पुरुषाची छाती होणार आहे ? ८. अरे द्रौपदीला सभेंत ओढून नेऊन पांडवांना कोपविणाऱ्या ह्या माझ्या पुत्रांनीं शरीरावर रोमांच उठण्यासारखें हें भयंकर तुमुल युद्ध उपस्थित केलेलें आहे ९. आणि त्या सभेमध्यें दुर्योधनानें द्रौपदीच्या दोन्ही मांड्या जेव्हां उघड्या करून दाखविल्या तेव्हां, "अरे पाप्या, कपटद्यूतानें आह्मांला जिंकण्याची इच्छा धरणारा जो तूं त्या तुझ्या मांड्या तेरा वर्षें झाल्यावर मी आपल्या भयंकर वेग धारण करणाऱ्या गदेनें फोडून टाकीन " असें जें ओठ स्फुरण पावत असतां भीमसेनानें भाषण केलें आहे तें वायफळ केलेलें नव्हे १०.११. त्या सर्वांचेंही तेज अपरिमित असून सर्वही प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आहेत आणि त्याचप्रमाणें सर्वही सर्व अस्त्रें जाणणारे असून देवांनाही अत्यंत अजिंक्य आहेत १२. वास्तव, आधींच क्रुद्ध झालेले आणि त्यांतून भार्येच्या क्रोधाची भर पडलेले हे कुंतीपुत्र युद्धामध्यें तुझ्या पुत्रांचा नाश करितील

कर्णेन वदता परुषं वचः । पर्याप्तं वैरमेतावद्यत्कृष्णा मा सभां गता १४ अपीदानीं मम सुतास्तिष्ठेरन्मन्दचेतसः । येषां भ्राता गुरुर्ज्येष्ठो विनये नावतिष्ठते १५ ममापि वचनं सूत न शुश्रूषति मन्दभाक् । दृष्ट्वा मां चक्षुषा हीनं निर्विचेष्टमचेतसम् १६ ये चास्य सचिवा मन्दाः कर्णसौबलकादयः । ते तस्य भूयसो दोषान्वर्धयन्ति विचेतसः १७ स्वैरमुक्ता अपि शराः पार्थेनामिततेजसा । निर्दहेयुर्मम सुतान्किं पुनर्मन्युनेरिताः १८ पार्थबाहुबलोत्सृष्टा महाचापविनिःसृताः । दिव्यास्त्रमन्त्रमुदिताः सादयेयुः सुरानपि १९ यस्य मन्त्री च गोप्ता च सुहृच्चैव जनार्दनः । हरिस्त्रैलोक्यनाथः स किं नु तस्य न निर्जितम् २० इदं हि सुमहाचित्रमर्जुनस्येह सञ्जय । महादेवेन बाहुभ्यां यत्समेत इति श्रुतिः २१ प्रत्यक्षं सर्वलोकस्य खाण्डवे यत्कृतं पुरा । फाल्गुनेन सहायार्थे वह्नेर्दामोदरेण च २२ सर्वथा न हि मे पुत्राः सहामात्याः ससौबलाः । क्रुद्धे पार्थे च भीमे च वासुदेवे

असें मला वाटतें १३. धृतराष्ट्र प्रश्न करितोः—हे सारथे संजया, मर्मभेदक भाषण करून कर्णानें काय बरें संपादन केलें ? द्रौपदी सभेमध्यें आली ह्याच्या योगानें पराकाष्ठेचें वैर मात्र संपादन केलेलें मला दिसत आहे १४. अरे, ज्यांचा ज्येष्ठ भ्राता व मानानें गुरु असा दुर्योधन विनयाचें अवलंबन करीत नाहीं ते माझे मंदबुद्धि पुत्र अद्यापि तरी स्वस्थ बसतील काय ? १५. हे सारथे, दृष्टिहीन आणि ह्मणूनच उलाढालींत न पडणाऱ्या मला मूर्ख समजून तो मंदबुद्धि दुर्योधन माझ्याही सांगण्याची परवा करीत नाही १६ आणि कर्ण, शकुनि वगैरे जे ह्याचे मूर्ख मंत्री ते तर अगदींच अविचारी असून ह्याचे दोष अधिकाधिकच वृद्धिंगत करीत असतात १७. अरे, अपरिमिततेजस्वी अर्जुनानें सहज सोडिलेली बाणवृष्टिही माझ्या पुत्रांना दग्ध करून टाकील; मग क्रोधानें सोडिलेल्यांची तर गोष्ट कशाला पाहिजे ? १८. अर्जुनाच्या बाहुबलानें सुटलेले, प्रचंड गांडीव धनुष्यापासून निघालेले आणि दिव्यास्त्रविषयक मंत्रांनीं युक्त झालेले बाण देवांचाही नाश करितील १९. अहो, त्रैलोक्याधिपति जनार्दन श्रीहरि ज्यांचा मंत्री, रक्षक व सखा आहे त्यांना काय बरें अजिंक्य आहे ?२०. हे संजया, महादेवाशीं अर्जुनानें मल्लयुद्ध केल्याचें ऐकण्यांत येत आहे हा तर त्या अर्जुनाविषयीं फारच मोठा आश्चर्याचा प्रकार आहे २१ आणि अग्नीच्या साहाय्यार्थ अर्जुनानें व श्रीकृष्णानें सर्व लोकांसमक्ष खांडववनामध्यें जें केलें तोही तशांतलाच प्रकार आहे २२.सारांश, यादवाधिपति वासुदेव, भीमसेन आणि अर्जुन हे जर क्रुद्ध झाले आहेत तर अमात्य आणि शकुनि ह्यांसहवर्तमान माझ्या पुत्रांचा सर्वस्वीं नायनाट होणारच २३.

च सात्वते २३ [१९६६] इतिश्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके पर्वणी-न्द्रलोकाभिगमनपर्वणि धृतराष्ट्रखेद एकोनपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ॥४९ ॥

जनमेजय उवाच ॥ यदिदं शोचितं राज्ञा धृतराष्ट्रेण वै मुने । प्रव्राज्य पाण्डवान्वीरान्सर्वमेतन्निरर्थकम् १ कथं च राजपुत्रं तमुपेक्षेताल्पचेतसम् । दुर्योधनं पाण्डुपुत्रान्कोपयानं महारथान् २ किमासीत्पाण्डुपुत्राणां वने भोजनमुच्यताम् । वानेयमथवा कृष्टमेतदाख्यातु नो भवान् ३ वैशम्पायन उवाच ॥ वानेयं च मृगांश्चैव शुद्धैर्बाणैर्निपातितान् । ब्राह्मणानां निवेद्याग्रमभुञ्जन्पुरुषर्षभाः ४ तांस्तु शूरान्महेष्वासांस्तदा निवसतो वने । अन्वयुर्ब्राह्मणा राजन्साग्नयोनग्नयस्तथा ५ ब्राह्मणानां सहस्राणि स्नातकानां महात्मनाम् । दश मोक्षविदां तत्र यान्बिभर्ति युधिष्ठिरः ६ रुरून्कृष्णमृगांश्चैव मेध्यांश्चान्यान्वनेचरान् । बाणैरुन्मथ्य विविधैर्ब्राह्मणेभ्यो न्यवेदयत् ७ न तत्र कश्चिद्दुर्वर्णो व्याधितो वापि दृश्यते । कृशो वा दुर्बलो वापि दीनो भीतोपि वा पुनः ८ पुत्रानिव प्रियान्भ्रातॄञ्ज्ञातीनिव महा-

---

ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतातर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं धृतराष्ट्राच्या खेदाविषयीं एकुणपन्नासावा अध्याय समाप्त झाला ॥ ४९ ॥

जनमेजय ह्मणतोः—हे मुने, वीर पांडवांना हाकून दिल्यावर धृतराष्ट्राजानें जो हा शोक केला तो सर्व व्यर्थ आहे १. (कारण, आपल्या पुत्राचें वर्तन जर धृतराष्ट्राला खरोखरीच अभिमत नसतें तर) महारथी पांडवांना अल्पबुद्धि दुर्योधन कोप आणीत असतांना त्या राजपुत्राची त्यानें उपेक्षा कशी केली असती ? २. असो. आतां वनामध्यें पांडवांचें भोजन कशा प्रकारचें असें हें आपण सांगा; ह्मणजे ते अरण्यामध्यें आपोआप उगवणाऱ्या धान्यावर निर्वाह करीत असत किंवा नांगरून पेरलेल्या धान्यावर उपजीविका करीत असत हें आपण मला कथन करा ३. वैशंपायन सांगतातः—वनामध्यें आपोआप उगवलेलें धान्य आणि शुद्ध बाणांनी मारिलेले मृग ह्यांच्यावर, त्यांतला भाग प्रथम ब्राह्मणांना निवेदन करून, ते पुरुषश्रेष्ठ उपजीविका करीत असत ४. ते महाधनुर्धारी शूर पांडव वनामध्यें वास्तव्य करीत असतांना, हे राजा, साग्निक आणि निरग्निक असे ब्राह्मण त्यांच्या बरोबर असत ५. मोक्षवेत्ते व स्नातक असे दहा हजार ब्राह्मण त्या ठिकाणीं होते व युधिष्ठिर राजा त्यांचें पोषण करीत होता ६. रुरु, कृष्णमृग आणि इतरही पवित्र वनचर पशु नानाप्रकारच्या बाणांनीं मारून ते ब्राह्मणांना निवेदन करीत असत ७. कयाहीन, व्याधिग्रस्त, कृश, अशक्त, दीन अथवा भित्रा असा तेथें कोणीही नव्हता ८. कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराज

दगन् । पुपोष कौरवश्रेष्ठो धर्मराजो युधिष्ठिरः ९ पतींश्च द्रौपदी सर्वा-
न्द्विजातींश्च यशस्विनी । मातृवद्भोजयित्वाग्रे शिष्टमाहारयत्तदा १० प्राचीं
राजा दक्षिणां भीमसेनो यमौ प्रतीचीमथ वाप्युदीचीं । धनुर्धरा मांसहेतो-
र्मृगाणां क्षयं चक्रुर्नित्यमेवोपगम्य ११ तथा तेषां वसतां काम्यके वै विही-
नानामर्जुनेनोत्सुकानाम् । पञ्चैव वर्षाणि तथा व्यतीयुरधीयतां जपतां
जुह्वतां च १२ [१९८७]इति श्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके पर्व-
णीन्द्रलोकाभिगमनपर्वणि पार्थाहारकथने पञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५० ॥

वैशम्पायन उवाच॥ तेषां तच्चरितं श्रुत्वा मनुष्यातीतमद्भुतम् । चिन्ता-
शोकपरीतात्मा मन्युनाभिपरिप्लुतः १ दीर्घमुष्णं च निःश्वस्य धृतराष्ट्रो-
म्बिकासुतः । अब्रवीत्सञ्जयं सूतमामन्त्र्य पुरुषर्षभ २ न रात्रौ न दिवा
सूत शान्तिं प्राप्नोमि वै क्षणम् । संचिन्त्य दुर्नयं घोरमतीतं द्यूतजं हि
तत् ३ तेषामसह्यवीर्याणां शौर्यं धैर्यं धृतिं पराम् । अन्योन्यमनुरागं च

युधिष्ठिर भ्रात्यांस प्रियपुत्रांप्रमाणे आणि ज्ञातींचें सहोदरांप्रमाणें पोषण करीत असे ९. सर्व ब्राह्मणांना आणि पतींना मातेप्रमाणें प्रथम (ममतेनें)भोजन घालून यशस्विनी द्रौपदी अवशिष्ट अन्न भक्षण करीत असे १०. धर्मराजा पूर्वदिशेस, भीमसेन दक्षिण दिशेस आणि नकुलसहदेव पश्चिम अथवा उत्तर दिशेस ह्याप्रमाणे जाऊन ते धनुर्धर पांडव मांसप्राप्तीकरितां मृगांचा नित्य वध करीत असत ११. असो. ह्याप्रमाणे अर्जुनरहित आणि ह्मणूनच त्याला भेटण्याविषयीं उत्सुक असे ते पांडव काम्यकवनामध्यें रहात असतांना अध्ययन, जपजाप्य आणि होमहवन ह्यांत त्यांचीं पांचही वर्षे गेलीं १२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणातलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वांपैकीं पांडवांचा आहार कथन करण्याविषयीं पन्नासावा अध्याय समाप्त झाला ॥ ५० ॥

वैशंपायन सांगतात:—त्याचें हें अमानुष व अद्भुत चरित्र श्रवण करून क्रोधानें भरलेला धृतराष्ट्र चिंता आणि शोक ह्यांनीं अगदीं व्याकुल झाला १ व हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, संजय सारथ्याला बोलावून आणिल्यानर दीर्घ आणि उष्ण असा सुस्कारा टाकून अंबिकापुत्र धृतराष्ट्र त्याला ह्मणाला २ " हे सारथे, द्यूतापासून उद्भवणाऱ्या त्या अमर्याद घोर अनर्थाचा विचार मनामध्यें येऊन आणि असह्य वीर्यानें युक्त असलेल्या त्या पांडवांचें शौर्य, धैर्य, पराकाष्ठेचा उल्हास आणि अमानुष असं एकमेकांवर असलेलें त्या भ्रात्यांचं प्रेम मनामध्यें आणिलें असतां रात्रीं अथवा दिवसां माझ्या चित्ताला स्वस्थता कसली ती एक क्षणभर देखील प्राप्त होत नाहीं ३,४. इंद्रासारिखे तेजस्वी, महाभाग्यवान् आणि युद्धामध्यें अजिंक्य असे ते देवकुमार

भ्रातॄणामतिमानुषम् ४ देवपुत्रौ महाभागौ देवराजसमद्युती। नकुलः सह-
देवश्च पाण्डवौ युद्धदुर्मदौ ५ दृढायुधौ दूरपातौ युद्धे च कृतनिश्चयौ।
शीघ्रहस्तौ दृढक्रोधौ नित्ययुक्तौ तरस्विनौ ६ भीमार्जुनौ पुरोधाय यदा
तौ रणमूर्धनि। स्थास्येते सिंहविक्रान्तावश्विनाविव दुःसहौ ७ निःशेषमिह
पश्यामि मम सैन्यस्य सञ्जय। तौ ह्यप्रतिरथौ युद्धे देवपुत्रौ महारथौ ८
द्रौपद्यास्तं परिक्लेशं न क्षंस्येते त्वमर्षिणौ। वृष्णयोऽथ महेष्वासाः पञ्चाला
वा महौजसः ९ युधि सत्याभिसन्धेन वासुदेवेन रक्षिताः। प्रधक्ष्यन्ति रणे
पार्थाः पुत्राणां मम वाहिनीम् १० रामकृष्णप्रणीतानां वृष्णीनां सूतन-
न्दन। न शक्यः सहितुं वेगः सर्वैस्तैरपि संयुगे ११ तेषां मध्ये महेष्वासो
भीमो भीमपराक्रमः। शैक्यया वीरघातिन्या गदया विचरिष्यति १२
तथा गाण्डीवनिर्घोषं विस्फूर्जितमिवाशनेः। गदावेगं च भीमस्य नालं
सोढुं नराधिपाः १३ ततोऽहं सुहृदां वाचो दुर्योधनवशानुगः। स्मरणीयाः

पांडुपुत्र नकुलसहदेव ५ लांबपर्यंत बाण मारण्यामध्ये पटाईत आहेत; त्यांची आयुधें बळकट आहेत; युद्धाविषयीं त्यांचा निश्चय झालेला आहे; हस्तलाघवांतही ते निपुण आहेत; त्यांचा क्रोध फार दिवस राहणारा आहे; ते स्वतः वेगवान् आहेत आणि आपलें कार्य साधण्याविषयीं ते नेहमीं तत्पर राहणार आहेत ६ करितां, अश्विनीकुमारांप्रमाणें दुःसह असलेले ते सिंहतुल्यपराक्रमी नकुलसहदेव भीमार्जुनांना पुढें करून जेव्हां रणांगणाचे अग्रभागीं उभे राहतील ७ तेव्हां, हे संजया, माझ्या सैन्यापैकीं कांहींएक शेष राहणार नाहीं. हा परिणाम ह्या ठिकाणीं मला दिसत आहे. युद्धामध्यें ज्यांना जोड नाहीं असे ते महारथी देवकुमार ८ रागीट असल्या-मुळें द्रौपदीचे ते क्लेश सहन करणार नाहींत आणि त्याचप्रमाणें, महाधनुर्धारी वृष्णि अथवा महाबलाढ्य पांचालही सहन करणार नाहींत ९. सत्यप्रतिज्ञ वासुदेव युद्धामध्यें संरक्षण करीत असतांना ते कुंतीपुत्र संग्रामामध्यें माझ्या पुत्रांच्या सैन्याची राखरां-गोळी करितील १०. हे सूतपुत्रा, त्या माझ्या सर्व पुत्रांना मिळूनही रामकृष्णांच्या हुकमतींत वागणाऱ्या वृष्णींचा वेग युद्धामध्यें सहन होणें शक्य नाहीं ११. त्या पांडवांतील तो महाधनुर्धारी व भयंकरपराक्रमी भीमसेन तर (भूमि विदारण करून पातालांत प्रवेश करील ह्या भीतीनें नेहमीं अंतराळींच) शिंक्यावर असलेली आपली वीरनाशक गदा हातांत घेऊन युद्धामध्यें संचार करूं लागेल १२ आणि विद्युल्लतेच्या गडगडाटाप्रमाणें तो गांडीव धनुष्याचा ध्वनि व भीमाच्या गदेचा वेग सहन कर-ण्यास आह्मांकडील राजे तर समर्थ होणारच नाहींत १३. तेव्हां दुर्योधनाच्या

स्मरिष्यामि मया या न कृताः पुरा १४ सञ्जय उवाच ॥ व्यतिक्रमोयं सुमहांस्त्वया राजन्नुपेक्षितः । समर्थेनापि यन्मोहात्पुत्रस्ते न निवारितः १५ श्रुत्वा हि निर्जितान्द्यूते पाण्डवान्मधुसूदनः । त्वरितः काम्यके पार्थान्समभावयदच्युतः १६ द्रुपदस्य तथा पुत्रा धृष्टद्युम्नपुरोगमाः । विराटो धृष्टकेतुश्च केकयाश्च महारथाः १७ तैश्च यत्कथितं राजन्दृष्ट्वा पार्थान्पराजितान् । चारेण विदितं सर्वं तन्मयावेदितं च ते १८ समागम्य वृतस्तत्र पाण्डवैर्मधुसूदनः । सारथ्ये फाल्गुनस्याजौ तथेत्याह च तान्हरिः १९ अमर्षितो हि कृष्णोपि दृष्ट्वा पार्थांस्तदा गतान् । कृष्णाजिनोत्तरासङ्गानब्रवीच्च युधिष्ठिरम् २० या सा समृद्धिः पार्थानामिन्द्रप्रस्थे बभूव ह । राजसूये मया दृष्टा नृपैरन्यैः सुदुर्लभा २१ यत्र सर्वान्महीपालाञ्छस्त्रतेजोभयार्दितान् । सवङ्गाङ्गान्सपौण्ड्रोड्रान्सचोलद्राविडान्ध्रकान् २२ सागरानूपकांश्चैव ये च प्रान्ताभिवासिनः । सिंहलान्बर्बरान्म्लेच्छान्ये च

सांगण्याप्रमाणें वागून मीं लक्ष्यांत ठेवण्यास योग्य असे जे जे सुहृदांचे शब्द पूर्वी ऐकिले नाहींत त्यांचें मला स्मरण होईल १४. संजय ह्मणतो:—" हे राजा, समर्थ असूनही ज्याअर्थी मोहामुळें तूं आपल्या पुत्राचें निवारण केलें नाहींस त्याअर्थी ह्या फारच मोठ्या अपराधाची तूं उपेक्षा केली आहेस १५. अरे, पांडवांना द्यूतामध्यें जिंकिल्याचें ऐकिल्याबरोबर प्रतिज्ञेपासून कधींही च्युत न होणाऱ्या मधुसूदनानें सत्वर काम्यकवनामध्यें जाऊन त्यांचें सांत्वन केलें १६. धृष्टद्युम्नप्रभृति द्रुपदाचे पुत्र, विराट, धृष्टकेतु आणि महारथी केकय १७ ह्यांनीं पांडव पराजित झाल्याचें अवलोकन केल्यावर जें त्यांना सांगितलें तें, हे राजा, हेरानें तुला सर्व सांगितलें असून मींही विदित केलेंच आहे १८. त्या काम्यकवनांत पांडवांची भेट झाल्यावर पांडवांनीं समरांगणामध्यें अर्जुनाचें सारथ्य करण्याविषयीं मधुसूदनाची प्रार्थना केली आणि "ठीक आहे" ह्मणून त्या श्रीहरीनेंही त्यांना सांगितलें १९; इतकेंच नव्हे परंतु, कृष्णाजिन परिधान केलेल्या पांडवांना आणि विशेषतः युधिष्ठिराला त्या वेळीं वनांत आल्याचें अवलोकन करून श्रीकृष्ण क्रुद्ध होऊन ह्मणाला २० " इंद्रप्रस्थामध्यें राजसूययागसमयीं इतर राजांना अत्यंत दुर्लभ अशी जी पांडवांची संपत्ति मीं अवलोकन केली २१ —ह्मणजे पांडवांच्या शस्त्रतेजानें भयभीत होऊन आलेले अंग, वंग, पौंड्र, उड्र, चोल, द्राविड आणि आंध्र ह्या देशांतील जे सर्व राजे २२, स्वस्थप्रमाणें सागरासमीप असलेल्या उदकमय प्रदेशांत राहणारे, तसेच सीमेवर राहणारे सिंहल, बर्बर, म्लेच्छ व लंकेमध्यें राहणारे असे जे मीं अवलोकन केले २३ तसेंच पश्चिमेकडील राष्ट्रें

लङ्कानिवासिनः २३ पश्चिमानि च राष्ट्राणि शतशः सागरान्तिकान् । पह्लवान्दरदान्सर्वान्किरातान्यवनाञ्छकान् २४ हारहूणांश्च चीनांश्च तुषारान्सैन्धवांस्तथा । जागुडान्रामठान्मुण्डान्स्त्रीराज्यमथ तङ्गणान् २५ केकयान्मालवांश्चैव तथा काश्मीरकानपि । अद्राक्षमहमाहूतान्यज्ञे ते परिवेषकान् २६ सा ते समृद्धिर्यैरात्ता चपला प्रतिसारिणी । आदाय जीवितं तेषामाहरिष्यामि तामहम् २७ रामेण सह कौरव्य भीमार्जुनयमैस्तथा । अक्रूरगदसाम्बैश्च प्रद्युम्नेनाहुकेन च २८ धृष्टद्युम्नेन वीरेण शिशुपालात्मजेन च । दुर्योधनं रणे हत्वा सद्यः कर्णं च भारत ॥ दुःशासनं सौबलेयं यश्चान्यः प्रतियोत्स्यते २९ ततस्त्वं हास्तिनपुरे भ्रातृभिः सहितो वसन् । धार्तराष्ट्रीं श्रियं प्राप्य प्रशाधि पृथिवीमिमाम् ३० अथैनमब्रवीद्राजा तस्मिन्वीरसमागमे । शृण्वत्स्वेतेषु वीरेषु धृष्टद्युम्नमुखेषु च ३१ युधिष्ठिर उवाच ॥ प्रतिगृह्णामि ते वाचामेमां सत्यां जनार्दन । अमित्रान्मे महाबाहो सानुबन्धान्हनिष्यसि ३२ वर्षात्त्रयोदशादूर्ध्वं सत्यं मां कुरु केशव । प्रतिज्ञातो वने वासो राजमध्ये मया ह्ययम् ३३ तद्धर्मराजवचनं

तेथें लोटलेलीं जीं मीं पाहिलीं, समुद्रतीरीं राहणारे पल्हव, दरद, किरात, यवन व शक हे जे सर्व मीं अवलोकन केले २४; त्याचप्रमाणें हारहूण, चीन, तुषार, सैंधव, जागुड, रामठ, स्त्रीराज्य आणि तंगण ह्यांना जे मीं पाहिलें २५ आणि त्याचप्रमाणें केकय, मालव व काश्मीर ह्या देशांतील बोलावून आणिलेले राजे जे मीं तुझ्या यज्ञामध्यें वाढप्यांचें काम करीत असतांना अवलोकन केले २६—ती तुझी नाचाकडे जाणारी चंचल समृद्धि ज्यांनीं हरण केली त्यांचें जीवित हरण करून मी तिला माघारी आणीन २७. हे कुरुवंशराजश्रेष्ठा धर्मराजा, बलराम, भीम, अर्जुन, नकुलसहदेव, अक्रूर, गद, सांब, प्रद्युम्न, आहुक २८ वीर धृष्टद्युम्न आणि त्याचप्रमाणें शिशुपालपुत्र ह्यांच्या साहाय्यानें दुर्योधन, कर्ण, दुःशासन, शकुनि आणि इतरही जो कोणी तुमचे विरुद्ध युद्ध करणारा असेल तो अशा सर्वांचा मी संग्रामामध्यें वध करीन २९ आणि नंतर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, धृतराष्ट्राचें वैभव प्राप्त झाल्यावर हास्तिनपुरामध्यें वास्तव्य करून तूं ह्या पृथ्वीचें राज्य कर ३०. ह्या (प्रमाणें कृष्णानें प्रतिज्ञा केल्या) नंतर धर्मराजा त्या वीरसमुदायामध्यें हे धृष्टद्युम्नप्रभृति वीर ऐकत असतांना म्हणाला ३१ "हे जनार्दना, ही तुझी सत्य वाणी मला मान्य आहे. हे महापराक्रमी श्रीकृष्णा, माझ्या शत्रूंचा तूं अनुयायांसहवर्तमान नाश करिशील ३२ हें माझें म्हणणें तेराव्या वर्षानंतर, हे केशवा, तूं खरें करून दाखीव. कारण, राजांमध्यें

प्रतिश्रुत्य सभासदः । धृष्टद्युम्नपुरोगास्ते मम यामासुरञ्जसा ३४ केशवं मधुरैर्वाक्यैः कालयुक्तैरमर्षितम् । पाञ्चालीं प्राहुरक्लिष्टां वासुदेवस्य शृण्वतः ३५ दुर्योधनस्तव क्रोधाद्देवि त्यक्ष्यति जीवितम् । प्रतिजानीमहे सत्यं मा शुचो वरवर्णिनि ३६ ये स्म तेऽक्षजितां कृष्णे दृष्ट्वा त्वां प्राहसंस्तदा । मांसानि तेषां खादन्तो हरिष्यन्ति वृकद्विजाः ३७ पास्यन्ति रुधिरं तेषां गृध्रा गोमायवस्तथा । उत्तमाङ्गानि कर्षन्तो यैः कृष्टासि सभातले ३८ तेषां द्रक्ष्यसि पाञ्चालि गात्राणि पृथिवीतले । क्रव्यादैः कृष्यमाणानि भक्ष्यमाणानि चासकृत् ३९ परिक्लिष्टासि यैस्तत्र यैश्चासि समुपेक्षिता । तेषामुत्कृत्तशिरसां भूमिः पास्यति शोणितम् ४० एवं बहुविधा वाचस्त ऊचुर्भरतर्षभाः । सर्वे तेजस्विनः शूराः सर्वे चाहतलक्षणाः ४१ ते धर्मराजेन वृता वर्षादूर्ध्वं त्रयोदशात् । पुरस्कृत्योपयास्यन्ति वासुदेवं महारथाः ४२ रामश्च कृष्णश्च धनञ्जयश्च प्रद्युम्नसाम्बौ युयुधानभीमौ । माद्रीसुतौ केकयराज-

मीं ह्या वनवासाची प्रतिज्ञा केलेली आहे " ३३. ह्याप्रमाणें धर्मराजानें केलेलें तें भाषण श्रवण केल्यावर तेथील धृष्टद्युम्नप्रभृति सभासदांनीं " योग्य योग्य " असें सहज ह्मटलें ३४ आणि क्रुद्ध झालेल्या केशवाचें समयोचित अशा मधुर शब्दांनीं सांत्वन करून तो वासुदेव ऐकत असतांनाच ते अंतर्बाह्य निर्मल असलेल्या द्रौपदीला ह्मणाले ३५ " हे राजपत्नि, तुझ्या क्रोधामुळें दुर्योधन प्राणाला मुकेल हें आह्मी तुला प्रतिज्ञेवर खरें सांगत आहोंत. हे श्रेष्ठ स्त्रिये, तूं शोक करूं नकोस ३६. हे द्रौपदि, द्यूतामध्यें पराजित झालेल्या तुला अवलोकन करून जे त्यावेळीं हंसले असतील त्यांचें मांस लांडगे व गिधाडें, खाण्याकरितां, हरण करतील ३७. ज्यांनीं तुला सभेमध्यें ओढून आणिलें असेल त्यांचीं मस्तकें गिधाडें व कोल्हीं ओढून नेतील आणि त्यांचें रक्त प्राशन करतील ३८. इतकेंच नव्हे परंतु, हे पांचालि, मांसभक्षक प्राणी पुन्हां पुन्हां त्यांचे अवयव भूतलावर ओढून नेऊन खात आहेत असें तूं अवलोकन करशील ३९. त्याचप्रमाणें त्या सभेमध्यें ज्यांनीं तुला क्लेश दिले असतील व ज्यांनीं तुझी उपेक्षा केली असेल त्यांचा शिरच्छेद होऊन भूमि त्यांचें रक्त प्राशन करील " ४०. ह्याप्रमाणें अनेक प्रकारचीं भाषणें त्या भरतश्रेष्ठांचीं आहेत व ते सर्वही तेजस्वी व शूर असून सर्वही अखंडित लक्षणांनीं युक्त आहेत ४१. तेव्हां, तेराव्या वर्षानंतर वासुदेवाला पुढें घालून धर्मराजासहवर्तमान ते महारथी (संग्रामाकरितां) तुह्मांकडे येथील ४२. बलराम, कृष्ण, धनंजय, प्रद्युम्न व सांब, युयुधान व भीम, नकुल व सहदेव, केकयराजाचे पुत्र, पंचालराजाचे पुत्र व मत्स्यराजा असे

पुत्राः पञ्चालपुत्राः सह मत्स्यराज्ञा ४३ एतान्सर्वाल्लोकवीरानजेयान्महात्मनः सानुबन्धान्ससैन्यान्। को जीवितार्थी समरेभ्युदीयात्क्रुद्धान्सिंहान्केसरिणो यथैव ४४ धृतराष्ट्र उवाच ॥ यन्माब्रवीद्विदुरो द्यूतकाले त्वं पाण्डवाञ्जेष्यसि चेन्नरेन्द्र। ध्रुवं कुरूणामयमन्तकालो महाभयो भविता शोणितौघः ४५ मन्ये तथा तद्भवितेति सूत यथा क्षत्ता प्राह वचः पुरा माम्। असंशयं भविता युद्धमेतद्गते काले पाण्डवानां यथोक्तम् ४६[२०३३] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणीन्द्रलोकाभिगमनपर्वणि धृतराष्ट्रविलाप एकपञ्चाशत्तमोध्यायः ॥५१॥ समाप्तमिन्द्रलोकाभिगमनपर्व ॥

अथ नलोपाख्यानपर्व ॥ जनमेजय उवाच ॥ अस्त्रहेतोर्गते पार्थे शक्रलोकं महात्मनि। युधिष्ठिरप्रभृतयः किमकुर्वत पाण्डवाः १ वैशम्पायन उवाच ॥ अस्त्रहेतोर्गते पार्थे शक्रलोकं महात्मनि। न्यवसन्कृष्णया सार्धं काम्यके भरतर्षभाः २ ततः कदाचिदेकान्ते विविक्त इव शाद्वले। दुःखार्ता भरतश्रेष्ठा निषेदुः सह कृष्णया ३ धनञ्जयं शोचमानाः साश्रुकण्ठाः सुदुः-

येतील ४३. परंतु, त्रैलोक्यांतील वीर व अजिंक्य असे हे सर्व महात्मे आपले अनुयायी व सैन्यें ह्यांसहवर्तमान आले असतां जीविताची इच्छा करणारा कोणता बरें पुरुष, आयाळ धारण करणाऱ्या क्रुद्ध सिंहाप्रमाणें असलेल्या, त्यांच्यापुढें जाण्याचें मनांत आणील ! ४४. धृतराष्ट्र ह्मणतोः—" हे राजा, पांडवांना जर तूं जिंकिलेस तर रक्ताचे पाट ज्यामध्यें वहाणार आहेत असा हा महाभयंकर कौरवांचा विनाशकाल निःसंशय प्राप्त झालाच असें तूं समज " ह्मणून द्यूतसमयी ज्याप्रमाणें मला विदुरानें सांगितलें आहे ४५ त्याचप्रमाणें तें होणार असें मला वाटतें. हे संजया, पूर्वी विदुरानें मला सांगितल्याप्रमाणें हा त्रयोदशवर्षात्मक काल लोटल्यानंतर तूं सांगितलेंस तसें पांडवांचें युद्ध निःसंशय होणार ४६. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील इंद्रलोकाभिगमनपर्वापैकीं धृतराष्ट्रविलापसंबंधीं एकावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥५१॥ ह्या ठिकाणीं इंद्रलोकाभिगमनपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें नलोपाख्यानपर्वाला आरंभ झाला. जनमेजय प्रश्न करितोः—अस्त्रप्राप्तीकरितां महात्मा अर्जुन इंद्रलोकीं गेल्यावर युधिष्ठिरप्रभृति पांडवांनीं काय केलें ? १. वैशंपायन सांगतातः—महात्मा अर्जुन अस्त्रप्राप्तीकरितां इंद्रलोकीं गेल्यानंतर भरतवंशजश्रेष्ठ पांडव द्रौपदीसहवर्तमान काम्यकवनामध्यें राहिले होते २. पुढें थोडथोडें गवत उगवल्यामुळें ज्यांतील भूमि हिरवट झालेली आहे अशा एका जवळ जवळ निर्जन असलेल्या प्रदेशावर ते दुःखाकुल झालेले भरतवंशजश्रेष्ठ पांडव द्रौपदीसह बसले असतां ३

खिताः । तद्वियोगार्दितान्सर्वाञ्छोकः समभिपुप्लुवे ४ धनञ्जयवियोगाच्च राज्यभ्रंशाच्च दुःखिताः । अथ भीमो महाबाहुर्युधिष्ठिरमभाषत ५ निदेशाच्चे महाराज गतोसौ भरतर्षभः । अर्जुनः पाण्डुपुत्राणां यस्मिन्प्राणाः प्रतिष्ठिताः ६ यस्मिन्विनष्टे पञ्चालाः सह पुत्रैस्तथा वयम् । सात्यकिर्वासुदेवश्च विनश्येयुर्न संशयः ७ योसौ गच्छति धर्मात्मा बहून्क्लेशान्विचिन्तयन् । भवन्नियोगाद्बीभत्सुस्ततो दुःखतरं नु किम् ८ यस्य बाहू समाश्रित्य वयं सर्वे महात्मनः । मन्यामहे जितानाजौ परान्प्राप्तां च मेदिनीम् ९ यस्य प्रभावान्न मया सभामध्ये धनुष्मतः । नीता लोकममुं सर्वे धार्तराष्ट्राः ससौबलाः १० ते वयं बाहुबलिनः क्रोधमुत्थितमात्मनः । सहामहे भवन्मूलं वासुदेवेन पालिताः ११ वयं हि सह कृष्णेन हत्वा कर्णमुखान्परान् । स्वबाहुविजितां कृत्स्नां प्रशासेम वसुन्धराम् १२ भवतो द्यूतदोषेण सर्वे वयमुपप्लुताः । अहीनपौरुषा बाला बलिभिर्बलव-

---

अश्रूंनीं कंठ दाटून येऊन ते अतिदुःखित पांडव अर्जुनाकरितां हळहळूं लागले आणि त्याच्या वियोगामुळें दुःखित झालेले ते सर्वही शोकामध्यें अगदीं मग्न झाले ४. कारण, राज्यभ्रंशामुळें त्यांना अधिक दुःख झालें असून अर्जुनाच्या वियोगामुळें तर त्यांना आणखी अधिकच दुःख झालें होतें. ह्याप्रमाणें ते शोकाकुल झाले असतां त्यांच्यापैकींच महापराक्रमी भीमसेन युधिष्ठिराला ह्मणाला ५ " हे महाराज, तुझ्या आज्ञेनें हा भरतश्रेष्ठ अर्जुन गेला आहे व त्याच्यावरच आह्मां पांडुपुत्रांचे प्राण अवलंबून आहेत ६. तेव्हां त्याचा नाश झाला असतां पुत्रांसहवर्तमान पंचाल, आह्मी, सात्यकि आणि वासुदेव ह्यांचा नाश होणार ह्यांत संशय नाहीं ७. अनेक क्लेशांची चिंता करीत करीत जो हा धर्मात्मा अर्जुन आपल्या आज्ञेमुळें जात आहे त्यापेक्षां अधिक दुःखदायक गोष्ट ती कोणती ? ८. त्या महात्म्या अर्जुनाच्या बाहूंचा आश्रय केल्यामुळें युद्धामध्यें शत्रूंना जिंकून आह्मीं पृथ्वी प्राप्त करून घेतलीच असें समजत आहों ९ आणि त्याच धनुर्धारी अर्जुनाच्या प्रभावामुळें मी शकुनीसहवर्तमान सर्व धृतराष्ट्रपुत्रांना (द्यूतसमयीं) सभेमध्यें स्वर्गाला नेऊन न पोंचवितां स्वस्थ बसलों १०. ते आह्मी बाहुबलानें युक्त असून वासुदेवानें रक्षित आहोंत आणि तुझ्यामुळें उत्पन्न झालेला क्रोध सहन करीत आहोंत ११. अरे, कृष्णाच्या साहाय्यानें कर्णप्रभृति शत्रूंचा वध करून बाहुबलानें जिंकलेल्या संपूर्ण पृथ्वीचें आह्मीं राज्य केलें असतें १२. परंतु, करावें काय ? आमच्या पौरुषामध्यें कसल्याही प्रकारचा कमीपणा नसतांना तुझ्या द्यूतरूप दोषाच्या योगानें आह्मी सर्व ठार बुडालों आहोंत आणि मांडलिक

नराः १३ क्षात्रं धर्मं महाराज त्वमवेक्षितुमर्हसि । न हि धर्मो महाराज क्षत्रियस्य वनाश्रयः १४ राज्यमेव परं धर्मं क्षत्रियस्य विदुर्बुधाः । स क्षत्रधर्मविद्राजा मा धर्म्यान्नीनशः पथः १५ प्राग्द्वादशसमा राजन्धार्तराष्ट्रा-ञ्जिहन्महि । निवर्त्य च वनात्पार्थमानाय्य च जनार्दनम् १६ व्यूढानीकान्महाराज जवेनैव महामते । धार्तराष्ट्रानमुं लोकं गमयामि विशांपते १७ सर्वानहं हनिष्यामि धार्तराष्ट्रान्ससौबलान् । दुर्योधनं च कर्णं च यो वान्यः प्रतियोत्स्यते १८ मया प्रशमिते पश्चात्त्वमेष्यसि वनं पुनः । एवंकृते न ते दोषा भविष्यन्ति विशांपते १९ यज्ञैश्च विविधैस्तात कृतं पापमरिंदम । अवधूय महाराज गच्छेम स्वर्गमुत्तमम् २० एवमेतद्भवेद्राजन्यदि राजा न बालिशः । अस्माकं दीर्घसूत्रः स्याद्भवान्धर्मपरायणः २१ निकृत्या निकृतिप्रज्ञा हन्तव्या इति निश्चयः । न हि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते २२ तथा भारत धर्मेषु धर्मज्ञैरिह दृश्यते । अहोरात्रं महाराज

राजांनीं दिलेल्या करभारांच्या योगाने दुर्योधनप्रभृति मूर्ख आह्मापेक्षां बलिष्ठ होऊन बसले आहेत १३. हे महाराज, अरे, क्षत्रधर्माकडे तरी तूं कांहीं पहा. हे महाराज, वनाचा आश्रय करून राहणे हा क्षत्रियांचा धर्म नव्हे १४. राज्य हाच क्षत्रियांचा श्रेष्ठ धर्म असे प्राज्ञ जन समजतात. तूं क्षत्रियधर्मज्ञ राजा असतांना धर्ममार्गाचा नाश करूं नकोस १५. हे राजा, बारा वर्षे सरण्याचे पूर्वीच अर्जुनाला वनांतून परत फिरवून आणि कृष्णाला आणवून आह्मी धृतराष्ट्रपुत्रांचा वध करूं १६. हे महाविचारी महाराजा, ज्यांनीं आपल्या सैन्याची रचना चांगली केलेली आहे अशा धृतराष्ट्रपुत्रांना फक्त जोरानेंच, हे प्रजाधिपते, मी परलोकास पाठवितो १७. दुर्योधन, कर्ण आणि इतरही जो कोणी प्रतिपक्षी असेल तो व शकुनीसहवर्तमान इतरही सर्व धृतराष्ट्रपुत्र ह्या सर्वांचा मी वध करीन १८. हे प्रजाधिपते, ह्याप्रमाणें मीं एकदां ह्यांचें निर्दलन केल्यावर तूं पुनरपि खुशाल वनामध्यें रहा. ह्मणजे असें झालें असतां तूंही दोषी होणार नाहींस १९. बा शत्रुदमना महाराजा, (असें केल्यानें) आपल्या हातून जें कांहीं पाप घडेल त्याचें आपण नाना प्रकारच्या यज्ञांनीं क्षालन केल्यावर आपणांला उत्कृष्ट स्वर्ग प्राप्त होईल २०. एकसारखें धर्माचेच अवलंबन करून बसलेला व कर्तव्यकर्म लांबणीवर टाकणारा असा जर तूं आमचा राजा मूर्ख नसशील तर, हे राजा, ह्याप्रमाणें घडून येईल २१. अरे, कपटबुद्धि शत्रूचा कपटानेंच वध केला पाहिजे असा धर्मशास्त्राचा सिद्धांत आहे. कपटी शत्रूचा कपटानें वध केला असतां त्याला पाप ह्मणत नाहीत २२. शिवाय, हे भरतकुलोत्पन्ना महाराजा, एक अहोरात्र संवत्सराबरोबर असल्याचें धर्म-

तुल्यं संवत्सरेण ह २३ तथैव वेदवचनं श्रूयते नित्यदा विभो । संवत्सरो महाराज पूर्णो भवति कृच्छ्रतः २४ यदि वेदाः प्रमाणास्ते दिवसादूर्ध्व-मच्युत । त्रयोदशसमाः कालो ज्ञायतां परिनिष्ठितः २५ कालो दुर्योधनं हन्तुं सानुबन्धमरिन्दम । एकाग्रं पृथिवीं सर्वां पुरा राजन्करोति सः २६ द्यूतप्रियेण राजेन्द्र तथा तद्भवता कृतम् । प्रायेणाज्ञातचर्यायां वयं सर्वे निपातिताः २७ न तं देशं प्रपश्यामि यत्र सोऽस्मान्सुदुर्जनः । न विज्ञास्यति दुष्टात्मा चारैरिति सुयोधनः २८ अधिगम्य च सर्वान्नो वनवासमिमं ततः । प्रव्राजयिष्यति पुनर्निकृत्याधमपूरुषः २९ यद्यस्मानधिगच्छेत पापः स हि कथंचन । अज्ञातचर्यामुत्तीर्णान्दृष्ट्वा च पुनराह्वयेत् ३० द्यूतेन ते महाराज पुनर्द्यूतमवर्तत । भवांश्च पुनराहूतो द्यूते नैवापनेष्यति ३१ स तथाक्षेषु कुशलो निश्चितो गतचेतनः । चरिष्यामि महा-

---

वेत्त्यांनीं धर्मशास्त्रामध्यें अवलोकन केलेलें आहे. (कारण, सहस्रसंवत्सरात्मक सत्र श्रुतीमध्यें सांगितलें आहे; परंतु, तें होणें असंभवनीय असल्यामुळें दिवस हाच संवत्सराचा प्रतिनिधि मानावा असें पूर्वमीमांसेमध्यें ठरविलेलें आहे.) २३. त्याचप्रमाणें, हे प्रभो महाराजा, कष्ट झाले असतां एका दिवसांनेही संवत्सर परिपूर्ण होत असतो अशा अर्थाचें वेदवचन नेहमी ऐकण्यांत येत असतें २४. तेव्हां वैदिक धर्मापासून कधींही भ्रष्ट न होणाऱ्या महाराजा, वेद जर तूं प्रमाण मानीत असशील तर (तेराव्या) दिवसानंतर तेरा वर्षांचा काल संपूर्ण झाला असें तूं समज २५. सारांश, हे शत्रुदमना राजा, सर्व पृथ्वी दुर्योधनानें स्वतःचे अमलांत एकत्र केली नाही तोंच अनुयायांसहवर्तमान त्याचा वध करण्याचा हा समय आहे २६. हे राजाधिराज, द्यूत तुला प्रिय असल्यामुळें तूं त्याप्रमाणें तें केलेंस आणि आह्मां सर्वांना प्रायः (पार पडण्यास अशक्य अशा) अज्ञातवासामध्यें लोटून दिलेंस २७. कारण, ज्या ठिकाणीं गेले असतां तो अत्यंत दुर्जन व दुरात्मा दुर्योधन हेरांच्या योगानें आह्मांला ओळखणार नाहीं असा प्रदेशच मला दिसत नाहीं २८. तो नराधम आह्मां सर्वांना ओळखून काढील आणि पुनरपि कपटानें ह्या वनवासाकरितां हांकून देईल २९ आणि त्यांतूनही कसेंतरी अज्ञातवासांतून आह्मी पार पडल्याचें जर त्यानें जाणिलें तर तो भेट होतांक्षणीं पुनरपि द्यूताकरितां तुला आह्वान करील आणि, हे महाराजा, असें झालें ह्मणजे पुनरपि द्यूताचा प्रसंग आलाच. कारण, द्यूताविषयीं पुनरपि जरी आह्वान झालें तरी तूं मागें सरणार नाहींसच ३०,३१. तूं अक्षद्यूतामध्यें तशा प्रकारचा कुशल ! असल्यामुळें तुला जय येणें संशयितच आहे आणि ह्मणूनच, हे महाराजा, तुज अविचाऱ्याला पुनरपि

राज वनेषु वसतीः पुनः ३२ यद्यस्मान्सुमहाराज कृपणान्कर्तुमर्हसि।
यावज्जीवमवेक्षस्व वेदधर्मांश्च कृत्स्नशः ३३ निकृत्या निकृतिप्रज्ञो हन्तव्य
इति निश्चयः। अनुज्ञातस्त्वया गत्वा यावच्छक्ति सुयोधनम् ३४ यथैव
कक्षमुत्सृष्टो दहेदनिलसारथिः। हनिष्यामि तथा मन्दमनुजानातु मे
भवान् ३५ वैशम्पायन उवाच॥ एवं ब्रुवाणं भीमं तु धर्मराजो युधिष्ठिरः।
उवाच सान्त्वयन्राजा मूर्ध्न्युपाघ्राय पाण्डवम् ३६ असंशयं महाबाहो
हनिष्यसि सुयोधनम्। वर्षात्त्रयोदशादूर्ध्वं सह गाण्डीवधन्वना ३७ यत्त्व-
माभाषसे पार्थ प्राप्तः काल इति प्रभो। अनृतं नोत्सहे वक्तुं न ह्येतन्मम
विद्यते ३८ अन्तरेणापि कौन्तेय निकृतिं पापनिश्चयम्। हन्ता त्वमसि
दुर्धर्ष सानुबन्धं सुयोधनम् ३९ एवं ब्रुवति भीमं तु धर्मराजे युधिष्ठिरे।
आजगाम महाभागो बृहदश्वो महानृषिः ४० तमभिप्रेक्ष्य धर्मात्मा संप्राप्तं
धर्मचारिणम्। शास्त्रवन्मधुपर्केण पूजयामास धर्मराट् ४१ आश्वस्तं

वनामध्यें दिवस काढण्याची पाळी येईल ३२. हे महाराज, आह्मांला जिवांतजीव आहे तोंपर्यंत दीन करून टाकण्याचें जर तुझ्या मनांत असेल तर मात्र तूं आपला पूर्णपणें वेदधर्माचाच विचार करीत रहा ३३. अरे, कपटबुद्धि शत्रूचा कपटानेंच घात केला पाहिजे हा सिद्धांत आहे. ह्यास्तव, आपली अनुज्ञा झाल्यास मोकळा सुटलेला अग्नि ज्याप्रमाणें तृण दग्ध करून टाकितो त्याचप्रमाणें सर्व शक्ति खर्च करून मी मूढ दुर्योधनाचा वध करीन; आपण मला आज्ञा द्यावी ३४,३५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भीमसेन बोलूं लागला असतां प्रभु धर्मराज युधिष्ठिर त्याचें मस्तकीं अवघ्राण करून सांत्वन करीत करीत त्याला ह्मणाला ३६ "हे महापराक्रमी भीमसेना, गांडीवधनुर्धारी अर्जुनाच्या साहाय्यानें तेराव्या वर्षानंतर तूं दुर्योधनाचा निःसंशय वध करशील ३७. हे प्रभो कुंतीपुत्रा, आज वेळ आली आहे असें जें तूं ह्मणतोस तें हें बरोबर आहे असें मला वाटत नाहीं आणि अनृत भाषण करण्याला माझा धीर होत नाहीं ३८. हे अजिंक्य कुंतीपुत्रा, कपटाचें अवलंबन केल्यावांचूनही दुर्योधनाचा तूं अनुयायांसहवर्तमान घात करणारा आहेस. (तेव्हां, एक दिवस संवत्सराच्या स्थानीं आहे अशा प्रकारचा कपटव्यवहार तुला पाहिजे कशाला?)" ३९. ह्याप्रमाणें धर्मराज युधिष्ठिराचें भीमसेनाशीं बोलणें चाललें आहे तोंच महाभाग्यवान् बृहदश्व महर्षि तेथें आले ४० व ते धर्माला अनुसरून वागणारे महर्षि प्राप्त झाल्याचें अवलोकन केल्याबरोबर धर्मात्म्या धर्मराजानें मधुपर्कपूर्वक त्यांची यथाविधि पूजा केली ४१. नंतर, ते स्वस्थ बसल्यावर त्यांच्याकडे पाहून महापराक्रमी युधिष्ठिर फारच

चैनमासीनमुपासीनो युधिष्ठिरः। अभिप्रेक्ष्य महाबाहुः कृपणं बह्वभाषत४२ अक्षद्यूते च भगवन्धनं राज्यं च मे हृतम् । आहूय निकृतिप्रज्ञैः कितवैरक्षकोविदैः ४३ अनक्षज्ञस्य हि मतो निकृत्या पापनिश्चयैः । भार्या च मे सभां नीता प्राणेभ्योपि गरीयसी ४४ पुनर्द्यूतेन मां जित्वा वनवासं सुदारुणम् । प्राव्राजयन्महारण्यमजिनैः परिवारितम् ४५ अहं वने दुर्वसतीर्वसन्परमदुःखितः। अक्षद्यूताधिकारे च गिरः शृण्वन्सुदारुणाः४६ आर्तानां सुहृदां वाचो द्यूतप्रभृति शंसताम् । अहं हृदि श्रिताः स्मृत्वा सर्वरात्रीर्विचिन्तयन् ४७ यस्मिंश्चैव समस्तानां प्राणा गाण्डीवधन्वनि । विना महात्मना तेन गतसत्त्व इवाभवम् ४८ कदा द्रक्ष्यामि बीभत्सुं कृतास्त्रं पुनरागतम् । प्रियवादिनमक्षुद्रं दयायुक्तमतन्द्रितम् ४९ अस्ति राजा मया कश्चिदल्पभाग्यतरो भुवि । भवता दृष्टपूर्वो वा श्रुतपूर्वोपि वा क्वचित् ५० न मत्तो दुःखिततरः पुमानस्तीति मे मतिः ५१ बृहदश्व उवाच ॥

दैन्ययुक्त असें भाषण करूं लागला ४२ की, " हे भगवन्, फांसे टाकण्यामध्यें पटाईत अशा कपटबुद्धि जुगार खेळणाऱ्यांनीं मला आह्वान केलें आणि द्यूतामध्यें माझें धन व राज्य हरण केलें ४३. इतकेंच नव्हे परंतु, द्यूतामध्यें मी निपुण नसल्यामुळें त्या पापबुद्धि जुगार खेळणारानी कपट करून प्राणापेक्षांही अधिक असलेली अशी माझी भार्या सभेमध्यें नेली ४४ व पुनरपि द्यूतानें त्यांनीं मला जिंकिले आणि कृष्णाजिनें परिधान केलेल्या अशा मला अत्यंत भयंकर वनवासाकरितां घोर अरण्यामध्यें हाकून लाविलें ४५. मी अत्यंत दुःखित झालों असून वनामध्यें हे दिवस फारच दुःखानें कठीत आहें. द्यूतप्रसंगीं प्रतिपक्ष्यांनीं उच्चारिलेले अत्यंत भयंकर शब्द आणि द्यूताच्या आरंभापासून आर्त होऊन मोठ्या कळवळ्यानें सांगणाऱ्या सुहृदांचे शब्द जे मीं श्रवण केले आहेत ते सर्व माझ्या हृदयामध्यें बसलेले आहेत व त्यांचे स्मरण होऊन माझ्या सर्व रात्री चिंतनामध्यें जात आहेत ४६, ४७. ज्या गांडीवधनुर्धारी अर्जुनाचे ठिकाणीं आह्मा सर्वांचे प्राण आहेत त्या महात्म्याचा वियोग झाल्यामुळें तर मी सांप्रत गतप्राण झाल्यासारिखा झालों आहे ४८. अहो, प्रियवादी, क्षुद्रपणा न करणारा, दयाळू आणि कधींही बेसावधपणानें न वागणारा असा अर्जुन अस्त्रप्राप्ति होऊन परत आल्यानें मी केव्हां बरें पाहीन ? ४९. माझ्यापेक्षां भाग्यहीन असा कोणी राजा ह्या पृथ्वीवर आजपर्यंत आपल्या कोठें पहाण्यांत अथवा ऐकण्यांत तरी आला आहे काय ? ५०. माझ्यापेक्षां अधिक दुःखी पुरुष कोणी असेल असें मला तर वाटत नाहीं " ५१. बृहदश्व ह्मणतातः—हे महाराज पांडुपुत्रा, " माझ्याहून

यद्ब्रवीषि महाराज न मत्तो विद्यते क्वचित्। अल्पभाग्यतरः कश्चित्पुमा-
नस्तीति पाण्डव ५२ अत्र ते वर्णयिष्यामि यदि शुश्रूषसेनघ। यस्त्वत्तो दुःखि-
ततरो राजासीत्पृथिवीपते ५३ वैशम्पायन उवाच॥ अथैनमब्रवीद्राजा ब्रवीतु
भगवानिति। इमामवस्थां संप्राप्तं श्रोतुमिच्छामि पार्थिवम् ५४ बृहदश्व
उवाच॥ शृणु राजन्नवहितः सह भ्रातृभिरच्युत। यस्त्वत्तो दुःखिततरो
राजासीत्पृथिवीपते ५५ निषधेषु महीपालो वीरसेन इति श्रुतः। तस्य
पुत्रोऽभवन्नाम्ना नलो धर्मार्थकोविदः ५६ स निकृत्या जितो राजा पुष्क-
रेणेति नः श्रुतम्। वनवासं सुदुःखार्तो भार्यया न्यवसत्सह ५७ न तस्य
दासा न रथो न भ्राता न च बान्धवाः। वने निवसतो राजञ्शिष्यन्ते स्म
कदाचन ५८ भवान्हि संवृतो वीरैर्भ्रातृभिर्देवसंमितैः। ब्रह्मकल्पैर्द्विजा-
ग्र्यैश्च तस्मान्नार्हसि शोचितुम् ५९ युधिष्ठिर उवाच॥ विस्तरेणाहमिच्छामि
नलस्य सुमहात्मनः। चरितं वदतां श्रेष्ठ तन्ममाख्यातुमर्हसि ६० [२०९३]
इति श्रीमहाभारते० नलोपाख्यानपर्वणि द्विपञ्चाशत्तमोऽध्यायः॥ ५२॥

भाग्यहीन असा कोणाही पुरुष कोठेंही झाला नाहीं " असें ज्याअर्थी तूं ह्मणत आहेस त्याअर्थी ५२, हे निष्पाप भूपते, तशी जर ऐकण्याची इच्छा असेल तर तुझ्यापेक्षांही अधिक दुःखी राजा कोण होऊन गेला हें मी तुला ह्या ठिकाणीं सांगतों ५३. वैशंपायन सांगतातः—ह्यावर धर्मराजा त्यांना ह्मणाला " भगवानांनीं सांगावें. अशी अवस्था प्राप्त झालेला कोण राजा होता तो ऐकण्याची माझी इच्छा आहे " ५४. बृहदश्व सांगतातः—हे धर्मापासून च्युत न होणाऱ्या भूपते धर्मराजा, तुझ्यापेक्षां दुःखी असा राजा कोण होऊन गेला हें तूं आतां भ्रात्यांसहवर्तमान लक्ष्य देऊन श्रवण कर ५५. निषध देशामध्यें वीरसेन ह्मणून प्रसिद्ध असलेला एक राजा होऊन गेला. त्याला धर्मज्ञ व अर्थवेत्ता असा एक नल ह्मणून पुत्र होता ५६. त्या नलराजाला पुष्करानें कपट करून जिंकिलें असतां त्यानें अत्यंत दुःखित होऊन भार्येसहवर्तमान वनवास स्वीकारिला असें आमच्या ऐकण्यांत आहे ५७. हे राजा, तो वनामध्यें वास्तव्य करूं लागला असतां दास, रथ, भ्राता आणि बांधव ह्यांपैकीं त्याचे संनिध कांहींही उरलें नाहीं ५८ आणि तूं तर देवतुल्य वीर भ्रात्यांनीं व ब्रह्मतुल्य द्विजश्रेष्ठांनीं परिवेष्टित झालेला आहेस. तस्मात्, ह्याबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं ५९. युधिष्ठिर ह्मणतोः—हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ, त्या अत्यंत महात्म्या नलाचें चरित्र सविस्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे करितां, आपण तें मला कथन करा ६०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं बावन्नावा अध्याय समाप्त झाला॥ ५२॥

बृहदश्व उवाच ॥ आसीद्राजा नलो नाम वीरसेनसुतो बली । उप-
पन्नो गुणैरिष्टै रूपवानश्वकोविदः १ अतिष्ठन्मनुजेन्द्राणां मूर्ध्नि देवपति-
र्यथा । उपर्युपरि सर्वेषामादित्य इव तेजसा २ ब्रह्मण्यो वेदविच्छूरो
निषधेषु महीपतिः । अक्षप्रियः सत्यवादी महानक्षौहिणीपतिः ३ ईप्सितो
वरनारीणामुदारः संयतेन्द्रियः । रक्षिता धन्विनां श्रेष्ठः साक्षादिव मनुः
स्वयम् ४ तथैवासीद्विदर्भेषु भीमो भीमपराक्रमः । शूरः सर्वगुणैर्युक्तः प्रजा-
कामः स चाप्रजः ५ स प्रजार्थे परं यत्नमकरोत्सुसमाहितः । तमभ्यगच्छ-
द्ब्रह्मर्षिर्दमनो नाम भारत ६ तं स भीमः प्रजाकामस्तोषयामास धर्मवित् ।
महिष्या सह राजेन्द्र सत्कारेण सुवर्चसम् ७ तस्मै प्रसन्नो दमनः सभार्याय वरं
ददौ । कन्यारत्नं कुमारांश्च त्रीनुदारान्महायशाः ८ दमयन्तीं दमं दान्तं दमनं
च सुवर्चसम् । उपपन्नान्गुणैः सर्वैर्भीमान्भीमपराक्रमान् ९ दमयन्ती तु रूपेण
तेजसा यशसा श्रिया । सौभाग्येन च लोकेषु यशः प्राप सुमध्यमा १०
अथ तां वयसि प्राप्ते दासीनां समलंकृतम् । शतं शतं सखीनां च पर्य-

---

बृहदश्व सांगतातः—वीरसेनाचा पुत्र नल म्हणून एक बलाढ्य राजा होऊन गेला. तो इष्टगुणसंपन्न, रूपवान् आणि अश्ववेत्ता होता १. देवाधिपति इंद्रच कीं काय असा तो राजा तेजाच्या योगानें सर्वांपेक्षा वरचढ असलेल्या सूर्याप्रमाणें सर्व राजा-पेक्षां वरचढ होता २. तो ब्राह्मणप्रिय, वेदवेत्ता, शूर, द्यूतप्रिय, सत्यवादी, मोठा सेनानायक आणि निषध देशाचा राजा असून ३ श्रेष्ठ स्त्रियांना प्रिय, उदार, जितेंद्रिय, प्रत्यक्ष मनूप्रमाणें प्रजेचें रक्षण करणारा आणि धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असा होता ४. त्याचप्रमाणें महापराक्रमी, शूर, सर्वगुणसंपन्न आणि संतानेच्छु परंतु संतानरहित असा विदर्भदेशामध्यें भीम म्हणून राजा होता ५. अगदीं तत्पर राहून संतानाकरितां त्यानें पराकाष्ठेचा यत्न केला असतां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, दमननामक ब्रह्मर्षि त्याच्याकडे आले ६. हे राजाधिराज युधिष्ठिरा, त्या महातेजस्वी ब्रह्मर्षींना त्या धर्मवेत्त्या संतानेच्छु भीमराजानें आपल्या पत्नीसहवर्तमान सत्काराच्या योगानें संतुष्ट केलें ७. तेव्हां दमन ब्रह्मर्षींनीं त्या सपत्नीक राजावर प्रसन्न होऊन त्याला असा वर दिला कीं, "हे महाकीर्तिमान् राजा, तुला दमयंती म्हणून एक कन्यारत्न आणि सर्वगुणसंपन्न, उग्र, महापराक्रमी आणि महातेजस्वी असे दम, दांत व दमन म्हणून तीन उदार पुत्र होतील" ८,९. पुढें सौंदर्यसंपन्न दमयंतीची तर रूप, तेज, यश, लक्ष्मी आणि सौभाग्य ह्यांच्या योगानें लोकांमध्यें कीर्ति झाली १०. असो. ती दमयंती वयांत आल्यावर उत्तम अलंकार धारण केलेल्या शेंकडों दासी आणि

पासच्छचीमिव ११ तत्र स्म राजते भैमी सर्वाभरणभूषिता । सखीमध्ये-
ऽनवद्याङ्गी विद्युत्सौदामिनी यथा १२ अतीव रूपसंपन्ना श्रीरिवायतलो-
चना । न देवेषु न यक्षेषु तादृग्रूपवती क्वचित् १३ मानुषेष्वपि चान्येषु
दृष्टपूर्वाथवा श्रुता । चित्तप्रसादनी बाला देवानामपि सुन्दरी १४ नलश्च
नरशार्दूलो लोकेष्वप्रतिमो भुवि । कन्दर्प इव रूपेण मूर्तिमानभवत्स्व-
यम् १५ तस्याः समीपे तु नलं प्रशशंसुः कुतूहलात् । नैषधस्य समीपे
तु दमयन्तीं पुनः पुनः १६ तयोरदृष्टः कामोऽभूच्छृण्वतोः सततं गुणान् ।
अन्योन्यं प्रति कौन्तेय स व्यवर्धत हृच्छयः १७ अशक्नुवन्नलः कामं
तदा धारयितुं हृदा । अन्तःपुरसमीपस्थे वन आस्ते रहोगतः १८ स
ददर्श ततो हंसाञ्जातरूपपरिष्कृतान् । वने विचरतां तेषामेकं जग्राह
पक्षिणम् १९ ततोऽन्तरिक्षगो वाचं व्याजहार नलं तदा । हन्तव्योऽस्मि न
ते राजन्करिष्यामि तव प्रियम् २० दमयन्तीसकाशे त्वां कथयिष्यामि

शेकडा सख्या शचीप्रमाणे तिच्या सेवेमध्ये तत्पर राहू लागल्या ११ व त्या ठिकाणीं आपल्या सख्यांमध्यें निर्दोष अवयवांनीं युक्त आणि सर्व प्रकारच्या आभरणांनीं भूषित अशी भीमकन्या पर्जन्यकालच्या विद्युल्लतेप्रमाणें चमकूं लागली १२. ती अतिशयच रूपवती असून लक्ष्मीप्रमाणें दीर्घ नेत्रांनीं युक्त होती व देव, यक्ष आणि इतरही मानव ह्यांमध्यें तिच्यासारखी रूपवती स्त्री पूर्वी कोणाच्या पहाण्यांत तर नव्हेच परंतु कोणाच्या ऐकण्यांतही आलेली नव्हती. सारांश, ती बाला दमयंती चित्ताला आल्हाद देणारी असून देवांपेक्षांही सुंदर होती १३.१४. इकडे पुरुषश्रेष्ठ नल तर सर्व लोकांमध्यें अप्रतिम असून स्वरूपानें प्रत्यक्ष मदनच भूमीवर अवतीर्ण होऊन राहिला आहे कीं काय असा होता १५. लोक त्या दमयंतीजवळ मोठ्या उत्कंठेनें नलाची प्रशंसा करूं लागले आणि निषधराजपुत्र नलाचे समीपही तेच वारंवार दमयंतीचे गुण गाऊं लागले १६. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें एकमेकांचे गुण सतत कानावर येऊं लागल्यामुळें एकमेकांविषयीं एकमेकांच्या अंतःकरणांत इच्छा उत्पन्न होऊन ती उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊं लागली १७. नल तर अंतःकरणामध्यें काम आंवरून धरण्यास असमर्थ होऊन अंतःपुराचे समीप असलेल्या वनामध्यें एकांतस्थलीं जाऊन बसूं लागला १८. असें होतां होतां एके दिवशीं सुवर्ण पक्षांनीं युक्त असे हंसपक्षी त्याच्या दृष्टीं पडले आणि वनामध्यें संचार करणाऱ्या त्या पक्ष्यांपैकीं एकाला त्यानें धरिलें १९. तेव्हां भूमीपासून अधांतरीं धरिलेला तो पक्षी नलाला ह्मणाला "हे राजा, तूं माझा वध करूं नकोस; मी तुझा मनोरथ सिद्धीस नेईन २०. सारांश,

नैषध। यथा त्वदन्यं पुरुषं न मा मंस्यति कर्हिचित् २१ एवमुक्तस्ततो हंसमुत्ससर्ज महीपतिः। ते तु हंसाः समुत्पत्य विदर्भानगमंस्ततः २२ विदर्भनगरीं गत्वा दमयन्त्यास्तदान्तिके। निपेतुस्ते गरुत्मन्तः सा ददर्श च तान्खगान् २३ सा तानद्भुतरूपान्वै दृष्ट्वा सखिगणावृता। हृष्टा ग्रहीतुं खगमांस्त्वरमाणोपचक्रमे २४ अथ हंसा विससृपुः सर्वतः प्रमदावने। एकैकशस्तदा कन्यास्तान्हंसान्समुपाद्रवन् २५ दमयन्ती तु यं हंसं समुपाधावदन्तिके। स मानुषीं गिरं कृत्वा दमयन्तीमथाब्रवीत् २६ दमयन्ति नलो नाम निषधेषु महीपतिः। अश्विनोः सदृशो रूपे न समास्तस्य मानुषाः॥ कंदर्प इव रूपेण मूर्तिमानभवत्स्वयम् २७ तस्य वै यदि भार्या त्वं भवेथा वरवर्णिनि। सफलं ते भवेज्जन्म रूपं चेदं सुमध्यमे २८ वयं हि देवगन्धर्वमनुष्योरगराक्षसान्। दृष्टवन्तो न चास्माभिर्दृष्टपूर्वस्तथाविधः २९ त्वं चापि रत्नं नारीणां नरेषु च नलो वरः। विशिष्टया विशिष्टेन सङ्गमो गुणवान्भवेत् ३० एवमुक्ता तु हंसेन दमयन्ती

हे नैषधा, तुझ्याशिवाय दुसऱ्या पुरुषाला दमयंती कधीं मनामध्येंही आणणार नाहीं अशा प्रकारें मी तिचे समीप तुझी प्रशंसा करीन" २१. ह्याप्रमाणें हंसानें राजाला सांगितलें असतां राजानें तो हंस सोडून दिला; तेव्हां ते सर्व हंसपक्षी तेथून उड्डाण करून विदर्भ देशाला गेले २२ आणि विदर्भनगरीला गेल्यावर ते दमयंतीच्या समीप गेले असतां तिनेंही ते पक्षी अवलोकन केले २३. सख्यांच्या समुदायानें परिवेष्टित असलेली ती दमयंती ते अद्भुतरूप धारण करणारे पक्षी अवलोकन केल्याबरोबर आनंदित होऊन त्यांना धरण्याकरितां पुढें सरसावूं लागली २४. तेव्हां ते हंस त्या प्रमदावनामध्यें चोहोंकडे पसरले असतां एकएकट्याच्या मागें लागून ती त्या हंसांकडे धावूं लागली २५; परंतु ज्या हंसाचे समीप दमयंती धांवत गेली तो हंस मनुष्यवाणीचें अवलंबन करून तिला ह्मणाला २६. "हे दमयंति, निषधदेशामध्यें नलनामक भूपति आहे; तो रूपानें अश्विनीकुमारांप्रमाणें असून मानव त्याची बरोबरी करणारे नाहीत. फार काय ! रूपानें तर तो जसा कांहीं प्रत्यक्ष मदनच स्वतः अवतीर्ण झालेला आहे २७. तेव्हां, हे कृशोदरि सुंदरि, तूं जर त्याची भार्या होशील तर तुझ्या ह्या जन्माचें व रूपाचें साफल्य होईल २८. आह्मी देव, गंधर्व, मनुष्य, उरग व राक्षस हे सर्वही अवलोकन केले; परंतु, तशा प्रकारचा पुरुष आजपर्यंत आमचे पाहण्यांत आला नाहीं २९. तात्पर्य, तंही स्त्रियांमध्यें रत्न आहेस व नलही पुरुषांमध्यें श्रेष्ठ आहे. तेव्हां उत्कृष्टेचा उत्कृष्टाशीं समागम झाला असतां तो मोठा उत्तम

विशांपते । अब्रवीत्तत्र तं हंसं त्वमप्येवं नले वद ३१ तथेत्युक्त्वाण्डजः कन्यां विदर्भस्य विशांपते । पुनरागम्य निषधान्नले सर्वं न्यवेदयत् ३२ [२१२५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि हंसदमयन्तीसंवादे त्रिपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥५३॥

बृहदश्व उवाच ॥ दमयन्ती तु तच्छ्रुत्वा वचो हंसस्य भारत । ततः प्रभृति न स्वस्था नलं प्रति बभूव सा १ ततश्चिन्तापरा दीना विवर्णवदना कृशा । बभूव दमयन्ती तु निःश्वासपरमा तदा २ उर्ध्वदृष्टिर्ध्यानपरा बभूवोन्मत्तदर्शना । पाण्डुवर्णा क्षणेनाथ हृच्छयाविष्टचेतना ३ न शय्यासनभोगेषु रतिं विन्दति कर्हिचित् । न नक्तं न दिवा शेते हाहेति रुदती पुनः ४ तामस्वस्थां तदाकारां सख्यस्ता जज्ञुरिङ्गितैः । ततो विदर्भपतये दमयन्त्याः सखीजनः ५ न्यवेदयत्तामस्वस्थां दमयन्तीं नरेश्वरे । तच्छ्रुत्वा नृपतिर्भीमो दमयन्तीं सखीगणात् ६ चिन्तयामास तत्कार्यं सुम-

---

होणार आहे " ३०. ह्याप्रमाणें, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, हंसानें दमयंतीला सांगितलें असतां " तूंही ह्याप्रमाणें नलापाशीं जाऊन सांग " ह्मणून तिनें त्या हंसाला सांगितलें ३१. तेव्हां, हे प्रजाधिपते, " ठीक आहे " असें तो हंस त्या विदर्भराजाच्या कन्येला ह्मणाला आणि पुनरपि निषधदेशास जाऊन त्यानें सर्व कांहीं नलापाशीं सांगितलें ३२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं हंसदमयंतीसंवादाविषयीं त्रेपन्नावा अध्याय समाप्त झाला॥५३॥

बृहदश्व सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तें हंसाचें भाषण श्रवण केल्यापासून नलासंबंधानें दमयंती अगदीं अस्वस्थ झाली १. नंतर चिंताक्रांत, दीन व कृश झालेल्या दमयंतीचें मुख निस्तेज होऊन ती एकसारखे सुस्कार टाकूं लागली २ व दृष्टि वर देऊन एकसारखी नलाचें चिंतन करीत असलेली व मत्त झाल्यासारखी दिसत असलेली ती दमयंती एका क्षणामध्यें पांढरी फटफटीत झाली आणि कामानें तर तिला अगदीं मूर्छितच करून टाकिलें ३. निजणें, बसणें व भोग्य वस्तूंचा स्वीकार करणें ह्यांपैकीं तिला कांहींही गोड वाटेना व हाय हाय ह्मणून वारंवार रडणाऱ्या त्या दमयंतीचा अहोरात्र डोळाही लागेना ४. असो ती (चिंतनानें) अगदीं नलाकार बनली आहे व त्यामुळेंच अस्वस्थ झाली आहे असें इंगितांवरून तिच्या सख्यांनीं जाणिलें; लगेच दमयंतीच्या त्या सख्या विदर्भराजाकडे गेल्या ५ व दमयंती अस्वस्थ झाल्याचें त्यांनीं त्या राजाला सांगितलें. ह्याप्रमाणें दमयंतीच्या सख्यांपासून तें वर्तमान श्रवण केल्यावर भीमराजा ६ " कां बरें आज माझी कन्या

हत्स्वां सुतां प्रति । किमर्थं दुहिता मेद्य नातिस्वस्थेव लक्ष्यते ७ स समीक्ष्य महीपालः स्वां सुतां प्राप्तयौवनाम् । अपश्यदात्मना कार्यं दमयन्त्याः स्वयंवरम् ८ स संनिमन्त्रयामास महीपालान्विशांपतिः । अनुभूयतामयं वीराः स्वयंवर इति प्रभो ९ श्रुत्वा तु पार्थिवाः सर्वे दमयन्त्याः स्वयंवरम् । अभिजग्मुस्ततो भीमं राजानो भीमशासनात् १० हस्त्यश्वरथघोषेण पूरयन्तो वसुंधराम् । विचित्रमाल्याभरणैर्बलैर्दृश्यैः स्वलंकृतैः ११ तेषां भीमो महाबाहुः पार्थिवानां महात्मनाम् । यथार्हमकरोत्पूजां तेऽवसंस्तत्र पूजिताः १२ एतस्मिन्नेव काले तु सुराणामृषिसत्तमौ । अटमानौ महात्मानाविन्द्रलोकमितो गतौ १३ नारदः पर्वतश्चैव महाप्राज्ञौ महाव्रतौ । देवराजस्य भवनं विविशाते सुपूजितौ १४ तावर्चयित्वा मघवा ततः कुशलमव्ययम् । पप्रच्छानामयं चापि तयोः सर्वगतं विभुः १५ नारद उवाच ॥ आवयोः कुशलं देव सर्वत्रगतमीश्वर । लोके च मघवन्कृत्स्ने नृपाः कुशलिनो विभो १६ बृहदश्व उवाच ॥ नारदस्य वचः श्रुत्वा

चांगली स्वस्थ नसल्यासारखी दिसत आहे ? " ह्मणून आपल्या कन्येसंबंधानें त्या अत्यंत मोठ्या कार्याविषयी चिंताक्रांत झाला ७ पुढें आपल्या कन्येला यौवनावस्था प्राप्त झाल्याचें अवलोकन करून आपण दमयंतीचें स्वयंवर केलें पाहिजे असें त्यानें मनामध्यें आणिलें ८. नंतर, हे प्रभो युधिष्ठिरा, त्या प्रजाधिपतीनें " हे वीरहो, ह्या स्वयंवरसमारंभाला यावें " ह्मणून भूपतींना निमंत्रण केलें असतां ९ दमयंतीचें स्वयंवर होत असल्याचें ऐकून पृथ्वीतील सर्व राजे भीमराजाच्या आज्ञेवरून त्याच्याकडे गेले १०. जातांना प्रेक्षणीय, उत्तमप्रकारें भूषित आणि चित्रविचित्र पुष्पाभरणांनीं युक्त अशा सैन्यांच्या योगानें व गज, अश्व आणि रथ ह्यांच्या घोषानें सर्व पृथ्वी ते व्यापून टाकीत होते ११. असो. आपल्या नगरामध्यें आल्यावर महापराक्रमी भीमराजानें त्या महात्म्या राजांची योग्यतेप्रमाणें पूजा केली आणि नंतर ते पूजा केलेले राजे त्या ठिकाणीं राहिले १२. ह्याचवेळीं देवर्षिश्रेष्ठ महात्मे पर्वत व नारद हिंडतां हिंडतां येथून इंद्रलोकीं गेले आणि महाज्ञानी व अत्यंत व्रतस्थ असे ते सर्वांना मान्य असलेले देवर्षि देवराजाच्या मंदिरामध्यें प्रविष्ट झाले १३,१४. त्यांचें पूजन केल्यावर प्रभु इंद्रानें सर्वप्रकारें त्यांना अक्षय्य कुशल असल्याचें आणि सर्वप्रकारें आरोग्य असल्याचें विचारिलें १५. नारद सांगतातः—हे सुराधिपते देवा, आमचें कुशल आहे व, हे प्रभो इंद्रा, सर्व जगतांतील राजेही कुशल आहेत १६. बृहदश्व सांगतातः—नारदांचें भाषण श्रवण करून इंद्रानें त्यांना विचारिलें " जीविताची परवा न

पप्रच्छ बलवृत्रहा। धर्मज्ञाः पृथिवीपालास्त्यक्तजीवितयोधिनः १७
शस्त्रेण निधनं काले ये गच्छन्त्यपराङ्मुखाः। अयं लोकोक्षयस्तेषां
यथैव मम कामधुक् १८ क नु ते क्षत्रियाः शूरा न हि पश्यामि तानहम्।
आगच्छतो महीपालान्दयितानतिथीन्मम १९ एवमुक्तस्तु शक्रेण नारदः
प्रत्यभाषत। नारद उवाच॥ शृणु मे मघवन्येन न दृश्यन्ते महीक्षितः २०
विदर्भराज्ञो दुहिता दमयन्तीति विश्रुता। रूपेण समतिक्रान्ता पृथिव्यां
सर्वयोषितः २१ तस्याः स्वयंवरः शक्र भविता न चिरादिव। तत्र गच्छन्ति
राजानो राजपुत्राश्च सर्वशः २२ तां रत्नभूतां लोकस्य प्रार्थयन्तो मही-
क्षितः। काङ्क्षन्ति स्म विशेषेण बलवृत्रनिषूदन २३ एतस्मिन्कथ्यमाने
तु लोकपालाश्च साग्निकाः। आजग्मुर्देवराजस्य समीपममरोत्तमाः २४
ततस्ते शुश्रुवुः सर्वे नारदस्य वचो महत्। श्रुत्वैव चाब्रुवन्हृष्टा गच्छामो
वयमप्युत २५ ततः सर्वे महाराज सगणाः सहवाहनाः। विदर्भानभिज-
ग्मुस्ते यतः सर्वे महीक्षितः २६ नलोपि राजा कौन्तेय श्रुत्वा राज्ञां
समागमम्। अभ्यगच्छददीनात्मा दमयन्तीमनुव्रतः २७ अथ देवाः पथि

करितां युद्ध करणारे जे धर्मवेत्ते भूपति युद्धापासून परावृत्त न होतां शस्त्रानें योग्यवेळीं मरण पावतात त्यांना हा मनोरथ सिद्धीस नेणारा लोक माझ्या प्रमाणेंच अक्षय्य प्राप्त होत असतो १७, १८. परंतु, ते शूर क्षत्रिय आहेत कोठें? माझे प्रिय अतिथि असलेले ते भूपाल सांप्रत इकडे येत असल्याचें मी पहात नाहीं" १९. ह्याप्रमाणें इंद्रानें विचारिलें असतां नारदमुनींनीं त्याला उत्तर दिलें कीं "हे इंद्रा, राजे कां दृष्टीस पडत नाहींत हें आतां ऐक" २०. दमयंती ह्मणून प्रसिद्ध असलेली विदर्भराजाची कन्या रूपानें पृथ्वींतील सर्व स्त्रियांपेक्षां वरचढ आहे २१. हे इंद्रा, तिचें स्वयंवर लवकरच होणार असून तिकडे सर्व राजे व राजकुमार तीं प्राप्त होण्याच्या इच्छेनें जात आहेत आणि, हे इंद्रा, जगतांतील रत्न असलेल्या कन्येची भूपति तर विशेषेंकरून इच्छा करीत आहेत" २२, २३. ह्याप्रमाणें नारदमुनि सांगत असतांना सुरश्रेष्ठ लोकपाल अग्नीसहवर्तमान देवराजाच्यासमीप आले २४ व नारदाचें तें महत्त्वाचें भाषण त्यांनीं श्रवण केलें. इतकेंच नव्हे परंतु, तें भाषण श्रवण करितांक्षणींच ते आनंदित झाले आणि "आपणसुद्धां तिकडे जाऊं ह्मणून ह्मणाले २५. तदनंतर, हे महाराजा, वाहनें व अनुयायिगण ह्यांसहवर्तमान ते सर्व लोकपाल विदर्भ देशाला गेले. कारण, त्याच ठिकाणीं सर्व राजे गेले होते २६. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, मनाचा उदार आणि दमयंतीविषयीं उत्सुक असा नलराजाही राजे जुळले आहेत असें ऐकून तिकडे गेला २७.

नलं ददृशुर्भूतले स्थितम् । साक्षादिव स्थितं मूर्त्या मन्मथं रूपसंपदा २८
तं दृष्ट्वा लोकपालास्ते भ्राजमानं यथा रविम् । तस्थुर्विगतसंकल्पा
विस्मिता रूपसंपदा २९ ततोन्तरिक्षे विष्टभ्य विमानानि दिवौकसः ।
अब्रुवन्नैषधं राजन्नवतीर्य नभस्तलात् ३० भोभो निषधराजेन्द्र नल सत्य-
व्रतो भवान् । अस्माकं कुरु साहाय्यं दूतो भव नरोत्तम ३१ [२१५६]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि
नलोपाख्यानपर्वणीन्द्रनारदसंवादे चतुःपञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५४ ॥

बृहदश्व उवाच ॥ तेभ्यः प्रतिज्ञाय नलः करिष्य इति भारत ॥ अथै-
तान्परिपप्रच्छ कृताञ्जलिरुपस्थितः १ के वै भवन्तः कश्चासौ यस्याहं
दूत ईप्सितः । किंच तद्वो मया कार्यं कथयध्वं यथातथम् २ एवमुक्ते
नैषधेन मघवानभ्यभाषत । अमरान्वै निबोधास्मान्दमयन्त्यर्थमागतान् ३
अहमिन्द्रोयमग्निश्च तथैवायमपां पतिः । शरीरान्तकरो नृणां यमोय-
मपि पार्थिव ४ त्वं वै समागतानस्मान्दमयन्त्यै निवेदय । लोकपाला

असो. देव स्वर्गांतून निघून विदर्भदेशाला जात असतांना रूपानें मूर्तिमान् मदनच बसला आहे की काय असा भूतलावर बसलेला नलराजा मार्गामध्यें त्यांनीं अवलोकन केला २८ आणि सूर्याप्रमाणें प्रकाशित असलेल्या त्या नलाला अवलोकन केल्याबरोबर ते लोकपाल त्याच्या सौंदर्यवैभवानें चकित होऊन दमयंतीची प्राप्ति होण्याविषयीं निराश झाले २९. तदनंतर अंतरिक्षामध्यें विमानें थांबवून, आकाशांतून खालीं उतरल्यावर, हे धर्मराजा, ते देव नलराजाला ह्मणाले ३० "हे निषधराजेंद्रा नला, तूं सत्य व्रतानें चालणारा आहेस. करितां, आह्मांला साहाय्य कर आणि, हे पुरुषश्रेष्ठा, तूं आमचा दूत हो ३१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं इंद्र व नारद ह्यांच्या संवादाविषयीं चोपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५४ ॥

बृहदश्व सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, मी तुह्मांला साहाय्य करीन असें वचन दिल्यानंतर नलराजा हात जोडून त्यांचे समीप उभा राहिला आणि त्यांना ह्मणाला १ "आपण कोण? मी ज्याचा दूत होणें इष्ट आहे तो तरी कोण? आणि मीं तुमचें काय कार्य करावें हें आपण मला इत्थंभूत कथन करा" २. ह्याप्रमाणें नैषधराजानें विचारिलें असतां इंद्र ह्मणाला "दमयंतीकरितां आलेले आह्मी देव आहोंत असें तूं समज ३. मी इंद्र आहे, हा अग्नि आहे, त्याचप्रमाणें हा जलाधिपति वरुण आहे आणि, हे राजा, प्राण्यांच्या शरीराचा अंत करणारा हा यमही येथें आलेला

महेन्द्राद्याः समायान्ति दिदृक्षवः ५ प्राप्तुमिच्छन्ति देवास्त्वां शक्रोऽग्निर्वरुणो यमः। तेषामन्यतमं देवं पतित्वे वरयस्व ह ६ एवमुक्तः स शक्रेण नलः प्राञ्जलिरब्रवीत्। एकार्थं समुपेतं मां न प्रेषयितुमर्हथ ७ कथं तु जातसंकल्पः स्त्रियमुत्सहते पुमान्। परार्थमीदृशं वक्तुं तत्क्षमन्तु महेश्वराः ८ देवा ऊचुः॥ करिष्य इति संश्रुत्य पूर्वमस्मासु नैषध। न करिष्यसि कस्मात्त्वं व्रज नैषध मा चिरम् ९ बृहदश्व उवाच॥ एवमुक्तः स देवैस्तैर्नैषधः पुनरब्रवीत्। सुरक्षितानि वेश्मानि प्रवेष्टुं कथमुत्सहे १० प्रवेक्ष्यसीति तं शक्रः पुनरेवाभ्यभाषत। जगाम स तथेत्युक्त्वा दमयन्त्या निवेशनम् ११ ददर्श तत्र वैदर्भीं सखीगणसमावृताम्। देदीप्यमानां वपुषा श्रिया च वरवर्णिनीम् १२ अतीव सुकुमाराङ्गीं तनुमध्यां सुलोचनाम्। आक्षिपन्तीमिव प्रभां शशिनः स्वेन तेजसा १३ तस्य दृष्ट्वैव ववृधे कामस्तां चारुहासिनीम्। सत्यं चिकीर्षमाणस्तु धारयामास हृच्छयम् १४

आहे ४. आह्मीं आलों आहोंत असें तूं दमयंतीला निवेदन कर. सारांश, "महेंद्रप्रभृति लोकपाल तुला पाहण्याकरितां येत आहेत ५; ह्मणजे इंद्र, अग्नि, वरुण, यम हे देव तुझ्या प्राप्तीची इच्छा करीत आहेत. करितां, पति ह्या नात्यानें तूं त्यांच्या पैकीं कोणत्या तरी एका देवाला वर" ६. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां नल त्याला ह्मणाला "त्याच गोष्टीकरितां मी आलों आहें; ह्यास्तव, हा निरोप सांगून तुह्मीं मला पाठविणें योग्य नाहीं ७. "हे महाप्रभु हो, ज्या स्त्रीविषयीं ज्याच्या मनामध्यें वासना उत्पन्न झाली आहे तोच पुरुष त्याच स्त्रीला दुसऱ्याकरितां अशा प्रकारचें बोलण्याला कसा बरें तयार होईल ? करितां (मी आपली आज्ञा नाकारीत आहें) ह्याची आपण क्षमा करा" ८. देव ह्मणतातः—हे नैषधा, साहाय्य करीन असें पूर्वीं आह्मांला वचन देऊन आतां तूं कां ह्मणून नाकारीत आहेस ? तस्मात् जा; विलंब लावूं नको ९". बृहदश्व सांगतातः—ह्याप्रमाणें ते देव त्याला ह्मणाल्यावर "सुरक्षित राजगृहामध्यें प्रविष्ट होण्याची इच्छा मीं कशी धरावी ?" ह्मणून नल त्यांना ह्मणाला असतां १० "तुझा प्रवेश होईल" असें इंद्रानें पुनरपि त्याला सांगितलें आणि "ठीक आहे" असें ह्मणून तो नलही दमयंतीच्या मंदिरामध्यें गेला ११. तेथें गेल्यावर सख्यांच्या समुदायानें परिवेष्टिलेली, तनु आणि कांति ह्यांच्या योगानें देदीप्यमान, सुकुमार अवयव, सूक्ष्म मध्यभाग व उत्कृष्ट नेत्र ह्यांनीं युक्त आणि स्वतःच्या तेजानें जशी कांहीं चंद्राच्या प्रभेलाच मागें सारीत असलेली ती विदर्भराजाची उत्कृष्ट कन्या त्यानें अवलोकन केली १२, १३. त्या सुहास्यवदनेला पहातां-

ततस्ता नैषधं दृष्ट्वा संभ्रान्ताः परमाङ्गनाः । आसनेभ्यः समुत्पेतुस्तेजसा तस्य धर्षिताः १५ प्रशशंसुश्च सुप्रीता नलं ता विस्मयान्विताः । न चैनमभ्यभाषन्त मनोभिस्त्वभ्यपूजयन् १६ अहोरूपमहोकान्तिरहो धैर्यं महात्मनः । कोयं देवोथवा यक्षो गन्धर्वो वा भविष्यति १७ न तास्तं शक्नुवन्ति स्म व्याहर्तुमपि किंचन । तेजसा धर्षितास्तस्य लज्जावत्यो वराङ्गनाः १८ अथैनं स्मयमानं तु स्मितपूर्वाभिभाषिणी । दमयन्ती नलं वीरमभ्यभाषत विस्मिता १९ कस्त्वं सर्वानवद्याङ्ग मम हृच्छयवर्धन । प्राप्तोस्यमरवद्वीर ज्ञातुमिच्छामि तेनघ २० कथमागमनं चेह कथं चासि न लक्षितः । सुरक्षितं हि मे वेश्म राजा चैवोग्रशासनः २१ एवमुक्तस्तु वैदर्भ्या नलस्तां प्रत्युवाच ह । नल उवाच ॥ नलं मां विद्धि कल्याणि देवदूतमिहागतम् २२ देवास्त्वां प्राप्तुमिच्छन्ति शक्रोऽग्निर्वरुणो यमः । तेषामन्यतमं देवं पतिं वरय शोभने २३ तेषामेव प्रभावेण प्रविष्टोहमल-

---

क्षणी नलाची कामेच्छा वृद्धिंगत झाली; परंतु आपण दिलेलें वचन खरें करण्याकरितां त्यानें तो काम आंवरून धरिला १४ असा इकडे नल आल्यानंतर त्याच्या तेजानें दिपून गेलेल्या त्या उत्कृष्ट स्त्रिया अगदीं भांबावून जाऊन आपआपल्या आसनांवरून सत्वर पलीकडे झाल्या १५ आणि विस्मित होऊन अतिशयच आनंदित झालेल्या त्या स्त्रिया नलाची प्रशंसा करूं लागल्या वाणीनें त्याच्यासंबधानें त्यांनीं कांहीं शब्द उच्चारिले नाहींत; परंतु, आपआपल्या मनामध्येंच " काय हो हें रूप ! काय हो ही कांति ! काय हो ह्या महात्म्याचें धैर्य ! हा का देव, का यक्ष, का गंधर्व, कां हा असावा तरी कोण ! अशी त्या त्याची प्रशंसा करूं लागल्या १६,१७. कारण, त्याच्या तेजानें दिपून जाऊन त्या श्रेष्ठ स्त्रिया लज्जित झाल्यामुळे त्याच्याशीं प्रत्यक्ष एक चकार शब्दही बोलण्याचें त्यांना धैर्य होईना १८. नंतर हास्य करीत असलेल्या त्या वीर नलाला हास्यपूर्वक भाषण करणारी दमयंती विस्मित होऊन ह्मणाली १९ " हे मत्कामवर्धना सर्वांगसुंदरा, तू कोण आहेस ? हे वीरा, येथें प्राप्त झालेला तू देवांप्रमाणें दिसत आहेस. ह्यास्तव, हे निष्पापा, तुला जाणण्याची माझी इच्छा आहे २०. अरे, ह्या ठिकाणीं तुझें येणें झालें कसें ? आपण कोणाच्या दृष्टीस कसे पडला नाहीं ? कारण, हें माझें मंदिर फारच सुरक्षित असून राजा तर कडक शिक्षा करणारा आहे " २१. ह्याप्रमाणें विदर्भ राजाच्या कन्येनें विचारिलें असतां नल तिला उत्तर देऊं लागला कीं " हे कल्याणि, देवदूत ह्या नात्यानें ह्या ठिकाणीं आलेला मी नल आहें असें तूं समज २२. इंद्र, अग्नि, वरुण व यम हे देव तुझ्या प्राप्तीची इच्छा करीत आहेत

क्षितः। प्रविशन्तं न मां कश्चिदपश्यन्नाप्यवारयत् २४ एतदर्थमहं भद्रे प्रेषितः सुरसत्तमैः। एतच्छ्रुत्वा शुभे बुद्धिं प्रकुरुष्व यथेच्छसि २५ [२१८१]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलस्य देवदौत्ये पञ्चपञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५५ ॥

बृहदश्व उवाच ॥ सा नमस्कृत्य देवेभ्यः प्रहस्य नलमब्रवीत्। प्रणयस्व यथाश्रद्धं राजन्किं करवाणि ते १ अहं चैव हि यच्चान्यन्ममास्ति वसु किंचन। तत्सर्वं कुरु विश्रब्धं तव प्रणयमीश्वर २ हंसानां वचनं यत्तु तन्मां दहति पार्थिव। त्वत्कृते हि मया वीर राजानः संनिपातिताः ३ यदि त्वं भजमानां मां प्रत्याख्यास्यसि मानद। विषमग्निं जलं रज्जुमास्थास्ये तव कारणात् ४ एवमुक्तस्तु वैदर्भ्या नलस्तां प्रत्युवाच ह। तिष्ठत्सु लोकपालेषु कथं मानुषमिच्छसि ५ येषामहं लोककृतामीश्वराणां

ह्यास्तव, हे कल्याणि, त्यांच्यापैकी कोणत्या तरी एका देवाला तू पति वर २३. त्यांच्याच प्रभावानें मी कोणाच्या दृष्टोत्पत्तीस न येतां येथें प्रविष्ट झालों आहे. प्रवेश करितांना मला कोणी पाहिलें नाहीं आणि ह्मणूनच कोणी अटकावही केला नाहीं २४. असो. हे कल्याणि, येवढ्याकरितां सुरश्रेष्ठांनी मला पाठविलें आहे. तेव्हां, हे शुभे, हें ऐकून घेऊन इच्छेस येईल त्याप्रमाणें तूं आपल्या मनाचा निश्चय कर" २५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकी नलाच्या देवदौत्याविषयीं पंचावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५५ ॥

बृहदश्व सांगतात:—ती दमयंती देवांना श्रद्धेनें नमस्कार करून हास्यपूर्वक नलाला ह्मणाली "हे राजा, मी आपलें काय कार्य करावें ? आपण माझें पाणिग्रहण करा १. हे नाथ, मी आणि इतर जें ह्मणून कांहीं माझें धन असेल तें सर्व आपलें आहे. करितां, आपण माझ्याशीं विवाह करा २. हे भूपते, हंसांनीं जें माझ्याशीं भाषण केलें त्यामुळें (कामाच्या योगानें) माझ्या शरीराचा अगदी दाह होत आहे. हे वीरा, आपण येथें यावें एतदर्थच मी (स्वयंवराच्या निमित्तानें) राजे एकत्र जमविले आहेत ३. तस्मात्, हे मान्य, आपले ठिकाणीं अनुरक्त असलेल्या माझा जर आपण स्वीकार न कराल तर आपणांकरितां मी विषप्राशन करीन, अग्निकाष्ठ भक्षण करीन, उदकामध्यें उडी घालीन अथवा फांस लावून घेईन" ४. ह्याप्रमाणें विदर्भराजकन्येनें सांगितलें असतां नल तिला ह्मणाला "अगे, लोकपाल तुझी इच्छा करीत राहिले असतांना तूं मनुष्याची कां ह्मणून इच्छा करीत आहेस ? ५. त्या महात्म्या प्रभु लोकपालांच्या चरणरजाचीही मला योग्यता नाहीं. तस्मात्, तुझें

महात्मनाम् । न पादरजसा तुल्यो मनस्ते तेषु वर्ततास् ६ विप्रियं ह्याचरन्मर्त्यो देवानां मृत्युमृच्छति । त्राहि मामनवद्याङ्गि वरयस्व सुरोत्तमान् ७ विरजांसि च वासांसि दिव्याश्चित्राः स्रजस्तथा । भूषणानि तु मुख्यानि देवान्प्राप्य तु भुङ्क्ष्व वै ८ य इमां पृथिवीं कृत्स्नां संक्षिप्य ग्रसते पुनः । हुताशमीशं देवानां का तं न वरयेत्पतिम् ९ यस्य दण्डभयात्सर्वे भूतग्रामाः समागताः । धर्ममेवानुरुध्यन्ति का तं न वरयेत्पतिम् १० धर्मात्मानं महात्मानं दैत्यदानवमर्दनम् । महेन्द्रं सर्वदेवानां का तं न वरयेत्पतिम् ११ क्रियतामविशङ्केन मनसा यदि मन्यसे । वरुणं लोकपालानां सुहृद्वाक्यमिदं शृणु १२ नैषधेनैवमुक्ता सा दमयन्ती वचोऽब्रवीत् । समाप्लुताभ्यां नेत्राभ्यां शोकजेनाथ वारिणा १३ देवेभ्योऽहं नमस्कृत्य सर्वेभ्यः पृथिवीपते । वृणे त्वामेव भर्तारं सत्यमेतद्ब्रवीमि ते १४ तामुवाच ततो राजा वेपमानां कृताञ्जलिम् । दौत्येनागत्य कल्याणि तथा भद्रे विधीयताम् १५ कथं ह्यहं प्रतिश्रुत्य देवतानां विशेषतः । परार्थे यत्नमारभ्य कथं स्वार्थमिहोत्सहे १६ एष धर्मो यदि स्वार्थो ममापि भविता ततः ।

मन त्यांचे ठिकाणी असू दे ६. देवांना अप्रिय असलेली गोष्ट करणारा मनुष्य मृत्यु पावतो. ह्यास्तव, हे सुंदरि, तूं मला मृत्यूपासून तार आणि सुरश्रेष्ठांना वर ७. देवांचा स्वीकार करून तूं निर्मल वस्त्रें, नानाप्रकारच्या दिव्य पुष्पमाला आणि उत्कृष्ट भूषणें ह्यांचा उपभोग घे ८. ही संपूर्ण पृथ्वी सोडून देऊन जो फिरून ग्रस्त करितो त्या देवाधिपति अग्नीला कोणती बरें स्त्री पति वरणार नाहीं ? ९. ज्याच्या दंडाच्या भयानें सर्व प्राणिसमुदाय धर्माचेंच अवलंबन करून राहतात त्या यमधर्माला कोणती बरें स्त्री पति वरणार नाही ? १०. दैत्यदानवनाशक व धर्मनिष्ठ अशा महात्म्या सर्व देवाधिपति इंद्राला कोणती बरें स्त्री पति वरणार नाहीं ? ११. तुझी जर इच्छा असल तर लोकपालांपैकी वरुणाला तूं निःशंकपणे आपला पति कर. हे दमयंति, हें मज सुहृदाचें सांगणें तूं ऐक " १२. ह्याप्रमाणें निषधराज नलानें सांगितलें असतां शोकजन्य अश्रूंनीं डोळे भरून येऊन दमयंती ह्मणाली १३ " हे पृथ्वीपते, सर्व देवांना नमस्कार करून मी आपणांलाच पति वरितें हें मी आपणांला सत्य सांगत आहें " १४. ह्यावर हात जोडून लट लट कांपत असलेल्या दमयंतीला नलराजा ह्मणाला " हे भद्रे, तूं त्या माझ्या सांगण्याप्रमाणें वाग हे कल्याणि, साहाय्य करीन ह्मणून वचन दिलें असतां आणि विशेषतः देवांना वचन दिलें असतां व त्याप्रमाणें निरोप घेऊन मी येथें आलों असतां ह्मणजे दुसऱ्याचें काम करण्याकरितां यत्न आरं-

एवं स्वार्थं करिष्यामि तथा भद्रे विधीयताम् १७ ततो बाष्पाकुलां वाचं दमयन्ती शुचिस्मिता । प्रत्याहरन्ती शनकैर्नलं राजानमब्रवीत् १८ उपायोयं मया दृष्टो निरपायो नरेश्वर । येन दोषो न भविता तव राजन्कथंचन १९ त्वं चैव हि नरश्रेष्ठ देवाश्चेन्द्रपुरोगमाः । आयान्तु सहिताः सर्वे मम यत्र स्वयंवरः २० ततोहं लोकपालानां संनिधौ त्वां नरेश्वर । वरयिष्ये नरव्याघ्र नैवं दोषो भविष्यति २१ एवमुक्तस्तु वैदर्भ्या नलो राजा विशांपते । आजगाम पुनस्तत्र यत्र देवाः समागताः २२ तमपश्यंस्तथायान्तं लोकपाला महेश्वराः । दृष्ट्वा चैनं ततोपृच्छन्वृत्तान्तं सर्वमेव तम् २३ कच्चिद्दृष्टा त्वया राजन्दमयन्ती शुचिस्मिता । किमब्रवीच्च नः सर्वान्वद भूमिपतेनघ २४ नल उवाच ॥ भवद्भिरहमादिष्टो दमयन्त्या निवेशनम् । प्रविष्टः सुमहाकक्षं दण्डिभिः स्थविरैर्वृतम् २५ प्रविशन्तं च मां तत्र न कश्चिद्दृष्टवान्नरः । ऋते तां पार्थिवसुतां भव-

मिला असतां ह्या ठिकाणी मी स्वार्थ साधून घेण्याची इच्छा कशी बरें धरावी ? १५, १६. स्वार्थ साधणें हा जर धर्म होत असेल तर तो माझाही होईल करितां, मी ह्याप्रमाणें आपला स्वार्थ साधून घेईन ; परंतु, हे कल्याणि. तूं तशी तजवीज कर " १७. ह्यानंतर ती सुहास्यवदना दमयंती अश्रूंनी कंठ दाटून आल्यामुळें हळूं हळूं एकेक शब्द तोंडाबाहेर काढीत काढीत नलराजाला ह्मणाली १८ " हे प्रजाधिपते, अपायरहित असा हा एक उपाय ह्याविषयीं मला सुचला आहे व त्याच्या योगानें, हे राजा, तुला किमपि दोष लागणार नाहीं १९. हे पुरुषश्रेष्ठा, तूं आणि इंद्रप्रभृति देव ज्या ठिकाणीं माझ्या स्वयंवराचा समारंभ असेल त्या ठिकाणीं एकत्र जुळून या २०. ह्मणजे, हे नराधिपा, मी लोकपालांचे सनिध तुला वरीन आणि असें झालें असतां, हे पुरुषश्रेष्ठा, आपणांकडे दोष येणार नाहीं " २१. ह्याप्रमाणें, हे प्रजाधिपते, विदर्भराजकन्येनें सांगितल्यावर ज्या ठिकाणीं देव एकत्र जुळून आले होते त्या ठिकाणीं नलराजा फिरून गेला २२ व तशा प्रकारें येत असल्याचें त्या महासमर्थ लोकपालांनीं अवलोकन केलें आणि अवलोकन करितांक्षणीं " हे राजा, ती सुहास्यवदना दमयंती तुझ्या दृष्टीं पडली का ? हे निष्पापा भूपते, ती काय ह्मणाली हें आह्मांसर्वांना तूं निवेदन कर " ह्मणून त्याला तो सर्व वृत्तांत त्यांनीं विचारिला असतां २३.२४ नल ह्मणाला:—तुमची आज्ञा झाल्यावर मी वृद्ध वृद्ध चोपदारांनी व मोठमोठ्या द्वारांनीं युक्त अशा दमयंतीच्या मंदिरामध्यें प्रविष्ट झालों २५. प्रवेश करितांना तुमच्याच तेजाच्या प्रभावानें त्या राजकन्येशिवाय त्या ठिकाणीं मला कोणत्याही पुरुषानें

तामेव तेजसा २६ सख्यश्चास्या मया दृष्टास्ताभिश्चाप्युपलक्षितः । विस्मिताश्चाभवन्सर्वा दृष्ट्वा मां विबुधेश्वराः २७ वर्ण्यमानेषु च मया भवत्सु रुचिरानना । मामेव गतसंकल्पा वृणीते सा सुरोत्तमाः २८ अब्रवीच्चैव मां बाला आयान्तु सहिताः सुराः । त्वया सह नरव्याघ्र मम यत्र स्वयंवरः २९ तेषामहं संनिधौ त्वां वरयिष्यामि नैषध । एवं तव महाबाहो दोषो न भवितेति ह ३० एतावदेव विबुधा यथावृत्तमुपाहृतम् । मया शेषे प्रमाणं तु भवन्तस्त्रिदशेश्वराः ३१ [२२१२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलकर्तृकदेवदौत्ये षट्पञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५६ ॥

बृहदश्व उवाच ॥ अथ काले शुभे प्राप्ते तिथौ पुण्ये क्षणे तथा । आजुहाव महीपालान्भीमो राजा स्वयंवरे १ तच्छ्रुत्वा पृथिवीपालाः सर्वे हृच्छयपीडिताः । त्वरिताः समुपाजग्मुर्दमयन्तीमभीप्सवः २ कनकस्तम्भरुचिरं तोरणेन विराजितम् । विविशुस्ते नृपा रङ्गं महासिंहा इवाचलम् ३ तत्रासनेषु विविधेष्वासीनाः पृथिवीक्षितः । सुरभिस्रग्धराः सर्वे

पाहिलें नाहीं २६. तिच्या सख्या मीं अवलोकन केल्या व त्यांनीही मला पाहिलें. हे देवनायकहो, मला अवलोकन करण्याबरोबर त्या सर्व विस्मित झाल्या २७. हे सुरश्रेष्ठ हो, मी तुमची प्रशंसा करूं लागलों असतां मनोहर मुद्रेनें युक्त असलेल्या त्या दमयंतीनें निश्चयपूर्वक मलाच वरण्याचें ठरविलें २८ आणि ती बाला मला ह्मणाली "हे पुरुषश्रेष्ठा, ज्या ठिकाणीं माझा स्वयंवर समारंभ होईल त्या ठिकाणीं तुझ्यासहवर्तमान देव एकत्र जुळून येवोत २९. ह्मणजे, हे नैषधा, मी त्यांचे संनिध तुला वरीन आणि असें झालें असतां, हे महाबाहो, तुला दोष लागणार नाहीं ३०. देवहो, हें येवढेंच जसें घडलें तसें मीं आपणांला कथन केलें आहे. आतां पुढें काय करावयाचें तें करण्याला आपण सुरश्रेष्ठ मुकत्यार आहांत ३१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नलानें केलेल्या देवदौत्याविषयीं छप्पन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५६ ॥

बृहदश्व सांगतातः—नंतर शुभ काल, शुभ तिथि व मंगलकारक मुहूर्त प्राप्त झाल्यावर भीमराजानें स्वयंवरसभेमध्यें भूपालांना बोलाविलें १. तें ऐकून सर्व भूपति मदनानें व्यथित झाले आणि दमयंती प्राप्त होण्याची इच्छा धरून सत्वर तेथें आले २. नंतर सुवर्णस्तंभांनीं मनोहर व तोरणानें सुशोभित अशा त्या रंगसभेमध्यें ते नृप पर्वतावर जाणाऱ्या सिंहाप्रमाणें प्रविष्ट झाले ३ आणि सुवासिक पुष्पांच्या माला

प्रमृष्टमणिकुण्डलाः ४ तां राजसमितिं पुण्यां नागैर्भोगवतीमिव । संपूर्णां पुरुषव्याघ्रैर्व्याघ्रैर्गिरिगुहामिव ५ देवगन्धर्वपतयो ददृशुर्विस्मयान्विताः । पौरजानपदाश्चैव ये तत्रासन्समाहिताः ६ तत्र स्म पीना दृश्यन्ते बाहवः परिघोपमाः । आकारवर्णसुश्लक्ष्णाः पञ्चशीर्षा इवोरगाः ७ सुकेशान्तानि चारूणि सुनासाक्षिभ्रुवाणि च । मुखानि राज्ञां शोभन्ते नक्षत्राणि यथा दिवि ८ दमयन्ती ततो रङ्गं प्रविवेश शुभानना । मुष्णन्ती प्रभया राज्ञां चक्षूंषि च मनांसि च ९ तस्या गात्रेषु पतिता तेषां दृष्टिर्महात्मनाम् । तत्र तत्रैव सक्ताभून्न चचाल च पश्यताम् १० ततः संकीर्त्यमानेषु राज्ञां नामसु भारत । ददर्श भैमी पुरुषान्पञ्च तुल्याकृतीनिह ११ तान्समीक्ष्य ततः सर्वान्निर्विशेषाकृतीन्स्थितान् । संदेहादथ वैदर्भी नाभ्यजानान्नलं नृपम् १२ यं यं हि ददृशे तेषां तं तं मेने नलं नृपम् १३ सा चिन्तयन्ती बुद्ध्याथ तर्कयामास भाविनी । कथं हि देवाञ्जानीयां कथं विद्यां नलं

धारण करणारे व निर्मल रत्नकुंडलांनी युक्त असलेले ते सर्वही भूपति नानाप्रकारच्या सिंहासनांवरून बसले ४. तेव्हां व्याघ्रांनी गजबजून गेलेल्या पर्वताच्या गुहेप्रमाणें अथवा नागांनीं व्याप्त झालेल्या भोगवती नगरीप्रमाणें पुरुषश्रेष्ठांनीं भरलेली ती राजसभा देवगंधर्वाधिपति आणि इतरही संनिध असलेले देशांतील व नगरांतील लोक ह्यांनीं विस्मयचकित होऊन अवलोकन केली ५,६. त्या सभेमध्यें आकारानें व वर्णानें फारच मनोहर आणि अडसराप्रमाणें पुष्ट असलेले राजांचे बाहु पंचमुखी नागाप्रमाणें दिसूं लागले ७ आणि उत्कृष्ट केशाग्रें, मनोहर नासिका, नेत्र आणि भिंवया ह्यांनीं युक्त असलेलीं राजांचीं मुखकमलें आकाशांतील नक्षत्रांप्रमाणें चमकूं लागलीं ८. असो. ह्याप्रमाणें राजे येऊन बसल्यानंतर शुभ मुद्रेनें युक्त असलेली दमयंती आपल्या प्रभेनें राजांचीं मनें व नेत्र हरण करीत करीत रंगसभेमध्यें प्रविष्ट झाली ९. ती प्रविष्ट होतांक्षणीं तिच्याकडे पाहूं लागलेल्या राजांची दृष्टि तिच्या ज्या अवयवाकडे गेली त्या त्या अवयवाचे ठिकाणींच लगटून राहिली; दुसरीकडे ढळली नाहीं १०. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, राजांचीं नावें सांगण्यांत येऊं लागली असतां त्या भीमकन्येनें एकसारखीं रूपें धारण केलेले पांच पुरुष अवलोकन केले ११ आणि ज्यांच्या स्वरूपांत यत्किंचितूही फरबदल नाही असे ते सर्व पांचही पुरुष अवलोकनांत आल्यावर संदेहामुळें नलराजा कोणता हें त्या दमयंती नामक विदर्भराजाच्या कन्येला ओळखितां येईना १२. कारण, त्यांच्यापैकीं ज्याच्या ज्याच्याकडे ती पाही तो तो नलराजाच आहे असें तिला वाटे १३. तेव्हां अशाप्रकारें विचारांत पडलेली ती दमयंती

नृपम् १४ एवं संचिन्तयन्ती सा वैदर्भी भृशदुःखिता । श्रुतानि देवलिङ्गानि तर्कयामास भारत १५ देवानां यानि लिङ्गानि स्थविरेभ्यः श्रुतानि मे । तानीह तिष्ठतां भूमावेकस्यापि न लक्षये १६ सा विनिश्चित्य बहुधा विचार्य च पुनः पुनः । शरणं प्रति देवानां प्राप्तकालममन्यत १७ वाचा च मनसा चैव नमस्कारं प्रयुज्य सा । देवेभ्यः प्राञ्जलिर्भूत्वा वेपमानेदमब्रवीत् १८ हंसानां वचनं श्रुत्वा यथा मे नैषधो वृतः । पतित्वे तेन सत्येन देवास्तं प्रदिशन्तु मे १९ मनसा वचसा चैव यथा नाभिचराम्यहम् । तेन सत्येन विबुधास्तमेव प्रदिशन्तु मे २० यथा देवैः स मे भर्ता विहितो निषधाधिपः । तेन सत्येन मे देवास्तमेव प्रदिशन्तु मे २१ यथेदं व्रतमारब्धं नलस्याराधने मया । तेन सत्येन मे देवास्तमेव प्रदिशन्तु मे २२ स्वं चैव रूपं कुर्वन्तु लोकपाला महेश्वराः । यथाहमभिजानीयां पुण्यश्लोकं नराधिपम् २३ निशम्य दमयन्त्यास्तत्करुणं प्रतिदेवितम् । निश्चयं परमं

" मीं देव कसे ओळखावे आणि नलराजाला मीं कसं जाणावें " ह्मणून आपल्या बुद्धीनें तर्क करूं लागली १४. तेव्हां ह्याप्रमाणें विचार करितां करितां त्या अत्यंत दुःखित झालेल्या विदर्भराजकन्येनें, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, पूर्वी ऐकिलेल्या देवचिन्हांचें स्मरण केलें आणि ती आपणांशीं ह्मणाली १५ " वृद्धांपासून जीं देवांचीं चिन्हें मीं ऐकिलीं आहेत तीं ह्या रंगसभेमध्यें भूमीला स्पर्श करून असलेल्या पांचांपैकीं एकाचेही ठिकाणीं मला आढळत नाहींत " १६. ह्याप्रमाणें देवांचीं चिन्हें ह्यांच ठिकाणीं आहेत किंवा नाहींत ह्याविषयीं अनेक प्रकारांनीं स्वतःची खात्री करून घेऊन फिरून फिरून विचार केल्यावर ह्या प्रसंगीं देवांना शरणच गेलें पाहिजे असें तिला वाटलें १७ आणि वाणीनें व मनानें देवांना नमस्कार करून व हात जोडून कांपत कांपत ती ह्मणाली १८ " हंसाचें भाषण श्रवण करून मीं निषधराजासच पति ह्या नात्यानें वरिलें आहे. हें जर सत्य असेल तर त्या सत्याच्या योगानें देवांनीं तो मला दाखवावा १९. त्याचप्रमाणें वाचेनें अथवा मनानें मीं त्याच्यावांचून दुसऱ्या कोणाचाही स्वीकार केलेला नाहीं हें जर सत्य असेल तर त्या सत्याच्या योगानें तो कोणता हें मला देवांनी दाखवावें २०; तो निषधराज देवांनीं माझा भर्ता नेमिला आहे. हें जर सत्य असेल तर त्या सत्याच्या योगानें देवांनीं तोच मला दाखवावा २१. तसेंच हें व्रतही नलालाच संतुष्ट करण्याकरितां मीं आरंभिलेलें आहे. तेव्हां हें जर सत्य असेल तर त्या सत्याच्या योगानें देवांनीं तोच मला दाखवावा २२ आणि ह्या महासमर्थ लोकपालांनीं आपलें स्वरूप प्रकट करावें;

तथ्यमनुरागं च नैषधे २४ मनोविशुद्धिं बुद्धिं च भक्तिं रागं च नैषधे । यथोक्तं चक्रिरे देवाः सामर्थ्यं लिङ्गधारणे २५ सापश्यद्विबुधान्सर्वान-स्वेदान्स्तब्धलोचनान् । हृषितस्रग्रजोहीनान्स्थितानस्पृशतः क्षितिम् २६ छायाद्वितीयो म्लानस्रग्रजःस्वेदसमन्वितः । भूमिष्ठो नैषधश्चैव निमेषेण च सूचितः २७ सा समीक्ष्य तु तान्देवान्पुण्यश्लोकं च भारत । नैषधं वरयामास भैमी धर्मेण पाण्डव २८ विलज्जमाना वस्त्रान्तं जग्राहायत-लोचना । स्कन्धदेशेऽसृजत्तस्य स्रजं परमशोभनाम् २९ वरयामास चैवैनं पतित्वे वरवर्णिनी । ततो हाहेति सहसा मुक्तः शब्दो नराधिपैः ३० देवै-र्महर्षिभिस्तत्र साधु साध्विति भारत । विस्मितैरीरितः शब्दः प्रशंसद्भि-र्नलं नृपम् ३१ दमयन्तीं तु कौरव्य वीरसेनसुतो नृपः । आश्वासयद्वरा-रोहां प्रहृष्टेनान्तरात्मना ३२ यत्त्वं भजसि कल्याणि पुमांसं देवसंनिधौ ।

म्हणजे पुण्यश्लोक राजा कोणता तो मी ओळखीन " २३. ह्याप्रमाणें करुणरसानें भरलेला दमयंतीचा विलाप श्रवण करून आणि तिचा दृढ निश्चय, तिचें तें परा-काष्ठेचें सत्य भाषण व निषधराजाचे ठिकाणीं असलेली अनुरक्तता २४ आणि त्याचप्रमाणें त्याच्याविषयीं असलेलें तिचें शुद्ध मन, बुद्धि, भक्ति व प्रेम पाहून तिनें सांगितल्याप्रमाणें देवांनीं आपआपलें चिन्ह धारण करण्याचा यत्न केला २५. तेव्हां स्वेद, नेत्रचांचल्य आणि मल ह्यांनीं रहित, भूमीला स्पर्श न करणारे आणि टवटवीत पुष्पांच्या योगानें युक्त असे सर्व देव तिनें अवलोकन केले २६ आणि छायारूप दुसरा आकार, कोमेजत चाललेल्या पुष्पांची माला, मल व स्वेद ह्यांनीं युक्त आणि भूमीवर स्थित असा नैषध नेत्रांच्या उघडझापीमुळेंही तिच्या समजण्यांत आला २७. हे भरतकुलोत्पन्ना पांडुपुत्रा युधिष्ठिरा, त्या देवांना व पुण्यश्लोक नैषधराजाला अव-लोकन केल्यावर त्या भीमकन्येनें नैषधालाच धर्मानें वरिलें २८. तात्पर्य, दीर्घनय-नांनीं युक्त असलेल्या त्या दमयंतीनें लाजत लाजत पदर घेतला आणि त्या नलाच्या गळ्यामध्यें तिनें सर्वोत्कृष्ट माला टाकून दिली २९ व अशा प्रकारें त्या नलाला पति ह्या नात्यानें त्या उत्कृष्ट स्त्रीनें वरिलें. तेव्हां भूपालांनीं एकदम हाहाकार केला ३० आणि विस्मित झालेल्या देवांनीं व महर्षींनीं, हे भरतकुलोत्पन्ना युधि-ष्ठिरा, नलराजाची प्रशंसा करीत करीत " उत्तम उत्तम " असा शब्द उच्चा-रिला ३१. तेव्हां, हे कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, वीरसेनपुत्र नलराजानें प्रसन्न अंतःकरणानें सुंदरी दमयंतीला आश्वासन देऊन असें सांगितलें कीं ३२ " हे कल्याणि, ज्याअर्थीं देवांचे सन्निध तूं मज मानवाचा स्वीकार करीत आहेस त्याअर्थीं

तस्मान्मां विद्धि भर्तारमेतत्ते वचने रतम् ३३ यावच्च मे धरिष्यन्ति प्राणा देहे शुचिस्मिते। तावत्त्वयि भविष्यामि सत्यमेतद्ब्रवीमि ते॥ दमयन्ती तथा वाग्भिरभिनन्द्य कृताञ्जलिः ३४ तौ परस्परतः प्रीतौ दृष्ट्वा त्वग्निपुरोगमान्। तानेव शरणं देवाञ्जग्मतुर्मनसा तदा ३५ वृते तु नैषधे भैम्या लोकपाला महौजसः। प्रहृष्टमनसः सर्वे नलायाष्टौ वरान्ददुः ३६ प्रत्यक्षदर्शनं यज्ञे गतिं चानुत्तमां शुभाम्। नैषधाय ददौ शक्रः प्रीयमाणः शचीपतिः ३७ अग्निरात्मभवं प्रादाद्यत्र वाञ्छति नैषधः। लोकानात्मप्रभांश्चैव ददौ तस्मै हुताशनः ३८ यमस्त्वन्नरसं प्रादाद्धर्मे च परमां स्थितिम्। अपां पतिरपां भावं यत्र वाञ्छति नैषधः ३९ स्रजश्चोत्तमगन्धाढ्याः सर्वे च मिथुनं ददुः। वरानेवं प्रदायास्य देवास्ते त्रिदिवं गताः ४० पार्थिवाश्चानुभूयास्य विवाहं विस्मयान्विताः। दमयन्त्याश्च मुदिताः प्रतिजग्मुर्यथागतम् ४१ गतेषु पार्थिवेन्द्रेषु भीमः प्रीतो महामनाः।

मी तुझा भर्ता तुझ्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तत्पर आहें हें तूं समज ३३. हे सुहास्यवदने, जोंपर्यंत माझ्या देहामध्यें प्राण आहेत तोंपर्यंत मी तुझ्याशीं ह्याप्रमाणें वागेन; हें मी तुला सत्य सांगतों. ह्याप्रमाणें नलराजानें सांगितलें असतां दमयंतीही त्याचप्रमाणें शब्दांनीं त्याचें अभिनंदन करून हात जोडून उभी राहिली ३४ व अशाप्रकारें एकमेकांच्या योगानें एकमेकांवर संतुष्ट झालेले ते स्त्रीपुरुष अग्निप्रभृति देव अवलोकन करून त्याच देवांना मनानें शरण गेले ३५. असो. ह्याप्रमाणें भीमकन्येनें निषधदेशाधिपति नलाला वरिलें असतां महातेजस्वी लोकपालांच्या मनाला आनंद झाला व त्या सर्वांनीं मिळून नलाला आठ वर दिले ३६. संतुष्ट होत असलेल्या शचीपति इंद्रानें यज्ञामध्यें स्वतःचें प्रत्यक्ष दर्शन आणि अनुपम शुभ गति असे दोन वर नलाला दिले ३७; अग्नीनें नल इच्छा करील त्या ठिकाणीं आपण प्रकट होण्याचें कबूल केलें आणि स्वतःप्रमाणें तेजस्वी लोकही त्या अग्नीनें त्याला दिले ३८; यमानें अन्नरस आणि धर्माचे ठिकाणीं उत्कृष्ट निष्ठा हीं दोन त्याला दिलीं आणि जलाधिपति वरुणानें नल इच्छील त्याठिकाणीं उदक ३९ व उत्कृष्ट सुवासानें युक्त असलेल्या पुष्पमाला अशीं दोन त्याला दिलीं. ह्याप्रमाणें सर्वांनीं दोन दोन वर दिले आणि त्याला वर देऊन ते देव स्वर्गाला चालते झाले ४०. असो. नल आणि दमयंती ह्यांचा हा विवाह झाल्याचें अवलोकन केल्यावर तेथें आलेले राजे विस्मयचकित झाले आणि आनंदित होऊन ते आल्या मार्गानें परत गेले ४१. नंतर श्रेष्ठ श्रेष्ठ राजे गेल्यावर मनाचा उदार असलेला भीम राजा संतुष्ट झाला आणि दमयन्ती व नल ह्यांचा

विवाहं कारयामास दमयन्त्या नलस्य च ४२ उष्य तत्र यथाकामं नैषधो द्विपदां वरः । भीमेन समनुज्ञातो जगाम नगरं स्वकम् ४३ अवाप्य नारीरत्नं तु पुण्यश्लोकोपि पार्थिवः । रेमे सह तया राजञ्छच्येव बलवृत्रहा ४४ अतीव मुदितो राजा भ्राजमानोंशुमानिव । अरञ्जयत्प्रजा वीरो धर्मेण परिपालयन् ४५ ईजे चाप्यश्वमेधेन ययातिरिव नाहुषः । अन्यैश्च बहुभिर्धीमान्क्रतुभिश्चाप्तदक्षिणैः ४६ पुनश्च रमणीयेषु वनेषूपवनेषु च । दमयन्त्या सह नलो विजहारामरोपमः ४७ जनयामास च ततो दमयन्त्यां महामनाः । इन्द्रसेनं सुतं चापि इन्द्रसेनां च कन्यकाम् ४८ एवं स यजमानश्च विहरंश्च नराधिपः । ररक्ष वसुसंपूर्णां वसुधां वसुधाधिपः ४९ [२२६१] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीस्वयंवरे सप्तपञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५७ ॥

बृहदश्व उवाच ॥ वृते तु नैषधे भैम्या लोकपाला महौजसः । यान्तो ददृशुरायान्तं द्वापरं कलिना सह १ अथाब्रवीत्कलिं शक्रः संप्रेक्ष्य बल-

---

विवाहसमारंभ त्यानें करविला ४२. तेव्हां पुरुषश्रेष्ठ नलानें इच्छेप्रमाणें तेथें वास्तव्य केलें आणि भीमराजानें अनुज्ञा दिल्यावर तो स्वतःच्या नगराला निघून गेला ४३. सारांश, हे राजा, इंद्र ज्याप्रमाणें शचीशीं रममाण होत असतो त्याचप्रमाणें तें स्त्रीरत्न प्राप्त झाल्यावर पुण्यश्लोक नलराजाही तिच्यासहवर्तमान रममाण झाला ४४. नंतर अत्यंत आनंदित झालेला व सूर्याप्रमाणें प्रकाशत असलेला तो वीर नलराजा धर्मानें परिपालन करणारा असल्यामुळें प्रजेला सुख देऊं लागला ४५. नहुषपुत्र ययातिराजाप्रमाणें त्या बुद्धिमान् नलराजानें अश्वमेध व परिपूर्ण दक्षिणांना युक्त असे दुसरेही पुष्कळ क्रतु केले ४६. पुढें रम्य अशा वनामध्यें आणि उपवनामध्यें त्या देवतुल्य नलराजानें दमयंतीसहवर्तमान क्रीडा केली ४७ आणि नंतर त्या उदार राजानें दमयंतीचे ठिकाणीं इंद्रसेननामक पुत्र आणि इंद्रसेना ह्या नांवाची कन्या अशीं दोन अपत्यें उत्पन्न केलीं ४८ व ह्याप्रमाणें यज्ञयाग आणि क्रीडा करीत असलेल्या त्या पृथ्वीपति नलराजानें द्रव्यानें भरलेल्या पृथ्वीचें रक्षण केलें ४९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं दमयंतीच्या स्वयंवराविषयीं सत्तावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५७ ॥

बृहदश्व सांगतातः—भीमराजाच्या कन्येनें नलराजाला वरिल्यानंतर महातेजस्वी लोकपाल परत जाऊं लागले असतां द्वापरासहवर्तमान कलि येत असल्याचें त्यांनीं अवलोकन केलें १. तेव्हां बल व वृत्र ह्यांचा वध करणाऱ्या इंद्रानें "हे कले, द्वापराला

वृत्रहा । द्वापरेण सहायेन कले ब्रूहि क यास्यसि २ ततोऽब्रवीत्कलिः शक्रं दमयन्त्याः स्वयंवरम् । गत्वा हि वरयिष्ये तां मनो हि मम तां गतम् ३ तमब्रवीत्प्रहस्येन्द्रो निर्वृत्तः स स्वयंवरः । वृतस्तया नलो राजा पतिरस्मत्समीपतः ४ एवमुक्तस्तु शक्रेण कलिः कोपसमन्वितः । देवानामन्त्र्य तान्सर्वानुवाचेदं वचस्तदा ५ देवानां मानुषं मध्ये यत्सा पतिमविन्दत । तत्र तस्या भवेन्न्याय्यं विपुलं दण्डधारणम् ६ एवमुक्ते तु कलिना प्रत्यूचुस्ते दिवौकसः । अस्माभिः समनुज्ञाते दमयन्त्या नलो वृतः ७ का च सर्वगुणोपेतं नाश्रयेत नलं नृपम् । यो वेद धर्मानखिलान्यथावच्चरितव्रतः ८ योऽधीते चतुरो वेदान्सर्वानाख्यानपञ्चमान् । नित्यं तृप्ता गृहे यस्य देवा यज्ञेषु धर्मतः ९ अहिंसानिरतो यश्च सत्यवादी दृढव्रतः । यस्मिन्दाक्ष्यं धृतिर्ज्ञानं तपः शौचं दमः शमः १० ध्रुवाणि पुरुषव्याघ्रे लोकपालसमे नृपे । एवंरूपं नलं यो वै कामयेच्छपितुं कले ११ आत्मानं स शपेन्मूढो हन्यादात्मानमात्मना । एवंगुणं नलं यो वै कामयेच्छपितुं कले १२ कृच्छ्रे

बरोबर घेऊन तूं कोठें जात आहेस तें सांग " असें कलीला विचारिलें असतां २ " दमयंतीच्या स्वयंवराचे ठिकाणीं जाऊन मी तिला वरणार आहें. कारण, माझें मन तिच्यावर गेलें आहे. " ह्मणून कलीनें इंद्राला उत्तर दिलें ३. तेव्हां इंद्र हास्यपूर्वक त्याला ह्मणाला " तो स्वयंवर समारंभ उरकला. त्या दमयंतीनें आह्मां संनिधच नलराजा पति वरिला " ४. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां कलि कोपयुक्त झाला आणि सर्व देवांना हाक मारून ह्मणाला ५ " देवांमध्यें ज्याअर्थी तिनें मनुष्य पति वरिला त्याअर्थी तिला मोठा दंड करणेंच न्याय्य आहे " ६. ह्याप्रमाणें कलि ह्मणाला असतां त्या देवांनीं त्याला फिरून सांगितलें " आह्मी अनुज्ञा दिल्यानंतर दमयंतीनें नलाला वरिलें आहे ७. अरे, सर्वगुणसंपन्न नलराजाचा आश्रय कोणती बरें स्त्री करणार नाहीं? नलराजा केवल सर्वधर्मज्ञच नसून स्वतः त्याप्रमाणें आचरण करणारा आहे ८. चार वेद आणि पांचवा इतिहास ह्यांचें तो अध्ययन करीत आहे व त्याच्या घरीं यज्ञामध्यें देव धर्मतः नित्य तृप्त होत आहेत ९. हिंसा न करण्याविषयीं तो नेहमीं तत्पर आहे; तो सत्यवचनी असून स्वीकारलेलें व्रत शेवटपर्यंत चालविणारा आहे आणि त्या पुरुषश्रेष्ठ व लोकपालतुल्य नलराजाचे ठिकाणीं नित्योत्साह, धैर्य, ज्ञान, तप, शौच, इंद्रियदमन व मनःसंयमन हीं कायमचीं आहेत. तेव्हां, हे कले, अशाप्रकारच्या नलाला शाप देण्याचें जो मनांत आणील १०, ११ तो मूढ स्वतःलाच शापील आणि आपणच आपला घात करून घेईल. हे कले, अशाप-

स नरके मज्जेदगाधे विपुले ह्रदे । एवमुक्त्वा कलिं देवा द्वापरं च
दिवं ययुः १३ ततो गतेषु देवेषु कलिर्द्वापरमब्रवीत् । संहर्तुं नोत्सहे
कोपं नले वत्स्यामि द्वापर १४ भ्रंशयिष्यामि तं राज्यान्न भैम्या सह
रंस्यते । त्वमप्यक्षान्समाविश्य साहाय्यं कर्तुमर्हसि १५ [२२७६] इति
श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलो-
पाख्यानपर्वणि कलिदेवसंवादेऽष्टपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५८ ॥

बृहदश्व उवाच ॥ एवं स समयं कृत्वा द्वापरेण कलिः सह । आजगाम
ततस्तत्र यत्र राजा स नैषधः १ स नित्यमन्तरप्रेप्सुर्निषधेष्ववसच्चिरम् ।
अथास्य द्वादशे वर्षे ददर्श कलिरन्तरम् २ कृत्वा मूत्रमुपस्पृश्य संध्याम-
न्वास्त नैषधः । अकृत्वा पादयोः शौचं तत्रैनं कलिराविशत् ३ स समा-
विश्य च नलं समीपं पुष्करस्य च । गत्वा पुष्करमाहेदमेहि दीव्य नलेन
वै ४ अक्षद्यूते नलं जेता भवान्हि सहितो मया । निषधान्प्रतिपद्यस्व
जित्वा राज्यं नलं नृपम् ५ एवमुक्तस्तु कलिना पुष्करो नलमभ्ययात् ।

कारच्या गुणी नलाला जो शाप देण्याचें मनांत आणील १२ तो अगाध व प्रचंड आणि ह्मणूनच दुःसह अशा नरकरूप डबक्यामध्यें मग्न होईल ". ह्याप्रमाणें कलीला व द्वापराला सांगून देव स्वर्गास चालते झाले १३. नंतर देव गेल्यावर कलि द्वापराला ह्मणाला " हे द्वापरा, माझ्यानें क्रोध आंवरून धरवत नाहीं. तस्मात्, मी नलाचे ठिकाणीं वास्तव्य करीन १४ आणि (द्यूताच्या योगानें) त्याला राज्यापासून भ्रष्ट करून टाकीन ह्मणजे भीमकन्येसहवर्तमान त्याला रममाण होतां येणार नाहीं. करितां, तूंही फांशांमध्यें प्रविष्ट होऊन मला साहाय्य कर १५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत-लक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं कलि आणि देव ह्यांच्या संवादाविषयीं अठ्ठावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५८ ॥

बृहदश्व सांगतातः— ह्याप्रमाणें बेत केल्यावर ज्या ठिकाणीं तो नैषधराजा होता त्या ठिकाणीं द्वापरासहवर्तमान कलि आला १. तो कलि नेहमीं संधि पहाण्याकरितां टपून बसून पुष्कळ दिवसपर्यंत निषधदेशामध्यें राहिला. तेव्हां बाराव्या वर्षी त्या कलीला संधि सांपडली २. मूत्रोत्सर्ग करून व त्या इंद्रियाचें प्रक्षालन करून नलराजा पादप्रक्षालन न करितां संध्येला बसला असतां त्या ठिकाणीं कलीनें त्याच्यामध्यें प्रवेश केला ३. ह्याप्रमाणें नलाचे देहामध्यें प्रविष्ट झाल्यावर तो कलि नलाच्या पुष्करनामक भ्रात्याकडे गेला आणि त्याला ह्मणाला " चल, नलाशीं तूं द्यूत खेळ ४. अक्षद्यूतामध्यें माझ्या साहाय्यानें तूं नलाला जिंकशील. तेव्हां नलाचें राज्य जिंकून

कलिश्चैव वृषो भूत्वा गवां पुष्करमभ्ययात् ६ आसाद्य तु नलं वीरं पुष्करः परवीरहा । दीव्यावेत्यब्रवीद्भ्राता वृषेणेति मुहुर्मुहुः ७ न च क्षमे ततो राजा समाह्वानं महात्मनः । वैदर्भ्याः प्रेक्षमाणायाः पणकालममन्यत ८ हिरण्यस्य सुवर्णस्य यानयुग्यस्य वाससाम् । आविष्टः कलिना द्यूते जीयते स्म नलस्तदा ९ तमक्षमदसंमत्तं सुहृदां न तु कश्चन । निवारणेभवच्छक्तो दीव्यमानमरिंदमम् १० ततः पौरजनाः सर्वे मन्त्रिभिः सह भारत । राजानं द्रष्टुमागच्छन्निवारयितुमातुरम् ११ ततः सूत उपागम्य दमयन्त्यै न्यवेदयत् । एष पौरजनो देवि द्वारि तिष्ठति कार्यवान् १२ निवेद्यतां नैषधाय सर्वाः प्रकृतयः स्थिताः । अमृष्यमाणा व्यसनं राज्ञो धर्मार्थदर्शिनः १३ ततः सा बाष्पकलया वाचा दुःखेन कर्शिता । उवाच नैषधं भैमी शोकोपहतचेतना १४ राजन्पौरजनो द्वारि त्वां दिदृक्षुरवस्थितः । मन्त्रिभिः सहितः सर्वै राजभक्तिपुरस्कृतः ॥ तं

तूं निषध देश आपल्या स्वाधीन करून घ " ५. ह्याप्रमाणें कलीनें सांगितलें असतां पुष्कर नलाकडे आला व कलिही श्रेष्ठ फांशाचें रूप धारण करून पुष्कराकडे आला ६. ह्याप्रमाणें शत्रुपक्षीयवीरनाशक पुष्कर भ्राता वीर नलाकडे येऊन " फांशानें आपण द्यूत खेळू " असें वारंवार ह्मणाला असतां ७ नलराजा मोठा मानी असल्यामुळें त्याला तें दमयंतीसमक्ष झालेलें आह्वान सहन होईना तेव्हां हा द्यूतसमय आलाच असें त्यानें ठरविलं ८. कलीनें झपाटलेला नल (द्यूत सुरू झालें असतां) रौप्य, सुवर्ण, रथ आणि वस्त्रें ही सर्व हरला ९. द्यूतमदानें मत्त झालेला तो शत्रुदमन नलराजा द्यूत खेळत असतांना त्याचें निवारण करण्यास सुहृदांपैकी कोणीही जेव्हां समर्थ झाला नाहीं १० तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, द्यूतमत्त झालेल्या राजाचे निवारण करावें एतदर्थ त्याची भेट घेण्याकरितां सर्व नगरवासी जन मंत्र्यांसहवर्तमान तेथें आले ११. तेव्हां सारथि दमयंतीच्या समीप जाऊन ह्मणाला " हे देवि, कांहीं कामाकरितां हे नगरवासी लोक दरवाज्यापाशीं येऊन उभे राहिले आहेत १२ आणि धर्म व अर्थ ह्यांचें तत्त्व जाणणारा राजा संकटांत सांपडत आहे हें सहन न होऊन सर्व मंत्रीही येऊन उभे राहिले आहेत. करितां, हें वर्तमान नलराजाला निवेदन होऊं द्या " १३. ह्याप्रमाणें सूतानें सांगितल्यानंतर दुःखाकुल व शोकाच्या योगानें चित्तव्याकुलझालेली ती भीमकन्या दमयंती अश्रूंच्या योगानें अस्पष्ट उमटत असलेल्या वाणीनें नलराजाला ह्मणाली १४ " हे राजा, आपली भेट घेण्याकरितां राजनिष्ठापूर्वक सर्व मंत्र्यांसहवर्तमान नगरवासी लोक दरवाज्याशीं

द्रष्टुमर्हसीत्येवं पुनः पुनरभाषत १५ तां तथा रुचिरापाङ्गीं विलपन्तीं तथाविधाम्। आविष्टः कलिना राजा नाभ्यभाषत किंचन १६ ततस्ते मन्त्रिणः सर्वे ते चैव पुरवासिनः। नायमस्तीति दुःखार्ता व्रीडिता जग्मुरालयान् १७ तथा तदभवद्द्यूतं पुष्करस्य नलस्य च। युधिष्ठिर बहून्मासान्पुण्यश्लोकस्त्वजीयत १८[२२९४]इतिश्रीमहाभारते शतसाहस्र्यां॰ मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलद्यूत एकोनषष्टितमोऽध्यायः॥५९॥

बृहदश्व उवाच ॥ दमयन्ती ततो दृष्ट्वा पुण्यश्लोकं नराधिपम्। उन्मत्तवदनुन्मत्ता देवने गतचेतसम् १ भयशोकसमाविष्टा राजन्भीमसुता ततः। चिन्तयामास तत्कार्यं सुमहत्पार्थिवं प्रति २ सा शङ्कमाना तत्पापं चिकीर्षन्ती च तत्प्रियम्। नलं च हृतसर्वस्वमुपलभ्येदमब्रवीत् ३ बृहत्सेनामतियशां तां धात्रीं परिचारिकाम्। हितां सर्वार्थकुशलामनुरक्तां सुभाषिताम् ४ बृहत्सेने व्रजामात्यानानाय्य नलशासनात्। आचक्ष्व

येऊन उभे राहिले आहेत त्यांची आपण भेट घ्यावी" असें तिनें वारंवार राजाला सांगितलें १५. परंतु, मनोहर नेत्रप्रांतांनीं युक्त असलेली ती तशा प्रकारची दमयंती ह्याप्रमाणें मोठ्या काकुळतीनें सांगत असतांनाही राजा कलीनें ग्रस्त झाला असल्यामुळें तिच्याशीं काहीच बोलला नाहीं १६. तेव्हा ते सर्व मंत्री व ते नगरवासी जन "ह्या राजाचा नाश झाला" ह्मणून दुःखाकुल व लज्जित होऊन आपआपल्या घरी परत गेले १७. हे युधिष्ठिरा, पुष्कर आणि नल ह्यांमध्यें त्याप्रमाणें पुष्कळ महिनेपर्यंत द्यूत चाललें व अखेरीस पुण्यश्लोक नलराजा त्यांत हरला १८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षश्लोकात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नलाच्या द्यूताविषयीं एकुणसाठावा अध्याय समाप्त झाला ॥ ५९ ॥

बृहदश्व सांगतातः—द्यूतामध्यें उन्मत्ताप्रमाणें बेहोष झालेल्या पुण्यश्लोक नलराजाला अवलोकन करून उन्मादरहित असलेली दमयंती १ भय आणि शोक ह्यांनीं व्याप्त झाली आणि, हे राजा, नंतर ती भीमकन्यका राजाच्या संबंधानें आपल्या फारच मोठ्या कर्तव्याचा विचार करू लागली २. ह्या द्यूतामुळें राजावर कांहीं अरिष्ट ओढवणार आहे अशी शंका तिला येऊं लागली व त्याचें हित करण्याची इच्छा धरणारी ती दमयंती नलाच्या सर्वस्वाचा अपहार झाला हें समजून आल्यावर अतिविख्यात, कोणतीही गोष्ट घडवून आणण्याविषयीं निपुण, अनुरक्त, हितावह, मृदुभाषिणी आणि सेवेमध्यें तत्पर अशा आपल्या बृहत्सेनानामक दायीला ह्मणाली ३,४ "बृहत्सेने, जा; नलराजाच्या आज्ञेनें अमात्यांना घेऊन ये आणि आपलें द्रव्य गेलें

यद्धृतं द्व्यिमवशिष्टं च यद्वसु ५ ततस्ते मन्त्रिणः सर्वे विज्ञाय नलशासनम् । अपि नो भागधेयं स्यादित्युक्त्वा नलमाव्रजन् ६ तास्तु सर्वाः प्रकृतयो द्वितीयं समुपस्थिताः । न्यवेदयद्भीमसुता न च तत्प्रत्यनन्दत ७ वाक्यमप्रतिनन्दन्तं भर्तारमभिवीक्ष्य सा । दमयन्ती पुनर्वेश्म व्रीडिता प्रविवेश ह ८ निशम्य सततं चाक्षान्पुण्यश्लोकपराङ्मुखान् । नलं च हृतसर्वस्वं धात्रीं पुनरुवाच ह ९ बृहत्सेने पुनर्गच्छ वार्ष्णेयं नलशासनात् । सूतमानय कल्याणि महत्कार्यमुपस्थितम् १० बृहत्सेना तु सा श्रुत्वा दमयन्त्याः प्रभाषितम् । वार्ष्णेयमानयामास पुरुषैराप्तकारिभिः ११ वार्ष्णेयं तु ततो भैमी सान्त्वयञ्श्लक्ष्णया गिरा । उवाच देशकालज्ञा प्राप्तकालमनिन्दिता १२ जानीषे त्वं यथा राजा सम्यग्वृत्तः सदा त्वयि । तस्य त्वं विषमस्थस्य साहाय्यं कर्तुमर्हसि १३ यथायथा हि नृपतिः पुष्करेणेव जीयते । तथातथास्य वै द्यूते रागो भूयोऽभिवर्धते १४ तथा

कितो आणि शिलक राहिलें किती—हें त्यांना विचार " ५. ह्याप्रमाणें बृहत्सेनेनें जाऊन सांगितलें असतां नलाची आज्ञा झाल्याचें समजून " (द्यूतामध्यें बेहोष झालेल्या राजाला द्रव्याची चौकशी करण्याचें ज्याअर्थी सुचलें आहे त्याअर्थी) आमचें नशीबच उघडणार कीं काय " असें ह्मणून ते नलराजाकडे आले ६. तदनंतर ते सर्व मंत्री दुसऱ्यानें दाराशीं येऊन उभे राहिल्याचें भीमकन्येनें नलाला सांगितलें; तथापि त्याला तें रुचलें नाहीं ७. तेव्हां आपल्या सांगण्याकडे पति लक्ष्य देत नाहीं असें अवलोकन करून दमयंती पुनरपि लज्जित होऊन घरामध्यें गेली ८ आणि फांसे एकसारिखे पुण्यश्लोक नलराजाच्या विरुद्ध पडत आहेत आणि नलाच्या सर्वस्वाचा अपहार झालेला आहे असें ऐकून ती पुनरपि दाईला ह्मणाली ९ " बृहत्सेने, पुन्हां वार्ष्णेयाकडे जा आणि नलाची आज्ञा आहे ह्मणून सांगून त्या सारथ्याला घेऊन ये. कारण, हे कल्याणि, आपलें मोठें कर्तव्य बजावण्याची ही वेळ आलेली आहे " १०. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलेलें श्रवण केल्यावर बृहत्सेना इष्ट गोष्ट करणाऱ्या सेवकांसहवर्तमान वार्ष्णेयाला घेऊन आली ११. नंतर मधुरवाणीनें सांत्वन करून कालदेशवर्तमान जाणणारी ती निर्दोष भीमकन्या कालानें प्राप्त झालेली गोष्ट वार्ष्णेयाला सांगू लागली कीं १२ " हे सारथ्या, राजा तुझ्या ठिकाणीं नेहमीं चांगल्या रीतीनें वागत असतो हें तूं जाणीतच आहेस. तस्मात्, सांप्रत संकटांत सांपडलेल्या त्या राजाला साहाय्य करणें तुला योग्य आहे १३. अरे जसा जसा पुष्कर नलराजाला जिंकीत आहे तसा तसा

च पुष्करस्याक्षाः पतन्ति वशवर्तिनः । तथा विपर्ययश्चापि नलस्याक्षेषु दृश्यते १५ सुहृत्स्वजनवाक्यानि यथावन्न शृणोति च । ममापि च तथा वाक्यं नाभिनन्दति मोहितः १६ नूनं मन्ये न दोषोस्ति नैषधस्य महात्मनः । यत्तु मे वचनं राजा नाभिनन्दति मोहितः १७ शरणं त्वां प्रपन्नास्मि सारथे कुरु मद्वचः। न हि मे शुध्यते भावः कदाचिद्विनशेदपि १८ नलस्य दयितानश्वान्योजयित्वा मनोजवान् । इदमारोप्य मिथुनं कुण्डिनं यातुमर्हसि १९ ममज्ञातिषु निक्षिप्य दारकौ स्यन्दनं तथा । अश्वांश्चेमान्यथाकामं वस वान्यत्र गच्छ वा २० दमयन्त्यास्तु तद्वाक्यं वार्ष्णेयो नलसारथिः । न्यवेदयदशेषेण नलामात्येषु मुख्यशः २१ तैः समेत्य विनिश्चित्य सोनुज्ञातो महीपते । ययौ मिथुनमारोप्य विदर्भांस्तेन वाहिना २२ हयास्तत्र विनिक्षिप्य सूतो रथवरं च तम् । इन्द्रसेनां च तां कन्यामिन्द्रसेनं च बालकम् २३ आमन्त्र्य भीमं राजानमार्तः शोचन्नलं नृपम् । अटमानस्ततो-

ह्या राजाच्या द्यूताविषयीं अभिनिवेश अधिक अधिकच वृद्धिगत होत आहे १४. त्याचप्रमाणें पुष्कराला फांसे अगदीं हुकमी पडत आहेत आणि नलराजाला पडत असलेल्या फांशाचे ठिकाणीं उलट प्रकार दृष्टोत्पत्तीस येत आहे १५. सुहृद् आणि स्वजन ह्यांच्या शब्दांकडे तर तो यावें तसें लक्ष्य देत नाहींच आणि त्याचप्रमाणें मोहित झाला असल्यामुळें त्याला माझेंही सांगणें रुचत नाहीं १६. राजा मोहित झाला असल्यामुळें त्याला माझें भाषण रुचत नाहीं ह्यांत खरोखर त्या महात्म्या नलाचा दोष नाहीं असें मला वाटतें १७. हे सारथ्या, मी तुला शरण आलें आहें; तू माझें हें सांगणें एक. अरे हा जो प्रकार चालला आहे त्याविषयीं माझें मन शुद्ध नाहीं; कदाचित्, ह्यामध्यें नलाचा नाशही होईल १८. करितां, मनाप्रमाणें वेगवान् असलेले नलाचे प्रिय अश्व रथाला जोडून आणि हीं दोन मुलें रथामध्यें घालून तूं कुंडिणपुराला चालता हो १९ आणि तेथें गेल्यावर हीं मुलें, हा रथ आणि हे अश्व माझ्या माहेरच्या माणसांचे स्वाधीन करून मग तूं हवा तर तेथें रहा अथवा दुसरीकडे कोठें जा " २०. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितल्यावर त्या वार्ष्णेयनामक नलसारथ्यानें नलराजाच्या मुख्य अमात्यांना तें सर्व निवेदन केलें २१. तेव्हां, हे भूपते युधिष्ठिरा, त्यांनीं एकत्र मिळून तसें करण्याचा निश्चय केला व त्यांची अनुज्ञा झाल्यावर त्या दोघां मुलांना रथांत घालून तो त्या रथाच्या योगानें विदर्भ देशाला गेला २२. तेथें गेल्यावर ते अश्व, तो श्रेष्ठ रथ, ती इंद्रसेना कन्या व इंद्रसेन बालक अशीं तेथें ठेवून २३ आणि भीमराजाचा निरोप घेऊन तो दुःखित झालेला

योध्यां जगाम नगरीं तदा २४ ऋतुपर्णं स राजानमुपतस्थे सुदुःखितः। भृतिं चोपययौ तस्य सारथ्येन महीपते २५ [२३१९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि कुण्डिनं प्रति कुमारकुमारीप्रस्थापने षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥

बृहदश्व उवाच ॥ ततस्तु याते वार्ष्णेये पुण्यश्लोकस्य दीव्यतः। पुष्करेण हृतं राज्यं यच्चान्यद्वसु किंचन १ हृतराज्यं नलं राजन्प्रहसन्पुष्करोऽब्रवीत्। द्यूतं प्रवर्ततां भूयः प्रतिपाणोऽस्ति कस्तव २ शिष्टा ते दमयन्त्येका सर्वमन्यज्जितं मया। दमयन्त्याः पणः साधु वर्ततां यदि मन्यसे ३ पुष्करेणैवमुक्तस्य पुण्यश्लोकस्य मन्युना। व्यदीर्यतेव हृदयं न चैनं किंचिदब्रवीत् ४ ततः पुष्करमालोक्य नलः परममन्युमान्। उत्सृज्य सर्वगात्रेभ्यो भूषणानि महायशाः ५ एकवासा ह्यसंवीतः सुहृच्छोकविवर्धनः। निश्चक्राम ततो राजा त्यक्त्वा सुविपुलां श्रियम् ६ दमयन्त्येकवस्त्राथ गच्छन्तं पृष्ठतोऽन्वगात्। स तया बाह्यतः सार्धं त्रिरात्रं नैषधोऽवसत् ७

व नलराजाकरितां शोक करीत असलेला वार्ष्णेय सारथि हिंडत हिंडत पुनरपि अयोध्या नगरीला गेला २४. नंतर तो अत्यंत दुःखित झालेला वार्ष्णेय सारथि ऋतुपर्ण राजाकडे गेला आणि, हे पृथ्वीपते धर्मराजा, सारथि ह्या नात्यानें तो त्याचा पगार घेऊं लागला २५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं कुंडिणपुराला राजकुमार व राजकन्या पाठविण्याविषयीं साठावा अध्याय समाप्त झाला ॥ ६० ॥

बृहदश्व सांगतात:—वार्ष्णेय सारथि गेल्यानंतर द्यूत करणाऱ्या पुण्यश्लोक नलराजाचें राज्य आणि इतरही जें कांहीं द्रव्य होतें तें सर्व पुष्करानें हरण केलें १ आणि, हे राजा, राज्यापहार झालेल्या नलाला हंसत हंसत पुष्कर ह्मणाला "द्यूत चालूं दे. आतां पणाला लावण्याला तुझ्यापाशीं काय आहे? २. एक दमयंती तुझ्यापाशीं शिलक राहिली आहे; बाकी सर्व मीं जिंकिलें आहे. करितां, इच्छा असेल तर तूं आपला दमयंतीचा पण खुशाल लाव कसा" ३. ह्याप्रमाणें पुष्कर बोलला असतां पुण्यश्लोक नलराजाचें हृदय क्रोधानें जसें कांहीं विदीर्ण झालें; तथापि तो त्याला कांहीं एक ह्मणाला नाहीं ४. तदनंतर पुष्कराकडे पाहून अत्यंत क्रुद्ध झालेल्या महाकीर्तिमान् नलराजानें आपल्या अवयवांपासून भूषणें काढून टाकिलीं ५ आणि पांघरण्यालाही कांहीं एक न घेतां त्या अपार लक्ष्मीचा त्याग करून सुहृदांचा शोक वृद्धिंगत करणारा तो नलराजा फक्त नेसलेल्या वस्त्रासहवर्तमान चालता झाला ६. तेव्हां

पुष्करस्तु महाराज घोषयामास वै पुरे । नले यः सम्यगातिष्ठेत्स गच्छेद्वध्यतां मम ८ पुष्करस्य तु वाक्येन तस्य विद्वेषणेन च । पौरा न तस्य सत्कारं कृतवन्तो युधिष्ठिर ९ स तथा नगराभ्याशे सत्कारार्हो न सत्कृतः । त्रिरात्रमुषितो राजा जलमात्रेण वर्तयन् १० पीड्यमानः क्षुधा तत्र फलमूलानि कर्षयन् । प्रातिष्ठत ततो राजा दमयन्ती तमन्वगात् ११ क्षुधया पीड्यमानस्तु नलो बहुतिथेऽहनि । अपश्यच्छकुनान्कांश्चिद्धिरण्यसदृशच्छदान् १२ स चिन्तयामास तदा निषधाधिपतिर्बली । अस्ति भक्ष्यो ममाद्यायं वसु चेदं भविष्यति १३ ततस्तान्परिधानेन वाससा स समावृणोत् । तस्य तद्वस्त्रमादाय सर्वे जग्मुर्विहायसा १४ उत्पतन्तः खगा वाक्यमेतदाहुस्ततो नलम् । दृष्ट्वा दिग्वाससं भूमौ स्थितं दीनमधोमुखम् १५ वयमक्षाः सुदुर्बुद्धे तव वासो जिहीर्षवः । आगता न हि नः

दमयंतीही त्याचप्रमाणें एका वस्त्रानिशींच त्याच्या मागोमाग निघून गेली व तिच्यासहवर्तमान तो निषधदेशाधिपति नलराजा नगराबाहेर त्रिरात्र राहिला ७. इकडे, हे महाराजा, " नलाशीं जो चांगल्या रीतीनें वागेल त्याचा मी वध करीन " ह्मणून पुष्करानें नगरामध्यें दवंडी दिली ८. तेव्हां पुष्कराची तशी आज्ञा झाल्यामुळें आणि (आपण दोन वेळां राजाला दोन गोष्टी सांगण्याकरितां त्याच्या दाराशीं गेलों असतांही त्यानें आपली परवा केली नाहीं ह्मणून) त्या नलाविषयींही मनांत तिरस्कार उत्पन्न झाला असल्यामुळें, हे युधिष्ठिरा, नगरवासी जनांनीं त्याचा सत्कार केला नाहीं ९. ह्यामुळें सत्कारास पात्र असतांनाही सत्कार न होतां तो राजा नगरासमीप केवळ उदकावर उपजीविका करून तीन दिवस राहिला १०. नंतर क्षुधेनें त्या ठिकाणीं व्याकुल होऊं लागल्यावर फलमूलें पाहण्याकरितां तो राजा तेथून पुढें चालता झाला असतां दमयंतीही त्याच्या मागोमाग गेली ११. ह्याप्रमाणें अनेक दिवसपर्यंत क्षुधेनें पीडित झालेला तो नल मार्गानें जाऊं लागला तेव्हां सुवर्णासारख्या पंखांनीं युक्त असलेले कांहीं पक्षी त्यानें अवलोकन केले १२ आणि " आज मला भक्ष्यही प्राप्त झालें आहे व हें आपल्याला धन ह्मणूनही उपयोगीं पडणार आहे " ह्मणून त्या निषधदेशाधिपति बलाढ्य नलराजानें मनामध्यें आणिलें १३. नंतर नेसावयाचें वस्त्र त्या नलानें त्या पक्ष्यांवर टाकिलें असतां त्याचें तें वस्त्र घेऊन ते सर्वही पक्षी आकाशमार्गानें चालते झाले १४ आणि खाली मान घालून व दीन होऊन भूमीवर उभा राहिलेल्या त्या दिगंबर नलाला अवलोकन करून ते पक्षी उडतां उडतां ह्मणाले १५ " हे मूढमते, आह्मी फांसे असून तुझें वस्त्र हरण करण्याच्या इच्छेनें येथें आलों

प्रीतिः सवाससि गते त्वयि १६ तान्समीपगतानक्षानात्मानं च विवाससम् । पुण्यश्लोकस्तदा राजन्दमयन्तीमथाब्रवीत् १७ येषां प्रकोपादैश्वर्यात्प्रच्युतोऽहमनिन्दिते । प्राणयात्रां न विन्देयं दुःखितः क्षुधयान्वितः १८ येषां कृते न सत्कारमकुर्वन्मयि नैषधाः । इमे ते शकुना भूत्वा वासो भीरु हरन्ति मे १९ वैषम्यं परमं प्राप्तो दुःखितो गतचेतनः । भर्ता तेऽहं निबोधेदं वचनं हितमात्मनः २० एते गच्छन्ति बहवः पन्थानो दक्षिणापथम् । अवन्तीमृक्षवन्तं च समतिक्रम्य पर्वतम् २१ एष विन्ध्यो महाशैलः पयोष्णी च समुद्रगा । आश्रमाश्च महर्षीणां बहुमूलफलान्विताः २२ एष पन्था विदर्भाणामसौ गच्छति कोसलान् । अतःपरं च देशोऽयं दक्षिणे दक्षिणापथः २३ एतद्वाक्यं नलो राजा दमयन्तीं समाहितः । उवाचासकृदार्तो हि भैमीमुद्दिश्य भारत २४ ततः सा बाष्पकलया वाचा दुःखेन कर्शिता । उवाच दमयन्ती तं नैषधं करुणं वचः २५ उद्विजते मे हृदयं सीदन्त्यङ्गानि सर्वशः । तव पार्थिव संकल्पं चिन्तयन्त्याः पुनः

होतो. कारण, तू बरोबर एक वस्त्र घेऊन गेल्यामुळें आमच्या मनाला नीट वाटेना" १६. ह्याप्रमाणे त्यांनीं सांगितलें असतां त्या समीप असलेल्या फांशांकडे आणि वस्त्ररहित अशा आपणा स्वतःकडे पाहून, हे धर्मराजा, तो पुण्यश्लोक नल दमयंतीला ह्मणाला १७ "हे निर्दोष स्त्रिये, ज्यांच्या कोपामुळें मी ऐश्वर्यापासून भ्रष्ट झालों आणि दुःखित व क्षुधित झाला असतां प्राणयात्रा (चालण्यापुरतें भक्ष्य) मला प्राप्त होत नाहीं १८ व ज्यांच्याकरितां निषध देशांत रहाणाऱ्या लोकांनीं माझा सत्कार केला नाहीं ते फांसे पक्षी होऊन, हे भीरु, माझें वस्त्र हरण करीत आहेत १९. माझ्या संकटाची तर अगदी सीमाच झालेली आहे व त्यामुळें मी तुझा भर्ता दुःखित झालों असून मला कांहीं एक सुचेनासें झालें आहे. ह्याकरितां, आपल्या हिताचें हें माझें सांगणें तूं ऐक २०. अवंती आणि ऋक्षवान् पर्वत ह्यांवरून हे अनेक मार्ग दक्षिण देशाला जात आहेत २१. हा विंध्याद्रि महापर्वत आहे, ही समुद्रगामिनी पयोष्णी नदी आहे आणि विपुल फलमूलांनीं युक्त असे हे महर्षींचे आश्रम आहेत २२. हा मार्ग (तुझ्या) विदर्भ देशाकडे जात आहे, हा कोसल देशाला चालला आहे आणि ह्याच्यापुढें दक्षिणेस हा दक्षिणापथ देश आहे" २३. हेंच भाषण, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, भीमकन्येला उद्देशून त्या दुःखित नलराजानें स्वस्थांतःकरणपूर्वक वारंवार केलें २४. तेव्हां दुःखानें कृश झालेली ती दमयंती अश्रूंच्या योगानें अस्पष्ट व ह्मणूनच उमटत नसलेल्या वाणीनें त्या निषधाधिपति नलराजाशीं दीन भाषण करूं लागली कीं २५ "हे राजा,

पुनः २६ हृतराज्यं हृतद्रव्यं विवस्त्रां क्षुच्छ्रमान्वितम् । कथमुत्सृज्य गच्छे-
यमहं त्वां निर्जने वने २७ श्रान्तस्य ते क्षुधार्तस्य चिन्तयानस्य तत्सु-
खम् । वने घोरे महाराज नाशयिष्याम्यहं क्लमम् २८ न च भार्यासमं
किंचिद्विद्यते भिषजां मतम् । औषधं सर्वदुःखेषु सत्यमेतद्ब्रवीमि ते २९
नल उवाच ॥ एवमेतद्यथात्थ त्वं दमयन्ति सुमध्यमे । नास्ति भार्यासमं
मित्रं नरस्यार्तस्य भेषजम् ३० न चाहं त्यक्तुकामस्त्वां किमलं भीरु
शङ्कसे । त्यजेयमहमात्मानं न चैव त्वामनिन्दिते ३१ दमयन्त्युवाच ॥
यदि मां त्वं महाराज न विहातुमिहेच्छसि । तत्किमर्थं विदर्भाणां पन्थाः
समुपदिश्यते ३२ अवैमि चाहं नृपते न तु मां त्यक्तुमर्हसि । चेतसा
त्वपकृष्टेन मां त्यजेथा महीपते ३३ पन्थानं हि ममाभीक्ष्णमाख्यासि च
नरोत्तम । अतोनिमित्तं शोकं मे वर्धयस्यमरोपम ३४ यदि चायमभि-
प्रायस्तव ज्ञातीन्व्रजेदिति । सहितावेव गच्छावो विदर्भान्यदि मन्यसे ३५

तुझ्या ह्या उद्देशाचा मी फिरून फिरून विचार करीत आहें व त्यामुळें माझें मन उद्विग्न होत असून माझे हातपाय तर अगदीं मोडले आहेत २६. अरे, राज्य व द्रव्य ह्यांचा अपहार होऊन वस्त्ररहित आणि क्षुधा व श्रम ह्यांनीं व्याप्त झालेल्या तुला ह्या निर्जन वनामध्यें सोडून कशी बरें जाऊं ? २७. श्रांत व क्षुधार्त अशा तुला त्या सुखाची आठवण होऊं लागली असतां, हे महाराज, घोरवनामध्यें मी तुझे श्रम परिहार करीन २८. कोणतेंही दुःख झालें असतां भार्येसारिखें दुसरें कोणतेंही औषध वैद्यांना अभिमत नाहीं हें मी आपणांला सत्य सांगतें " २९. नल ह्मणतोः—हे सुंदरि दमयंति, दुःखित पुरुषाला भार्येसमान मित्र अथवा औषध नाहीं, हें जें तूं ह्मणतेस तें बरोबर आहे ३०. हे भीरु, तुझा त्याग करण्याचे माझ्या मनांत नाहीं; तस्मात्, तूं कशाकरितां ही हवीतसली शंका घेत आहेस ? हे निर्दोष स्त्रिये, मी स्वतःचा त्याग करीन परंतु तुझा करणारच नाही ३१. दमयंती ह्मणतेः—हे महाराज, आपण जर ह्या ठिकाणीं माझा त्याग करण्याची इच्छा करीत नाहीं तर विदर्भ देशाचा मार्ग कां ह्मणून दाखवीत आहांत ? ३२. हे नराधिपते, आपण माझा त्याग करणार नाहीं हें मी जाणीत आहें; परंतु, हे भूपते, आपलें चित्त जाग्यावर नसल्यामुळें आपण माझा त्याग करीत आहांत ३३. हे पुरुषश्रेष्ठ, आपण वारंवार मला (विदर्भ देशाचा) मार्ग सांगत आहांत आणि ह्यामुळें, हे देवतुल्य भूपते, आपण माझा शोक वृद्धिंगत करीत आहांत ३४. " ह्या स्त्रीनें माहेरच्या माणसांकडे जावें " असा जर आपला अभिप्राय असेल तर आपली इच्छा असल्यास आपण उभयतां

विदर्भराजस्तत्र त्वां पूजयिष्यति मानद। तेन त्वं पूजितो राजन्सुखं वत्स्यसि नो गृहे३६ [२३५५] इति श्रीमहाभारते० संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलवनयात्रायामेकषष्टितमोध्यायः ॥ ६१ ॥

नल उवाच ॥ यथा राज्यं तव पितुस्तथा मम न संशयः । न तु तत्र गमिष्यामि विषमस्थः कथंचन १ कथं समृद्धो गत्वाहं तव हर्षविवर्धनः । परिच्युतो गमिष्यामि तव शोकविवर्धनः २ बृहदश्व उवाच ॥ इति ब्रुवन्नलो राजा दमयन्तीं पुनः पुनः । सान्त्वयामास कल्याणीं वाससोर्धेन संवृताम् ३ तावेकवस्त्रसंवीतावटमानावितस्ततः । क्षुत्पिपासापरिश्रान्तौ सभां कांचिदुपेयतुः ४ तां सभामुपसंप्राप्य तदा स निषधाधिपः । वैदर्भ्या सहितो राजा निषसाद महीतले ५ स वै विवस्त्रो विकचो मलिनः पांसुगुण्ठितः । दमयन्त्या सह श्रान्तः सुष्वाप धरणीतले ६ दमयन्त्यपि कल्याणी निद्रयापहृता ततः । सहसा दुःखमासाद्य सुकुमारी तपस्विनी ७ सुप्तायां दमयन्त्यां तु नलो राजा विशांपते । शोको-

बरोबरच विदर्भ देशाला जाऊं ३५ हे मानी भूपते, त्या ठिकाणीं विदर्भराजा तुमचा सत्कार करील आणि त्यानें सत्कार केला असतां आपण आमच्या घरीं सुखानें रहाल ३६. ह्याप्रमाणे महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नलाच्या वनयात्रेविषयीं एकसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥६१॥

नल ह्मणतोः— जसें तुझ्या पित्याचें राज्य आहे तसें माझेंही राज्य निःसंशय होतें. ह्यास्तव, संकटांत असलेला मी, कांहीं झालें तरी, तिकडे जाणार नाहीं १. कारण, मी समृद्ध स्थितीमध्यें तिकडे जाऊन तुझा हर्ष वृद्धिंगत होण्यास कारणीभूत झालों असतांना सांप्रत वैभवापासून भ्रष्ट झालेला मी तेथें जाऊन तुझा शोक वृद्धिंगत करण्यास कसा कारणीभूत होऊं ? २. बृहदश्व सांगतातः— ह्याप्रमाणें संभाषण करणाऱ्या नलराजानें अर्धवस्त्रानें आच्छादित असलेल्या कल्याणी दमयंतीचें पुन्हां पुन्हां सांत्वन केलं ३. ह्याप्रमाणें एका वस्त्रानें शरीर आच्छादित केलेले ते स्त्रीपुरुष हिकडे तिकडे हिंडतां हिंडतां क्षुधेनें व तृषेनें व्याकुल होऊन एका खोपटापाशीं आले ४ आणि त्या खोपटापाशीं आल्यावर तो निषधदेशाधिपति नलराजा वैदर्भीसहवर्तमान भूतलावरच बसला ५. नंतर वस्त्ररहित, केसमोकळेसोडलेला, मलिन व धुळीनें भरलेला असा तो नलराजा भूतलावरच निजला ६ व एकदम मार्गक्रमणाचें दुःख झाल्यामुळें त्या बिचाऱ्या सती सुकुमार दमयंतीलाही निद्रेनें घेरलें ७. नंतर, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, दमयंती निद्रिस्थ झाली असतां शोकानें ज्याचें अंतःकरण क्षुब्ध झालें

न्मथितचित्तात्मा न स्म शेते यथापुरा ८ स तद्राज्यापहरणं सुहृत्त्यागं च सर्वशः । वने च तं परिध्वंसं प्रेक्ष्य चिन्तामुपेयिवान् ९ किं नु मे स्यादिदं कृत्वा किं नु मे स्यादकुर्वतः । किं न मे मरणं श्रेयः परित्यागो जनस्य वा १० मामियं ह्यनुरक्तैवं दुःखमाप्नोति मत्कृते । मद्विहीना त्वियं गच्छेत्कदाचित्स्वजनं प्रति ११ मयि निःसंशयं दुःखमियं प्राप्स्यत्यनुव्रता । उत्सर्गे संशयः स्यात्तु विन्देतापि सुखं क्वचित् १२ स विनिश्चित्य बहुधा विचार्य च पुनः पुनः । उत्सर्गं मन्यते श्रेयो दमयन्त्या नराधिप १३ न चैषा तेजसा शक्या कैश्चिद्धर्षयितुं पथि । यशस्विनी महाभागा मद्भक्तेयं पतिव्रता १४ एवं तस्य तदा बुद्धिर्दमयन्त्यां न्यवर्तत । कलिना दुष्टभावेन दमयन्त्या विसर्जने १५ सोऽवस्त्रतामात्मनश्च तस्याश्चाप्येकवस्त्रताम् । चिन्तयित्वाध्यगाद्राजा वस्त्रार्धस्यावकर्तनम् १६ कथं वासो

आहे अशा नलराजाला पूर्वीप्रमाणें निद्रा येईना ८. तो राज्याचा अपहार, तो सुहृदांचा त्याग आणि वनामध्यें प्राप्त झालेली ती दुःस्थिति अवलोकन करून तो चिंतन करूं लागला कीं ९ " असें केल्यानें माझें काय होईल आणि न केल्यानें तरी काय होईल ? अशा अवस्थेंत रहाण्यापेक्षां त्या बायकोमाणसाचा त्याग करून जाणें अथवा मरण स्वीकारणें अधिक चांगलें नाहीं काय ? १०. माझे ठिकाणीं ही स्त्री प्रेम करीत आहे आणि ह्मणून माझ्याकरितां हिला ह्याप्रमाणें दुःख सोसावें लागत आहे. ह्यास्तव, माझा वियोग झाला असतां ही कदाचित् माहेरच्या माणसांकडे तरी जाऊन (सुखानें) राहील ११. ह्या पतिव्रतेला माझ्याजवळ मात्र राहून दुःख प्राप्त होईल आणि त्याग केला असतां हिला दुःख प्राप्त होईल किंवा नाही ह्याविषयीं संशय आहे. (कदाचित् जर दुःख प्राप्त झाले तर सध्यांपेक्षां जास्त तें काय होणार आहे ? परंतु ही जर माहेरीं गेली तर) कदाचित् हिला सुखही प्राप्त होईल " १२. ह्याप्रमाणें अनेक प्रकारें बेत करून फिरून फिरून विचार केल्यावर, हे नराधिपते, दमयंतीला सोडून जाणेंच बरें असें त्याला वाटलें १३. " तेजामुळें मार्गामध्यें कोणालाही हिच्यावर हल्ला करितां येणें शक्य नाहीं; कारण, ही पतिव्रता स्त्री माझ्या सेवेमध्यें तत्पर राहणारी असून महाभाग्यवती व यशस्विनी आहे " १४. ह्याप्रमाणें दुरात्म्या कलीच्या योगानें दमयंतीचा त्याग करण्याविषयीं त्या राजाची बुद्धि झाली आणि ती बरोबर असण्याविषयीं त्याचें मत फिरलें १५. स्वतःला मुळींच वस्त्र नाहीं आणि तिला तर एकच वस्त्र आहे ह्याचा विचार करून नलराजानें दमयंतीचें अर्धे वस्त्र फाडून काढण्याचें मनामध्यें आणिलें १६ आणि

विकर्तेयं न च बुध्येत मे प्रिया । विचिन्त्यैवं नलो राजा सभां पर्यच-रत्तदा १७ परिधावन्नथ नल इतश्चेतश्च भारत । आससाद सभोद्देशे विकोशं खड्गमुत्तमम् १८ तेनार्धं वाससश्छित्त्वा निवस्य च परंतपः । सुतामुत्सृज्य वैदर्भीं प्राद्रवद्गतचेतनाम् १९ ततो निवृत्तहृदयः पुनरागम्य तां सभाम् । दमयन्तीं तदा दृष्ट्वा रुरोद निषधाधिपः २० यां न वायुर्न चादित्यः पुरा पश्यति मे प्रियाम् । सेयमद्य सभामध्ये शेते भूमावनाथवत् २१ इयं वस्त्रावकर्तेन संवीता चारुहासिनी । उन्मत्तेव वरारोहा कथं बुद्ध्वा भविष्यति २२ कथमेका सती भैमी मया विरहिता शुभा । चरिष्यति वने घोरे मृगव्यालनिषेविते २३ आदित्या वसवो रुद्रा अश्विनौ समरुद्गणौ । रक्षन्तु त्वां महाभागे धर्मेणासि समावृता २४ एवमुक्त्वा प्रियां भार्यां रूपेणाप्रतिमां भुवि । कलिनापहृतज्ञानो नलः प्रातिष्ठदु-द्यतः २५ गत्वा गत्वा नलो राजा पुनरेति सभां मुहुः । आकृष्यमाणः

'मी हें वस्त्र माझी प्रिया जागी होणार नाहीं अशा रीतीनें फाडूं कसें ? " असा पुन्हां पुन्हां विचार मनांत आणून नलराजा त्या खोपटाभोंवती हिंडूं लागला १७. नंतर इकडे तिकडे धांवाधांव करितां करितां, भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, त्या खोपटा-जवळच त्याला एक उत्कृष्ट नंगी तलवार सांपडली १८. तिच्या योगानें अर्धे वस्त्र कापून काढून परिधान केल्यावर तो शत्रुतापन नलराजा मूर्छित झाल्याप्रमाणें निद्रिस्थ असलेल्या दमयंतीला सोडून चालता झाला १९. तदनंतर (दयेच्या योगानें पुनरपि अंतःकरणानें उलट खाल्ल्यामुळें तो निषधदेशाधिपति नलराजा पुनरपि त्या खोपटा-पाशीं आला आणि दमयंतीला अवलोकन करून रुदनपूर्वक शोक करूं लागला कीं २० " जी माझी प्रिया पूर्वीं सूर्याच्या अथवा वायूच्याही दृष्टीं पडत नसे ती आज ह्या खोपटामध्यें अनाथाप्रमाणें भूमीवर शयन करीत आहे २१. ह्या कातरलेल्या वस्त्रानें आच्छादित असलेली ही सुहास्यवदना सुंदरी जागी झाल्यानंतर कशी बरें बावरल्यासारखी होऊन जाईल ? २२. माझा वियोग झालेली ही शुभ व पतिव्रता भीमकन्या श्वापदांनीं व सर्पांनीं सेवित असलेल्या ह्या घोर वनामध्यें कशी बरें एकटी संचार करील ? २३. हे महा भाग्यवति, तूं धर्मानें अवगुंठित झालेली आहेस; ह्यास्तव, आदित्य, वसु, रुद्र आणि मरुद्गणांसहवर्तमान अश्विनीकुमार हे तुझें रक्षण करोत २४". ह्याप्रमाणें रूपानें पृथ्वीमध्यें अप्रतिम असलेल्या आपल्या प्रिय भार्येला उद्देशून भाषण केल्यावर कलीनें विवेकशून्य झालेला नलराजा उठून चालूं लागला २५. तो नलराजा जाऊन जाऊन पुन्हांपुन्हां त्या खोपटापाशीं येत असे. कारण, कलि त्याला तेथून

कलिना सौहृदेनावकृष्यते २६ द्विधेव हृदयं तस्य दुःखितस्याभवत्तदा । दोलेव मुहुरायाति याति चैव सभां प्रति २७ अवकृष्टस्तु कलिना मोहितः प्राद्रवन्नलः । सुप्तामुत्सृज्य तां भार्यां विलप्य करुणं बहु २८ नष्टात्मा कलिना स्पृष्टस्तत्तद्विगणयन्नृपः । जगामैकां वने शून्ये भार्यामुत्सृज्य दुःखितः २९ [२३८४] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीपरित्यागे द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥

बृहदश्व उवाच ॥ अपक्रान्ते नले राजन्दमयन्ती गतक्लमा । अबुध्यत वरारोहा संत्रस्ता विजने वने १ अपश्यमाना भर्तारं शोकदुःखसमन्विता । प्राक्रोशदुच्चैः संत्रस्ता महाराजेति नैषधम् २ हा नाथ हा महाराज हा स्वामिन्किं जहासि माम् । हा हतास्मि विनष्टास्मि भीतास्मि विजने वने ३ ननु नाम महाराज धर्मज्ञः सत्यवागसि । कथमुक्त्वा तथा सत्यं सुप्तामुत्सृज्य कानने ४ कथमुत्सृज्य गन्तासि दक्षां भार्यामनुव्रताम् । विशेषतोऽनपकृते

दूर नेत असे व दया दमयंतीसमीप त्याला ओढून आणीत असे २६. सारांश, त्या दुःखित नलराजाचें हृदय द्विधा झालें व झोपाळ्याप्रमाणें त्याची स्थिति होऊन तो वारंवार दूर जाऊं लागला व खोपटापाशीं येऊं लागला २७. असें होतां होतां करुणस्वरानें फारच विलाप करून कलीनें पछाडलेला आणि म्हणूनच मोहित झालेला तो नलराजा त्या निद्रिस्थ भार्येला सोडून चालता झाला २८. सारांश, कलीनें घेरल्यामुळें कशाचीही परवा न करितां तो विवेकशून्य बनलेला दुःखित राजा निर्जन वनामध्यें भार्येला एकटी टाकून चालता झाला २९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं दमयंतीचा त्याग करण्याविषयीं बासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६२ ॥

बृहदश्व सांगतातः—हे राजा, नल निघून गेल्यावर श्रमपरिहार होऊन त्याची भार्या सुंदरी दमयंती जागी झाली आणि निर्जन वनामध्यें भिऊं लागली १. शोक आणि दुःख ह्यांनीं व्याप्त झालेल्या त्या दमयंतीला जेव्हां पति दृष्टीं पडेना तेव्हां ती फारच भयभीत झाली आणि "हे महाराज" म्हणून नलाला उद्देशून उच्च स्वरानें आक्रोश करूं लागली २. (दमयंती म्हणते) हे नाथ, हे महाराज, हे प्रभो, आपण माझा कां त्याग करितां ? हे दैवा, माझा घात झाला, माझा नाश झाला. अरे, मी ह्या निर्जन वनामध्यें भिऊन गेलें आहें ३. हे महाराज, तूं धर्मज्ञ असून सत्यवचनी आहेस; परंतु, स्वयंवरसमयीं तशाप्रकारें सत्य भाषण करून आतां रे कां मला अरण्यामध्यें निद्रिस्थ सोडून जात आहेस ? ४. अरे, मी विशेषतः अनप-

परेणापकृते सति ५ शक्यसे ता गिरः सत्यकर्तुं मयि नरेश्वर । यास्त्वयां लोकपालानां संनिधौ कथिताः पुरा ६ नाकाले विहितो मृत्युर्मर्त्यानां पुरुषर्षभ । यत्र कान्ता त्वयोत्सृष्टा मुहूर्तमपि जीवति ७ पर्याप्तः परिहासोऽयमेतावान्पुरुषर्षभ । भीताहमतिदुर्धर्ष दर्शयात्मानमीश्वर ८ दृश्यसे दृश्यसे राजन्नेष दृष्टोऽसि नैषध । आवार्य गुल्मैरात्मानं किं मां न प्रतिभाषसे ९ नृशंसं बत राजेन्द्र यन्मामेवंगतामिह । विलपन्तीं समागम्य नाश्वासयसि पार्थिव १० न शोचाम्यहमात्मानं न चान्यदपि किंचन । कथं नु भवितास्येक इति त्वां नृप शोचिमि ११ कथं नु राजंस्तृषितः क्षुधितः श्रमकर्शितः । सायाह्ने वृक्षमूलेषु मामपश्यन्भविष्यसि १२ ततः सा तीव्रशोकार्ता प्रदीप्तेव च मन्युना । इतश्चेतश्च रुदती पर्यधावत दुःखिता १३ मुहुरुत्पतते बाला मुहुः पतति विह्वला । मुहुरालीयते भीता मुहुः क्रोशति रोदिति १४ अतीव शोकसंतप्ता मुहुर्निःश्वस्य

राधी असतांनाही जरी शत्रूनें अपकार केला आहे, तथापि तुझ्याविषयीं दक्ष व तूं सांगशील त्याप्रमाणें वागणाऱ्या मज भार्येला सोडून तूं कोठें रे जात आहेस ? ५. हे नराधिपा, त्या लोकपालांच्या संनिध माझ्यासंबधानें जे तूं शब्द पूर्वी उच्चारिलेस ते यथार्थ करण्यास तूं समर्थ आहेस ६. ज्याअर्थी तूं त्याग केलेली ही कांता एक क्षणभर तरी जिवंत राहिली आहे त्याअर्थी, हे पुरुषश्रेष्ठा, वेळ आल्यावांचून मर्त्यांना मृत्यु येत नाहीं (हीच गोष्ट खरी आहे) ७. हे पुरुषश्रेष्ठा, आतां ही थट्टा पुरे झाली. हे अतिदुर्जया, मी भयभीत झालें आहे रे ! हे प्रभो, आतां मला येऊन भेट ८. हे राजा, दिसलास दिसलास रे मला ! हे नैषधा, अरे हा दिसलास रे ! अरे, झुडपांच्या आड दडून माझ्याशीं कां रे भाषण करीत नाहींस? ९. हे पृथ्वीपते राजेंद्रा, अशा अवस्थेला जाऊन पोंचलेली मी ह्या ठिकाणीं विलाप करीत असतांनाही तूं जवळ येऊन मला धीर देत नाहींस हें खरोखर वाईट आहे १०. हे राजा, मला स्वतःकरितां वाईट वाटत नसून दुसऱ्याही कशाकरितां मी शोक करीत बसलें नाहीं; परंतु, हे राजा, तूं एकटा कसा रे राहशील ह्मणून मी शोक करीत आहें ११. हे राजा, श्रमानें थकून जाऊन क्षुधार्त व तृषाक्रांत झालेल्या तुला मी सायंकालीं वृक्षमूलाजवळ दृष्टी पडलें नाहीं ह्मणजे तुझी काय रे अवस्था होईल ! " १२. याप्रमाणें तीव्र शोकानें घेरलेली आणि रागानें जशी कांहीं पेटलेली ती दमयंती दुःखित होऊन रडत रडत इकडे तिकडे धांवूं लागली १३. ती बाला वरचेवर उठत असे; वरचेवर विह्वल होऊन पडत असे; वारंवार भयभीत होऊन दडत असे

विह्वला । उवाच भैमी निःश्वस्य रुदत्यथ पतिव्रता १५ यस्याभिशापा-
द्दुःखार्तो दुःखं विन्दति नैषधः । तस्य भूतस्य नो दुःखाद्दुःखमप्यधिकं
भवेत् १६ अपापचेतसं पापो य एवं कृतवान्नलम् । तस्माद्दुःखतरं प्राप्य
जीवत्वसुखजीविकाम् १७ एवं तु विलपन्ती सा राज्ञो भार्या महात्मनः ।
अन्वेषमाणा भर्तारं वने श्वापदसेविते १८ उन्मत्तवद्भीमसुता विलपन्ती
इतस्ततः । हा हा राजन्निति मुहुरितश्चेतश्च धावति १९ तां क्रन्दमानाम-
त्यर्थं कुररीमिव वाशतीम् । करुणं बहु शोचन्तीं विलपन्तीं मुहुर्मुहुः २०
सहसाभ्यागतां भैमीमभ्याशपरिवर्तिनीम् । जग्राहाजगरो ग्राहो महाकायः
क्षुधान्वितः २१ सा ग्रस्यमाना ग्राहेण शोकेन च परिप्लुता । नात्मानं
शोचति तथा यथा शोचति नैषधम् २२ हा नाथ मामिह वने ग्रस्यमा-
नामनाथवत् । ग्राहेणानेन विजने किमर्थं नानुधावसि २३ कथं भवि-
ष्यसि पुनर्मामनुस्मृत्य नैषध । कथं भवाञ्जगामाद्य मामुत्सृज्य वने

आणि एकसारखी आक्रोश करून रडत असे १४. ह्याप्रमाणें अत्यत शोकसंतप्त व विह्वल झालेली पतिव्रता भीमकन्या वारंवार दीर्घ सुस्कारे टाकून टाकून रडत रडत ह्मणाली १५ " ज्याच्या द्वेषामुळें दुःखपीडित झालेल्या नैषधराजाला दुःख होत आहे त्या प्राण्याला आमच्याही दुःखापेक्षां अधिक दुःख होईल १६. अरे, निष्पाप अंतःकरणानें युक्त असलेल्या नलाला ज्या पाप्यानें अशी अवस्था आणिली त्याला त्या नलापेक्षांही अधिक दुःख प्राप्त होऊन तो दुःखानें आपलें जीवित कंठो १७. ह्याप्रमाणें विलाप करणारी त्या महात्म्या नलराजाची भार्या श्वापदांनीं युक्त असलेल्या त्या वनामध्यें भर्त्याला शोधूं लागली १८. सारांश, " हे राजा, हे राजा, " असा वारंवार विलाप करीत असलेली ती भीमकन्या उन्मत्त झाल्याप्रमाणें इकडे तिकडे धांवूं लागली १९. तेव्हां आक्रोश करणारी कुररीच कीं काय अशा रीतीनें ओरडणारी आणि अतिशय करुणस्वरानें शोक करून वारंवार विलाप करीत असलेली २० ती भीमकन्या एकाएकीं जवळ आली असतां शरीरानें धिप्पाड असलेल्या एका क्षुधित अजगरानें त्या जवळ असलेल्या भीमकन्येला धरिलें २१. ह्याप्रमाणें शोकानें अगदीं ग्रासून टाकिलेल्या त्या दमयंतीला अजगर गट्ट करीत असतांही नलराजाकरितां होत असलेल्या दुःखाप्रमाणें तिला स्वतःकरितां दुःख होईना २२. (ती ह्मणाली) " हे नाथ, अनाथाप्रमाणें हा अजगर ह्या निर्जन वनामध्यें मला गिळीत असतांनाही तूं कशा करितां धाऊन येत नाहींस ? २३. हे नैषधा, (आतां जर तूं मला सोडविलें नाहींस तर) पुनरपि माझें स्मरण झालें ह्मणजे तुझें कसें रे होईल ?

प्रभो २४ पापान्मुक्तः पुनर्लब्ध्वा बुद्धिं चेतो धनानि च २५ श्रान्तस्य ते क्षुधार्तस्य परिग्लानस्य नैषध । कः श्रमं राजशार्दूल नाशयिष्यति तेनघ २६ ततः कश्चिन्मृगव्याधो विचरन्गहने वने । आक्रन्दमानां संश्रुत्य जवेनाभिससार ह २७ तां तु दृष्ट्वा तथा ग्रस्तामुरगेणायतेक्षणाम् । त्वरमाणो मृगव्याधः समभिक्रम्य वेगतः २८ मुखतः पाटयामास शस्त्रेण निशितेन च । निर्विचेष्टं भुजङ्गं तं विशस्य मृगजीवनः २९ मोक्षयित्वा स तां व्याधः प्रक्षाल्य सलिलेन ह । समाश्वास्य कृताहारामथ पप्रच्छ भारत ३० कस्य त्वं मृगशावाक्षि कथं चाभ्यागता वनम् । कथं चेदं महत्कृच्छ्रं प्राप्तवत्यसि भाविनि ३१ दमयन्ती तथा तेन पृच्छ्यमाना विशांपते । सर्वमेतद्यथावृत्तमाचचक्षेऽस्य भारत ३२ तामर्धवस्त्रसंवीतां पीनश्रोणिपयोधराम् । सुकुमारानवद्याङ्गीं पूर्णचन्द्रनिभाननाम् ३३ अरालपक्ष्मनयनां तथा मधुरभाषिणीम् । लक्षयित्वा मृगव्याधः कामस्य वशमीयिवान् ३४ तामेवं

हे प्रभो, ह्या वनामध्यें मला सोडून तूं आज कसा रे गेलास ? २४. अरे, हें नष्टचर्य संपल्यावर पुनरपि तुला विवेक, भान आणि द्रव्य हीं प्राप्त झालीं असतां माझें स्मरण झालें ह्मणजे तुझें कसें रे होईल ? २५. हे नैषधा, श्रांत व क्षुधार्त झाल्यामुळें तुला फारच ग्लानि आली असतां, हे नृपश्रेष्ठा, हे निष्पापा, कोण रे तुझा श्रमपरिहार करील ? " २६. ह्याप्रमाणें ती दमयंती आक्रोश करीत असल्याचें श्रवण करून त्या गहन वनामध्यें संचार करीत असलेला एक पारधि वेगानें तिच्या जवळ आला २७ आणि अजगरानें त्या दीर्घनेत्रांनीं युक्त असलेल्या दमयंतीला ग्रासून टाकिलें आहे असें अवलोकन केल्याबरोबर तो त्वरेनें पुढें येत असलेला पारधि वेगावेगानेंच पुढें सरसावला २८ आणि धार लावलेल्या शस्त्रानें तो अजगर त्यानें मुखापासून फाडून टाकिला. ह्याप्रमाणें तो भुजंग फाडून व मारून त्या पारध्यानें २९ तिची सुटका केली. नंतर उदकानें तिला धुऊन काढल्यावर व तिनें कांहीं भक्षण केल्यावर, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तिला धीर देऊन तो पारधि विचारूं लागला कीं ३०, " हे हरिणाक्षि, तूं कोणाची ? वनामध्यें कशी आलीस ? आणि, हे स्त्रिये, तुला हें महासंकट कसें प्राप्त झालें ? " ३१. ह्याप्रमाणें, हे भरतकुलोत्पन्ना प्रजाधिपते धर्मराजा, तो पारधि तिला विचारूं लागला असतां दमयंतीनें त्याला हें सर्व वर्तमान इत्थंभूत सांगितलें ३२. तेव्हां अर्धवस्त्रानें आच्छादित, पुष्ट कटिप्रदेश व स्तन ह्यांनी युक्त, सुकुमार आणि निर्दोष अवयव, पूर्णचंद्राप्रमाणें मुख ३३ आणि कुटिल केशाग्रांनीं युक्त असलेले नेत्र ह्यांनीं संपन्न असलेल्या त्या मधुरभाषिणी दमयंतीला पाहून तो व्याध अगदीं कामाधीन

श्लक्ष्णया वाचा लुब्धको मृदुपूर्वया । सान्त्वयामास कामार्तस्तदबुध्यत भाविनी ३५ दमयन्त्यपि तं दुष्टमुपलभ्य पतिव्रता । तीव्ररोषसमाविष्टा प्रजज्वालेव मन्युना ३६ स तु पापमतिः क्षुद्रः प्रधर्षयितुमातुरः । दुर्धर्षां तर्कयामास दीप्तामग्निशिखामिव ३७ दमयन्ती तु दुःखार्ता पतिराज्यविनाकृता । अतीतवाक्पथे काले शशापैनं रुषान्विता ३८ यद्यहं नैषधादन्यं मनसापि न चिन्तये । तथायं पततां क्षुद्रः परासुर्मृगजीवनः ३९ उक्तमात्रे तु वचने तथा स मृगजीवनः । व्यसुः पपात मेदिन्यामग्निदग्ध इव द्रुमः ४० [२४२४]इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वण्यजगग्रस्तदमयन्तीमोचने त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥

बृहदश्व उवाच ॥ सा निहत्य मृगव्याधं प्रतस्थे कमलेक्षणा । वनं प्रतिभयं शून्यं झिल्लिकागणनादितम् १ सिंहद्वीपिरुरुव्याघ्रमहिषर्क्षगणै-

---

होऊन गेला ३४. असो. तो कामपीडित झालेला व्याध मृदुशब्दपूर्वक मधुर वाणीनें तिचें ह्याप्रमाणें सांत्वन करूं लागला असतां त्या स्त्रीनें तें जाणिलें ३५. इतकेंच नव्हे परतु, तो दुष्ट आहे असें जाणून प्रचंड कोपानें युक्त झालेली ती दमयंती रागानें जशी कांहीं जळफळूं लागली ३६. तव्हां बलात्कार करण्याविषयीं अगदीं उत्सुक झालेल्या त्या पापबुद्धि नीच व्याधाला प्रदीप्त अग्निज्वालेप्रमाणें तिच्या अगावर हात टाकणें भयंकर आहे असें वाटलें ३७. तथापि नुसती तोंडानें विनति करून संकट टळण्याचा हा समय नव्हे असें त्या पतिहीन व राज्यहीन झालेल्या दुःखाकुल क्रुद्ध दमयंतीला वाटल्यावर तिनें त्या व्याधाला शाप दिला कीं ३८ " जर मी नलाशिवाय अन्य पुरुष मनामध्येंही आणिला नसेल तर हा नीच व्याध गतप्राण होऊन पडो ३९ ". असें ह्मणण्याबरोबर अग्नीनें दग्ध झालेल्या वृक्षाप्रमाणें तो व्याध गतप्राण होऊन पृथ्वीवर पडला ४० ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं अजगरानें ग्रासून टाकिलेल्या दमयंतीच्या सुटकेविषयीं त्रेसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६३ ॥

बृहदश्व सांगतातः—मृगव्याधाला मारून ती कमलाक्षी दमयंती झिल्लिकासंज्ञक पतगसमुदायाच्या योगानें नादित व शून्य अशा त्या भयंकर वनामध्यें चालली १. सिंह, चित्ते, रुरु, व्याघ्र, महिष व अस्वलें ह्यांच्या समुदायांनीं युक्त अललेलें तें वन नानाप्रकारच्या पक्षिसमुदायांनीं गजबजलेलें असून म्लेच्छ व

---

१ म्लेच्छांनीं व्याप्त असलेल्या प्रदेशांत वास्तव्य करणें अनादि कालापासूनच भयंकर मानिलें जात होतें असें ह्यावरून दिसतें.

र्युतम् । नानापक्षिगणाकीर्णं म्लेच्छतस्करसेवितम् २ शालवेणुधवाश्व-
त्थतिन्दुकेङ्गुदकिंशुकैः । अर्जुनारिष्टसंछन्नं स्यन्दनैश्च सशाल्मलैः ३
जम्ब्वाम्रलोध्रखदिरसालवेत्रसमाकुलम् । पद्मकामलकप्लक्षकदम्बोदुम्ब-
रावृतम् ४ बदरीबिल्वसंछन्नं न्यग्रोधैश्च समाकुलम् । प्रियालतालख-
र्जूरहरीतकिबिभीतकैः ५ नानाधातुशतैर्नद्धान्विविधानपि चाचलान् ।
निकुञ्जान्परिसंघुष्टान्दरीश्चाद्भुतदर्शनाः ६ नदीः सरांसि वापीश्च विवि-
धाश्च मृगद्विजान् । सा बहून्भीमरूपांश्च पिशाचोरगराक्षसान् ७ पल्व-
लानि तडागानि गिरिकूटानि सर्वशः । सरितो निर्झरांश्चैव ददर्शाद्भुत-
दर्शनान् ८ यूथशो ददृशे चात्र विदर्भाधिपनन्दिनी । महिषांश्च वराहांश्च
ऋक्षांश्च वनपन्नगान् ९ तेजसा यशसा लक्ष्म्या स्थित्या च परया युता ।
वैदर्भी विचरत्येका नलमन्वेषती तदा १० नाबिभ्यत्सा नृपसुता भैमी
तत्राथ कस्यचित् । दारुणामटवीं प्राप्य भर्तृव्यसनपीडिता ११ विदर्भ-
तनया राजन्विललाप सुदुःखिता । भर्तृशोकपरीताङ्गी शिलातलमथा-
श्रिता १२ दमयन्त्युवाच ॥ व्यूढोरस्क महाबाहो नैषधानां जनाधिप । क

तस्कर ह्यांनीही तें युक्त होतें २. शाल, वेणु, धव, अश्वत्थ, तिंदुक, इंगुद, पळस, अर्जुन, निंब, तिवस आणि सावरी ह्या वृक्षांनीं तें आच्छादित झालेलें असून ३ जंबु, आम्र, लोध्र खैर, साल आणि वेत्र ह्यांनी तें गजगजलेलें होतें. पद्मक, आमलक, चिंचा, कदंब व उंबर ह्यांनीं तें व्याप्त झालेलें असून ४ बदरि आणि बिल्व ह्यांनींही तें आच्छादित झालेलें होतें आणि वट, चार, ताड, खजूर, हिरडे आणि बेहेडे ह्या वृक्षांचीही त्यांत गर्दी झालेली होती ५. असो. तऱ्हेतऱ्हेच्या शेंकडों धातूंनीं जखडून गेलेले अनेक पर्वत, नादित झालेलीं कुंजवनें, दिसण्यांत भयंकर अशा दऱ्या ६, नद्या, सरोवरें, वापी, नाना प्रकारचे पशुपक्षी, भयंकर रूप धारण केलेले अनेक पिशाच, उरग व राक्षस ७, तळीं, तडाग, पर्वतशिखरें, ओहोळ आणि आश्चर्यकारक झरे तिनें अवलोकन केले ८ आणि त्या विदर्भराजाच्या कन्येनें महिष, डुक्कर, अस्वलें आणि वनभुजंग ह्यांचें तर कळपच्याकळपच पाहिले ९. सारांश, तेज, यश, कांति आणि उत्कृष्ट आचरण ह्यांनीं संपन्न असलेली ती विदर्भराजकन्या नलाचा शोध लावण्याकरितां एकटी संचार करूं लागली १० आणि ती राजकुमारी भीमकन्या त्या अरण्यामध्यें कोणाचीही भीति बाळगीनाशीं झाली. पुढें भर्त्याच्या दुःखानें पीडित झालेली आणि भयंकर अरण्यामध्यें प्राप्त झालेली ११ ती विदर्भकन्या, हे राजा, अत्यंत दुःखित होऊन विलाप करूं लागली आणि भर्त्याच्या शोकानें घेरलेली ती दमयंती

नु राजन्गतोस्यद्य विसृज्य विजने वने १३ अश्वमेधादिभिर्वीर क्रतुभि-
र्भूरिदक्षिणैः। कथमिष्ट्वा नरव्याघ्र मयि मिथ्या प्रवर्तसे १४ यत्त्वयोक्तं
नरश्रेष्ठ मत्समक्षं महाद्युते। स्मर्तुमर्हसि कल्याण वचनं पार्थिवर्षभ १५
यच्चोक्तं विहगैर्हंसैः समीपे तव भूमिप। मत्समक्षं यदुक्तं च तदवेक्षितु-
मर्हसि १६ चत्वार एकतो वेदाः साङ्गोपाङ्गाः सविस्तराः। स्वधीता
मनुजव्याघ्र सत्यमेकं किलैकतः १७ तस्मादर्हसि शत्रुघ्न सत्यं कर्तुं
नरेश्वर। उक्तवानसि यद्वीर मत्सकाशे पुरा वचः १८ हा वीर नल
नामाहं नष्टा किल तवानघ। अस्यामटव्यां घोरायां किं मां न प्रति-
भाषसे १९ कर्षयत्येष मां रौद्रो व्यात्तास्यो दारुणाकृतिः। अरण्यराट्
क्षुधाविष्टः किं मां न त्रातुमर्हसि २० न मे त्वदन्या काचिद्धि प्रिया-
स्तीत्यब्रवीः सदा। तामृतां कुरु कल्याण पुरोक्तां भारतीं नृप २१
उन्मत्तां विलपन्तीं मां भार्यामिष्टां नराधिप। ईप्सितामीप्सितोसि त्वं
किं मां न प्रतिभाषसे २२ कृशां दीनां विवर्णां च मलिनां वसुधाधिप।

विलाप करितां करिता एका धोंड्यावर बसली १२ नंतर नलाला उद्देशून ती ह्मणाली
हे विशालवक्षा, हे महापराक्रमी नैषधाधिपा, हे राजा, मला निर्जन वनामध्यें सोडून
तूं आज कोठें गेला आहेस? १३. हे पुरुषश्रेष्ठा वीरा, विपुल दक्षिणांनीं युक्त असे
अश्वमेधादि क्रतु करून तूं माझ्याशीं खोटेपणानें कसा रे वागत आहेस? १४. हे
पुरुषश्रेष्ठा, हे महातेजस्वी राजा, हे कल्याणा, हे नृपश्रेष्ठा, माझ्यासमक्ष जें तूं वद-
लास त्याचें स्मरण कर. १५. हे भूपाला, हंसपक्ष्यांनीं तुझ्याजवळ जे सांगितलें आणि
माझ्यासमोर येऊन जें त्यांनीं सांगितलें तिकडे तूं लक्ष्य दे १६. हे पुरुषश्रेष्ठा, अंगप्रत्यंगां-
सहवर्तमान उत्तम प्रकारें अध्ययन केलेले सविस्तर चार वेद एकीकडे आणि खरोखर
नुसतें सत्य एकीकडे १७. तस्मात्, हे शत्रुनाशका, हे प्रजाधिपते, हे वीरा, माझ्या-
जवळ जें तूं पूर्वीं वदलास ते खरें कर १८. हे वीरा, हे नला, हे निष्पापा, आज
मी तुझी पत्नी ह्या घोर अरण्यामध्यें खरोखर हीन दीन झालें असतांना माझ्याशीं
कां रे भाषण करीत नाहींस! १९. अरे, आकाराने भयंकर व दिसण्यांतही उग्र असा
हा वनाधिपति व्याघ्र क्षुधित होऊन व आ पसरून मला ओढून नेण्याच्या बेतांत आहे.
तेव्हां तूं अशा वेळीं सुद्धां माझें कां रे रक्षण करीत नाहीस? २०. हे कल्याणा,
"तुझ्यावांचून दुसरी कोणतीही स्त्री मला प्रिय नाही" असें तूं नेहमीं ह्मणत होतास.
ह्मास्तव, हे राजा, ती पूर्वीं उच्चारिलेली वाणी तूं आतां खरी कर २१. हे प्रजाधि-
पते, कसलेंही भान न राहतां मी तुझी योग्य व प्रिय भार्या विलाप करीत असतांना

वस्त्रार्धप्रावृतामेकां विलपन्तीमनाथवत् २३ यूथभ्रष्टामिवैकां मां हरिणीं पृथुलोचन । न मानयसि मामार्य रुदन्तीमरिकर्शन २४ महाराज महारण्ये अहमेकाकिनी सती । दमयन्त्यभिभाषे त्वां किं मां न प्रतिभाषसे २५ कुलशीलोपसंपन्न चारुसर्वाङ्गशोभन । नाद्य त्वां प्रतिपश्यामि गिरावस्मिन्नरोत्तम २६ वने चास्मिन्महाघोरे सिंहव्याघ्रनिषेविते । शयानमुपविष्टं वा स्थितं वा निषधाधिप २७ प्रस्थितं वा नरश्रेष्ठ मम शोकविवर्धन । कं नु पृच्छामि दुःखार्ता त्वदर्थे शोककर्शिता २८ कच्चिद्दृष्टस्त्वयारण्ये संगत्येह नलो नृपः । को नु मे वाथ प्रष्टव्यो वनेऽस्मिन्प्रस्थितं नलम् २९ अभिरूपं महात्मानं परव्यूहविनाशनम् । यमन्वेषसि राजानं नलं पद्मनिभेक्षणम् ३० अयं स इति कस्याद्य श्रोष्यामि मधुरां गिरम् । अरण्यराडयं श्रीमांश्चतुर्दंष्ट्रो महाहनुः ३१ शार्दूलोऽभिमुखोऽभ्येति व्रजाम्येनमशङ्किता। भवान्मृगाणामधिपस्त्वमस्मिन्कानने प्रभुः ३२

तूं माझा प्रिय भर्ता कशाकरितां माझ्याशीं भाषण करीत नाहींस! २२. हे भूपते, कृश, दीन, निस्तेज, मलिन व अर्धे वस्त्र परिधान केलेली अशी मी कळपांतून चुकलेल्या एकट्या हरिणीप्रमाणें ह्या ठिकाणीं अनाथासारखी एकटी रोदन व विलाप करीत असतांना तूं माझी कां बरें पर्वा करीत नाहींस? २३,२४. हे महाराज, मी दमयंती मोठ्या अरण्यामध्यें एकटी आहे व तुला उद्देशून बोलत आहें; परंतु, तूं मला कां बरें उत्तर देत नाहींस? २५. हे कुलीना, हे शीलसंपन्ना, हे सर्व उत्कृष्ट अवयवांनीं शोभणाऱ्या पुरुषश्रेष्ठा, ह्या पर्वतावर आज तूं माझ्या दृष्टीं पडत नाहींस २६. हे निषधराजा, सिंहव्याघ्रांनी सेवित अशा ह्या महाघोर वनामध्यें मी तुला पडलेला, बसलेला, उभा असलेला २७ अथवा चालत असलेलाही पहात नाहीं. तस्मात्, तुझ्याकरितां शोकानें अगदीं जर्जर होऊन दुःखपीडित झालेल्या ह्या स्त्रीनें, हे माझा शोक वृद्धिंगत करणाऱ्या पुरुषश्रेष्ठा, तुझ्याविषयीं कोणाला बरें विचारावें? २८. ह्या अरण्यामध्यें नलराजा तुझ्या दृष्टीं पडला आहे काय असें मी ह्या वनामध्यें निघून गेलेल्या नलासंबंधानें कोणाला विचारूं? २९. "योग्य, महात्म्या, शत्रुसैन्यनाशक आणि कमलनयन अशा ज्या नलराजाला तूं शोधित आहेस ३० तो हा" अशी कोणाची मधुर वाणि आज माझ्या कानीं पडेल बरें! प्रचंड हनुवटी आणि चार दाढा ह्यांनीं युक्त असलेला हा कांतिमान् अरण्यराज ३१ व्याघ्र माझ्याकडेच तोंड करून येत आहे. मी ह्याच्याकडे निःशंकपणानें जातें "हे व्याघ्रा, तूं मृगांचा अधिपति आहेस आणि ह्या अरण्यांतील राजा आहेस ३२.अरे, मी विदर्भ-

विदर्भराजतनयां दमयन्तीति विद्धि माम् । निषधाधिपतेर्भार्यां नलस्यामित्रघातिनः ३३ पतिमन्वेषतीमेकां कृपणां शोककर्शिताम् । आश्वासय मृगेन्द्रेह यदि दृष्टस्त्वया नलः ३४ अथवा त्वं वनपते नलं यदि न शंससि । मां खादय मृगश्रेष्ठ दुःखादस्माद्विमोचय ३५ श्रुत्वारण्ये विलपितं न मामाश्वासयत्ययम् । यामिमां स्वादुसलिलामापगां सागरंगमाम् ३६ इमं शिलोच्चयं पुण्यं शृङ्गैर्बहुभिरुच्छ्रितैः । विराजद्भिरिवानेकैर्नैकवर्णैर्मनोरमैः ३७ नानाधातुसमाकीर्णं विविधोपलभूषितम् । अस्यारण्यस्य महतः केतुभूतमिवोत्थितम् ३८ सिंहशार्दूलमातङ्गवराहर्क्षमृगायुतम् । पतत्रिभिर्बहुविधैः समन्तादनुनादितम् ३९ किंशुकाशोकबकुलपुन्नागैरुपशोभितम् । कर्णिकारधवप्लक्षैः सुपुष्पैरुपशोभितम् ४० सरिद्भिः सविहङ्गाभिः शिखरैश्च समाकुलम् । गिरिराजमिमं तावत्पृच्छामि नृपतिं प्रति ४१ भगवन्नचलश्रेष्ठ दिव्यदर्शन विश्रुत । शरण्य बहुकल्याण नमस्तेस्तु महीधर ४२ प्रणमे त्वाभिगम्याहं राजपुत्रीं निबोध माम् । राज्ञः

राजकन्या दमयंती शत्रुघातक निषधराज नलाची भार्या आहे, असें तूं समज ३३. हे मृगराजा, ह्या ठिकाणीं जर तुला नल दृष्टीं पडला असेल तर शोकाकुल होऊन पतीचा शोध करीत अनाथ होऊन एकटी हिंडणाऱ्या मला तूं धीर दे ३४. किंवा, हे वनराजा, तुला जर नल कोठें आहे हें सांगावयाचें नसेल तर मला खाऊन टाक आणि, हे मृगश्रेष्ठा, एकदां ह्या दुःखांतून मुक्त कर ३५. अरे, ! माझा विलाप ऐकूनही हा मला आश्वासन देत नाही. असो. आतां मधुर जलानें युक्त अशी जी ही समुद्राला जाऊन मिळणारी नदी तिला मी विचारितें ३६ अथवा ह्या पवित्र पर्वताला मी विचारून पाहतें. हा पर्वत अनेक उच्च शिखरांनीं युक्त आहे व ह्याचीं शिखरें पुष्कळ असून तीं अनेक वर्णांनीं युक्त, मनोहर आणि शोभा पावणारीं अशीं आहेत ३७. हा पर्वत नानाप्रकारच्या धातूंनीं व्याप्त झाला असून नाना प्रकारच्या पाषाणांनीं भूषित झालेला आहे आणि ह्या प्रचंड अरण्यांतील उभारिलेला ध्वजच कीं काय असा शोभत आहे ३८. सिंह, व्याघ्र, गज, वराह आणि अस्वलें ह्या पशूंनीं हा युक्त असून अनेक प्रकारच्या पक्ष्यांनीं हा आसमंतात नादित झालेला आहे ३९. पळस, अशोक, बकुल आणि पुन्नाग ह्या वृक्षांनीं ह्याला शोभा आलेली असून कर्णिकार, धव व प्लक्ष ह्या सुपुष्पित वृक्षांनींही हा सुशोभित झालेला आहे ४० आणि पक्षियुक्त नद्या व शिखरें ह्यांनीं हा गजबजलेला आहे. तेव्हां, राजाच्या संबंधानें मी ह्याला विचारून पहातें ४१. हे भगवन्, हे पर्वतश्रेष्ठा, हे दिव्यदर्शना, हे प्रख्यात,

स्नुषां राजभार्यां दमयन्तीति विश्रुताम् ४३ राजा विदर्भाधिपतिः पिता मम महारथः। भीमो नाम क्षितिपतिश्चातुर्वर्ण्यस्य रक्षिता ४४ राजसूयाश्वमेधानां क्रतूनां दक्षिणावताम्। आहर्ता पार्थिवश्रेष्ठः पृथुचार्वञ्चितेक्षणः ४५ ब्रह्मण्यः साधुवृत्तश्च सत्यवागनसूयकः। शीलवान्वीर्यसंपन्नः पृथुश्रीर्धर्मविच्छुचिः ४६ सम्यग्गोप्ता विदर्भाणां निर्जितारिगणः प्रभुः। तस्य मां विद्धि तनयां भगवंस्त्वामुपस्थिताम् ४७ निषधेषु महाराजः श्वशुरो मे नरोत्तमः। गृहीतनामा विख्यातो वीरसेन इति स्म ह ४८ तस्य राज्ञः सुतो वीरः श्रीमान्सत्यपराक्रमः। क्रमप्राप्तं पितुः स्वं यो राज्यं समनुशास्ति ह ४९ नलो नामारिहा श्यामः पुण्यश्लोक इति श्रुतः। ब्रह्मण्यो वेदविद्वाग्मी पुण्यकृत्सोमपोऽग्निमान् ५० यष्टा दाता च योद्धा च सम्यक्चैव प्रशासिता। तस्य मामबलां श्रेष्ठां विद्धि भार्यामिहागताम् ५१ त्यक्तश्रियं भर्तृहीनामनाथां व्यसनान्विताम्। अन्वेषमाणां भर्तारं त्वं मां पर्वतस-

हे शरण्या, हे बहुकल्याणसंपन्न पर्वता, तुला नमस्कार असो ४२. मी जवळ येऊन तुला प्रणाम करीत आहें. मी राजकन्या, राजस्नुषा आणि दमयंती ह्मणून प्रसिद्ध असलेली राजभार्या आहें असें तूं समज ४३. विदर्भदेशाधिपति भीमनामक महारथी राजा माझा पिता आहे. तो भूपति असून चारी वर्णांचें रक्षण करणारा आहे ४४. राजसूय आणि अश्वमेध असे मोठमोठ्या दक्षिणांनीं युक्त असलेले क्रतु करणारा तो नृपश्रेष्ठ असून विपुल आणि मनोहर अशा नेत्रांनीं युक्त आहे ४५. तो ब्राह्मणभक्त, सदाचरणी, सत्यवचनी, मत्सररहित, सुशील, वीर्यवान्, महावैभवशाली, धर्मवेत्ता व पवित्र असून ४६ विदर्भदेशाचें उत्तमप्रकारें रक्षण करणारा आहे आणि त्या प्रभूनें आपले शत्रुगण पराजित केलेले आहेत. हे भगवन्, त्याची कन्या मी तुझ्या समीप आलें आहें असें तूं समज ४७. माझा श्वशुर नांव घेण्यासारिखा, पुरुषश्रेष्ठ व वीरसेन ह्मणून प्रसिद्ध असून निषधदेशाचा महाराजा होता ४८. त्या राजाचा पुत्र वीर, वैभवशाली आणि अमोघपराक्रमी आहे व पित्यापासून परंपरागत आलेलें स्वतःचें राज्य तो करीत आहे ४९. तो पुण्यश्लोक ह्मणून प्रसिद्ध असलेला शत्रुनाशक मेघश्याम नल होय. तो ब्राह्मणभक्त, वेदवेत्ता, वक्ता, पुण्यवान्, सोमपान करणारा, नेहमीं अग्नि सिद्ध ठेवणारा ५०, यजन करणारा, दाता, योद्धा आणि उत्तम प्रकारें राज्य चालविणारा आहे. तेव्हां येथें आलेली ही मी अबला त्याची श्रेष्ठ भार्या आहें असें तूं समज ५१. हे पर्वतश्रेष्ठा, राज्यलक्ष्मीचा त्याग होऊन भर्त्याचाही वियोग झाल्यामुळें मी संकटांत सांपडून अनाथ बनलें आहें आणि पतीचा शोध करीत हिंडत आहें हें

त्तम ५२ सुमल्लिखद्भिरेतैर्हि त्वया शृङ्गशतैर्नृपः । कच्चिद्दृष्टोचलश्रेष्ठ वनेऽस्मिन्वा नलो नृपः ५३ गजेन्द्रविक्रमो धीमान्दीर्घबाहुरमर्षणः । विक्रान्तः सत्त्ववान्वीरो भर्ता मम महायशाः ५४ निषधानामधिपतिः कच्चिद्दृष्टस्त्वया नलः । किं मां विलपतीमेकां पर्वतश्रेष्ठ विह्वलम् ५५ गिरा नाश्वासयस्यद्य स्वां सुतामिव दुःखिताम् । वीर विक्रान्त धर्मज्ञ सत्यसन्ध महीपते ५६ यद्यस्यस्मिन्वने राजन्दर्शयात्मानमात्मना । कदा सुस्निग्धगम्भीरां जीमूतस्वनसंनिभाम् ५७ श्रोष्यामि नैषधस्याहं वाचंताममृतोपमाम् । वैदर्भीत्येव विस्पष्टां शुभां राज्ञो महात्मनः ५८ आम्नायसारिणीमृद्धां मम शोकविनाशिनीम् । भीतामाश्वासयत मां नृपते धर्मवत्सल ५९ इति सा तं गिरिश्रेष्ठमुक्त्वा पार्थिवनन्दिनी । दमयन्ती ततो भूयो जगाम दिशमुत्तराम् ६० सा गत्वा त्रीनहोरात्रान्ददर्श परमाङ्गना । तापसारण्यमतुलं दिव्यकाननशोभितम् ६१ वसिष्ठभृग्वत्रिसमैस्तापसैरुपशोभितम् । नियतैः संयताहारैर्दमशौचसमन्वितैः ६२ अब्भक्षैर्वायुभ-

---

तूं जाण ५२. हे पर्वतश्रेष्ठा, ह्या गगनचुंबित शेंकडो शिखरांवर कोठें तरी राजा तुला दृष्टीं पडला आहे काय ? किंवा ह्या वनामध्यें तो नलराजा तूं अवलोकन केला आहेस काय ? ५३. श्रेष्ठ गजासारिखा पराक्रमी, बुद्धिमान् , आजानुबाहु, अपमान सहन न करणारा, महापराक्रमी, धैर्यवान् , वीर व महाकीर्तिमान् असा माझा भर्ता ५४ निषधराज नल तुझ्या कोठें आढळण्यांत आला आहे काय ? हे पर्वतश्रेष्ठा, विह्वल होऊन एकटी विलाप करीत असलेल्या मला ५५ आपल्या दुःखित कन्येप्रमाणें मधुर वाणीनें आज कां रे धीर देत नाहींस ? हे वीरा, हे पराक्रमी, हे धर्मवेत्त्या, हे सत्यप्रतिज्ञ भूपते ५६, हे राजा, ह्या वनामध्यें असलास तर स्वतः मला दर्शन दे. अत्यंत मधुर, गंभीर आणि मेघगर्जनेसारिखी ५७ ती अमृततुल्य नलाची वाणी मला केव्हां बरें ऐकावयाला सांपडेल ! अहो, माझा शोक नाहींसा करणारी अशी त्या महात्म्या राजाची वैदर्भी अशीच स्पष्ट, शुभ, सत्य व उदार वाणी केव्हां बरें माझ्या कानावर येईल ? हे राजा, हे धर्मवत्सला, भयभीत झालेल्या मला आतां आपण धीर द्या" ५८,५९. ह्याप्रमाणें त्या श्रेष्ठ पर्वताला सांगून ती राजकन्या दमयंती तेथूनही पुढें उत्तर दिशेला चालती झाली ६० व तीन अहोरात्र चालून गेल्यावर त्या श्रेष्ठ स्त्रीनें दिव्य वृक्षांनीं शोभित असें एक अनुपम तपोवन अवलोकन केलें ६१. वसिष्ठ, भृगु आणि अत्रि ह्यांसारिख्या तपस्वी मुनींनीं तें वन सुशोभित झालेलें होतें व ते मुनि नियमानें वागणारे, आहाराचा त्याग केलेले, दम व शौच ह्यांनीं युक्त असलेले ६२, उदकप्राशन

क्षैश्च पत्राहारैस्तथैव च । जितेन्द्रियैर्महाभागैः स्वर्गमार्गदिदृक्षुभिः ६३
वल्कलाजिनसंवीतैर्मुनिभिः संयतेन्द्रियैः । तापसाध्युषितं रम्यं ददर्शाश्र-
ममण्डलम् ६४ नानामृगगणैर्जुष्टं शाखामृगगणायुतम् । तापसैः समुपेतं
च सा दृष्ट्वैव समाश्वसत् ६५ सुभ्रूः सुकेशी सुश्रोणी सुकुचा सुद्विजानना।
वर्चस्विनी सुप्रतिष्ठा स्वसितायतलोचना ६६ सा विवेशाश्रमपदं वीरसे-
नसुतप्रिया । योषिद्रत्नं महाभागा दमयन्ती तपस्विनी ६७ साभिवाद्य
तपोवृद्धान्विनयावनता स्थिता । स्वागतं त इति प्रोक्ता तैः सर्वैस्तापसो-
त्तमैः ६८ पूजां चास्या यथान्यायं कृत्वा तत्र तपोधनाः । आस्यता-
मित्यथोचुस्ते ब्रूहि किं करवामहे ६९ तानुवाच वरारोहा कच्चिद्भगवता-
मिह । तपःस्वग्निषु धर्मेषु मृगपक्षिषु चानघाः ७० कुशलं वो महाभागाः
स्वधर्माचरणेषु च । तैरुक्ता कुशलं भद्रे सर्वत्रेति यशस्विनि ७१
ब्रूहि सर्वानवद्याङ्गि का त्वं किं च चिकीर्षसि । दृष्ट्वैव ते परं रूपं द्युतिं
च परमामिह ७२ विस्मयो नः समुत्पन्नः समाश्वसिहि मा शुचः ।

करून, वायुभक्षण करून अथवा गळलेलीं पानें सेवन करून राहणारे, जितेंद्रिय, महाभाग्यवान्, स्वर्गमार्ग साधण्याची इच्छा करणारे ६३, वल्कलें व अजिनें परिधान केलेले, मननशील आणि इंद्रियसंयमन करणारे होते. असो. अशा प्रकारच्या तपस्वी मुनींनीं वास्तव्य केलेलें रम्य आश्रमस्थान तिनें अवलोकन केलें ६४. नानाप्रकारचे मृग व वानरसमुदाय ह्यांनीं संपन्न असून तपस्वी लोकांनीं युक्त असलेलें तें वन अवलोकन करितांक्षणींच तिला धीर आला ६५ आणि उत्तम भिंवया, उत्कृष्ट केश, सुंदर कटि, मनोहर स्तन, उत्तम दंत व मुख, तेज, उत्कृष्ट कटिप्रदेश आणि अत्यंत कृष्णवर्ण व दीर्घ नेत्र ह्यांनीं युक्त असलेली ६६ ती वीरसेनपुत्र नलराजाची प्रिया महाभाग्यवती, तपस्विनी व सर्वोत्कृष्ट स्त्री दमयंती त्या आश्रमामध्यें गेली ६७ आणि तपोवृद्ध मुनींना अभिवंदन केल्यावर विनयानें नम्र होउन उभी राहिली. तेव्हां "तुझें स्वागत असो" असें तिला त्या सर्व श्रेष्ठ तपस्व्यांनीं सांगितलें ६८ आणि तिचा यथायोग्य आदरसत्कार केल्यानंतर "बसावें, आम्हीं आपलें काय काम करावें ?" ह्मणून ते तपोधन तिला ह्मणाले असतां ६९ त्या सुंदरीनें "हे निष्पाप व महाभाग्यवान् मुनिजनहो, भगवानांचें तप, अग्निसेवा, धर्म व स्वधर्माचरण यथास्थित चाललें असून अरण्यांतील पशुपक्षी वगैरे सर्व कुशल आहेत नां ?" असें त्यांना विचारिलें. तेव्हां त्या यशस्विनीला ते ह्मणाले "हे कल्याणि, आमचें सर्वप्रकारें कुशल आहे ७०, ७१. हे सर्वांगसुंदरि, तू कोण आणि कोणत्या उद्देशानें येथें आली आहेस हें आह्मांला सांग. तुझें उत्कृष्ट रूप आणि परा-

अस्यारण्यस्य देवी त्वमुताहोस्य महीभृतः ७३ अस्याश्च नद्याः कल्याणि वद सत्यमनिन्दिते। साब्रवीत्तानृषीन्नाहमरण्यस्यास्य देवता ७४ न चाप्यस्य गिरेर्विप्रा नैव नद्याश्च देवता। मानुषीं मां विजानीत यूयं सर्वे तपोधनाः ७५ विस्तरेणाभिधास्यामि तन्मे शृणुत सर्वशः। विदर्भेषु महीपालो भीमो नाम महीपतिः ७६ तस्य मां तनयां सर्वे जानीत द्विजसत्तमाः। निषधाधिपतिर्धीमान्नलो नाम महायशाः ७७ वीरः सङ्ग्रामजिद्विद्वान्मम भर्ता विशांपतिः। देवताभ्यर्चनपरो द्विजातिजनवत्सलः ७८ गोप्ता निषधवंशस्य महातेजा महाबलः। सत्यवान्धर्मवित्प्राज्ञः सत्यसंधोऽरिमर्दनः ७९ ब्रह्मण्यो दैवतपरः श्रीमान्परपुरञ्जयः। नलो नाम नृपश्रेष्ठो देवराजसमद्युतिः ८० मम भर्ता विशालाक्षः पूर्णेन्दुवदनोऽरिहा। आहर्ता क्रतुमुख्यानां वेदवेदाङ्गपारगः ८१ सपत्नानां मृधे हन्ता रविसोमसमप्रभः। स कैश्चिन्निकृतिप्रज्ञैरनार्यैरकृतात्मभिः ८२ आहूय पृथिवीपालः सत्यध-

---

काष्ठेची कांति अवलोकन करण्याबरोबर ७२ आह्मांला विस्मय उत्पन्न झाला आहे. करितां, तूं धीर धर, शोक करूं नकोस. हे कल्याणि, हे निर्दोष स्त्रिये, तू ह्या अरण्याची देवता आहेस किंवा ह्या पर्वताची अधिदेवता आहेस अथवा ह्या नदीची अधिष्ठानदेवता आहेस ? हें सत्य सांग ". ह्याप्रमाणें ऋषींनीं विचारिल्यावर ती त्यांना ह्मणाली " मी ह्या अरण्याची देवता नाहीं ७३, ७४, अथवा, हे विप्रहो, ह्या पर्वताची किंवा नदीचीही देवता मी नाहीं. हे सर्व तपोधनहो, मी मानुषी आहें हें तह्मीं समजा ७५. मी आपला वृत्तांत सविस्तर सांगतें तो आपण माझ्यापासून सर्वप्रकारें श्रवण करा. विदर्भदेशामध्यें भीमराजा ह्मणून भूपाल आहे ७६. त्याची मी कन्या आहे असें, हे सर्व द्विजश्रेष्ठ हो, तुह्मी जाणा. निषधदेशाधिपति, महायशस्वी व बुद्धिमान् , विद्वान् आणि संग्राम जिंकणारा वीर नलराजा माझा भर्ता असून तो देवपूजनाविषयीं तत्पर आणि ब्राह्मण लोकांवर प्रेम करणारा आहे ७७, ७८. तो निषधवंशाचा रक्षण करणारा असून महातेजस्वी, महाबलाढ्य, सत्यनिष्ठ, धर्मवेत्ता, ज्ञानवान् सत्यप्रतिज्ञ आणि शत्रुनाशक असून ७९ तो नृपश्रेष्ठ नल कांतीनें इंद्रतुल्य, ब्राह्मणभक्त, देवतांविषयीं तत्पर, वैभवशाली आणि शत्रुसेना जिंकणारा असा आहे ८०. सारांश, हा माझा विशालनयन भर्ता पूर्ण चंद्राप्रमाणें आनंददायकमुखकमलानें युक्त असून शत्रुनाशक, श्रेष्ठ श्रेष्ठ क्रतु करणारा, वेदवेदांगपारंगत ८१, संग्रामामध्यें शत्रूंचा वध करणारा आणि प्रभेनें चंद्रसूर्यांची बरोबरी करणारा आहे. त्या सत्यनिष्ठ व धर्मपरायण भूपालाला उच्छृंखल, कपटबुद्धि, कुटिल आणि द्यूतामध्यें निपुण अशा कांहीं दुष्टांनीं

र्मपरायणः । देवने कुशलैर्जिह्मैर्हृतं राज्यं वसूनि च ८३ तस्य मामवगच्छध्वं भार्यां राजर्षभस्य वै । दमयन्तीति विख्यातां भर्तृदर्शनलालसाम् ८४ सा वनानि गिरींश्चैव सरांसि सरितस्तथा। पल्वलानि च सर्वाणि तथारण्यानि सर्वशः ८५ अन्वेषमाणा भर्तारं नलं रणविशारदम् । महात्मानं कृतास्त्रं च विचरामीह दुःखिता ८६ कच्चिद्भगवतां रम्यं तपोवनमिदं नृपः । भवेत्प्राप्तो नलो नाम निषधानां जनाधिपः ८७ यत्कृतेहमिदं ब्रह्मन्प्रपन्ना भृशदारुणम् । वनं प्रतिभयं घोरं शार्दूलमृगसेवितम् ८८ यदि कैश्चिदहोरात्रैर्न द्रक्ष्यामि नलं नृपम् । आत्मानं श्रेयसा योक्ष्ये देहस्यास्य विमोचनात् ८९ को नु मे जीवितेनार्थस्तमृते पुरुषर्षभम् । कथं भविष्याम्यथाहं भर्तृशोकाभिपीडिता ९० तथा विलपतीमेकामरण्ये भीमनन्दिनीम् । दमयन्तीमथोचुस्ते तापसाः सत्यदर्शिनः ९१ उदर्कस्तव कल्याणि कल्याणो भविता शुभे । वयं पश्याम तपसा क्षिप्रं द्रक्ष्यसि नैषधम् ९२ निषधानामधिपतिं नलं रिपुनिपातिनम् । भैमि धर्मभृतां श्रेष्ठं द्रक्ष्यसे विगतज्वरम् ९३ विमुक्तं सर्वपापेभ्यः सर्वरत्नसमन्वितम् ।

द्यूतार्थ आह्वान करून त्याचे राज्य व द्रव्य हरण करून घेतलें आहे ८२, ८३. त्या राजेंद्राची मी दमयंती म्हणून विख्यात असलेली भार्या असून त्या आपल्या भर्त्याच्या दर्शनाविषयीं उत्सुक झालेली आहें असें आपण समजा ८४. तात्पर्य, ती मी दुःखित राजपत्नी संग्रामनिपुण व कृतास्त्र अशा महात्म्या भर्त्या नलाला शोधण्याकरितां ह्या पृथ्वीवरील वनें, पर्वत, सरोवरें, नद्या, सर्व तळीं आणि सर्व अरण्यें हिंडत आहें ८५,८६. निषधदेशाचा अधिपति नलराजा भगवानांच्या ह्या रम्य तपोवनामध्यें मला प्राप्त होईल काय ? ८७. हे ब्रह्मनिष्ठ, त्याच्याकरिता मी ह्या अत्यंत दारुण वनामध्यें प्राप्त झालें आहें. ह्या घोर वनामध्यें व्याघ्र व इतर श्वापदें रहात असल्यामुळें हें एक प्रत्यक्ष भयच आहे ८८. आतां कांहीं दिवसांमध्यें जर नलराजा माझ्या दृष्टीं पडला नाहीं तर ह्या देहाचा त्याग करून मी आपलें सार्थक करून घेणार ८९. त्या पुरुषश्रेष्ठ नलावांचून मला ह्या जीविताशीं काय हो करावयाचें आहे. भर्तृशोकानें व्याप्त झालेली मी आज जिवत कशीं राहूं ? " ९० ह्याप्रमाणें अरण्यामध्यें एकटी संचार करीत असलेली ती भीमराजाची कन्या दमयंती विलाप करूं लागली असतां ते सत्यदर्शी तपस्वी तिला म्हणाले ९१ " हे कल्याणि, तुला पुढें चांगले दिवस येतील. हे शुभे, तू निषधराज नलाला सत्वर अवलोकन करिशील हें आम्हांला तपश्चर्येच्या योगानें दिसत आहे ९२. हे भीमकन्ये, धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ व शत्रुघातक असा निषधदेशाधिपति नल चिंतारहित असलेला

तदेव नगरं श्रेष्ठं प्रशासतमरिन्दमम् ९४ द्विषतां भयकर्तारं सुहृदां शोक-
नाशनम् । पतिं द्रक्ष्यसि कल्याणि कल्याणाभिजनं नृपम् ९५ एवमुक्त्वा
नलस्येष्टां महिषीं पार्थिवात्मजाम् । तापसान्तर्हिताः सर्वे साग्निहोत्रा-
श्रमास्तथा ९६ सा दृष्ट्वा महदाश्चर्यं विस्मिता ह्यभवत्तदा । दमयन्त्यन-
वद्याङ्गी वीरसेननृपस्नुषा ९७ किं नु स्वप्नो मया दृष्टः कोयं विधि-
रिहाभवत् । क्व नु ते तापसाः सर्वे क्व तदाश्रममण्डलम् ९८ क्व सा
पुण्यजला रम्या नदी द्विजनिषेविता । क्व नु ते ह नगा हृद्याः फलपु-
ष्पोपशोभिताः ९९ ध्यात्वा चिरं भीमसुता दमयन्ती शुचिस्मिता । भर्तृशो-
कपरा दीना विवर्णवदनाभवत् १०० सा गत्वाथापरां भूमिं बाष्पसंदि-
ग्धया गिरा । विललापाश्रुपूर्णाक्षी दृष्ट्वाशोकतरुं ततः १ उपगम्य तरुश्रे-
ष्ठमशोकं पुष्पितं वने । पल्लवापीडितं हृद्यं विहङ्गैरनुनादितम् २ अहो
बतायमगमः श्रीमानस्मिन्वनान्तरे । आपीडैर्बहुभिर्भाति श्रीमान्पर्वतरा-

---

तूं अवलोकन करशील ९३. सर्व संकटांतून मुक्त आणि सर्व रत्नांनीं युक्त असा शत्रुदमन करणारा नलराजा त्याच श्रेष्ठ नगरामध्यें राज्य करीत असलेला तूं अवलोकन करशील ९४. हे कल्याणि, शत्रूंना भय उत्पन्न करणारा व मित्रांचें दुःख नाहींसें करणारा असा उत्तम कुलीन पति नलराजा तूं अवलोकन करशील " ९५. ह्याप्रमाणें नलाच्या प्रिय भार्येला ह्मणजे राजकन्या दमयंतीला सांगून ते सर्व तपस्वी मुनि अग्निहोत्र व आश्रम ह्यांसहवर्तमान गुप्त झाले ९६. तेव्हां तें मोठें आश्चर्य अवलोकन करून वीरसेनराजाची स्नुषा सुंदरी दमयंती विस्मित झाली ९७ आणि " अहो, हें कां मीं स्वप्न पाहिलें कीं काय ! अहो, ह्या ठिकाणीं हा काय प्रकार झाला ! ते सर्व तपस्वी कोठें गेले आणि तो आश्रम तरी कोणीकडे नाहींसा झाला ९८ ! पक्षिगणांनीं व पुण्यजनांनीं युक्त असलेली ती रम्य नदी काय झाली ! आणि फलें व पुष्पें ह्यांनीं सुशोभित असलेले ते मनोहर वृक्ष तरी कोणीकडे गेले ! " ९९. ह्याप्रमाणें पुष्कळ वेळ चिंतन करून ती सुहास्यवदना भीमकन्या दमयंती पतीच्या शोकानें व्याप्त झाल्यामुळें दीन व म्लानवदन झाली १००. नंतर ती दुसरीकडे चालती झाली आणि एक अशोक वृक्ष दृष्टीं पडतांक्षणीं अश्रूंनीं नेत्र भरून आलेली ती दमयंती अश्रूंनीं कंठ दाटल्यामुळें अस्पष्ट झालेल्या वाणीनें विलाप करूं लागली १. नंतर पल्लवांनीं भूषित, पक्ष्यांनीं नादित आणि प्रफुल्लित अशा त्या मनोहर व श्रेष्ठ अशोक वृक्षापाशीं जाऊन ह्मणाली २ " अहो, ह्या वनामध्यें हा सुंदर वृक्ष आहे व तो अनेक पल्लवांच्या योगानें पर्वतराजासारिखा कांतिमान् दिसत

डिव ३ विशोकां कुरु मां क्षिप्रमशोक प्रियदर्शन। वीतशोकभयाबाधं कच्चित्त्वं दृष्टवान्नृपम् ४ नलं नामारिदमनं दमयन्त्याः प्रियं पतिम्। निषधानामधिपतिं दृष्टवानसि मे प्रियम् ५ एकवस्त्रार्धसंवीतं सुकुमारतनुत्वचम्। व्यसनेनार्दितं वीरमरण्यमिदमागतम् ६ यथा विशोका गच्छेयमशोक नग तत्कुरु। सत्यनामा भवाशोक अशोकः शोकनाशनः ७ एवं साशोकवृक्षं तमार्ता वै परिगम्य ह। जगाम दारुणतरं देशं भैमी वराङ्गना ८ सा ददर्श नगान्नैकान्नैकाश्च सरितस्तथा। नैकांश्च पर्वतान्रम्यान्नैकांश्च मृगपक्षिणः ९ कन्दरांश्च नितम्बांश्च नदीश्चाद्भुतदर्शनाः। ददर्श तान्भीमसुता पतिमन्वेषती तदा ११० गत्वा प्रकृष्टमध्वानं दमयन्ती शुचिस्मिता। ददर्शाथ महासार्थं हस्त्यश्वरथसंकुलम् ११ उत्तरन्तं नदीं रम्यां प्रसन्नसलिलां शुभाम्। सुशीततोयां विस्तीर्णां ह्रादिनीं वेतसैर्वृताम् १२ प्रोद्घुष्टां क्रौञ्चकुररैश्चक्रवाकोपकूजिताम्। कूर्मग्राहझषाकीर्णां विपुलद्वीपशोभिताम् १३ सा दृष्ट्वैव महासार्थं नलपत्नी यशस्विनी।

आहे ३. हे अशोका, तूं मला सत्वर शोकरहित कर. हे प्रियदर्शना, शोक, भय आणि पीडा ह्यांनीं रहित असा नलराजा तूं कोठें पाहिला आहेस काय ? ४० अरे, दमयंतीचा प्रियपति शत्रुनाशक नल तूं अवलोकन केला आहेस काय ? अरे, अर्धवस्त्र परिधान केलेला, सुकुमार तनु व कांति ह्यांनीं युक्त असलेला आणि संकटानें जर्जर झालेला माझा प्रिय वीर निषधराजा ह्या अरण्यांत आलेला तूं अवलोकन केला आहेस काय ? ५,६. हे अशोकवृक्षा, मी शोकरहित होऊन येथून जाईन असें तूं कर. हे अशोका, अशोक ह्मणजे शोकनाशक असा अर्थ आहे. तेव्हां तूं आपलें नांव खरें कर " ७. ह्याप्रमाणें शोकाकुल झालेल्या त्या भीमकन्येनें अशोकवृक्षाला प्रदक्षिणा केली आणि तेथून ती श्रेष्ठ स्त्री त्याच्याहीपेक्षां घोर प्रदेशाकडे चालली ८. तेथें गेल्यावर अनेक वृक्ष, अनेक नद्या, अनेक रम्य पर्वत आणि अनेक पशुपक्षी तिनें अवलोकन केले ९ आणि पतीचा शोध करीत करीत चाललेल्या त्या भीमकन्येनें दऱ्या, कडे आणि दिसण्यांत अद्भुत अशा नद्या अवलोकन केल्या ११०. ह्याप्रमाणें पहातां पहातां बराच मार्ग आक्रमण केल्यावर त्या सुहास्यवदना दमयंतीनें गज, अश्व आणि रथ ह्यांनीं भरलेला असा एक मोठा जनसमूह अवलोकन केला ११. तो जनसमूह—निर्मल व अत्यंत शीत जलानें युक्त, वेतांनीं आच्छादित, विस्तीर्ण, खळाळणारी, रम्य, शुभ, क्रौंच आणि कुररपक्षी ह्यांनीं नादित, चक्रवाक पक्ष्यांच्या ध्वनीनें युक्त, कांसवें, सुसरी आणि मासे ह्यांनीं भरलेली आणि विस्तीर्ण बेटांनीं

उपसर्प वरारोहा जनमध्यं विवेश ह १४ उन्मत्तरूपा शोकार्ता तथा वस्त्रार्धसंवृता । कृशा विवर्णा मलिना पांसुध्वस्तशिरोरुहा १५ तां दृष्ट्वा तत्र मनुजाः केचिद्भीताः प्रदुद्रुवुः । केचिच्चिन्तापरा जग्मुः केचित्तत्र विचुक्रुशुः १६ प्रहसन्ति स्म तां केचिदभ्यसूयन्ति चापरे । अकुर्वत दयां केचित्पप्रच्छुश्चापि भारत १७ कासि कस्यासि कल्याणि किं वा मृगयसे वने । त्वां दृष्ट्वा व्यथिताः स्मेह कच्चित्त्वमसि मानुषी १८ वद सत्यं वनस्यास्य पर्वतस्याथवा दिशः । देवता त्वं हि कल्याणि त्वां वयं शरणं गताः १९ यक्षी वा राक्षसी वा त्वमुताहोसि वराङ्गना । सर्वथा कुरु नः स्वस्ति रक्ष वास्माननिन्दिते २० यथायं सर्वथा सार्थः क्षेमी शीघ्रमितो व्रजेत् । तथा विधत्स्व कल्याणि यथा श्रेयो हि नो भवेत् २१ तथोक्ता तेन सार्थेन दमयन्ती नृपात्मजा । प्रत्युवाच ततः साध्वी भर्तृव्यसनपीडिता २२ सार्थवाहं च सार्थं च जना ये चात्र केचन ।

शोभित झालेली—नदी उतरत होता १२,१३. तो महासमाज दृष्टीं पडतांक्षणीं नलपत्नी यशस्विनी सुंदरी दमयंती जवळ जाऊन त्या लोकांमध्यें शिरली १४. त्यावेळीं तिची आकृति उन्मत्त दिसत होती, शोकानें ती अगदीं व्याप्त झालेली होती, अर्धवस्त्र तिनें परिधान केलेलें होतें आणि ती स्वतः कृश, निस्तेज व मलिन असून तिचे केशही धुळीनें भरलेले व अस्ताव्यस्त झालेले होते १५. तिला अवलोकन करितांक्षणीं त्या मोठ्या समाजांतील कांहीं लोक भयभीत होऊन पळूं लागले, कांहीं चिंताक्रांत होऊन जाऊं लागले, कांहीं आक्रोश करूं लागले १६, कांहीं तिला हंसूं लागले, कांहीं जण तिचा द्वेष करूं लागले आणि कांहीं दया करून, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, तिला विचारूं लागले १७ " हे कल्याणि, तूं कोण आहेस, कोणाची आहेस आणि वनामध्यें काय पहात आहेस ? तुला पहाण्याबरोबर आम्ही घाबरून गेलों आहोंत; तेव्हां तूं मानुषीच आहेस ना ? १८ हें खरें सांग; अथवा, हे कल्याणि, हें वन, पर्वत अथवा दिशा ह्यांपैकीं तूं कोणाची अधिदेवता आहेस कीं काय तें सांग. आम्ही तुला शरण आलों आहोंत १९. हे सुंदर स्त्रिये, तूं यक्षिणी, राक्षसी अथवा उत्कृष्ट स्त्री आहेस कीं काय ? कोणीही असलीस तरी आमचें कल्याण कर; आमचें रक्षण कर १२०. हे कल्याणि, हा आमचा समाज येथून सत्वर सुखरूप चालता होईल आणि आमचें कल्याण होईल अशी तूं तजवीज कर " २१. ह्याप्रमाणें त्या समाजानें तिला सांगितलें असतां भर्तृदुःखानें पीडित झालेली ती साध्वी राजकन्या दमयंती त्या समाजांतील मुख्याला आणि समाजाला

युवस्थविरबालाश्च सार्थस्य च पुरोगमाः २३ मानुषीं मां विजानीत मनुजा-
धिपतेः सुताम्। नृपस्नुषां राजभार्यां भर्तृदर्शनलालसाम् २४ विदर्भराण्मम
पिता भर्ता राजा च नैषधः । नलो नाम महाभागस्तं मार्गाम्यपराजि-
तम् २५ यदि जानीत नृपतिं क्षिप्रं शंसत मे प्रियम् । नलं पुरुषशार्दूल-
ममित्रगणसूदनम् २६ तामुवाचानवद्याङ्गीं सार्थस्य महतः प्रभुः । सार्थ-
वाहः शुचिर्नाम शृणु कल्याणि मद्वचः २७ अहं सार्थस्य नेता वै सार्थ-
वाहः शुचिस्मिते । मनुष्यं नलनामानं न पश्यामि यशस्विनि २८ कुञ्ज-
रद्वीपिमहिषशार्दूलर्क्षमृगानपि । पश्याम्यस्मिन्वने कृत्स्ने ह्यमनुष्यनिषे-
विते २९ ऋते त्वां मानुषीं मर्त्यं न पश्यामि महावने । तथा नो यक्षरा-
ड्य मणिभद्रः प्रसीदतु १३० साब्रवीद्वणिजः सर्वान्सार्थवाहं च तं ततः ।
क्व नु यास्यति सार्थोयमेतदाख्यातुमर्हसि ३१ सार्थवाह उवाच ॥ सार्थोयं
चेदिराजस्य सुबाहोः सत्यदर्शिनः । क्षिप्रं जनपदं गन्ता लाभाय मनु-

---

ह्मणाली " तरुण, वृद्ध आणि बाल असे जे कोणी येथें असाल आणि विशेषकरून ह्या समाजाचे जे कोणी पुढारी असाल २२,२३ ते सर्व, मी राजकन्या राजस्नुषा आणि राजभार्या पतिदर्शनाविषयीं उत्सुक असून मानुषी आहें, असें समजा २४. विदर्भदेशाचा राजा माझा पिता असून महाभाग्यवान् नलनामक नैषधराजा माझा भर्ता आहे आणि त्या अपराजित भर्त्याला मी शोधीत आहें २५. करितां, पुरुषश्रेष्ठ आणि शत्रुनाशक असा माझा प्रिय नलराजा कोठें आहे हें जर तुह्मांला माहीत असेल तर मला सांगा " २६. ह्याप्रमाणें तिनें सांगितल्यावर त्या सुंदरी दमयंतीला त्या मोठ्या समाजाचा प्रभु, जो शुचिनामक समाजाध्यक्ष होता तो, ह्मणाला " हे कल्याणि, माझें ह्मणणें ऐकून घे २७. हे सुहास्यवदने, मी समाजाधिपति ह्या समाजाचा पुढारी आहें. हे यशस्विनि, नलनामक मनुष्य माझ्या आढळण्यांत आला नाहीं २८. गज, चित्ते, महिष, व्याघ्र, अस्वलें आणि मृग मी ह्या संपूर्ण निर्जन वनामध्यें अवलोकन करीत आहें २९. ह्या महावनामध्यें एक फक्त तूंच मनुष्यस्त्री मला दिसत आहेस. ह्याशिवाय कोणीही मनुष्य मला दिसत नाहीं. असो. यक्षाधिपति मणिभद्र आज आमच्यावर कृपा करून (ह्या अरण्यामध्यें) आमचें रक्षण करो " १३०. ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितल्यावर सर्व वाणी आणि तो समाजाधिपति ह्यांना " तो तांडा कोठें जात आहे, हें आपण मला सांगा " असें तिनें विचारिलें असतां ३१ तो समाजाधिपति तिला ह्मणाला:—हे मनुष्यकन्यके, हा तांडा कांहीं लाभ व्हावा ह्या उद्देशानें सत्यानें वागणाऱ्या चेदिराज सुबाहूच्या देशामध्यें सत्वर जाणार आहे १३२.

जात्मजे १३२ [२५५६] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीसार्थवाहसंगमे चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥

बृहदश्व उवाच ॥ सा तच्छ्रुत्वानवद्याङ्गी सार्थवाहवचस्तदा । जगाम सह तेनैव सार्थेन पतिलालसा १ अथ काले बहुतिथे वने महति दारुणे । तडागं सर्वतोभद्रं पद्मसौगन्धिकं महत् २ ददृशुर्वणिजो रम्यं प्रभूतयवसेन्धनम् । बहुपुष्पफलोपेतं नानापक्षिनिषेवितम् ३ निर्मलस्वादुसलिलं मनोहारिसुशीतलम् । सुपरिश्रान्तवाहास्ते निवेशाय मनो दधुः ४ संमते सार्थवाहस्य विविशुर्वनमुत्तमम् । उवास सार्थः सुमहान्वेलामासाद्य पश्चिमाम् ५ अथार्धरात्रसमये निःशब्दस्तिमिते तदा । सुप्ते सार्थे परिश्रान्ते हस्तियूथमुपागमत् ६ पानीयार्थं गिरिनदीं मदप्रस्रवणाविलाम् । अथापश्यत सार्थं तं सार्थजान्सुबहून्गजान् ७ ते तान्ग्राम्यगजान्दृष्ट्वा सर्वे वनगजास्तदा । समाद्रवन्त वेगेन जिघांसन्तो मदोत्कटाः ८ तेषामापततां

ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं दमयंती आणि सार्थवाह ह्यांच्या भेटीविषयीं चौसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६४ ॥

बृहदश्व मुनि सांगतातः—तें समाजाध्यक्षाचें भाषण श्रवण केल्यावर पतिदर्शनाविषयीं उत्सुक असलेली ती सुंदरी दमयंती त्याच समाजाबरोबर निघाली १. पुढें जातां जातां बरेच दिवस लोटल्यावर सर्व बाजूंनीं ज्यामध्यें उतरण्याला मार्ग आहेत असें एक पद्मसौगंधिक नामक मोठें सरोवर एका मोठ्या घोर वनामध्यें २ त्या उद्म्यांनीं अवलोकन केलें. त्या रम्य सरोवरासमीप पुष्कळ गवत व रान वाढलेलें होतें; अनेक प्रकारच्या पुष्पफलांनीं तें सरोवर युक्त होतें; नानाप्रकारचे पक्षी त्याच्यासमीप रहात होते ३; निर्मल आणि स्वादिष्ठ उदकानें तें भरलेलें होतें व तें जात्या मोठें मोहक असून शीतल होतें. त्या सरोवराचे ठिकाणीं ज्यांचीं वाहनें फारच थकून गेलेलीं आहेत अशा त्या वाण्यांनीं उतरण्याचें मनामध्यें आणिलें ४. नंतर त्या समाजाधिपतीच्या संमतीनें ते सर्व वाणी त्या उत्कृष्ट वनामध्यें शिरले आणि संध्याकाळ झाल्यावर त्या अतिप्रचंड समाजानें त्या ठिकाणीं वास्तव्य केलें ५. तदनंतर मध्यरात्रीचा समय झाल्यावर तो श्रांत झालेला सर्व समाज निद्रिस्थ होऊन जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें असतां पाणी पिण्याच्या उद्देशानें एक हत्तीचा कळप मदस्रावानें गढूळ झालेल्या त्या डोंगराळनदीवर आला आणि तेथें आल्यावर तो तांडा व त्या तांड्याबरोबर असलेले पुष्कळच हत्ती त्यांनीं अवलोकन केले ६,७. तेव्हां त्या ग्राम्य गजांना अवलोकन करून ते सर्व मदमत्त वनगज त्यांना मारण्याकरितां वेगावेगानें त्यांच्या अंगावर

वेगः करिणां दुःसहोभवत् । नगाग्रादिव शीर्णानां शृङ्गाणां पततां क्षितौ ९
स्पन्दतामपि नागानां मार्गा नष्टा वनोद्भवाः। मार्गं संरुध्य संसुप्तं पद्मिन्याः
सार्थमुत्तमम् १० ते तं ममर्दुः सहसा चेष्टमानं महीतले । हाहाकारं
प्रमुञ्चन्तः सार्थिकाः शरणार्थिनः ११ वनगुल्मांश्च धावन्तो निद्रान्धा
बहवोभवन् । केचिद्दन्तैः करैः केचित्केचित्पद्भ्यां हता गजैः १२ निह-
तोष्ट्राश्वबहुलाः पदातिजनसंकुलाः । भयादाधावमानाश्च परस्परहता-
स्तदा १३ घोरान्नादान्विमुञ्चन्तो निपेतुर्धरणीतले । वृक्षेष्वारुह्य संरब्धाः
पतिता विषमेषु च १४ एवंप्रकारैर्बहुभिर्दैवेनाक्रम्य हस्तिभिः । राज-
न्विनिहतं सर्वं समृद्धं सार्थमण्डलम् १५ आरावः सुमहांश्चासी-
त्त्रैलोक्यभयकारकः । एषोग्निरुत्थितः कष्टस्त्रायध्वं धावताधुना १६
रत्नराशिर्विशीर्णोयं गृह्णीध्वं किं प्रधावत । सामान्यमेतद्द्रविणं न
मिथ्या वचनं मम १७ एवमेवाभिभाषन्तो विद्रवन्ति भयात्तदा । पुन-
रेवाभिधास्यामि चिन्तयध्वं सकातराः १८ तस्मिंस्तथावर्तमाने दारुणे

धांवून गेले ८ आणि ते गज धांवून जाऊं लागले असतां पर्वतापासून तुटून भूमीवर पडत असलेल्या शिखरांच्या वेगाप्रमाणें त्यांचा वेग दुःसह झाला ९. हत्ती जाऊं लागलें असतां वनांतील मार्गाचा मागमूस नाहींसा झाला आणि त्या कमलयुक्त सरोवराचा मार्ग अडवून जो तांडा निजला होता १० तो तांडा भूतलावर तरफडत असतांना त्या गजांनीं एकाएकीं तुडवून टाकिला. त्या तांड्यांतील शरणार्थी लोक हाहाकार करूं लागले ११; निद्रेनें घेरल्यामुळें कांहीं दिसेनासें होऊन पुष्कळजण वनांतील झुडपांकडे धांवूं लागले व हत्तींनीं त्यांच्यापैकीं कांहींना दातांनीं, कांहींना सोंडांनीं आणि कांहींना पायांनीं मारून टाकिलें १२. त्या तांड्याबरोबर असलेले पुष्कळ उंट व घोडे मरून पडून पायदळ लोकांची गर्दी झाली असतां भयानें धांवतां धांवतांच एकमेकांवर आपटून कित्येक मेले १३. भयंकर आरोळ्या ठोकीत ठोकीत कित्येक भूतलावर पडले आणि कित्येक वृक्षांवर चढून घाबरे झाल्यामुळें दुर्गम प्रदेशावर पडून राहिले १४. ह्याप्रमाणें अनेक प्रकारांनीं, हे धर्मराजा, दुर्दैवामुळें हत्तींनीं तो बहुतक वैभवशाली तांडा तुडवून मारून टाकिला १५. त्यावेळेला त्रैलोक्यालाही भय उत्पन्न करणारी अशी फारच मोठी अरडाओरड झाली. "अरे हा भयंकर वणवा लागला आहे, आतां धांवा! धांवा! आमचें रक्षण करा १६. अरे, ही रत्नांची रास अस्ताव्यस्त पडली आहे.ही घ्या धांवतां कां ? अरे, हें द्रव्य सर्वसाधारण आहे; मी खोटें सांगत नाहीं १७. तुह्मीं भयभीत झालां आहांत; परंतु, पुनरपि मी तुह्मांला सांगतों त्याचा विचार करा".

जनसंक्षये । दमयन्ती च बुबुधे भयसंत्रस्तमानसा १९ अपश्यद्वैशसं तत्र सर्वलोकभयंकरम् । अदृष्टपूर्वं तद्दृष्ट्वा बाला पद्मनिभेक्षणा २० संसक्तवदनाश्वासा उत्तस्थौ भयविह्वला । ये तु तत्र विनिर्मुक्ताः सार्थात्केचिदविक्षताः २१ तेब्रुवन्सहिताः सर्वे कस्येदं कर्मणः फलम् । नूनं न पूजितोस्माभिर्मणिभद्रो महायशाः २२ तथा यक्षाधिपः श्रीमान्न वै वैश्रवणः प्रभुः । न पूजा विघ्नकर्तॄणामथवा प्रथमं कृता २३ शकुनानां फलं वाथ विपरीतमिदं ध्रुवम् । ग्रहा न विपरीतास्तु किमन्यदिदमागतम् २४ अपरेत्वब्रुवन्दीना ज्ञातिद्रव्यविनाकृताः । यासावद्य महासार्थे नारी ह्युन्मत्तदर्शना २५ प्रविष्टा विकृताकारा कृत्वा रूपममानुषम् । तयेयं विहिता पूर्वं माया परमदारुणा २६ राक्षसी वा ध्रुवं यक्षी पिशाची वा भयंकरी । तस्याः सर्वमिदं पापं नात्र कार्या विचारणा २७ यदि पश्याम

असें बोलत बोलत ते लोक भयानें धांवाधांव करूं लागले १८. ह्याप्रमाणें तो भयंकर जनसंहार सुरूं झाला असतां दमयंती जागी होऊन मनामध्यें अगदीं भयभीत झाली १९ आणि सर्व लोकांना भय उत्पन्न करणारा असा संहार तिनें अवलोकन केला. पूर्वीं कधींही अवलोकनांत न आलेले तें भयकर वर्तमान अवलोकन केल्यावर ती कमलनयना बाला दमयंती २० भयानें अगदीं विह्वल होऊन उभी राहिली असतां तिच्या तोंडांतून शब्दही निघेनासा झाला व भयामुळें ती श्वासही सोडीनाशी झाली. नतर त्या तांड्यापैकीं जे कांहीं जखम वगैरे न होतां हत्तीच्या तडाक्यांतून सुटले होते २१ ते सर्व एकत्र जमून ह्मणूं लागले " अरे, हे कोणाच्या कर्माचें तरी फल उदयाला आलें? अरे ! यक्षाधिपति महाकीर्तिमान् मणिभद्राचें आह्मीं पूजन केलें नाहीं (त्याचा हा परिणाम असावा.) २२. त्याचप्रमाणे यक्षाधिपति वैभवशाली प्रभु कुबेराचेंही आह्मीं पूजन केलें नाहीं अथवा विघ्नकर्त्यांची आह्मी प्रथम पूजा केली नाहीं (त्यामुळें हें संकट ओढवलें असावें)२३. अथवा आपल्याला जे शकुन झाले त्यांचेंच हें विपरीत फल निःसंशय असलें पाहिजे. अरे! ग्रह तर आपल्याला विपरीत नाहींत नां ? अरे ! हें काय रे भलतेंच संकट आपल्यावर ओढवलें ! " २४. ह्यानतर ज्ञाति आणि द्रव्य ह्यांचा वियोग झाल्यामुळें दीन झालेले असे कांहीं त्यांतलेच लोक ह्मणाले " दिसण्यांत उन्मत्त आणि आकारानें विद्रूप अशी जी स्त्री अमानुष रूप धारण करून आज ह्या महासमाजामध्यें शिरली तिनें अत्यंत भयंकर माया पूर्वींच उत्पन्न करून ठेविली होती २५,२६. ती कोणी तरी भयंकर राक्षसी, यक्षिणी अथवा पिशाची असली पाहिजे आणि तिचाच हा सर्व अनर्थ आहे ह्यांत संशय नाहीं २७. समाजाचा नाश करणारी व अनेक

तां पापां सार्थघ्नीं नैकदुःखदाम् । लोष्टभिः पांसुभिश्चैव तृणैः काष्ठैश्च मुष्टिभिः २८ अवश्यमेव हन्यामः सार्थस्य किल कृत्यकाम् । दमयन्ती तु तच्छ्रुत्वा वाक्यं तेषां सुदारुणम् २९ ह्रीता भीता च संविग्ना प्राद्रवद्यत्र काननम् । आशङ्कमाना तत्पापमात्मानं पर्यदेवयत् ३० अहो ममोपरि विधेः संरम्भो दारुणो महान् । नानुबध्नाति कुशलं कस्येदं कर्मणः फलम् ३१ न स्मराम्यशुभं किंचित्कृतं कस्यचिदण्वपि । कर्मणा मनसा वाचा कस्येदं कर्मणः फलम् ३२ नूनं जन्मान्तरकृतं पापमापतितं महत् । अपश्चिमामिमां कष्टामापदं प्राप्तवत्यहम् ३३ भर्तृराज्यापहरणं स्वजनाच्च पराजयः । भर्त्रा सह वियोगश्च तनयाभ्यां च विच्युतिः ३४ निर्नाथता वने वासो बहुव्यालनिषेविते । अथापरेद्युः संप्राप्ते हतशिष्टाजनास्तदा ३५ देशात्तस्माद्विनिष्क्रम्य शोचन्ते वैशसं कृतम् । भ्रातरं पितरं पुत्रं सखायं च नराधिप ३६ अशोचत्तत्र वैदर्भी किं नु मे दुष्कृतं कृतम् । योपि मे निर्ज-

---

प्रकारांनीं दुःख देणारी ती पापिणी जर आपल्या दृष्टीं पडली तर मातीच्या डिखळांनीं, धुळीनें, गवतानें, काष्ठानीं अथवा (काहीं न सांपडल्यास) बुक्यांनीं सुद्धां २८ आपण त्या समाजाच्या कृत्येला अवश्य मारून टाकूं ". हें त्यांचें अत्यंत घोर भाषण श्रवण केल्यावर २९ दमयंती लज्जित व भयभीत होऊन गांधळून गेली व जिकडे अरण्य होतें तिकडें पळत सुटली आणि ते लोक कदाचित् ह्मटल्याप्रमाणें आपणाला मारण्याचें पापकर्म करण्यास चुकणार नाहींत अशी शंका येऊन ती स्वतःबद्दल शोक करूं लागली ३० कीं, " अहो, केवढाहा तरी माझ्यावर दैवाचा हा महाभयंकर घाला पडला आहे ! अद्यापिही बऱ्याची चिन्हें दिसत नाहींत. तेव्हां, कोणत्या बरें कर्माचें फल हें उदयास आलें ह्मणावें ! ३१. कोणाचेंही अगदीं अणुमात्रसुद्धां —कायेनें, वाचेनें अथवा मनानें—माझ्या हातून वाईट झाल्याचें मला स्मरत नाहीं. तेव्हां हें कोणत्या कर्माचें फल ह्मणावें बरें ! ३२. खरोखर जन्मांतरीं केलेलें महत् पातक आतां उदयास आलें आहे आणि ह्मणूनच पतीच्या राज्याचा अपहार, स्वजनांपासून त्याचा पराजय, भर्त्याशीं वियोग, मुलांशीं ताडातोड, अनाथपणा, आणि पुष्कळ श्वापदें ज्यामध्यें राहतात अशा वनामध्यें वास्तव्य हीं कधींही मागें न फिरणारी दुःसह आपत्ति मला प्राप्त झाली आहे " असो. इकडे दुसरा दिवस उजाडल्यावर हत्तींनीं मारून शिलक राहिलेले त्या तांड्यांतील लोक ३३, ३४, ३५ त्या प्रदेशांतून बाहेर पडून, हे धर्मराजा, त्या अनर्थाबद्दल कोणी भ्रात्याकरितां, कोणी पित्याकरितां, कोणी पुत्राकरितां आणि कोणी मित्राकरितां शोक करूं लागले ३६.

नेरण्ये संप्राप्तोयं जनार्णवः ३७ स हतो हस्तियूथेन मन्दभाग्यान्ममैव तत् । प्राप्तव्यं सुचिरं दुःखं नूनमद्यापि वै मया ३८ नाप्राप्तकालो म्रियते श्रुतं वृद्धानुशासनम् । या नाहमद्य मृदिता हस्तियूथेन दुःखिता ३९ न ह्यदैवकृतं किंचिन्नराणामिह विद्यते । न च मे बालभावेपि किंचित्पापकृतं कृतम् ४० कर्मणा मनसा वाचा यदिदं दुःखमागतम् । मन्ये स्वयंवरकृते लोकपालाः समागताः ४१ प्रत्याख्याता मया तत्र नलस्यार्थाय देवताः । नूनं तेषां प्रभावेण वियोगं प्राप्तवत्यहम् ४२ एवमादीनि दुःखार्ता सा विलप्य वराङ्गना । प्रलापानि तदा तानि दमयन्ती पतिव्रता ४३ हतशेषैः सह तदा ब्राह्मणैर्वेदपारगैः । अगच्छद्राजशार्दूल चन्द्रलेखेव शारदी ४४ गच्छन्ती साचिराद्बाला पुरमासादयन्महत् । सायाह्ने चेदिराजस्य सुबाहोः सत्यदर्शिनः ४५ अथ वस्त्रार्धसंवीता प्रविवेश पुरोत्तमम् । तां विह्वलां कृशां दीनां मुक्तकेशीममार्जिताम् ४६ उन्मत्तामिव

नंतर विदर्भराजकन्या दमयंती ह्मणाली " काय तरी मी पातक केलेलें आहे ! अहो, निर्जन अरण्यामध्यें जो मला हा जनसमूह प्राप्त झाला होता ३७ तोही हत्तींच्या कळपानें मारून टाकिला. माझ्याच मंदभाग्यामुळें ती गोष्ट झाली. मला खरोखर अद्यापि सुद्धां पुष्कळ कालपर्यंत दुःख भोगावयाचें आहे ३८. मी दुःखित झालें असूनही हत्तींच्या कळपानें ज्याअर्थी मला आज तुडवून टाकिली नाहीं त्याअर्थी वेळ आल्यावांचून मृत्यु येत नाहीं हें जें वृद्धांचें ह्मणणें मीं ऐकिलें आहे तेंच सत्य आहे ३९. दैवाच्या कृतीवांचून कोणतीही गोष्ट मनुष्यांना ह्या जगतामध्यें प्राप्त होत नाहीं. परंतु, हें जें दुःख प्राप्त झालें आहे तें जर पूर्वसंचित कर्माचें फल ह्मणावें तर बालपणीं सुद्धां कृतीनें, मनानें अथवा वाणीनेंही मी कधीं कांहीं पापकर्म केलें नाहीं. (नाहीं ह्मणायाला) स्वयंवरार्थ लोकपाल जमले असतांना ४०, ४१ नलाकरितां मी त्या देवतांचा अव्हेर केलेला आहे. तेव्हां, त्यांच्याच प्रभावानें मला हा वियोग प्राप्त झाला असावा " ४२. ह्याप्रमाणें दुःखाकुल झालेल्या त्या श्रेष्ठ स्त्री पतिव्रता दमयंतीनें विलाप केला ४३ आणि हत्तींनीं मारून शिलक राहिलेले त्या तांड्याबरोबर जे कांहीं वेदपारंगत ब्राह्मण होते त्यांच्यासहवर्तमान, हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, शरदृतूंतील चंद्रकलेप्रमाणें शोभणारी ती दमयंती जाऊं लागली ४४. जातां जातां थोड्याच वेळानें ह्मणजे सायंकाळीं चेदिराज सत्यनिष्ठ सुबाहूचें मोठें नगर तिला लागलें ४५ व समीप आल्यानंतर अर्धवस्त्र परिधान केलेली ती दमयंती त्या उत्कृष्ट नगरामध्यें प्रविष्ट झाली. तेव्हां विह्वल, कृश, दीन, केश अस्ताव्यस्त झालेली,

गच्छन्तीं ददृशुः पुरवासिनः । प्रविशन्तीं तु तां दृष्ट्वा चेदिराजपुरीं तदा ४७
अनुजग्मुस्तत्र बाला ग्रामिपुत्राः कुतूहलात् । सा तैः परिवृतागच्छत्स-
मीपं राजवेश्मनः ४८ तां प्रासादगतापश्यद्राजमाता जनैर्वृताम् । धात्री-
मुवाच गच्छैनामानयेह ममान्तिकम् ४९ जनेन क्लिश्यते बाला दुःखिता
शरणार्थिनी । तादृग्रूपं च पश्यामि विद्योतयति मे गृहम् ५० उन्मत्त-
वेषा कल्याणी श्रीरिवायतलोचना । सा जनं वारयित्वा तं प्रासादतल-
मुत्तमम् ५१ आरोप्य विस्मिता राजन्दमयन्तीमपृच्छत । एवमप्यसुखा-
विष्टा बिभर्षि परमं वपुः ५२ भासि विद्युदिवाभ्रेषु शंस मे कासि कस्य
वा । न हि ते मानुषं रूपं भूषणैरपि वर्जितम् ५३ असहाया नरेभ्यश्च
नोद्विजस्यमरप्रभे । तच्छ्रुत्वा वचनं तस्या भैमी वचनमब्रवीत् ५४ मानुषीं
मां विजानीहि भर्तारं समनुव्रताम् । सैरन्ध्रीं जातिसंपन्नां भुजिष्यां काम-

---

मलिन ४६ आणि उन्मत्त स्त्रियाप्रमाणें चालत असलेली दमयंती नगरवासी जनांनीं अवलोकन केली आणि चेदिराजाच्या नगरीमध्यें शिरत असलेल्या त्या दमयंतीला अवलोकन करून ४७ गांवांतील पुढाऱ्यांचीं मुलें उत्कंठेनें तिच्या मागोमाग चाललीं. अशा प्रकारें बालांनीं परिवेष्टित असलेली ती दमयंती राजमंदिरासमीप गेली ४८. तेव्हां लोकांनी परिवेष्टित असलेल्या त्या दमयंतीला अवलोकन करून वाड्यामध्यें बसलेली राजमाता आपल्या दासीला ह्मणाली " जा आणि हिला माझ्याकडे घेऊन ये ४९. दुःखाकुल आणि रक्षकाची इच्छा करणाऱ्या ह्या बालेला लोक पीडा देत आहेत. माझ्या घराला शोभा आणील अशा प्रकारचें तिचें रूप मला दिसत आहे ५०. ह्या कल्याणी स्त्रीचा वेष उन्मत्ताप्रमाणें असून हिचे नेत्र लक्ष्मीप्रमाणें दीर्घ आहेत ". ह्याप्रमाणें दासीला सांगितल्यावर दमयंतीच्या भोंवतालीं जमलेल्या लोकांना दूर करून त्या उत्कृष्ट राजवाड्यामध्यें राजमातेनें तिला ५१ आणिली आणि, हे राजा, ती राजमाता दमयंतीला ह्मणाली " ह्याप्रमाणें तूं दुःखानें व्याप्त झाली असूनही पराकाष्ठेची कांति धारण करीत आहेस ५२ आणि मेघांतील विद्युल्लताच कीं काय अशी भासत आहेस. तेव्हां, तूं कोण व कोणाची हें मला सांग. भूषणानें रहित असूनही मनोहर दिसत असलेलें हें तुझें रूप मनुष्याचें नव्हें ५३. हे देवतुल्य स्त्रिये, तुझ्या-बरोबर कोणी नसतांनाही तूं लोकांना भीत नाहींस. (तेव्हां तूं साधारण स्त्री नव्हेस हें खचित आहे.) " हें त्या राजमातेचें भाषण ऐकून घेऊन भीमकन्या दम-यंती ह्मणाली ५४ " मी मनुष्यजातीची स्त्री असून भर्त्याला अनुसरून वागणारी आहें असें आपण समजा. मी इच्छेस येईल त्या ठिकाणीं वास्तव्य करणारी आणि

वासिनीम् ५५ फलमूलाशनामेकां यत्रसायंप्रतिश्रयाम् । असंख्येयगुणो भर्ता मां च नित्यमनुव्रतः ५६ भक्ताहमपि तं वीरं छायेवानुगता पथि । तस्य दैवात्प्रसङ्गोऽभूदतिमात्रं सुदेवने ५७ द्यूते स निर्जितश्चैव वनमेक उपेयिवान् । तमेकवसनं वीरमुन्मत्तमिव विह्वलम् ५८ आश्वासयन्ती भर्तारमहमप्यगमं वनम् । स कदाचिद्वने वीरः कस्मिंश्चित्कारणान्तरे ५९ क्षुत्परीतस्तु विमनास्तदप्येकं व्यसर्जयत् । तमेकवसना नग्नमुन्मत्तवद्चेतसम् ६० अनुव्रजन्ती बहुला न स्वपामि निशास्तदा । ततो बहुतिथे काले सुप्तामुत्सृज्य मां क्वचित् ६१ वाससोऽर्धं परिच्छिद्य त्यक्तवान्मामनागसम् । तं मार्गमाणा भर्तारं दह्यमाना दिवानिशम् ६२ साहं कमलगर्भाभमपश्यन्ती हृदि प्रियम् । न विन्दाम्यमरप्रख्यं प्रियं प्राणेश्वरं प्रभुम् ६३ तामश्रुपरिपूर्णाक्षीं विलपन्तीं तथा बहु । राजमाताब्रवीदार्ता भैमीमार्तस्वरां स्वयम् ६४ वसस्व मयि कल्याणि प्रीतिर्मे परमा

अंतःपुरामध्यें राहणारी जातीची दासी आहे ५५. मी फळें व मुळें ह्यांवर उपजीविका करीत असून तूर्त एकटीच हिंडत असते आणि हिंडतां हिंडतां जेथें सायंकाळ होईल तेथें वास्तव्य करीत असतें. माझा भर्ता असंख्य गुणांनीं युक्त असून नेहमीं मला अनुसरून वागत असतो ५६ आणि मीही छायेप्रमाणें त्याला अनुसरून वागत असून त्याच्या सेवेमध्यें नेहमीं तत्पर असतें. दैवामुळें त्याच्यावर द्यूताचा अत्यंत दुःसह प्रसंग आला ५७ आणि त्या द्यूतामध्यें पराजय पावून तो एकटा वनामध्यें चालतां झाला. तेव्हां, दुःखानें विह्वल होऊन एक वस्त्र परिधान केलेला तो वीर उन्मत्ताप्रमाणें वनांत जाऊं लागला असतां ५८ मीही त्याला धीर देण्याकरितां त्याच्या मागोमाग वनामध्यें गेलें. एकदां क्षुधित होऊन खिन्न झालेला तो वीर वनामध्यें चालला असतां कांहीं कारणामुळें त्याला जवळ असलेलें एक वस्त्रही टाकावें लागलें. तेव्हां नग्न व उन्मत्ताप्रमाणें विवेकहीन झालेल्या त्या भर्त्याच्या मागोमाग मी एकावस्त्रानिशीं ५९,६० गेलें व अरण्यामध्यें पुष्कळ रात्री माझ्या झोंपेवांचून गेल्या. तदनंतर बराच काळ लोटल्यावर मी त्याचा कांहीं अपराध केला नसतानाही मला झोंप लागली आहे असें पाहून तो माझ्या वस्त्रांतील अर्धे वस्त्र फाडून घेऊन मला टाकून चालता झाला. अहोरात्र अंतःकरणामध्यें जळत असलेली मी त्या भर्त्याला शोधीत आहें ६१,६२. कमलाच्या गाभ्याप्रमाणें मनोहर व देवतुल्य असा तो प्रिय प्राणनाथ प्रभु दृष्टीं पडत नसल्यामुळें माझ्या मनाला कांहींच बरें वाटत नाहीं " ६३. ह्याप्रमाणें अश्रूंनीं नेत्र भरून आलेली ती दमयंती नानाप्रकारांनीं विलाप करूं लागली. तेव्हां आर्त होऊन आक्रोश

त्वयि । मृगयिष्यन्ति ते भद्रे भर्तारं पुरुषा मम ६५ अपि वा स्वयमागच्छेत्परिधावन्नितस्ततः । इहैव वसती भद्रे भर्तारमुपलप्स्यसे ६६ राजमातुर्वचः श्रुत्वा दमयन्ती वचोऽब्रवीत् । समयेनोत्सहे वस्तुं त्वयि वीरप्रजायिनि ६७ उच्छिष्टं नैव भुञ्जीयां न कुर्यां पादधावनम् । न चाहं पुरुषानन्यान्प्रभाषेयं कथंचन ६८ प्रार्थयेद्यदि मां कश्चिद्दण्ड्यस्ते स पुमान्भवेत् । वध्यश्च तेऽसकृन्मन्द इति मे व्रतमाहितम् ६९ भर्तुरन्वेषणार्थं तु पश्येयं ब्राह्मणानहम् । यद्येवमिह वत्स्यामि त्वत्सकाशे न संशयः ७० अतोऽन्यथा न मे वासो वर्तते हृदये क्वचित् । तां प्रहृष्टेन मनसा राजमातेदमब्रवीत् ७१ सर्वमेतत्करिष्यामि दिष्ट्या ते व्रतमीदृशम् । एवमुक्त्वा ततो भैमीं राजमाता विशांपते ७२ उवाचेदं दुहितरं सुनन्दां नाम भारत । सैरन्ध्रीमभिजानीष्व सुनन्दे देवरूपिणीम् ७३ वयसा तुल्यतां प्राप्ता सखी तव भवत्वियम् । एतया सह मोदस्व निरुद्विग्नमनाः

करीत असलेल्या त्या भीमकन्या दमयंतीला राजमाता दुःखित होऊन म्हणाली ६४ " हे कल्याणि, तूं माझ्यापाशीं रहा. तुझे ठिकाणी माझें पराकाष्ठेचें प्रेम आहे. हे भद्रे, माझे सेवक लोक तुझ्या भर्त्याला शोधून काढितील ६५; किंवा इकडे तिकडे धांवतां धांवतां तो स्वतःच येथे येईल. हे कल्याणि, तूं येथेंच रहा; म्हणजे तुझी व भर्त्याची गांठ पडेल " ६६. ह्याप्रमाणें राजमातेनें सांगितलें असतां तें ऐकून घेऊन दमयंती म्हणाली " हे वीरमाते, काहीं अटीवर मी तुझ्यापाशीं राहीन ६७. मी कधीं उच्छिष्ट भक्षण करणार नाहीं; कधीं कोणाचें पादप्रक्षालन करणार नाहीं; इतर पुरुषांशीं मी कसाही प्रसंग आला तरी भाषण करणार नाहीं ६८; जो कोणी माझा अभिलाष करण्याची इच्छा धरील त्याचें तुला शासन करावें लागेल आणि एक वेळ शासन करून जर तो न ऐकेल तर त्या मूढाचा तुला वधही करावा लागेल. हे माझें व्रत ठरलेलें आहे ६९. भर्त्याचा शोध करण्याकरितां फक्त ब्राह्मणांची मात्र मी गांठ घेत जाईन. ह्याप्रमाणें होत असेल तर मी तुझे संनिध वास्तव्य करीन ह्यांत संशय नाहीं ७०. ह्याशिवाय इतर तऱ्हेनें कोठेंही वास्तव्य करणं माझ्या मनाला नीट वाटत नाहीं ". ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां प्रसन्न अंतःकरणानें राजमाता तिला म्हणाली ७१ " हें मी सर्व चालवीन; अशा प्रकारचें तुझें व्रत आहे ही फार चांगली गोष्ट आहे ". ह्याप्रमाणें, हे भरतकुलोत्पन्ना प्रजाधिपते धर्मराजा, भीमकन्या दमयंतीला सांगून ती राजमाता आपल्या सुनंदानामक कन्येला म्हणाली " हे सुनंदे, ही दासी देवरूपिणी आहे असें तूं समज ७२, ७३. ही वयानें तुझ्या बरोबरीची आहे.

सदा ७४ ततः परमसंहृष्टा सुनन्दा गृहमागमत्। दमयन्तीमुपादाय सखीभिः परिवारिता ७५ सा तत्र पूज्यमाना वै दमयन्ती व्यनन्दत। सर्वकामैः सुविहितैर्निरुद्वेगावसत्तदा ७६ [२६३२] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीचेदिराजगृहवासे पञ्चषष्टितमोऽध्यायः ॥६५॥

बृहदश्व उवाच ॥ उत्सृज्य दमयन्तीं तु नलो राजा विशांपते। ददर्श दावं दह्यन्तं महान्तं गहने वने १ तत्र शुश्राव शब्दं वै मध्ये भूतस्य कस्यचित्। अभिधाव नलेत्युच्चैः पुण्यश्लोकेति चासकृत् २ मा भैरिति नलश्चोक्त्वा मध्यमग्नेः प्रविश्य तम्। ददर्श नागराजानं शयानं कुण्डलीकृतम् ३ स नागः प्राञ्जलिर्भूत्वा वेपमानो नलं तदा। उवाच मां विद्धि राजन्नागं कर्कोटकं नृप ४ मया प्रलब्धो महर्षिर्नारदः सुमहातपाः। तेन मन्युपरीतेन शप्तोऽस्मि मनुजाधिप ५ तिष्ठ त्वं स्थावर इव यावदेव नलः क्वचित्। इतो नेता हि तत्र त्वं शापान्मोक्ष्यसि मत्कृतात् ६ तस्य शापान्न

तेव्हां ही तुझी सखी असो. हिच्यासहवर्तमान तूं नेहमीं निःशंक मनानें क्रीडा करीत जा" ७४. ह्याप्रमाणें मातेनें सांगितल्यानंतर सख्यांनीं परिवेष्टित असलेली ती सुनंदा पराकाष्ठेची आनंदित झाली आणि दमयंतीला घेऊन घरामध्यें गेली ७५. नंतर त्या ठिकाणीं मानमान्यता होऊं लागलेली दमयंती आनंदित झाली आणि तिच्या सर्व इच्छा उत्तमप्रकारें सिद्धीस जाऊं लागल्यामुळें ती निर्भयपणें तेथें राहूं लागली ७६. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकी चेदिराजाचे घरीं दमयंतीचें वास्तव्य झाल्याविषयीं पासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥६५॥

बृहदश्व सांगतातः—हे प्रजाधिपते धर्मराजा, दमयंतीला सोडून नलराजा चालता झाल्यावर त्या गहन वनामध्यें प्रचंड वणवा लागलेला त्यानें पाहिला १ व त्या ठिकाणीं त्या वणव्यामधून "हे नला, हे पुण्यश्लोका, धांव" असा अनेकवेळां कोणाप्राण्याचा शब्द त्याच्या कानावर आला २. तेव्हां "भिऊं नको" असें ह्मणून नल अग्नीमध्यें शिरला तों वेटोळें घालून पडलेला नागराज त्यानें अवलोकन केला ३. नंतर तो नाग नम्र होऊन कांपत कांपत नलाला ह्मणाला "हे प्रजापालका नलराजा, मी कर्कोटक नाग आहें असें तूं समज ४. हे प्रजाधिपते, अत्यंत महातपस्वी नारद महर्षींचा मीं उपहास केला असतां "तेथून कधीं काळीं नल तुला घेऊन जाईपर्यंत तूं स्थावराप्रमाणें निश्चल होऊन रहा आणि नलानें तुला नेलें ह्मणजे त्या वेळीं तूं माझ्या शापापासून मुक्त होशील" असा त्या महर्षींनीं क्रुद्ध होऊन मला शाप दिला आहे ५,६ व त्यांच्या शापामुळें एक पाऊल देखील टाकण्यास मी

शक्तोस्मि पदाद्विचलितुं पदम् । उपदेक्ष्यामि ते श्रेयस्त्रातुमर्हति मां भवान् ७ सखा च ते भविष्यामि मत्समो नास्ति पन्नगः । लघुश्च ते भविष्यामि शीघ्रमादाय गच्छ माम् ८ एवमुक्त्वा स नागेन्द्रो बभूवाङ्गुष्ठमात्रकः । तं गृहीत्वा नलः प्रायाद्देशं दावविवर्जितम् ९ आकाशदेशमासाद्य विमुक्तं कृष्णवर्त्मना । उत्स्रष्टुकामं तं नागः पुनः कर्कोटकोब्रवीत् १० पदानि गणयन्गच्छ स्वानि नैषध कानिचित् । तत्र तेहं महाबाहो श्रेयो धास्यामि यत्परम् ११ ततः संख्यातुमारब्धमदशद्दशमे पदे । तस्य दष्टस्य तद्रूपं क्षिप्रमन्तरधीयत १२ स दृष्ट्वा विस्मितस्तस्थावात्मानं विकृतं नलः । स्वरूपधारिणं नागं ददर्श स महीपतिः १३ ततः कर्कोटको नागः सान्त्वयन्नलमब्रवीत् । मया तेन्तर्हितं रूपं न त्वां विद्युर्जना इति १४ यत्कृते चासि निकृतो दुःखेन महता नल । विषेण स मदीयेन त्वयि दुःखं निवत्स्यति १५ विषेण संवृतैर्गात्रैर्यावत्त्वां न विमोक्ष्यति ।

असमर्थ आहें. ह्यास्तव तूं माझें रक्षण कर. मी तुला कल्याणाची गोष्ट सांगेन ७ आणि तुझा सखा होईन. माझ्यासारिखा दुसरा नाग कोणीही नाहीं. आतां मी तुझ्याकरितां हलका होतो आणि तूं मला घेऊन सत्वर चल " ८. ह्याप्रमाणें बोलून तो नागराज अगदीं अंगुष्ठायेवढा झाला आणि नंतर नलही त्याला घेऊन जेथें वणवा नव्हता अशा प्रदेशामध्यें गेला ९. तदनंतर अग्नीनें रहित अशा उघड्या प्रदेशामध्यें गेल्यावर नल त्या नागाला सोडून देण्याचें मनांत आणीत आहे तोंच तो कर्कोटक नाग त्याला ह्मणाला १० " हे नैषधा, तूं कांहीं पाउलें मोजीत मोजीत चल ह्मणजे, हे महापराक्रमी राजा, मी तुझें उत्कृष्ट कल्याण करीन " ११. ह्याप्रमाणें कर्कोटक नागानें सांगितल्यावर नलराजा पाउलें मोजून चालूं लागला असतां दहावें पाउल टाकितेवेळीं (" दश " असें ह्मणतांक्षणीं) त्या नागानें त्याला दंश केला व नागाचा दंश होताक्षणींच नलाचें पहिलें रूप गुप्त झालें १२. तेव्हां आपला देह विकृत झाला असें अवलोकन केल्यावर नलराजा विस्मयानें थक्क होऊन उभा राहिला असतां स्वतःचें रूप धारण केलेला कर्कोटक नाग त्या भूपतीच्या दृष्टीं पडला १३. तदनंतर सांत्वन करीत करीत कर्कोटक नाग नलाला ह्मणाला " तुला लोकांनीं ओळखूं नये ह्मणून मीं तुझें रूप गुप्त केलें आहें १४. हे नला, ज्याच्यामुळें दुःस्थिति येऊन तूं मोठें दुःख भोगीत आहेस तो कलि माझ्या विषाच्या योगानें तुझे ठिकाणीं मोठ्या दुःखानें वास्तव्य करील १५. हे महाराजा, विषयुक्त अवयवांनीं जोंपर्यंत तो तुला सोडणार नाहीं तोंपर्यंत तो तुझे ठिकाणीं दुःखानें

तावत्त्वयि महाराज दुःखं वै स निवत्स्यति १६ अनागा येन निकृतस्त्वम-
नर्हो जनाधिप । क्रोधादसूययित्वा तं रक्षा मे भवतः कृता १७ न ते
भयं नरव्याघ्र दंष्ट्रिभ्यः शत्रुतोपि वा । ब्रह्मविद्भ्यश्च भविता मत्प्रमादा-
न्नराधिप १८ राजन्विषनिमित्ता च न ते पीडा भविष्यति । सङ्ग्रामेषु च
राजेन्द्र शश्वज्जयमवाप्स्यसि १९ गच्छ राजन्नितः सूतो बाहुकोहमिति
ब्रुवन् । समीपमृतुपर्णस्य स हि चैवाक्षनैपुणः २० अयोध्यां नगरीं
रम्यामद्य वै निषधेश्वर । स तेक्षहृदयं दाता राजाश्वहृदयेन वै २१ इक्ष्वा-
कुकुलजः श्रीमान्मित्रं चैव भविष्यति । भविष्यसि यदाक्षज्ञः श्रेयसा योक्ष्यसे
तदा २२ समेष्यसि दारैस्त्वं मा स्म शोके मनः कृथाः । राज्येन तन-
याभ्यां च सत्यमेतद्ब्रवीमि ते २३ स्वं रूपं च यदा द्रष्टुमिच्छेथास्त्वं
नराधिप । संस्मर्तव्यस्तदा तेहं वासश्चेदं निवासयेः २४ अनेन वाससा
छन्नः स्वं रूपं प्रतिपत्स्यसे । इत्युक्त्वा प्रददौ तस्मै दिव्यं वासोयुगं

वास्तव्य करील १६. हे प्रजाधिपते, कपटाचा प्रयोग होण्यास तूं योग्य नसून अगदीं निरप-
राधी असतांना ज्यानें तुला कपट करून आपत्ति आणिली त्या कलीचा रागानें सूड
उगवून मीं तझें रक्षण केलें आहे १७. हे पुरुषश्रेष्ठा राजा, श्वापदें, शत्रु अथवा ब्रह्म-
वेत्ते ह्यांपासून तुला माझ्या प्रसादानें भय उत्पन्न होणार नाहीं १८. हे राजा, विषा-
बद्दल तुला पीडा होणार नाहीं आणि, हे राजाधिराज, संग्रामामध्यें तुला नेहमीं जय
मिळत जाईल १९. हे राजा, "मी बाहुकनामक सारथि आहे असें सांगत सांगत
तूं येथून ऋतुपर्ण राजाकडे जा. तो राजा द्यूतविद्येमध्यें निपुण आहे २०. हे निषधराज,
तू आज रम्य अशा अयोध्या नगरीप्रत जा. तो ऋतुपर्णराजा तुझ्यापासून अश्वविद्या
घेऊन तुला द्यूतविद्येचें तत्त्व सांगेल २१. हे राजा, इक्ष्वाकुकुलोत्पन्न वैभवशाली
ऋतुपर्णराजा तुझा मित्र होईल आणि तूं जेव्हां द्यूतविद्येमध्यें निपुण होशील तेव्हां
तुझें कल्याण होईल २२. तूं आतां शोक करूं नकोस. स्त्री, राज्य आणि पुत्र हीं
तुला प्राप्त होतील हें मी तुला सत्य सांगतों २३. हे राजा, स्वतःचें शरीर अवलोकन
करण्याची जेव्हां तुला इच्छा होईल तेव्हां तूं माझें स्मरण करून हें वस्त्र परिधान
करीत जा २४. ह्या वस्त्रानें तू आच्छादित झालास ह्मणजे तुला आपलें स्वरूप प्राप्त होईल.

१ नलराजाच्या शरीरामध्यें कलि प्रविष्ट झाला होता. त्या कलीला दुःख देण्याकरितां कर्कोटक नागानें नलराजाला दंश केला. ह्यावरून ज्याच्या शरीरामध्यें जो प्रवेश करितो त्याला त्या शरीराला होणाऱ्या सुखदुःखाचा उपभोग घ्यावा लागतो ही गोष्ट सिद्ध होते आणि असाच प्रकार कोणी कोणाला झपाटलें असल्यास होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

स्तदा २५ एवं नलं च संदिश्य वासो दत्त्वा च कौरव। नागराजस्ततो राजंस्तत्रैवान्तरधीयत २६ [२६५८] इति श्रीमहाभारते ० वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलकर्कोटकसंवादे षट्षष्टितमोध्यायः॥६६॥

बृहदश्व उवाच ॥ तस्मिन्नन्तर्हिते नागे प्रययौ नैषधो नलः। ऋतुपर्णस्य नगरं प्राविशद्दशमेहनि १ स राजानमुपातिष्ठद्बाहुकोहमिति ब्रुवन्। अश्वानां वाहने युक्तः पृथिव्यां नास्ति मत्समः २ अर्थकृच्छ्रेषु चैवाहं प्रष्टव्यो नैपुणेषु च। अन्नसंस्कारमपि च जानाम्यन्यैर्विशेषतः ३ यानि शिल्पानि लोकेस्मिन्यच्चैवान्यत्सुदुष्करम्। सर्वं यतिष्ये तत्कर्तुमृतुपर्ण भरस्व माम् ४ ऋतुपर्ण उवाच॥ वस बाहुक भद्रं ते सर्वमेतत्करिष्यसि। शीघ्रयाने सदा बुद्धिर्ध्रियते मे विशेषतः ५ स त्वमातिष्ठ योगं तं येन शीघ्रा हया मम। भवयुरश्वाध्यक्षोसि वेतनं ते शतं शताः ६ त्वामुपस्थास्यतश्चैव नित्यं वार्ष्णेयजीवलौ। एताभ्यां रंस्यसे सार्धं वस वै मयि बाहुक ७ बृहदश्व उवाच॥ एवमुक्तो नलस्तेन न्यवसत्तत्र पूजितः। ऋतुपर्णस्य नगरे

ह्याप्रमाणें नलाला सांगून कर्कोटक नागानें त्याला दोन दिव्य वस्त्रें दिलीं २५ आणि हे कुरुकुलोत्पन्ना धर्मराजा, ह्याप्रमाणें नलाला सांगून त्याला वस्त्रें दिल्यावर तो नागराज तेथेंच गुप्त झाला २६. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं नल व कर्कोटक यांच्या संवादाविषयीं सहासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥६६॥

बृहदश्व सांगतात:— तो नाग गुप्त झाल्यावर निषधराज नल दहाव्या दिवशीं ऋतुपर्ण राजाच्या नगरामध्यें जाऊन पोंचला १ आणि मी बाहुक आहें असें ह्मणत ह्मणत राजापाशीं जाऊन ह्मणाला " अश्व हाकण्यांत पृथ्वीमध्यें माझ्यासारिखा योग्य सारथि दुसरा कोणीही नाहीं २. द्रव्यसंबंधीं कांहीं कठीण प्रसंग येऊन पडले असतां मला सल्ला मसलत विचारावी व इतरांपेक्षां पाकसिद्धीसंबंधानेंही मी कांहीं विशेष जाणीत आहें ३. हे ऋतुपर्ण राजा, फार कशाला ? जीं जीं ह्मणून कांहीं या जगतामध्यें शिल्पकर्मे आहेत आणि जें जें ह्मणून कांहीं कृत्य करण्यास दुर्घट आहे तें सर्व पार पाडून नेण्याविषयीं मी यत्न करीन; तूं माझें पोषण कर " ४. ऋतुपर्ण ह्मणालाः—हे बाहुका, तुझें कल्याण असो. तूं येथें रहा. हें सर्व कांहीं तूं करशील. विशेषेंकरून रथांत बसून लवकर जाण्याविषयीं माझी नेहमीं इच्छा असते ५. ह्यास्तव, ज्याच्या योगानें माझे अश्व सत्वर गमन करूं लागतील असा कांहीं उपाय तूं योज. तूं अश्वावरील अध्यक्ष हो; तुला दरमाहा पगार दहाहजार मिळत जाईल ६. वार्ष्णेय आणि जीवल हे दोघेजण नित्य तुझ्या आज्ञेमध्यें तत्पर राहतील आणि ह्यांच्यासहवर्तमान, हे बाहुका, तूं आपला

सहवार्ष्णेयजीवलः ८ स वै तत्रावसद्राजा वैदर्भीमनुचिन्तयन् । सायं-
सायं सदा चेमं श्लोकमेकं जगाद ह । ९ क्व नु सा क्षुत्पिपासार्ता श्रान्ता
शेते तपस्विनी । स्मरन्ती तस्य मन्दस्य कं वा साद्योपतिष्ठति १० एवं
ब्रुवन्तं राजानं निशायां जीवलोऽब्रवीत् । कामेनां शोचसे नित्यं श्रोतुमि-
च्छामि बाहुक ११ आयुष्मन्कस्य वा नारी यामेवमनुशोचसि । तमु-
वाच नलो राजा मन्दप्रज्ञस्य कस्यचित् १२ आसीद्बहुमता नारी तस्या
दृढतरं वचः । स वै केनचिदर्थेन तया मन्दो व्ययुज्यत १३ विप्रयुक्तः
स मन्दात्मा भ्रमत्यसुखपीडितः । दह्यमानः स शोकेन दिवारात्रमत-
न्द्रितः १४ निशाकाले स्मरंस्तस्याः श्लोकमेकं स्म गायति १५ स
विभ्रमन्महीं सर्वां क्वचिदासाद्य किंचन । वसत्यनर्हस्तद्दुःखं भूय एवानुसं-
स्मरन् १६ सा तु तं पुरुषं नारी कृच्छ्रेऽप्यनुगता वने । त्यक्ता तेनाल्प-

---

काळ सुखानें घालविशील. तूं माझ्यापाशीं रहा ७. बृहदश्व सांगतातः---ह्याप्रमाणें
त्यानें नलाला सांगितलें असतां मानमान्यतापूर्वक वार्ष्णेय आणि जीवल ह्यांसहवर्तमान
तो नल ऋतुपर्णाच्या राजधानीमध्यें राहिला ८. तथें वास्तव्य करीत असतांना त्या
राजाला विदर्भराजकन्या दमयंतीचें एकसारखें स्मरण होत असे आणि सायंकाळ
झाला ह्मणजे प्रत्येक दिवशीं तो " क्षुधेनें व तृषेनें व्याकुल होऊन श्रांत झालेली ती
बिचारी कोठें बरें पडली असेल ? किंवा त्या मंदमतीचें स्मरण करणाऱ्या तिनें आज
(उपजीविकेकरितां) कोणाचा बरें आश्रय केला असेल " हा एक श्लोक एकसारखा
ह्मणत असे ९, १०. ह्याप्रमाणें नलराजा रात्रीं आपल्याशीं बोलूं लागला असतां
जीवल त्याला ह्मणाला " हे बाहुका, ह्या कोणत्या स्त्रीकरितां तूं नित्य शोक करीत
असतोस हें ऐकण्याची माझी इच्छा आहे ११. हे दीर्घायु बाहुका, ह्याप्रमाणें तूं
जिच्याबद्दल शोक करीत असतोस ती स्त्री तरी कोणाची आहे " ? ह्याप्रमाणें जीव-
लानें विचारिल्यावर नलराजा त्याला ह्मणाला " कोणा एका मंदमति पुरुषाची १२
एक अतिप्रिय स्त्री होती. त्या पुरुषाचें भाषण तर मुळींच विश्वसनीय नसे. पुढें कांहीं
कारणांमुळें त्या मूढ पुरुषाचा तिच्याशीं वियोग झाला असतां १३ स्त्रीवियोग झालेला
तो मूढमति दुःखाकुल होऊन भटकूं लागला. त्याची निद्रा अगदीं नाहींशी झाली
असून रात्रंदिवस तो स्त्रीच्या शोकानें जळत असे १४ आणि रात्रीच्या वेळीं तिचें
स्मरण होऊन तो एक श्लोक ह्मणत असे १५. ह्याप्रमाणें सर्व पृथ्वी हिंडतां हिंडतां
कोणाचा तरी आश्रय करून तो सध्यां राहिलेला आहे व तशा प्रकारें राहण्याला
तो अयोग्य असून वारंवार त्या दुःखाचें स्मरण करकरून तो आपले दिवस कंठीत

पुण्येन दुष्करं यदि जीवति १७ एका बालानभिज्ञा च मार्गाणामतथोचिता । क्षुत्पिपासापरीताङ्गी दुष्करं यदि जीवति १८ श्वापदाचरिते नित्यं वने महति दारुणे । त्यक्ता तेनाल्पभाग्येन मन्दप्रज्ञेन मारिष १९ इत्येवं नैषधो राजा दमयन्तीमनुस्मरन् । अज्ञातवासं न्यवसद्राज्ञस्तस्य निवेशने २० [२६७८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलविलापे सप्तषष्टितमोऽध्यायः ॥ ६७ ॥

बृहदश्व उवाच ॥ हृतराज्ये नले भीमः सभार्ये प्रेष्यतां गते । द्विजान्प्रस्थापयामास नलदर्शनकाङ्क्षया १ संदिदेश च तान्भीमो वसु दत्त्वा च पुष्कलम् । मृगयध्वं नलं चैव दमयन्तीं च मे सुताम् २ अस्मिन्कर्मणि संपन्ने विज्ञाते निषधाधिपे । गवां सहस्रं दास्यामि यो वस्तावानयिष्यति ३ अग्रहारांश्च दास्यामि ग्रामं नगरसंमितम् । न चेच्छक्याविहानेतुं दमयन्ती नलोपि वा ४ ज्ञातमात्रेपि दास्यामि गवां दशशतं धनम् ।

आहे १६. संकट प्राप्त झालें असतां ती स्त्री त्या पुरुषाच्या मार्गोमाग वनामध्यें गेली; परंतु,त्याचें पुण्य कमी झाल्यामुळें त्यानें तिचा त्याग केला. अशा स्थितीमध्यें जर ती स्त्री जिवंत राहिली असेल तर मोठें अघटितच समजलें पाहिजे १७. एकटी, अल्पवयी, वनांतील मार्गांविषयीं अनभिज्ञ, अशा प्रकारचें दुःख सहन करण्यास अयोग्य आणि क्षुधेनें व तृषेनें अगदीं जर्जर झालेली अशी ती स्त्री जिवंत राहिली असेल तर खरोखरच मोठी अघटित गोष्ट समजली पाहिजे १८. कारण, आर्या जीवला, त्या भाग्यहीन मंदमति पुरुषानें ज्या ठिकाणीं श्वापदांचा नित्य संचार आहे अशा मोठ्या घोर वनामध्यें तिला टाकून दिलेली आहे " १९. ह्याप्रमाणें दमयंतीचें स्मरण करीत करीत नैषधराजा त्या ऋतुपर्ण राजाच्या घरीं अज्ञातवासामध्यें राहिला २०. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नलाच्या विलापाविषयीं सहुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६७ ॥

बृहदश्व सांगतात:— ह्याप्रमाणें राज्याचा अपहार होऊन नलानें भार्येसहवर्तमान दुसऱ्याचें दास्य स्वीकारिलें असतां भीमराजानें नलाला पाहण्याकरितां ब्राह्मण पाठविले १ आणि पाठवितांना पुष्कळ द्रव्य देऊन भीमराजा त्यांना ह्मणाला " नल व माझी कन्या दमयंती ह्यांचा तुह्मीं शोध लावा २. हें कार्य सिद्धीस गेल्यावर ह्मणजे निषधराज नलाचा शोध लागल्यावर तुमच्यापैकीं जो त्या उभयतांना घेऊन येईल त्याला मी एक सहस्र गाई देईन ३. इतकेंच नव्हे परंतु, असें झाल्यास अग्रहार देईन आणि राजधानीसारिखा गांवही बक्षीस देईन. दमयंती आणि नल ह्यांना येथें घेऊन येणें जर शक्य नसेल ४ तर नुसतां शोध लागल्यावर सुद्धां मी एक सहस्र गाई

इत्युक्तास्ते ययुर्हृष्टा ब्राह्मणाः सर्वतोदिशम् ५ पुरराष्ट्राणि चिन्वन्तो नैषधं सह भार्यया । नैव क्वापि प्रपश्यन्ति नलं वा भीमपुत्रिकाम् ६ ततश्चेदिपुरीं रम्यां सुदेवो नाम वै द्विजः । विचिन्वानोथ वैदर्भीमपश्यद्राजवेश्मनि ७ पुण्याहवाचने राज्ञः सुनन्दासहितां स्थिताम् । मन्दं प्रख्यायमानेन रूपणाप्रतिमेन ताम्। निबद्धां धूमजालेन प्रभामिव विभावसोः ८ तां समीक्ष्य विशालाक्षीमधिकं मलिनां कृशाम् । तर्कयामास भैमीति कारणैरुपपादयन् ९ सुदेव उवाच ॥ यथेयं मे पुरा दृष्टा तथारूपेयमङ्गना । कृतार्थोस्म्यद्य दृष्ट्वेमां लोककान्तामिव श्रियम् १० पूर्णचन्द्रनिभां श्यामां चारुवृत्तपयोधराम् । कुर्वन्तीं प्रभया देवीं सर्वा वितिमिरा दिशः ११ चारुपद्मविशालाक्षीं मन्मथस्य रतीमिव । इष्टां समस्तलोकस्य पूर्णचन्द्रप्रभामिव १२ विदर्भसरसस्तस्माद्दैवदोषादिवोद्धृताम् । मलपङ्कानुलि-

---

देईन ". ह्याप्रमाणे भीमराजाने सांगितलें असतां ब्राह्मण आनंदित होऊन चोहोंकडे गेले ५ व गेल्यावर अनेक नगरामध्ये व राष्ट्रांमध्ये भार्येसहवर्तमान नैषधराजाचा त्यांनीं शोध केला; परंतु, नल अथवा भीमकन्या दमयंती त्यांच्या कोठेंही आढळण्यात येईना ६. नंतर सुदेवनामक ब्राह्मण त्यांचा शोध लावण्याकरितां रम्य चेदिपुरीमध्यें गेला असता विदर्भराजकन्या दमयंती त्याने राजवाड्यामध्ये पाहिली ७. ती (कांहीं निमित्ताने) राजाचे पुण्याहवाचन चालले असतां राजकन्या सुनंदेसहवर्तमान तेथें उभी होती; तिचें अप्रतिम रूप–ती भीमकन्या दमयंतीच असावी असे– (सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणाऱ्याला) किंचित् दर्शवीत होते आणि धुराच्या लोटाने व्याप्त झालेली अग्नीची प्रभाच की काय अशी ती दिसत होती ८. असो. फारच मलिन व कृश झालेल्या तिला अवलोकन केल्यावर खाणाखुणांच्या योगाने ती भीमकन्याच असावी असा त्या सुदेव ब्राह्मणाने तर्क केला ९. सुदेव आपल्याशी ह्मणाला:— जशी मी हिला पूर्वी पाहिली होती तशीच ही स्त्री रूपानें दिसत आहे. लोकप्रिय लक्ष्मीप्रमाणे हिला अवलोकन करून मी आज कृतार्थ झालों आहें १०. हिची कांति पूर्ण चंद्राप्रमाणे असून हिची ठवण नेहमीं सोळा वर्षांच्या स्त्रीप्रमाणें आहे. हिचे स्तन मनोहर व वर्तुल असून आपल्या तेजाच्या योगानें ही देवी सर्व दिशा प्रकाशित करीत आहे ११. हिचे नेत्र सुंदर व कमलपत्राप्रमाणे विशाल असून मदनाच्या रतीप्रमाणें ही रूपवती आहे आणि पूर्णचंद्राच्या प्रभेप्रमाणें ही सर्व लोकांना इष्ट आहे १२. विदर्भदेशरूप सरोवरापासून प्रारब्धदोषामुळें उपटली गेलेली व मळानें आणि चिखलानें सर्वांग व्याप्त झालेली ही दमयंती सरोवरापासून काढून आणिलेल्या

साङ्गीं मृणालीमिव चोद्धृताम् १३ पौर्णमासीमिव निशां राहुग्रस्तनि-
शाकराम् । पतिशोकाकुलां दीनां शुष्कस्रोतां नदीमिव १४ विध्वस्तप-
र्णकमलां वित्रासितविहंगमाम् । हस्तिहस्तपरामृष्टां व्याकुलामिव
पद्मिनीम् १५ सुकुमारीं सुजाताङ्गीं रत्नगर्भगृहोचिताम् । दह्यमानामि-
वार्केण मृणालीमिव चोद्धृताम् १६ रूपौदार्यगुणोपेतां मण्डनार्हाममण्डिताम्
। चन्द्रलेखामिव नवां व्योम्नि नीलाभ्रसंवृताम् १७ कामभोगैः
प्रियैर्हीनां हीनां बन्धुजनेन च । देहं धारयतीं दीनं भर्तृदर्शनकाङ्क्षया १८
भर्ता नाम परं नार्या भूषणं भूषणैर्विना । एषा हि रहिता तेन शोभमाना
न शोभते १९ दुष्करं कुरुतेऽत्यन्तं हीनो यदनया नलः । धारयत्यात्मनो
देहं न शोकेनापि सीदति २० इमामसितकेशान्तां शतपत्रायतेक्षणाम् ।
सुखार्हां दुःखितां दृष्ट्वा ममापि व्यथते मनः २१ कदा नु खलु दुःखस्य

कमलिनीप्रमाणें दिसत आहे १३. पतिशोकानें ही व्याकुल झाली असल्यामुळें, जिच्यामध्यें राहूनें चंद्राला ग्रासून टाकिला आहे अशा, पौर्णिमेच्या रात्रीप्रमाणें ही दिसत आहे आणि (पतिशोकामुळेंच) दीन झालेली ही दमयंती प्रवाह शुष्क होऊन गेलेल्या नदीप्रमाणें (सौंदर्यरहित) दिसत आहे १४. गजशुंडांचा संबंध झाल्यामुळें ज्यांतील कमलपत्रांचा व कमलांचा विध्वंस झालेला आहे व ज्याच्या तीरावरील पक्षी भयभीत झालेले आहेत अशा क्षुब्ध झालेल्या सरोवराप्रमाणें ही दिसत आहे १५. ही जात्या सुकुमार आहे; हिचे अवयव उत्कृष्ट आहेत व रत्नखचित मंदिरामध्येंच राहण्याला ही योग्य आहे. परंतु, सरोवरांतून बाहेर उपटून पडून सूर्या (च्या तापा) नें दग्ध होत असलेल्या कमलिनीप्रमाणें आज हिची स्थिति झालेली दिसत आहे १६. रूप आणि औदार्य ह्या गुणांनीं संपन्न व अलंकार धारण करण्यास योग्य असतांनाही भूषणरहित अशी ही दमयंती नील मेघांनीं आच्छादित झालेल्या आकाशांतील नव्या चंद्रकलेप्रमाणें दिसत आहे १७. प्रिय अशा भोग्य वस्तूंनीं व बंधुजनांनीं हीन असलेली ही दमयंती पतीची भेट होईल ह्या आशेनें मोठ्या कष्टानें देह धारण करून राहिलेली आहे १८. इतर भूषणें कांहीं जरी नसली तरी भर्ता हें स्त्रीचें मुख्य भूषण होय. ही त्यानें रहित असल्यामुळें जात्या देदीप्यमान असूनही सध्यां शोभत नाहीं १९. हिचा वियोग झाला असतांनाही नल जर शोकानें नाश न पावतां आपला देह धरून राहिला असेल तर त्याच्या हांतून ही अत्यंत दुर्घट गोष्ट होत आहे असें म्हटलें पाहिजे २०. कृष्ण केशाग्र आणि कमलपत्राप्रमाणें विशाल नेत्र ह्यांनीं युक्त व सुखोपभोगालाच योग्य असूनही दुःखित असलेल्या ह्या दमयंतीला अवलोकन करून माझ्याही मनाला